श्रीमहाराजांच्या वाङ्मयीन मूर्तीचे शिल्पकार

श्रीबाबाजीमहाराज पंडित

'गुरुभक्तीची परी । सांगो गा अवधारी'

वयाच्या १९ व्या वर्षी चंद्रपूरचे नारायण पैकाजी पंडित प्रज्ञाचक्षु श्रीगुलाबराव महाराजांकडे आले. १९०५ मध्ये त्यांनी आई-वडिल घरदार शिक्षण वगैरे सर्व सोडून देऊन सद्गुरुसेवेस आरंभ केला. महाराजांचे कपडे धुणे, आंघोळीस पाणी देणे, स्वतः स्वयंपाक करून महाराजांना जेऊं घालणे वगैरे लहानमोठी सर्व प्रकारची कामे जीव ओतून केलीत. जणुं ज्ञानेश्वरीतील सद्गुरुसेवा मूर्तिमंत साकार झाली.

हरिभाऊ केवले, गंगाधर मुळे वगैरे ग्रंथलेखनिकांत ते प्रमुख होते.त्यांनी महाराजांची अगदि निरपेक्ष सेवा केली पण त्यांनी महाराजांना केव्हाच काहीहि मागितलं नाही.त्यांचे ते निर्व्याज आणि उत्कट प्रेम पाहून महाराजांनी उद्गार काढले - ''मी पंडिताला वश झालो आहे''

गुरुभक्तीनं ओथंबलेल्या अन्तकरणाला आणखी काय हवं असतं? शेवटच्या वेळी तर महाराजांनी आपण होऊन आशीर्वाद दिला -

''अरे पंडित, आजवर मी तुला काही दिलं नाही. माझे ग्रंथ वाच. तुला समजतील! ''

या अमोघ शब्दांनी 'ये हृदयीचं ते हृदयी सामावलं.' पंडितांचं सारं जीवनच उजळून गेलं. त्या सोज्वळ प्रकाशात महाराजांच्या ग्रंथांची सर्व हस्तलिखिते सूक्तिरत्नावलीच्या रूपाने प्रकाशित झालीत अन् पंडितांच्या अखंड परिश्रमांनी महाराजांची वाङ्मयीन मूर्ती साकारली. दृष्ट लागावं असं अक्षरशिल्प मुद्रांकित होऊन सर्वांना उपलब्ध झाल!

मधुराद्वैताचार्य श्रीगुलाबरावमहाराज

श्रीगुलाबरावमहाराजांचे साहित्य : सूक्तिरत्नावली-यष्टीनुसार सूचि

प्रत्येक भागाला **'यष्टी'** म्हणजे गळ्यातील रत्नांचा कंठा, असे नांव आहे. एकूण २० भाग आहेत.(*) चिन्ह असलेल्या रचना सार्थ मुद्रित आहेत. (१-१-२०१३)

(यष्टि १) रु ४०

(१) भक्तिपदतीर्थामृत *
(२) निगमान्तपथसंदीपक
(३) चौसष्टी (अमृ.अ.१)
(४) ११ पत्रे (योग) *
(५) भगवद्गीतासंगति
(६) निदिध्यासनप्रकाश (योग)
(७) कान्तकान्तावाक्यपुष्पम् (संस्कृत)
(८) सूचनाप्रकरणम् - १
(९) गायत्री-अन्वयार्थ *

(यष्टी २ - पूर्वार्ध) रु.४०

(१०) कृष्णपंचपदी
(११) सद्वैजयंती (आर्या)
(१२) बाराखडी *
(१३) चित्तोपदेश *
(१४) त्रिकांडसार *
(१५) तुंबडी
(१६) चिरंजीवपदाभ्यास *
(१७) शांतिसुधाकर *
(१८) सोपानसिद्धि (योग)
(१९) नित्यतीर्थ (आळंदी-महिमा)*
(२०) मणिमंजुषा (बोधवाक्ये) *
(२१) प्रियपाहुणेर
(२२) अलौकिक प्रवास
(२३) अमोघनिरूपण (ॐकार)
(२४) स्त्रीगीत (५ अध्याय) य४
(२५) श्रीज्ञानेश्वरक्षमापनस्तोत्र
(२६) रामपंचपदी

(यष्टी २ - उत्तरार्ध) रु.५०

(२७) गुरुपंचपदी
(२८) २० पत्रे
(२९) ध्यानयोगदिवाकर (योग)
(३०) भगवद्भक्तिसौरभ (रुक्मिणी पत्रिका)*
(३१) प्रीतिनर्तन *
(३२) गोविन्दानंदसुधा / य१६ *
(३३) मातृपितृभावनाष्टक
(३४) सूचनाप्रकरण - २
(३५) पत्नप्रेमपराग

(यष्टी ३) रु.९०

प्रियलीलामहोत्सव भाग-१
(३६) आमंत्रणविलास.
श्रीभागवत : प्रथम स्कंध-विवरण
~~प्रियलीलामहोत्सव भाग २~~
~~(०) आगमनविलास~~ / य१४
(३७) सूचनाप्रकरण - ३

(यष्टी ४) रु.४०

~~(०) स्त्रीगीते अध्याय ५ / य२~~
(३८) स्त्रीगीतसंग्रह/ ओव्या १०९२

(यष्टी ५) रु.४०

(३९) अलौकिक व्याख्यानमाला (मानसशास्त्र,आधु.विज्ञानादीं)

(यष्टी ६) रु.२०

(४०) स्वमन्तव्यांश सिद्धान्त-तुषार (व्रजभाषा) प्रश्नोत्तर रूपाने स्व-अवताराचे प्रयोजन

(यष्टी ७) रु. ३०

(४१) सदतीस पत्रे
(बुवाबाजी, धर्म-सुधारक, धर्म, तत्त्वज्ञान समीक्षा, योग, भौतिक विज्ञान, स्वजाति बांधवांना विनंती इ.विषय)

(यष्टी ८) रु.६०

(४२) साधुबोध- ९३६ प्रश्नोत्तरे धार्मिक, नैतिक, सामाजिक, कौटुंबिक, पारकीय व आर्यसंबंधी प्रश्नोत्तरे.

(यष्टी ९ पूर्वार्ध) रु.१००

(४३) अभंगांची गाथा (२१५७) कीर्तनोपयोगी १९ आख्यानासहित

(यष्टी ९ उत्तरार्ध) रु.१००

(४४) पदांची गाथा (२२४४ पदे) कीर्तनोपयोगी ७ आख्यानासहित. तसेच स्तोत्रे, स्तुति, आरत्या, पाळणे, लावण्या, तुमडी व स्त्रीगीतादि अनेक प्रकारची लोकगीते

(यष्टी १०) रु.७५

(४५) प्रेमनिकुंज
मधुराद्वैत दर्शनाचे खंडन-मंडनपूर्वक उत्थाप्य शंका निरसनपूर्वक, ज्ञानोत्तर भक्तीच्या 'अनध्यस्त विवर्त' सिद्धान्ताची शास्त्रीय सिद्धी. श्रीभाऊसाहेब खापर्रेच्या अप्रतीम विवरणासह.

(यष्टी ११) रु.२५०

(४६) संप्रदायसुरतरू
(पूर्व व उत्तरविहार) ८०० पृष्ठे

(यष्टी १२) रु.५०

(४७) पत्रे व समीक्षा ४४
संस्कृत-काव्य-गद्य पत्रे व आधु. विषयांवरील समीक्षा.

(यष्टी १३) रु.५०

(४८) सुखवरसुधा.
स्वकृत ग्रंथ तारतम्ये करून कसे प्रमाण मानावे? याचे विवेचन
(४९) वेदान्तपदार्थोद्देशदीपिका
वेदान्तातील जुन्या आणि स्वनिर्मित पारिभाषिक शब्दांचे स्पष्टीकरण व श्रीभाऊसाहेब खापर्रेचे 'अध्ययन-भाष्य'.

(यष्टी १४) रु.८०

(५०) नारदीयभक्तिसूत्रभाष्य (ओवीबद्ध मराठी)
(५१) 'आगमनविलास'
प्रियलीलामहोत्सव २ रा खंड.
भागवत स्कंध २ / ओवी-भाष्य
(५२) *सांख्य-सुरेन्द्र
(कपिलांच्या ५७ सूत्रांवर ओवीभाष्य)
(५३) *सांख्य सुरेन्द्र ~~(य १७)~~ गद्य
(५४) सांख्यसार भाष्य ~~(य १८)~~ गद्य
(५५)सांख्यसूत्रांवरील विचार (य १५)
(५६) सांख्यावरील निबंध (य १५)
(५७) सांख्यकारिका निरूपण (य१८)

(यष्टी १५) रु.१००

३० अपूर्ण ग्रंथ
(५८) ईशावास्योपनिषद्
(५९) ज्ञानेश्वरी निरूपण
(६०) निगमान्तसुभा
(६१) ऐश्वर्यार्थदीपिका
(६२) ब्रह्मसूत्रव्याख्या
(६३) छंदप्रदीप
(६४) प्रमाद-कल्लोळ

१३० ग्रंथांचा व सवाशे पत्रांचा सारांश

(६५) योगप्रभाव - पद्य
(६६) हिरण्ययोग (स्वप्न योग)
(६७) पतिव्रता चरितामृत *
(६८) षट्पदध्वनि
(६९) गोपिकापादपीयूषलहरी
(७०) वेदान्त निरूपण / य१६
(७१) गान सोपान *
(७२) योगांगयमलक्षण (योग)
(७३) दुर्मत हृदयभंजन
(७४) सिद्धिसार
(७५) ईशावास्योपनिषद् गद्य
(७६) वेदान्तप्रक्रियासमुच्चय
(७७) वृत्तिक्षीरसागर
(७८) सुखपर्व (नाटक)
(....) सांख्य सूत्रावर विचार य१४
(....) एक निबंध (सांख्य) य१४
(७९) बौद्ध निबंध
(८०) आत्मचरित्र
(८१) नवीन भाषा - नावंग / लिपी
(८२) प्रश्नोत्तरे
(८३) श्री खापरेंना पत्र....
(८४) मानसायुर्वेद २ लेख *

(यष्टी १६) रु.१२०

संस्कृत रचना
(८५). अन्तर्विज्ञानसंहिता
(८६).ईश्वरदर्शनम्
(८७) समसूत्री
(८८) दुर्गातत्त्वम्
(८९) काव्यसूत्रसंहिता
(९०) शिशुबोधव्याकरणम्
(९१) न्यायसूत्राणि
(००) न्यायसूत्रविवरणम्
(९२) एकादशीनिर्णयः
(९३) पुराणमीमांसा
० पुराणमीमांसासूत्रविषयाः
० पुराणपुरुषमीमांसाभाष्यम्
(९४) आगमदीपिका
(९५) शास्त्रसमन्वयः (वृत्तिसमेतः)
(९६) युक्तितत्त्वानुशासनम्
(९७) षड्दर्शनलेशसंग्रहः
(९८) तत्त्वबोधः
(९९) स्वमतनिर्णयः
(१००) संप्रदायकुसुममधु
(१०१) ऋग्वेद टिप्पणी
(१०२) सच्चिन्निर्णयः
(१०३) गंगामात्रमृतपानम्
(१०४) भक्तितत्त्वविवेकः
(१०५) प्रियप्रेमोन्मादः
(०००) गोविन्दानन्दसुधा
(१०६) उच्छिष्टपुष्टिलेशः
(१०७) श्रीधरोच्छिष्टपुष्टिः
(१०८) नारदीयभक्तिसूत्रभाष्यम्
(१०९) बालवासिष्ठम्
(११०) मानसायुर्वेदः
(१११) भिषगिन्द्रशचीप्रभा
(११२) संस्कृत-पदानि ४१
(११३)एकादश-पत्राणि

(यष्टी १७)

समयोपदेश (सुबोध हिंदुधर्म)
(११४) सर्वमान्य धर्माची कल्पना
(शांतारामबापूंना निरूपणे)
(११५) गीतेवरील निरूपणे
(अन्नपूर्णाबाईंना)
(११६) योगवासिष्ठ (म)(रंगुताईना)

(यष्टी १८) रु.५०

समयोपदेश - स्फुट निरूपणे
(०) सांख्यसार य१४
(११७) युक्त्या
(११८) ब्रह्मसूत्र निरूपणे
(११९) बोधवाक्ये
(१२०) सुवर्णकण
(१२१) गुरुचरणकौमुदी
(१२२) बालबुद्धिविवर्धिनी
(१२३) वैद्यवृन्दावन *
(१२४) वैद्यनन्दिनी *
(१२५) भिषग्पाटवोपपत्तिः *
(१२६) नावंग-लिपी.
सांकेतिक लघुलिपी
(१२७) हरिपाठ-अर्थक्रम *
(१२८) हरिपाठ-प्रतिज्ञा *
(१२९) श्रौतक्रीडाविशेष *
मोक्षपट व खेळण्याचे नियम
(१३०) स्वसमाज-नियम
(१३१) मायर्सची समीक्षा *(अमे. तत्त्वज्ञ)*
(१३२) कुर्याभाईचे पत्र
(१३३) शिक्षण रत्नाकर
(१३४) जयविजय कथा
(१३५)नागपुरातील चर्चा (चरित्र.)
(१३६) वेदांत निरूपणे मराठी
(१३७) स्फुट निरूपणे
(१३८) ११ अभंग

(यष्टी १९) रु.६०

(१३९) मनोहरिणी (हिंदी)
हिंदीव्रजभाषेत गीताप्रवचने

(यष्टी २०) रु.१२०

(१४०) योगप्रभाव (गद्य)
पतंजलींच्या ४४ सूत्रांवर संवादरूपाने निरूपणे.

(२१) अदृश्यदीपिका
श्री. त्रिपुरवारांचे संकलन

श्रीगुलाबरावमहाराजांचे उत्तराधिकारी श्रीबाबाजीमहाराज पंडित यांचे ग्रंथ

१. आर्यधर्मोपपत्ति (रु.५०)
वैदिक हिंदुधर्माचे विस्ताराने विश्लेषण करणारा अपूर्व ग्रंथ.
२. हरिपाठ-रहस्य (रु.६०)
श्रुति- स्मृति- पुराणे व संत वचनांच्या आधारे भक्तीचे अपूर्व विवरण.
३.अमृतानुभवकौमुदी (रु.१००)
(म/हिं) शंकराचार्यांच्या अद्वैतावर उभारलेले पराभक्तिपर अनुपम विस्तृत भाष्य.
४. ज्ञाने.गूढार्थदीपिका (३००)
अर्थासह विवरण.१००० पृष्ठे
('') गीताप्रेस (रु.१२५)
('') हिंदी प्रत (रु.५००)
५. अभंगगाथा (रु.५०)
६. विविध लेखसंग्रह (रु.१००)
७. संतकथा (रु.१५)
८. पंचदशी प्रवचने
९. भागवत प्रवचने

मधुराद्वैताचार्य श्रीगुलाबरावमहाराज

श्री बाबाजीमहाराजांनी
अनुवादित केलेले ग्रंथ

१. भगवद्भक्तिसौरभ
(रुक्मिणीपत्रिका)
२. प्रीतिनर्तन
३. स्वमतनिर्णयः (रु.१०)
३. भक्तिपदतीर्थामृत (रु.१०)
४. निगमान्तपथसंदीपक
५. चित्तोपदेश (रु.५)
६. गोविंदानंद सुधा
७. कान्त-कान्ता वाक्यपुष्पम्
८. हरिपाठ अर्थक्रमासह (रु.३)
९. नारदीयभक्त्यधिकरणन्यायमाला
कै त्रिपुरवार लिखित
''श्रीज्ञानेश्वकन्यापदपांसु'' (रु.१५०)

श्रीगुलाबरावमहाराजांचे चरित्र

मूळ अधिकृत चरित्र (पृ.४३२)

o

कै. भाऊसाहेब खापरे निर्मित

(रु.३००)

१ ते १५ यष्टीतील अंदाजे २५००० नोंदी असलेला विषयसूचींचा कोश

o

डॉ.वा.ना.पंडित कृत ग्रंथ

o. शांकरतत्त्वज्ञानात भक्तीचे स्थान (पहिला पीएच.डी.प्रबंध)

o

डॉ.कृष्ण माधव घटाटे कृत

o. श्री गुलाबराव महाराजांची विचार संपदा (पीएच.डी .प्रबंध) (रु.१००)

o. १३० ग्रंथांचा सारांश (रु.२०)
(११८पत्रांसह) म./हिं.

o

डॉ.राम पंडित कृत

o. श्रीबाबाजीमहाराजांचे चरित्र

o

डॉ. अंजली खरे कृत

o. श्रीबाबाजीमहाराजांची विचारसंपदा
(पीएच.डी प्रबंध)

o

o

o

oooooooooooooooooooooooo

संपर्क :
ज्ञानेश्वर मधुराद्वैत सांप्रदायिक मंडळ, दहीसाथ, अमरावती

oooooooooooooooooooooooo

5

१३० ग्रंथांचा व सवाशे पत्रांचा सारांश

मधुराद्वैताचार्य श्रीगुलाबरावमहाराज

श्रीगुलाबरावमहाराजांचे साहित्य : विषयानुरूप सूची व अनुक्रम

6 . 1 . 2013

अनुक्रम यष्टी

सूत्रग्रंथ

१. अन्तर्विज्ञानसंहिता (सं) य १६
२. ईश्वरदर्शनम् (सं) य १६
३. समसूत्री (सं) य १६
४. दुर्गातत्त्वम् (सं) य १६
५. काव्यसूत्रसंहिता (सं) य १६
६. शिशुबोधव्याकरणम् (सं) य १६
७. न्यायसूत्राणि (सं) य १६
०० न्यायसूत्रविवरण
८. एकादशीनिर्णयः (सं) य १६
९. पुराणमीमांसा (सं) य १६
०० पुराणपुरुषमीमांसाभष्यम्

आकर ग्रंथ

१०. संप्रदाय सुरतरु, (भा.१,२) य ११

भाष्यग्रंथ

११. नारदीयभक्त्यधिकरणन्यायमाला (सं) य १६
१२. '' संस्कृतभाष्यम् (सं) य १६
१३. ना.भक्तिसूत्रभाष्य ओवी ५५८ य १४
१४. प्रियलीलामहोत्सव १ (भागवतभाष्य) आमंत्रणविलास य ३
१५. प्रियलीलामहोत्सव २ (भागवतभाष्य) आगमनविलास य १४
१६. श्रीधरोच्छिष्टपुष्टिः (सं) य १६
१७. उच्छिष्टपुष्टिलेशः (सं) य १६
१८. ब्रह्मसूत्रव्याख्या य १५
१९. ब्रह्मसूत्रावरील निरूपणे य १५
२०. निगमान्तसुभा य १५
२१. भगवद्गीतासंगति य १
२२. मनोहारिणी गीता (हिन्दी) य १९
२३. गीता निरूपणे(शांताराम) य १७
००. गीता प्रवचने (अन्नपूर्णाआईस) य १७
२४. ऐश्वर्यार्थदीपिका (ईश्वरगीता) य १५
२५. षट्पदध्वनिः य १५
२६. ईशावास्योपनिषद् (ओवी) य १५
२७. ईशावास्य - गद्य
२८. ऋग्वेदटिप्पणी (सं) य १६
२९. चौसष्टी (अमृ.अ१ वर) य १
३०.चिरंजीवपदाभ्यास य २(पू)
३१. बालवासिष्ठ (सं) य १६
३२. योगवासिष्ठ तत्त्व य १७
००. योगवासिष्ठ निरूपणे (रंगूताईस)य१८

शास्त्रग्रंथ

३३. सुखवरसुधा य १३
३४. वेदान्तपदार्थोद्देशदीपिका य १३
३५. शास्त्रसमन्वयः (सं) य १६
३६. आगमदीपिका (सं) य १६
३७. युक्तितत्त्वानुशासनम् (सं) य १६
३८. प्रेमनिकुंज य १०
३९. शांतिसुधाकर य २पू
४०. वेदान्तप्रक्रियासमुच्चय य १५
४१. वेदान्तनिरूपण य १५
४२. तत्त्वबोधः (सं) य १६
४३. षड्दर्शनलेशसंग्रहः (सं) य १६

भक्तिग्रंथ

४४. भक्तिपदतीर्थामृत (तत्त्वमसि) य १
४५. निगमान्तपथसंदीपक य १
४६. भगवद्भक्तिसौरभ य २उ
४७. प्रीतिनर्तन य २उ
४८. नित्यतीर्थ य २पू
४९. प्रिय पाहुणेर य २पू
५०. भक्तितत्त्वविवेक (सं) य १६
५१. प्रियप्रेमोन्माद (सं) य १६
५२. गोपिकापादपीयूषलहरी य १५
५३. गोविन्दानन्दसुधा (सं) य २उ

योग ग्रंथ

५४. निदिध्यासनप्रकाश य १
५५. ध्यानयोगदिवाकर य २उ
५६. सोपानसिद्धि य २पू
५७. हिरण्ययोग (स्वप्नयोग) य १५
५८. योगांगयमलक्षण य १५
५९. योगप्रभाव (पद्य) य १५
६०. योगप्रभाव (गद्य) ४४ सूत्रे य २०
६१. ज्ञाने.कुंडलिनी निरूपण. य १५

सांख्य ग्रंथ

६२. सांख्यसुरेंद्र : कपिलसूत्रओव्या य १४
६३.सांख्य सुरेन्द्र गद्य य १७
६४. सांख्यतत्त्व सूत्रविचार य १५
६५. सांख्यसार एक निबंध य १५
६६. सांख्यसार य १८ / य १४
००. सांख्यकारिका निरूपण य १८

१३० ग्रंथांचा व सवाशे पत्रांचा सारांश

संगीत ग्रंथ

६७. छंद प्रदीप य १५
६८. गानसोपान य १५

आयुर्वेद ग्रंथ

६९. मानसायुर्वेद (सं) य १६
७०. मानसायुर्वेदावर दोन लेख य १५
७१. भिषगिन्द्रशचीप्रभा (सं) य १६
७२. वैद्यवृंदोवन य १८
७३. भिषग्पाटवोपपत्तिः य १८
७४. वैद्यनन्दिनी य १८

प्रकरणग्रंथ

७५. स्वमतनिर्णयः (सं) य १६
७६. संप्रदायकुसुममधु (सं) य १६
७७. सच्चिन्निर्णयः (सं) य १६
७८. कान्तकान्तावाक्यपुष्पम् (सं) य१/य१६
७९. चित्तोपदेश य २पू
८०. सद्वैजयंती (आर्या) य २पू
८१. बाराखडी य २पू
८२. त्रिकांडसार य २पू
८३. प्रमाद कल्लोळ य १५

गाथा

८४. अभंगांची गाथा (२१५७) य ९पू
८५. पदांची गाथा (२२४४पदे) य ९उ

निबंध

८६. अलौकिक प्रवास य २पू
८७. अमोघनिरूपण य २पू
८८. बौद्ध निबंध य १५
८९. वेदान्तनिरूपण य १५ / य १८
९०. सिद्धिसार य १५
९१. अलौकिक व्याख्यानमाला य ५
९२. युक्त्या य १८
९३. गुरुचरणकौमुदी य १८
९४. स्फुट निरूपण (नीळकंठ) य १८

संवाद* व बोधवाक्ये

९५. साधुबोध * य ८
९६. मणिमंजुषा य २उ
९७. सुवर्णकण य १८
९८. स्वमंतव्यांशसिद्धान्ततुषार * य ६
९९. दुर्मतहृदयभंजन * य १५
१००. प्रश्नोत्तरे * य १५
१०१. वृत्तिक्षीरसागर य १५
१०२. बालबुद्धिविवर्धिनी * य १८

१०३.पत्रे ११४

०००. अकरा पत्रे य १
०००. वीस पत्रे य २उ
०००. सदतीस पत्रे य ७
०००. चवरेचाळीस पत्रे य १२
०००. एकपत्र (श्री खापरेंना) य १५
०००. एक पत्र (श्री कुर्याभाईना) य १८

लोकगीते

१०४ स्त्रीगीते (५ अध्याय) य २ / य ४
१०५. स्त्रीगीतसंग्रह (१०९२ गीते) य ४
१०६. तुंबडी य २पू
१०७. रुक्मिणी स्वयंवर (लावणी) य९उ
१०८. रुक्मिण-पत्रिका य ९उ

स्तोत्रे

१०९. ज्ञाने-मातृपितृ-भावनाष्टक य २उ
११०. कृष्णपंचपदी य २पू
१११. गुरुपंचपदी य २उ

चरित्र - आख्याने

११२. आत्मचरित्र य १५
११३. सूचना प्रकरण य १
००. सूचना प्रकरण य २उ
००. सूचना प्रकरण य ३

११४.आख्याने

०००. अभंगात्मक १९ आख्याने य ९पू
०००.पदात्मक ७ आख्याने य ९उ
११५. पतिव्रताचरितामृत य १५

विविधरचना

११६. सुखपर्व (भारतावर नाटक) य १५
११७. मात्रमृतपानम् (सं) य १६
११८. पत्नीप्रेमपराग चरित्र / य २उ
११९. मोक्षपट (श्रौतक्रीडापट) य १८
१२०. हरिपाठाच्या प्रतिज्ञा य १८
१२१. हरिपाठाचा अर्थक्रम य १८
१२२.ज्ञानपाठ य ९पू.
१२३. नवी भाषा 'नावंग' य १५
१२४. (,,) शब्दकोश य १५
१२५. (,,) लिपी य १८
१२६. मायर्स- टीपा व समीक्षा य १८
१२७. नागपुरातील चर्चा य १८
१२८. शिक्षणरत्नाकर चरित्र / य १८
१२९. बोधवाक्ये य १८
१३०.गायत्री-अन्वयार्थ य १
१३१.स्व-समाजनियम य १८

मधुराद्वैताचार्य श्रीगुलाबरावमहाराज

''घराघरात श्रीमहाराजांचे विचार पोचवावे.''
– भूतपूर्व पंतप्रधान श्री मोरारजीभाई

(श्रीगुलाबरावमहाराजांची विचारसंपदा' या ग्रंथाच्या विमोचन प्रसंगी)

संत श्रीगुलाबरावमहाराज यांचा माझा परिचय नव्हता. कारण मी महाराष्ट्रात होतो तेव्हा अमरावती महाराष्ट्रात नव्हती. त्यामुळे मला जेव्हा या कार्यक्रमासंबंधी सांगण्यात आले तेव्हा महाराजांच्या जीवनासंबंधी माहिती मिळविण्याचा मी प्रयत्न केला व जी काही माहिती मला मिळाली आणि त्यांच्या जीवनाचे जे पैलू मला समजले ते पाहून मला अतिशय आनंद झाला.

संतांची भूमी

या देशाला शक्ती प्रदान करणारी एक गोष्टी आहे आणि ती म्हणजे आपली संतपरंपरा ! प्रत्येक देशांत संत झाले आहेत. केवळ भारतातच ते होतात, असे नाही. मानवी समाज प्रत्येक ठिकाणी आहे. आपण तर असे म्हणतो की पक्षी असलेले काकभुशुंडीही संत होते. कावळासुद्धा संत असू शकतो, असा याचा अर्थ आहे. असे केवळ भारतातच मानले जाते, इतर कुठेही नाही. इथे जितके संत झाले तितकी बेरीज जगातल्या सर्व संतांचीही होणार नाही.

असो. संतांची परंपरा भारतातच कायम आहे. त्यांनीच आपल्या समाजाला काही महत्वाच्या अधिष्ठानावर कायम ठेवले आहे. आजही आपण बघाल, की गीतेसारखा ग्रंथ साऱ्या जगात कुठेही नाही. आपले लोक समजतात, की इंग्रजांनीच आपल्याला शिक्षण दिले. लोकतंत्रही त्यांनीच शिकविले. परंतु ऋग्वेदात लोकतंत्राचे वर्णन आले आहे त्याचे काय ?

''केवळ अध्यात्माकडेच लक्ष दिले, त्यामुळे या देशाचे पतन झाले,'' या म्हणण्यातही तथ्य नाही. पश्चिमी देशांमध्ये फक्त भौतिकतेकडेच लक्ष आहे. परिणामतः तेथे किती दुःख आहे, हे लक्षात येही कठीण आहे. शिवाय त्यांच्यापुढे एक मोठे संकट आहे की, ''यापुढे काय होणार?'' ते आपल्याकडे आशेने पाहतात आणि आपण मात्र त्यांच्याकडे डोळे लावतो.

संतांच्या जीवनापासून आपल्याला बरेच काही मिळाले आहे. संत श्रीगुलाबराव महाराज जन्मांध होते, अल्पायू होते; तरी त्यांनी किती मोठे कार्य केले! त्यांची उपलब्ध ग्रंथसंख्याच १३० सांगितली जाते. माझ्या जीवनात कदाचितच एवढे ग्रंथ मी वाचूं शकेन !

मला आनंद वाटतो की, आपण प्रज्ञाचक्षु श्रीगुलाबरावमहाराज यांची जन्मशताब्दी साजरी करणार आहात. तीन वर्षेपर्यंत आपण ती पाळणार हीही चांगली गोष्ट आहे. परंतु हा केवळ कागदी घोडा राहणार नाही अशी मी आशा करतो. त्यांचे विचार घराघरांत पोहोचविण्याचा आपण प्रयत्न करावा; तरच ती साजरी करणे सार्थ ठरेल. सर्वदूर महाराजांचे विचार आपण पसरवू शकता. याचा अर्थ असा नव्हे की, भारतातील एकूण एक घरात ते पोहोचवा. परंतु आपण जिथे आहात तिथे तरी त्या विचारांचा प्रसार होईल अशी मी आशा करतो. योग्य ठिकाणी त्यांचे विचार पोहोचले तर सर्वदूर पोहोचतील. दक्षिणेपासून उत्तरेपर्यंत, पश्चिमेकडून पूर्वेपर्यंत!

पूर्वीचे आपले संत देशातील सर्व ठिकाणी गेले आहेत. शंकराचार्य दक्षिणेचे असून ते पोहोचले काश्मीरला, पुरीला अन् द्वारकेला! आपले एकूण एक संत यात्रेच्या निमित्ताने सर्व देशभर फिरले आहेत. त्यामुळेच या देशात संस्कृतीची एकता दिसत आहे. त्यांच्यामुळेच हा विशाल देश 'भारत' म्हणविला जातो, 'एक देश' म्हणविला जातो. युरोपच्या तुलनेत पहा- जितक्या भाषा तिकडे आहेत

तितक्या साऱ्या एकट्या भारतात आहेत. परंतु युरोपला कोणी एक देश मानीत नाही. वास्तविक पाहता तेथे धर्म एकच आहे. उलट हिंदुस्थानात धर्म अनेक आहेत. आणि इथे बाहेरून जे जे आले त्याही सर्वांना येथे आश्रय मिळाला, स्थान मिळाले. उलट इंग्रजांनी येथे अडचणी निर्माण करून लढाई-झगडे सुरू केले.

आपणही असे मूर्ख की, आपसात भांडायला लागलो. परंतु आता आपल्याला समज येऊ लागली आहे. माझा असा विश्वास आहे, की, धैर्याने कार्य केले तर आपल्या देशाला पुन्हा तोच पूर्वीचा गौरव प्राप्त होईल. आपली पुन्हा प्रगती होईल. परंतु केवळ आपल्याकरिताच ती असणार नाही, उलट सर्व मानवी समाजाला पुढे घेऊन जाण्यासाठी आपली प्रगती राहील. हे महत्त्वाचे आहे.

प्रज्ञाचक्षु श्रीगुलाबराव महाराजांच्या जन्मशताब्दी समारोहाने हेच वातावरण या देशात दृढ व्हावे, अशी मी आशा करतो. याच आशेने डॉ. कृष्ण माधव घटाटे, यांच्या ''श्रीगुलाबराव महाराजांची विचारसंपदा'' या शोधप्रबंधाचे मी प्रकाशन करीत आहे.

पंतप्रधानांचे निवासस्थान, नवी दिल्ली
२० सप्टेंबर १९७८

०००

(या प्रसंगी त्यावेळचे विदेशमंत्री व माजी पंतप्रधान सन्माननीय अटलबिहारी वाजपेयी, नागपूरचे श्री बाबासाहेब घटाटे, दिल्लीचे महापौर श्री हंसराजजी गुप्ता, विश्वसंतसाहित्य प्रतिष्ठानचे अध्यक्ष प्रज्ञाभारती डॉ. श्रीधर वर्णेकर व श्रीगुलाबरावमहाराजांचे नातू बाळासाहेब मोहोड इ. मान्यवर अगत्याने उपस्थित होते.)

'गागर में सागर'
– भूतपूर्व प्रधानमंत्री अटलबिहारीजी वाजपेयी

मा. प्रधानजी का निवास स्थान,
गुरुपौर्णिमा, दिल्ली : २६-७-१९९९

''आज के इस पावन पर्वपर श्रीगुलाबरावमहाराज के जीवनी का प्रकाशन और विमोचन का शुभ कार्य हो रहा है. यह अनेक भाषाओं में अनुवादित होकर सारे पाठकों तक पहुंचना चाहिए.

श्रीगुलाबरावमहाराज इतिहास के जिस काल में हमारे में आए वह काल १९ वें शताब्दीका अंत और २० वें शताब्दीका प्रारंभ था.

उस समय भारतीय समाज में आत्मग्लानी की भावना पैदा करनेका प्रयास किया जा रहा था. पश्चिम का प्रभाव बढ रहा था.

इस अवसर पर संतों की एक मालिकानें हमारे बीचमें अवतरित होकर राष्ट्रीय निष्ठाओं को बनाएं रखा. उन्होंने आत्मविस्मृति हटाकर एक राष्ट्रीय चेतना पैदा की. यह चेतना सामाजिक, सांस्कृतिक और धार्मिक क्षेत्रों में पहले निर्माण हुई. इस चेतना से समाज को बल मिला और समाज की निष्ठाएं शक्तिशाली हुयी. भक्ति और आत्मविश्वास फिरसे लौटे, (भलेहि हम अपने स्वाधीनता को खो चुके थे) क्यों कि हमारी संस्कृति और हमारी जीवनपद्धति जिस प्रकारसे गढी गयी है, वह किसी

भी संकट का सामना करनेके लिए समर्थ है.

छोटीसी उमर में, गरीब घर में जन्म लेकर, जन्मके थोडे महिने बाद आखों की दृष्टि खो बैठने के पश्चात् भी श्रीगुलाबराव महाराजने जो कुछ योगदान दिया है, वह सचमुच में आदि शंकराचार्य महाराज की स्मृति को ताजा करनेवाला है.

समाज के लिए लेखनी उठाना और बोलकर ग्रंथों को तय्यार करना, ऐसे वह ग्रंथ लिखवाते थे. ग्रंथ में शास्त्रशुद्ध पद्धति से विषयों का प्रतिपादन; तथा खंडन करते हुए भी उनकी समन्वय की दृष्टि थी.

उन्होने भक्ति और अद्वैत का अंतर मिटाया.

ज्ञान, कर्म, भक्ति इन विषयों की हम चर्चा करते है उनका गीता में विशद रूप से उल्लेख आता है.

ज्ञान कठिन है.

ज्ञान गंभीर है.

ज्ञान शुष्क भी होता है.

ज्ञान कोरा अभिमान भी पैदा करता है.

कर्म कठिन कार्य है.

कर्म के प्रति आसक्ति होती है.

फिर उसके साथ फलपर भी दृष्टि रहती है. लेकिन् –

भक्ति इन दोनोंसें अलग खडी है.

उस में कुछ प्रप्ति का भाव नही है.

वह रसामृत से भरी हुयी है.

उस मे शुष्कता नही है.

सारे भेदों को मिटाती हुई भक्ति की लहर चलती है.

हम अपने इतिहास पर नजर डालें तों जब जब समाज का मानस कुंठित हुआ था - या थोडा निराशा में डुबा था, तों सारे देश में, केवल एक भाग में नहि, देश के सभी भागों में, सभी भाषाओं में एक भक्ति की लहर उठी थी. लोगों का मनोबल बढा था. भक्ति साहित्य की लहर से लोगों को शक्ति दियी थी.

यह शक्ति भगवान् से जुडी थी, इसलिए भक्त प्रार्थना करता था कि, ''जिन गुणोंका समुच्चय हम भगवान् में देखते है, उसमें से एक अंश, एक छोटासा अंश, हमे भी प्राप्त हो.''

इस भाव से समाज को बडी शक्ति मिली.

श्रीगुलाबरावमहाराजने मधुर भक्ति की बात की. चिंतन की एक नयी दिशा खोली. भक्ति केवल एकात्मक नहि किन्तु सर्वात्मक है. इसी के कारण सारे समाज मे जागृति पैदा हुयी.

मैं यह पुस्तक देख रहा था. बडे परिश्रम से जोशीजीने इस पुस्तक का लेखन किया है.

इसे एक संयोग ही मानना चाहिएं, कि माननीय मोरारजी भाई प्रधानमंत्री थे, यहीं पर जब श्रीगुलाबरावमहाराज के बारे में एक छोटासा प्रकाशन उन्होंनें किया था, तब भी मैं उपस्थित था. डॉ. घटाटे भी यहां कहीं उपस्थित है. (२०-९-७८)

इस पुस्तक में लिखा है कि श्रीगुलाबरावमहाराजने उनके गृहस्थाश्रम की तथा गृहकलह की

भी चर्चा की है. गृहकलह से शायदही कोई बच पाता है.

महाराजने किया हुआ पाश्चात्य अपसिद्धान्तों का खंडन यह एक अभ्यास का विषय है. किंतु खंडन करतें समय भी समन्वय की दृष्टि उन्होंने कभी नही छोडी.

फिर भी अभिनव चिंतनपद्धति से पाश्चात्यों के गलत विचारों का उन्होंने खंडन किया.

मैं सामने एक छोटीसी पुस्तिका देख रहा हूं.

पिछले पन्नेपर लिखा है कि उनको सर्वधर्मसमभाव के उपलक्ष्य में प्रश्न पूछा गया था -

यदि सर्व धर्म समान है तों अपनेहि धर्म में क्यों रहना?

सर्व धर्म समान है तों किसी और धर्म में जा सकते है.''

श्रीगुलाबरावमहाराजने उत्तर दिया कि -

सभी धर्म समान है तों अपने धर्म को छोडकर जानेकी

क्या जरूरत है?

कितना सहज और सटिक उत्तर है !

जैसा - ''गागर में सागर भर दिया है.''

लोग सर्वधर्मसमभाव का हमें बहोत उपदेश देते है - वों तो हमने गुट्टीसे पिया है. इसके लिए हमे बाहर से उपदेश लेने की आवश्यकता नही है. लेकिन ''परधर्मो भयावहः'' है. अपने धर्म पर डटे रहना यह भी एक शिक्षा है, यह भी संस्कार है.

इस तरह की बहुतसी सामग्री आपको इस पुस्तक में मिलेगी.

'मधुराद्वैत' एक गंभीर अध्ययन का विषय है. यह पुस्तक जों मराठी में है सों अन्य भाषाओं में भी आनी चाहिए. है. महाराज के विचारोंपर चर्चा होनी चाहिए. श्रीगुलाबरावमहाराज के हमारे उपर बहोत ऋण है. सभी भाषाओं में इनके बारे में जानकारी होनी चाहिए. और वह सभी दूसहुंचेगी ऐसा विश्वास है.

आज के इस पावन पर्व पर परम पूजनीय रज्जुभैय्याजी कि उपस्थिति है जिससे आज के गुरुपौर्णिमा का महत्व भी बढ गया. वो इलाहबाद में विज्ञान के प्राध्यापक के रूप मे थे. बहोत से हमारे मंत्रीमंडल के सदस्य उनके शिष्य थे. मैने विज्ञान पढा नही और यदि पढता तों उनका शिष्य होनेसे मै भी सौभाग्य तथा गौरव का अनुभव करता.

उनके उपस्थिती के लिए बहोत बहोत धन्यवाद !

- इति शम् ॥

मधुराद्वैताचार्य श्रीगुलाबरावमहाराज

समन्वयमहर्षि
– माननीय दत्तोपंत ठेंगडी,

(भारतीय मजदूरसंघाचे संस्थापक व माजी खासदार)

'युक्ती ने पटवून देण्याचा माझा बाणा आहे'

जगाच्या इतिहासात असे आढळते की, मानवजातीला उपकृत करणाऱ्या थोर पुरुषांच्या खऱ्या योग्यतेची कल्पना त्यांच्या समकालीनांना येत नाही. त्यांच्या मृत्यूनंतर कालांतराने पुढील पिढ्यांना क्रमाक्रमाने त्यांच्या विचारांची मौलिकता, व्यक्तिमत्त्वाचे उत्तुंगत्व व कर्तृत्वाचे असामान्यत्व यांचा अधिकाधिक परिचय होऊ लागतो. अशा श्रेष्ठ व्यक्तीच्या जीवनकार्याला त्यांच्या जिवंतपणी फळे येणे अशक्य असते, कारण त्यांचे लक्ष्य दूरगामी असते. त्यांनाही याची जाणीव असते. तरीपण आदर्श-प्रेरित होऊन, अंतिम यशाविषयी दृढ विश्वास असल्यामुळे असे महाभाग आपले संपूर्ण जीवन निष्काम बुद्धीने अखंड परिश्रम करण्यात व्यतीत करतात आणि ईश्वरी न्यायानुसार प्रारंभी उपेक्षित असलेल्या त्यांच्या जीवनकार्याला त्यांच्या अवतारसमाप्तीनंतर समाजाकडून क्रमशः वाढत्या प्रमाणात मान्यता मिळू लागते. अशा अलौकिक श्रेष्ठ पुरुषांत श्रीगुलाबराव महाराज यांची गणना होते.

महाराजांची अलौकिकता

श्री ज्ञानेश्वर, शंकराचार्य किंवा ख्रिस्त यांच्याप्रमाणेच श्रीगुलाबरावमहाराजांनीही आपला जीवनग्रंथ लवकरच आटोपला. वयाच्या केवळ चौतिसाव्या वर्षी त्यांनी महाप्रयाण केले. ते नऊ महिन्याचे असताना त्यांना कायमचे अंधत्व प्राप्त झाले. बालपणी घरचे किंवा आसमंतातील वातावरण व्यक्तिमत्वाच्या विकासाला अनुकूल असे नव्हते. या पार्श्वभूमीवर त्यांच्या अत्युच्च अध्यात्मसाधनेचा व अफाट ज्ञानाजर्नाचा विचार केला की, मन आश्चर्याने थक्क होते.

जवळजवळ जन्मांध असलेल्या या गरीब व्यक्तीने पाश्चात्य विज्ञान व विचारप्रवाह तसेच विभिन्न वैदिक व अवैदिक मतांचे अचूक, मार्मिक व तौलनिक ज्ञान इतक्या लहान वयात कसे प्राप्त करून घेतले असेल !

श्रीमहाराजांनी पाश्चात्यांचेच शब्द वापरून भारतीय नीतीशास्त्र कसे मांडता येते हे दाखवून दिले व युरोपीय आणि भारतीय नीतित्त्वांची तुलना करून भारतीय नीतितत्त्वांचे श्रेष्ठत्व सिद्ध केले.

शूद्रवर्ण मूळ ब्राह्मणांपैकीच होता. आर्य बाहेरून आले नाहीत, ते भारताचेच मूळ निवासी होते, आर्य शब्द वंशवाचक नसून गुणवाचक आहे व पूर्वीसर्व विश्वात एकच वैदिक-आर्यसंस्कृती नांदत होती, हे त्यांनी आव्हानपूर्वक सिद्ध केले.

परक्यांचे अंधानुकरण न करता व राष्ट्राच्या मूलभूत श्रद्धांना धक्का न लावता हिंदूंनी समाजसुधारणा कशी करावी, ह्याविषयी त्यांनी कालोचित मार्गदर्शन केले.

आर्य भौतिक शास्त्रांच्या खंडित परंपरेचे पुनरुज्जीवन कोणत्या प्रकारे करावे, हे त्यांनी विशद केले व *आधुनिक बुद्धिवाद्यांना आश्वासन दिले की, आपली कल्पना जरी सध्या बाल्यदशेत आहे तरी टिटवीप्रमाणे प्रयत्न केल्यास अशक्य काहीच नाही.

*या सर्वांना वैशेषिक शास्त्राची जोड दिली. म्हणजे खरोखरीच मोठे आणि पाश्चात्य भौतिक विज्ञानाला सर्वथा मूळरूप असलेले स्वयंपूर्णआर्यभौतिकशास्त्र तयार होईल. आणि ते भौतिकशास्त्र नास्तिक मत खंडन करणारे व 'ईश्वराचे अधिष्ठान असलेले भौतिकशास्त्र' राहील.

समन्वय सिद्धान्त

पाश्चात्य तत्त्वज्ञानातील उक्रांतिवाद, अणुवाद, संशयवाद आदि आणि धार्मिक क्षेत्रातील निरनिराळी वैदिक मते, तसेच जैन, बौद्ध, पारसिक, महंमदीय, ख्रिश्चन आदि मते या सर्वांविषयी त्यांनी अधिकारवाणीने नवीन व मूलगामी विचार प्रकट केले व समकालीन पाश्चात्य विद्वानांच्या प्रमेयांचे समर्थपणे खंडन केले.

सांख्य, योग, न्याय, वैशेषिक, पूर्वमीमांसा व उत्तरमीमांसा, या सहाही दर्शनांवर भरपूर लिखाण करून त्या प्रत्येकांत त्यांनी मौलिक भर टाकली. सांख्य, योग, वेदान्त आणि भक्ती ही सर्व एकमेकांना पूरक आहेत, त्यांत जो विरोध वाटतो तो पातळीचा विरोध आहे, अंतर्गत विरोध नाही, हा अभिनव समन्वयात्मक सिद्धांत त्यांनीच प्रथम प्रतिपादन केला.

तसेच पूर्वमीमांसेतील अनीश्वरवादाने खंडन, वेदांच्या नित्यतेसंबंधी मतांचे आंशिक निराकरण आणि मंत्ररूप देवतावादाचे निरसन करून त्यांनी उत्तरमीमांसेप्रमाणे ईश्वरत्वसिद्धी, देवतांचे विग्रहस्वरूप आणि वेदांची ईश्वराकडून उत्पत्ती वगैरे सप्रमाण सिद्ध केली. तसेच यज्ञीय हिंसेचे तात्पर्य अहिंसेत आहे, हे विशद केले.

अनध्यस्त विवर्त या नवीन शब्दाची निर्मिती करून त्याच्या साहाय्याने शंकरायार्चांच्या अद्वैत सिद्धांतावर भक्तिशास्त्राची मांडणी त्यांनी केली. सगुण-निर्गुण,साकार-निराकार यांतील भेद समाप्त केला. उपासना व भक्तीतील फरक नव्यानेच स्पष्ट केला व भक्तिशास्त्रात नवीन मोलाची भर टाकली.

विभिन्न वैदिक संप्रदायात त्यांनी समन्वय स्थापन केला. तसेच वैदिक मतांबरोबर बौद्ध व जैन मतांचा मूळ हिंदू धर्माशी असलेला समन्वय त्यांनी स्पष्ट केला.

ख्रिश्चन मत, बौद्धमत व भागवत धर्म यांचा परस्परसंबंध उलगडून दाखविला व ख्रिस्तीधर्म आर्य ऋषींनीच प्रवर्तित केलेला धर्म आहे, अशी ग्वाही दिली.

राजकीय द्वेषामुळे व व्यावहारिक दुर्गुणांमुळे हिंदू-मुसलमांनाच्या लढाया झाल्यात परंतु धार्मिक द्वेष हिंदु-मुसलमानांत कधीच राहू शकत नाही असे त्यांनी घोषित केले. ते म्हणतात,

''आम्ही त्यांच्या धर्मात ढवळाढवळ करीत नाही म्हणून
त्यांनी आमच्या धर्मात हात घालू नये, असे हिंदूंना वाटते.
हिंदूंच्या धर्मात ढवळाढवळ केली तरी हिंदूंनी उगे रहावे, म्हणजे
हिंदुत्व नाहीसे करावे की काय?''

हिंदू-मुसलमानांच्या धर्मतत्त्वातील साम्यस्थळे दाखवून ते म्हणतात,
''मुसलमान धर्म उत्पन्न होण्यापूर्वी अरबस्थान, अफगाणिस्थान वगैरे देशांत आर्य धर्मच होता, पण धार्मिक आचारक्रिया सुटल्यामुळे परमेश्वराने पतित लोकांना पुनः परमार्थ मार्गावर आणण्यासाठी मुसलमानी धर्म उत्पन्न केला, असे इतिहासावरून आणि आपल्या पुराणांवरून अनुमान करता येत असल्यामुळे व्यापक अशा हिंदू धर्माशी या मुसलमान धर्माचा सहज समन्वय होतो.''

श्रीगुलाबराव महाराजांच्या या विलक्षण समन्वय-क्षमतेमुळे त्यांना समन्वयमहर्षी ही उपाधी देणे उचित ठरेल. सद्यःकालीन राजकारणाची धुळवड शांत झाल्यानंतर त्यांच्या या गुणांचा राष्ट्रनिर्मितीच्या कार्यालफार मोठा उपयोग होणार आहे, यात शंका नाही.

समतोल प्रतिपादन

भारतीय व पाश्चात्य राष्ट्रकल्पनेविषयी ते लिहितात, ''आर्य धर्मातील राष्ट्रकल्पना जगांतील सर्व देशांपेक्षा वरचढ आहे हे म्हणणे अभिमानाचे नाही तर निःपक्षपातीपणाचे आहे. आपल्याकडे जित देशांतील चांगल्या व्यक्तीला होमरूल देण्याची पद्धत होती तर पाश्चात्यांची होमकुंडात घालण्याची पद्धत होती आणि अजूनही आहे.''

त्यांच्या प्रतिपादनांतील समतोलपणा वाखणण्यासारखा आहे. मनुष्यामनुष्यातील जन्माधारित उच्चनीचतेचा निषेध करूनही प्राचीन वर्णाश्रम व्यवस्थेचे शास्त्रीय स्वरूप त्यांनी सिद्ध केले.

धर्माच्या नावाखाली चाललेल्या बुवाबाजीवर कठोर हल्ला करूनही त्यांनी गुरूवरील श्रद्धेला बळकटी आणली.

प्रत्येक मत-संप्रदायातील तर्कविसंगत भागांवर कडक टीका करूनही कुणाचाही बुद्धिभेद किंवा श्रद्धाभंग होणार नाही याची कुशलतेने काळजी घेतली.

आपले जीवनकार्य पार पाडण्याच्या प्रयत्नात या अशिक्षित अंध सत्पुरुषाने मराठी, हिंदी व संस्कृत या भाषांत सव्वाशेच्यावर गद्य-पद्यात्मक ग्रंथांची रचना केली.

या साहित्यात, संगीत, व्याकरण, आयुर्वेद, काव्य, मानसशास्त्र, मानसायुर्वेद आदि विविध विषयांचाही त्यांनी आपल्या मौलिक पद्धतीने परामर्श घेतला आहे.

नवीन नावंग भाषेची निर्मिती केली आहे.

लघुलिपीची (सांकेतिक लिपीची) निर्मिती केली आहे.

१२३ नवीन मात्रावृत्तांची योजना केली आहे. वऱ्हाडी व व्रजभाषेचा उपयोग केला आहे.

लोकगीतांची निर्मिती केली आहे आणि कौटुंबिक समस्या व शिक्षणविषयक प्रश्नांवर प्रकाश टाकला आहे.

त्यांच्या साहित्यसंपदेत २५०० अभंग, १२५० गीते, २३००० ओव्या, २५०० पदे व १००० श्लोक यांचा समावेश होतो. एकूण पृष्ठसंख्या ६००० हून अधिक आहे. हे सर्व ध्यानात घेतल्यास साहित्यसम्राट तात्यासाहेब केळकरांच्या पुढील विधानाची सत्यता पटते.

'महाराजांचे ग्रंथ म्हणजे एक मोठा ज्ञानकोश झाला आहे.''

असाधारण अधिकार

परंतु विद्वानांनाही स्तिमित करून सोडणारी विद्वत्ता हे श्रीगुलाबराव महाराजांचे प्रमुख वैशिष्ट्य नव्हते. त्यांच्या श्रेष्ठत्वाचा स्थायी व भक्कम आधार होता आध्यात्मिक क्षेत्रातील त्यांचा असाधारण अधिकार. मुकुंदराज-ज्ञानेश्वरांपासून रामदास-तुकारामांपर्यंत महाराष्ट्रात अखंड्वालत आलेल्या संतपरंपरेचे त्याचेनंतर जवळजवळ २५० वर्षानंतर श्री गुलाबराव महाराजांच्या रूपाने पुनरुज्जीवन झाले, असे म्हटल्यास ती अतिशयोक्ती होणार नाही. गीतेत म्हटले आहे की,

'शुचीनां श्रीमतां गेहे योगभ्रष्टोऽभिजायते'

विदर्भातील माधानाचे पाटील श्री. गोंदूजी मोहोड व त्यांची धर्मपरायण पत्नी सौ. अलोकाबाई यांचे घराला वरील वर्णन निश्चितपणे लागू पडते. स्वतःच्या आजोळी अमरावती जवळील लोणी टाकळी या गावी शके १८०३ मधील आषाढ शुद्ध दशमीला महाराजांनी सौ. अलोकाबाईंच्या पोटी जन्म घेतला. जन्मतःच त्यांचा ओढा पारमार्थिक गोष्टींकडे होता. अवघ्या नवव्या महिन्यात झालेल्या दृष्टिनाशामुळे, किंवा वयाच्या चवथ्या वर्षी झालेल्या मातृवियोगामुळे, अथवा बाराव्या वर्षी झालेल्या विवाहामुळेही

त्यांच्या या मूळ प्रवृत्तीत यत्किंतही विचलता आली नाही.

ईश्वरभक्तीचे वेड जन्मजात असल्यामुळे बाल्यावस्थेपासूनच आपल्या तीव्र ०००० रणशक्तीचा व धारणाशक्तीचा उपयोग त्यांनी शास्त्राध्ययन व अध्यात्म-चिंतनाकरिता केला. तर्काधिकष्ठित बुद्धिवाद व सूक्ष्म-कोमल भावनोत्कटता यांच ००००मधुर व अभूतर्पूवसंगम त्यांचे ठायी असल्याचा प्रत्यय त्या वयातही निकटस्थांना येत असे.

संसारसुखाविषयी पूर्ण विरक्ती व ईप्सितसिद्धीसाठी वाटेल परिश्रम घेण्याची सिद्धता या गुणांचाही परिचय या काळापासून होऊ लागला होता. पूर्वसुकृत व वर्तमान साधना यांच्या संयोगामुळे १६ वे वर्ष लागण्यापूर्वीच समाधीस्थितीपर्यंत त्यांची प्रगती झाली होती. अध्ययन करण्याकरिता त्यांना विलक्षण कष्ट घ्यावे लागत. दुर्मिळ पुस्तकांचा पाठलाग करणे व इतरांकडून ती वाचून घेणे हे किती जिकिरीचे काम! प्रारंभिक काळात ज्ञानाच्या साधनांच्या शोधात त्यांना सहकुटुंब गावोगावी फिरावे लागले व पुढील काळात स्वमतप्रतिपादनाकरिता हे भ्रमण त्यांना आणखी वाढवावे लागले.

इ. स. १९०१ मध्ये श्री ज्ञानेश्वरमहाराजांनी त्यांना आपल्या स्वनामाचा मंत्र दिला. त्यानंतर त्यांना ऊहबुद्धी-सिद्धीची स्फूर्ती प्राप्त झाली. इ. स. १९०३ साली त्यांनी शुक्लेश्वर वाठोडा येथे भागवतातील दशमस्कंधात सांगितलेल्या कात्यायनी देवीच्या मंत्राची दीक्षा घेतली व माधुर्यभक्तीला अनुकूल असा कात्यायनी महोत्सव सुरू केला.

नवा संप्रदाय

इ. स. १९०८ मध्ये त्यांनी शिवदीक्षा घेऊन पार्थिव पूजेस प्रारंभ केला व इतरांनाही नित्य पार्थिव पूजेचा नियम घालून दिला. यानंतरचा उर्वरित काळ भजन, पूजन, प्रवचन, ग्रंथरचना, स्वमतप्रचार यांतच त्यांनी घालविला. व इ. स. १९१५ च्या भाद्रपद शुद्ध द्वादशीला २० सप्टेंबर १९१५ या दिवशी सूर्योदयाच्या मंगल समयी त्यांनी ब्रह्मस्थानी प्रस्थान केले.

या अल्प कालावधीत त्यांनी स्वतः अध्यात्मिक क्षेत्रांतील अत्युच्चपद प्राप्त करून घेतलेच, परंतु त्याचबरोबर हजारो लोकांना या क्षेत्रात मार्गदर्शन केले. अनेक लोकांना स्वतः दीक्षा दिली. सर्व मतसंप्रदयांच्या अनुयायांची त्यांच्या त्यांच्या मतांविषयीची श्रद्ध ०००० बळकट केली.

प्रत्येक मताला तर्काच्या कसोटीवर घासून त्यांतील ग्राह्याग्राह्य भागाचा निवाडा केला. कुणाचाही किंचितही श्रद्धाभंग होऊ न देता, सर्व संप्रदयांचे महत्त्व स्वीकार करूनही त्यांनी शांकराद्वैत व वेदापासून चालत आलेल्या माधुर्यभक्तीचा अधिकार आत्मज्ञानसंपन्न व्यक्तीसाठीच मर्यादित करून संप्रदायातील संभाव्य विकृतींना मुळातच आळा घातला.

स्वतः विधिपूर्वक संप्रदायाच्या व्रतनियमांचे पालन करून इतरांना तसे करण्याची प्रेरणा दिली व संप्रदायाला आधारभूत अशी ग्रंथसंपत्ती निर्माण करून त्याचा भक्कम पाया घातला.

श्री ज्ञानेश्वरमधुराद्वैत संप्रदाय ही महाराजांनी समाजाला दिलेली मोलाची देणगी आहे व ही देणगी सर्व-संप्रदाय समन्वयाच्या अधिकारी द्रष्ट्याने दिलेली आहे, हे विशेष.

उण्यापुऱ्या तीन दशकांचे हे कार्यकारी जीवन किती लोकोत्तर उपलब्धींनी भरलेले आहे. त्याच्या सर्व पैलूंचे समग्र दर्शन घडविणे इथे शक्य नाही व ते अभिप्रेतही नाही. इतके मात्र खरे की, या जीवनाच्या सखोल अध्ययनाने राष्ट्र-धर्म-संस्कृतीच्या अभिमान्यांना एक नवीन प्रेरणा प्राप्त होऊ शकेल.

* * *

मधुराद्वैताचार्य श्रीगुलाबरावमहाराज

श्रीगुलाबरावमहाराजांच्या जीवनाचा आलेख

* नाव : श्री गुलाब गोंदुजी मोहोड, मु. माधान इ.स. १८८१ ते १९१५.
* माता - पिता : श्री गोंदुजी व सौ. अलोकाबाई मोहोड.
* ६ जुलै १८८१, आषाढ शु. १०. अमरावतीजवळ लोणीटाकळी येथे जन्म.
* नवव्या महिन्यत अंधत्व आणि अल्पायुषी : वय चौतीस वर्षे.
* वयाची पहिली चार वर्षे माधानला वास्तव्य.
* इ.स. १८८५ : मातृवियोग
* त्यानंतरची सहा वर्षे आजोळी-लोणीटाकळीला वास्तव्य.
* या काळात प्रज्ञाचक्षुत्वाचा प्रत्यय.
* यांनतरचा इ.स. १९०० पर्यत माधानाच्या घरी वास्तव्य. या काळात दैवी गुणांचा उदय आणि सर्वज्ञतेचा परिचय. लोकांकडून ग्रंथ वाचवून घेण्यासाठी आत्यंतिक परिश्रम.
* इ.स. १८९६ : विवाह. पत्नी : सौ. मनकर्णिका.
* इ.स. १८९७ पासून निबंध व अभंगांची रचना, आनंदमार्ग खंडन. पितृवियोग
* इ.स. १९०० बालसवंगड्यांना अनुग्रह सिरसगाव, चांदूरबाजार, यावली इत्यादी ठिकाणी लोकोद्धारासाठी भ्रमंती. घरच्या विषप्रयोगादि कटकटींना कंटाळून आणि पाटीलकीवर पाणी सोडून गृहत्याग..
* इ.स. १९०१ श्रीज्ञानेश्वरमाउलीचा साक्षात् अनुग्रह.
* इ.स. १९०२ - ग्वाल्हेरचे स्वानंदसाम्राज्यकर्ते श्रींमत जठार यांना पत्र. त्यात *मानभावमत समीक्षा, * डार्विन मतसमीक्षा, * स्पेन्सरमत समीक्षा केली. *स्त्रीगीते या झोपाळ्यावरील व जात्यावरील लोकगीतांची रचना. * पंढरपूर यात्रा. * अमरावतीला आगमन. * हरिभाऊ केवले या शिष्योत्तमाची भेट.
* इ.स. १९०३ - * कात्यायनी व्रताचा आरंभ. देऊवाडा
* इ.स. १९०४ - * पूर्वजन्म - गुजरातेतील झुंझुरवाडा येथील सत्पुरुष बेचरानंदस्वामीसंबंधी संस्मरण. * आर्वीचे सत्पुरुष दामोदर आपाजी महाराज यांची भेट. * ज्ञानेश्वरीच्या निरूपणास आरंभ- * ज्ञानेश्वरीतील उपलब्ध प्रतीत नसलेली ओवी सांगितली.
* माधुर्यामृतसागरास भरती, * विविध विषयावर निरूपणे, बालसवंगडी व प्रथम शिष्य असलेल्या रामचंद्रबापूंना मृत्युसमयी दिलेल्या सूचना. * आळंदीवारीचा आरंभ. * स्त्रीव्रतांचा आरंभ. * रुक्मिणी स्वयंवराची रचना.
* इ.स. १९०५ - * महाराजांचा श्रीकृष्णाशी विवाह. * श्रीकृष्णमूर्ती व ज्ञानेश्वरमाउलीच्या पादुकांची प्राप्ति. * नित्यपूजा. * प्रियशिष्य आणि उत्तराधिकारी नारायण पंडितांशी भेट.
* मुला-अनंत यांचा जन्म. * ल. रा. पांगारकरांची व लोकनायक बापूजी अणे यांची भेट.
* इ.स. १९०७- *नागपूर येथे ज्ञानेश्वर मृद्रणालयाची स्थापना, व ग्रंथछपाईला आरंभ.
* जगदीशचंद्र बोसांच्या ग्रंथांची समीक्षा. * कलकत्ता येथे प्रा. प्रियनाथ मुकर्जीकडे मुक्काम.
* जगन्नाथपुरीयात्रा. * मायर्सच्या ग्रंथाची समीक्षा. * योगप्रभाव निरूपणे. चित्तोपदेश व सद्वैजयंतिरचना. * शिवपार्थिवपूजनाचा आरंभ. * प्रियलीलामहोत्सवादि ग्रंथांची रचना.
* इ.स. १९०९ - * अंतर्विज्ञानसंहिता, * अलौकिक व्याख्यानमालादि ग्रंथ-रचना.

* वृन्दावनाची यात्रा.
* इ.स.१९१० - * डॉ.मुंजेना पत्र,* न्याय वैशेषिकातून भौतिक विज्ञानासंबंधी मार्गदर्शन. * साहित्यसम्राट न.चि.केळकरांशी भेट.
* इ.स.१९११ ते १९१३- विविध विषयांवर पत्रे, लेख व अनेक ग्रंथांची निर्मिती.
* इ.स.१९१४ - * श्रीनिवृतिनाथांचा दृष्टांत, * देवासच्या राजांशी पत्रव्यवहार व देवासभेट.* संगीतकार पं.भातखंडेशी चर्चा व गानसोपानाची रचना.* धुळ्याचे सत्पुरुष बाबा गर्दे यांचेशी भेट.
* २० सप्टेंबर १९१५ - भाद्रपद शु.१२, पुणे मुक्कामी चाकण ऑइलमिलच्या परिसरातील घरातून महाप्रयाण.

कार्याचा आलेख

* नवव्या महिन्यात अंधत्व
* गोपीभाव : ज्ञानेश्वकन्या आणि कृष्णपत्नी.
* शांकर अद्वैत आणि भक्तीचा पूर्ण समन्वय.
* भक्तिशास्त्राची निर्मिती.
* भक्तीच्या नव्या १६ प्रकारांची मांडणी.
* ज्ञान, उपासना आणि भक्तीतील भेदविवेचन.
* माधुर्यभक्तीवरील आक्षेपांचे निराकरण आणि तिच्या सर्वोच्चतेचे शास्त्रीय प्रतिपादन.
* भगवद्विग्रहाचे अनध्यस्तविवर्तत्व : वेदान्तातील नवीन परिभाषा.
* नाममहात्म्य अर्थवाद आहे या आरोपाचे सविस्तर खंडन.
* योगी, ज्ञानी व भक्त यांच्यातील सूक्ष्म भेदांचे प्रतिपादन.
* धर्म आणि तत्वसमन्वयाच्या नऊ प्रकारांचे विवेचन.
* षड्दर्शने परस्परविरोधी नसून परस्परपूरक आहेत याची नवीन संदर्भात मांडणी.
* सांख्य सेश्वर आहे याची सप्रमाण सिद्धी.
* आधुनिक योग्यांच्या चुकीच्या संकल्पनांचे खंडन.
* योगदर्शनात अनेक नवीन प्रक्रियांची निर्मिती.
* स्वप्नातून परमार्थ प्राप्तीची प्रक्रिया.
* आन्तर् आणि बाह्य समाधीचे नवे मूलगामी विवेचन.
* पूर्वमीमांसेचे काही अंशी खंडन व उत्तरमीमांसेसाठी तिचा उपयोग.
* उत्क्रांतिवाद, अणुवाद, अज्ञेयवाद, संशयवाद वगैरे पाश्चात्यतत्त्वज्ञानांची भारतीयसिद्धांताशी तुलना आणि मूल्यमापन.
* नीतिशास्त्रातील युरोपियन मतांचे खंडन.त्यांचा भारतीय नीतीशी वेगळ्या रीतीने समन्वय आणि दैनंदिन सदाचाराचा उपदेश.
* पाश्चात्य आणि भारतीय मानसशास्त्रांशी तुलना.
* ॲलोपॅथी व आयुर्वेदाची तुलना आणि मानसायुर्वेदाची निर्मिती.
* इस्लाम, ईसाई, पारशी, बौद्ध, जैन, वगैरे सर्व वैदिक धर्माच्या शाखा आहेत या सिद्धान्ताचे

प्रमाणपुरस्सर शास्त्रशुद्ध विवेचन.

* वर्णाश्रम व्यवस्थेचे मूल्यमापन.
* ब्राह्मण-ब्रह्मणेतरवाद आणि आर्य-अनार्य वादासंबंधी तौलनिक विवेचन.
* लो. टिळक, विवेकानंद, रामतीर्थं वगैरेंच्या काही मतांची परखड चिकित्सा.
* बुवाबाजीचा दंभस्फोट.
* धर्मसंकर, धर्मसुधारणा आणि धर्मसमन्वय यातील भेद विवेचन.
* वेदांवर आणि पुराणांवर समन्वयात्मक सूत्रग्रंथांची रचना.
* प्राचीन आर्यांची विविध शास्त्रे आधुनिक विज्ञानाचे आणि तत्त्वज्ञानांचे मूळ स्रोत असल्याचे युक्तिसिद्ध प्रतिपादन.
* न्याय वैशेषिकातून प्राचीन आर्यांचे भौतिक विज्ञान कसे विकसित करावे याचे मार्गदर्शन.
* मनोविज्ञान, काव्यशास्त्र, संगीत, आयुर्वेद वगैरे शास्त्रांचे षड्दर्शनानुसार प्रस्तुतीकरण.
* इतिहास कोणी कसा लिहावा आणि कोणत्या इतिहासावर विश्वास ठेवावा याचे मार्गदर्शन.
* आर्य वंश नाही, आर्य बाहेरून आले नाहीत, शूद्र वर्ण हा आर्यांचाच भाग आहे या ऐतिहासिक सिद्धांतांचे मुद्देसूद प्रतिपादनः लो. टिळकांच्या उत्तरध्रुवीय मताचा परामर्श.
* तीन हजार वर्षापूर्वी आर्य संस्कृती विश्वव्यापक होती या ऐतिहासकि सिद्धान्ताची पुनर्स्थापना.
* डार्विन, स्पेन्सर, ॲनीबेझंट वगैरेंच्या उत्क्रांतिवादाचे खंडन.
* सुधारणा आणि बहुमत यांचे संबंधीपरखड विचार.
* शिक्षणासंबंधी मूलभूत विचार.
* प्राचीन व अर्वाचीन संगीताची तुलना,भातखंडेंचे खंडन व तात्त्विक प्रश्नांचा उहापोह.
* प्राचीन सूत्र कायम ठेवून नवीन साहित्यशास्त्राची निर्मिती.
* ''प्रक्षिप्त आणि भाषाभिन्नतेकडून लेखकभिन्नता'' हे आधुनिक संकेत संत किंवा आर्ष वाङ्मयाला लागू पडत नाहीत याचे स्व-उदाहरणावरून प्रतिपादन.
* कौटुंबिक व सामाजिक संबंधात प्रश्नोत्तर रूपाने मार्गदर्शन.
* मुलांसाठी उपदेश.
* स्त्रियांसाठी खास गीतांची निर्मिती.
* लोकगीतातून समाजप्रबोधन.
* नवीन १२३ मात्रावृत्तांची रचना.
* नवीन लघुलिपीची (सांकेतिकलिपी) निर्मिती.
* नवीन 'नावंग' भाषेची निर्मिती.
* नवीन व्याकरण सूत्रे.
* आत्मचरित्र लेखन.
* नाटक लेखन.
* आख्यानांची रचना.
* खेळातून परमार्थप्राप्तीचा उपाय : मोक्षपट.
* संस्कृत, हिंदी, मराठी, वऱ्हाडी आणि व्रजभाषेत एकूण १३० ग्रंथांची रचना.
  * अभंग - २०९९, * पदे - २२५२, * गीत - १२५०, * श्लोक– १०००,
  * ओव्या - २३०००, * एकूण पृष्ठे ६०००.

० ० ०

श्रीगुलाबरावमहाराजांचे विविध ज्ञानक्षेत्रातील नवे योगदान

तत्त्वज्ञान हा शब्द प्रामुख्याने वेदान्ताला लागत असला तरी सर्व शास्त्रातील तात्त्विक भूमिकांचा तत्त्वज्ञान क्षेत्रात अंतर्भाव केला जातो. त्यामुळे संत श्रीगुलाबराव महाराजांनी निरनिराळ्या ज्ञानक्षेत्रातील तात्त्विक भूमिकांचा जो उहापोह केला आहे, त्यासंधाने त्या सर्वांचा आढावा घेणे उचित राहील. विदर्भात १८८१ ते १९१५ या कालखंडात संत श्रीगुलाबराव महाराज होऊन गेले. त्यांना वयाच्या ९ व्या महिन्यात अंधत्व आले. त्यांचा काळ अव्वल इंग्रजी गुलामगिरीचा होता. तत्कालीन पराभूत अस्मितेच्या भारतीय जनमानसात पाश्चात्यांचे विज्ञान, तत्त्वज्ञान आणि नीती यांना अति गौरवाचे स्थान होते. अशावेळी पाश्चात्य तत्त्वज्ञानातील फोलपणा तुलनात्मक रीतीने निदर्शनास आणून देण्याचे आणि भारतीय शास्त्रांचे श्रेष्ठत्व निखळ युक्तिवादाच्या साह्याने पटवून देण्याचे अत्यंत मोलाचे कार्य प्रज्ञाचक्षु श्रीगुलाबराव महाराजांनी केले. त्यांनी तर्कवादाच्या कठोर चौकटीत असंख्य प्रमाणे देऊन अनुभवाच्या आधारावर सूक्ष्म विश्लेषण करून अनेक शास्त्रांवर आपली मुद्रा उमटविली. म्हणूनच साहित्यसम्राट नरसिंह चिंतामण केळकरांनी त्यांना ''ज्ञानाचा एनसायक्लोपीडिया'' म्हटले. आन्तर्राष्ट्रीय कीर्तीचे संस्कृत महाकवि प्रज्ञाभारती श्री. भा. वर्णेकरांनी ''प्रज्ञाचक्षू'' म्हटले तर श्री. दत्तोपंत ठेंगडी यांच्यासारख्या सामाजिक विचारवंतांनी त्यांचा ''समन्वयमहर्षि'' म्हणून गौरव केला. महाराजांनी भारतातील प्राचीन शास्त्रांना नव्या संदर्भात दिलेली तत्त्वज्ञानाची बैठक पाहता त्यांना केवळ विदर्भाचे म्हणणे, हे संकुचितपणाचे ठरेल. जसे शंकराचार्य केरळचे असूनही संपूर्ण भारताचे आहेत. श्रीराम अयोध्येचे, श्रीकृष्ण द्वारकेचेव बुद्ध पाटलीपुत्राचे असूनही सर्व विश्वाचेआहेत, तसेच श्रीगुलाबराव महाराजांचे व्यक्तिमत्व वैश्विक असले तरी विदर्भाने त्यांचा अभिमान धरणे स्वभाविकच आहे. म्हणून तत्त्वज्ञानक्षेत्रांतील विदर्भाच्या योगदानासंबंधाने महाराजांच्या विचारांचा परामर्श संक्षेपाने येथे घेतला आहे.

अध्यात्म

विदर्भातील नाथ, वारकरी, दत्त, गाणपत्य, देवीवगैरे बहुतांश संप्रदायांतून (महानुभवादि) सोडून उपास्य दैवते आणि उपासना पद्धती भिन्न भिन्न असल्या तर बहुतांश सर्वांनी शंकराचार्यांचे अद्वैतच स्वीकारले आहे.पण त्यांनी भक्तिसाठी स्वीकारलेले 'आहार्य द्वैत' गौण आहे अशी बहुतांश विचारवंतांची धारणा आहे. त्यामुळे तत्त्वज्ञानाला आलेला तो रुक्षपणा काढून टाकून सर्व संतांनी स्वीकारलेल्या अद्वैत ज्ञानोत्तर परमप्रेमरूपा पराभक्तीची जोड अद्वैत तत्त्वज्ञानाला महाराजांनी दिली. तर्ककर्कश युक्तिवादाच्या चौकटीतून शुद्ध शांकर अद्वैताच्या भूमिकेतून पूर्वपक्ष, उत्तर पक्ष, 'मध्यस्थ' आणि महाराजांनी मांडलेला नवा 'सिद्धान्त पक्ष' अशा विशेष शास्त्रीय पद्धतीने महाराजांनी भक्तिसिद्धांताची स्थापना केली. त्यामुळेमुकुंदराजांपासून ज्ञानेश्वर, एकनाथ, तुकाराम, रामदास आणि विदर्भातील देवनाथांपर्यंत सर्व संताची भक्ति आणि शांकर अद्वैत यांची एकरूपता स्पष्ट झाली आहे.

शांकरज्ञानसंयुक्तं भगवद्भक्ति-अलंकृतम् ।।
यद्वाक्यं तत्प्रमाणं स्यादिति स्वमतनिर्णयः ।।

हे करताना महाराजांनी प्रेमानिकुंज ग्रंथात वेदान्ताचे ११ पूर्वपक्ष मांडून शेवटी भक्तिसिद्धांताचा

निष्कर्ष काढून त्याला 'अनध्यस्तविवर्त' या नव्या संज्ञेने संबोधिले आहे. शंकराचार्यांच्या अध्यस्तविवर्त या संकल्पनेच्या पार्श्वभूमीवर ही नवी परिभाषा योजल्याने शांकर वेदान्ताला या भक्तिसिद्धांताचा नवा आयाम आणि योगदान मिळाले आहे.

हे सर्व करताना परब्रह्माच्या सत्-चित्-आनंद या तीन अंशांचे ज्ञानदेव-एकनाथांच्या संकेतानुसार सविस्तर विवेचन करून आनंदांशावर भक्तीची स्थिती कशी आहे हे महाराजांनी स्पष्ट केले आहे.

सच्चिदानंद भेदे । चालली तिन्ही पदे ।
परी तिही उणी आनंदे । केली येणे ।। अमृतानुभव ।।
सत्पद ते ब्रह्म । चित्पद ते माया ।
आनंदपद जया । म्हणती हरी ।। श्रीएकनाथ ।।

सदंश हा स्फुरण पावत नाही. चिदंशाच्या स्फुरणात सदंश व आनंदांश गौण असतो तर आनंदाच्या स्फुरणात संदश (सत्ता) चिदंश (ज्ञान) लीन असतो. आणि वृत्तीचे स्फुरण असूनही ती जाणली जात नाही. म्हणून वृत्तीचे स्फुरण असो किंवा लय असो, समाधी असो की व्युत्थान असो, दोन्ही अवस्थेत वृत्तिव्याप्तीच असते, फलव्याप्ती मुळीच नसते. म्हणजे दोन्ही ठिकाणी शुद्ध निर्वृत्तिक ब्रह्मस्थिती असते. हीच ज्ञानेश्वरांची पराभक्ति किंवा सहजावस्था किंवा सहजसमाधि होय. संत देवनाथ या स्थितीचे वर्णन करताना ''समाधि व्युत्थानी हरि विलसे'' असे म्हणतात.

उपासना व भक्ति

उपासना आणि भक्ति हे दोन्ही शब्द अनेकदा एकाच अर्थाने वापरले जातात. पण महाराजांनी त्यातील सूक्ष्म भेद दाखवून दिला आहे.

* अज्ञानदशेत सगुणविग्रहाची उपासना करताना ''उपास्य माझ्याहून भिन्न आहे'' असे द्वैत असते म्हणून तिला उपासना म्हणतात.

* ज्ञान झाल्यावर 'उपास्य आणि मी एकच आहे' असा अद्वैताचा अनुभव असतो तरीपण सगुण भगवंताचे ठिकाणी प्रेमाची उत्कट ओढ कायम असते. तिला ज्ञानोत्तर पराभक्ति म्हणतात. अशी ही भक्ति प्राप्त झाल्यानंतर -

प्रीतीवृत्तिसंधीत निर्गुणानंद । प्रीतिवृत्तिस्थ सगुणानंद ।
एवं निःशेष आटला भेद । ब्रह्मानंद चहूकडे ।। (भगवद्भक्ति सौरभ अ. ८)

दोन प्रेमवृत्तींच्या संधीत निर्गुणसमाधि असते आणि प्रीतिवृत्तीत सगुणसमाधि असते. अशा रीतीने स्फुरण होवो की लय होवो दोन्ही ठिकाणी ब्रह्मानंदच असतो. असे नव्या पद्धतीने विवेचन करून, उपासना व भक्तीतील फरक दाखवून भक्तिशास्त्रात नवे योगदान दिले आहे.

अनध्यस्त विवर्त

उपासना आणि भक्तीला आलंबन असलेला सगुणसाकार भगवंताचा विग्रह ज्ञानानंतर नाश पावतो काय? याचे उत्तर महाराजांनी नकारार्थी दिले आहे. त्यांनी शंकराचार्यांच्या अद्वैताचा पूर्णरूपाने स्वीकार करून ''अनध्यस्त विवर्त'' ही नवी संज्ञा- नवी परिभाषा वेदान्ताला दिली. प्रीतिनर्तन- निदिध्यासनप्रकाश- भगवद्भक्तिसौरभ- प्रेमनिकुंज वगैरे ग्रंथातून हा विषय अत्यंत विस्ताराने खंडनमंडनपूर्वक सिद्ध केला आहे.

अध्यस्त विवर्त म्हणजे दोरीच्या ठिकाणी अज्ञानाने सर्प भासणे. दोरीचे ज्ञान झाले की सर्प निवृत्त होतो. सर्पाचा भास देखील रहात नाही. तसेच जग हे अध्यस्तविवर्त असून त्याला अधिष्ठानरूप असलेल्या परब्रह्माचे ज्ञान झाले की जगाची निवृत्ती होते. पण अध्यस्तविवर्त अज्ञानजन्य असतो म्हणून ज्ञानाने तो निवृत्त होतो. पण -

अनध्यस्त विवर्त = सुवर्णाच्या अलंकारात सोने असते पण सोन्याचे ज्ञान झाले असता अलंकार नाहीसा होत नाही. त्याप्रमाणे ब्रह्मज्ञान झाले तरी प्रेमवृत्तीला आलंबन असलेला भगवंताचा विग्रह अज्ञानजन्य किंवा मायाकार्य नसल्यामुळे नाश पावत नाही. हा अनध्यस्त विवर्त होय.

सर्व संतांच्या साहित्यात हा विषय मधून मधून आला आहेच, पण महाराजांनी खंडनमंडनाच्या शास्त्रीय पद्धतीने वेद-उपनिषदे-पुराणे व संतवाणीतील अनेक प्रमाणे देऊन अनध्यस्त विवर्ताच्या सिद्धांताची[६] अनेकग्रंथांतून शास्त्रीय पद्धतीने सिद्ध केला आहे. याप्रमाणे अद्वैत तत्त्वज्ञानात ''अनध्यस्त विवर्त'' ही नवी परिभाषा देऊन अद्वैताला मधुर केले आहे आणि आपल्या या दर्शनाला 'श्री ज्ञानेश्वर मधुराद्वैत दर्शन' असे नाव दिले. म्हणून ते मधुराद्वैतदर्शनाचे प्रथम आचार्य म्हणून ओळखले जातात.

या भक्तिसिद्धांतानुसार अधिष्ठान ब्रह्मावर जो आनंदाश स्फुरण पावतो तोच भगवंताचा सगुण साकार विग्रह असून तो पूर्ण ब्रह्मस्वरूप आहे. अविनाशी आहे. मायाकार्य नाही. दोरीच्या ज्ञानाने सर्प नष्ट होतो तसा ब्रह्मज्ञानाने भगवंताचा देह नाश पावत नाही. या प्रेमाच्या स्थितीत वृत्तीचे स्फुरण असूनही जाणीव/नेणीव नाहीशी होऊन भक्ताला शुद्ध ब्रह्मस्थिती प्राप्त होते. आणि ही स्थिती प्राप्त झाली की स्वतः भक्तही अनध्यस्त विवर्तच होतो.[७]

'तत्त्वमसि' या महावाक्यातून भक्ती

''तत्त्वमसि'' या महावाक्यातून आतापर्यंत शांकरपरंपरेत केवळ ज्ञानबोधच दिला आणि घेतला जात असे. महाराजांनी या अद्वैतज्ञानबोधाचा पूर्णस्वीकार करूनही- ज्ञानानंतर भक्ति प्राप्त करून घेण्यासाठी- व्यतिरेकानंतर अन्वय प्राप्त करून घेण्यासाठी- याच महावाक्यातून भक्ति देखील कशी प्राप्त करून घ्यावी याचे 'भक्तिपदतीर्थामृत' ग्रंथात सविस्तर विवेचन केले आहे.

धारावाही रसो भक्तिरीशे तत्पदगोचरे ।
त्वं-पदज्ञो परो भक्त इति स्वमतनिर्णयः ।।४७।।

त्वंपद जाणणारा जीव = अद्वैतज्ञानसंपन्न भक्त

तत्पद = ईश्वर = भक्तीला आलंबन सगुणाकार अनध्यस्तविवर्त.

असि = ऐक्य = ज्ञानोत्तर परमप्रेमस्वरूप माधुर्यभक्ति.

या माधुर्यभक्तीची म्हणजे पराभक्तीची १६ प्रकारात नव्याने मांडणी केली. त्यात प्रथम नवविधा भक्ति असून पुढे लालन- वात्सल्य- माधुर्य अशा चढत्या श्रेणी आहेत. शेवटच्या चार पायऱ्या संयोग वियोगरूपी भक्तीच्या असून ही भक्ती सर्वश्रेष्ठ आणि सर्वंकष असल्याचे सविस्तर दाखवून दिले आहे.[८] या भक्तीत विषयवासनेचा किंवा शारीरिक प्रेमाचा अंशही नसतो. स्त्री-पुरुष प्रेमातील स्त्रीचे प्रेम पुरुषापेक्षा उत्कट आणि समर्पणरूप म्हणजे 'तत्सुखसुखित्वा'चे असते. उलट पुरुषाचे प्रेम 'स्वसुखसुखित्वा'चे म्हणजे भोगरूप असते. म्हणून या भक्तीचे लक्षण सांगताना महाराज म्हणतात-

जारिणीचे परपुरुषी मन । की विरहिणीचा विरह गहन ।।
तो विषयभाव वेगळा करून । हरिरूपी प्रेमयोजन ते भक्ति ।।[९]

याप्रमाणे माधुर्य प्रेमातील स्त्रीप्रेमाची उत्कटता अद्वैतज्ञानपूर्वक असण्यातच परब्रह्माची शुद्ध

आनंदमयस्थिती प्राप्त करणे होय. (न तत्र माहात्म्यज्ञानविस्मृत्यपवादः नारदीय भक्तिसूत्र) पण या माधुर्यप्रेमाचा अधिकार आत्मज्ञानसंपन्न भक्तालाच आहे, इतरांना नाही. असा स्पष्ट दंडक महाराजांनी सांगितला आहे.

ज्ञान होण्यापूर्वीसमान्यतः पुरुषांनी दास्य किंवा लालन भक्ति करावी आणि स्त्रियांनी वात्सल्य भक्ती करावी असे महाराज सांगतात. त्यांनी स्वतःला ज्ञानेश्वरांची कन्या आहे ही भावना दृढ करून श्रीकृष्णावर गोपींप्रमाणे प्रेम केले आहे. (पण हा दंडक न पाळल्यामुळे काही ठिकाणी मधुराभक्तीच्या नावाखाली स्वैराचार आढळतो आणि सामान्यांचा विलक्षण गैरसमज होतो.)

''यथा व्रजगोपिकानाम्'' (नारदभक्तिसूत्र)

ज्ञानेश्वर कन्या आणि कृष्णपती । सौभाग्यसंपत्ती नित्य मज ।।अभंग।।

योगशास्त्रातील योगदान

श्री गुलाबरावमहाराजांनी योगसाधनेच्या अनेक नवीन नवीन प्रक्रिया निर्माण करून योगाच्या प्रक्रियांवर आठ ग्रंथ आणि अनेक अभंग लिहिले आहेत. चक्रे- कुंडलिनी वगैरे संबंधी नवीन शास्त्रीय माहिती सांगितली आहे आणि चक्रे- कुंडलिनींच्या जडत्वाचा निरास करून भावनेने प्रकट होणारे त्यांचे चिन्मयस्वरूप विशद केले आहे.[१०]

वेदश्रवण

नादावर संयम केला असता दहा प्रकारचे अनाहत नाद ऐकू येतात व त्यानंतर समाधिस्थितीत ॐ कार ऐकू येतो आणि भक्ती असेलतर त्यानंतर चारी वेद ऐकू येतात, याचे योगप्रभाव व संप्रदायसुरतरू ग्रंथात ज्ञानेश्वरी, भागवत व पतंजलींचे संदर्भ देऊन स्वानुभवाच्या आधारावर सविस्तर विवेचन केले.[११]

समाधीचा विचार करताना वृत्ती लय पावल्या की निर्गुण आंतर्समाधी आणि वृत्ती स्फुरण पावल्या की भक्ती असेलतर सगुणभक्तिरूप बाह्यसमाधी साधल्या जातात. आणि असे एकदां झाले की आत आणि बाहेर- समाधि असो की व्युत्थान असो- निर्वृत्तिक पूर्णब्रह्मस्थिती म्हणजे अखंड सहजसमाधि प्राप्त होते. हे अभंगादि रचनेतून देखील स्पष्ट रीतीने सांगितले आहे. यांनाच 'तत्पदनिष्ठ समाधि' आणि 'त्वंपदनिष्ठ समाधि'[१२] अशी नवी नावे महाराजांनी दिली आहेत.

तसेच योगी, ज्ञानी व भक्त यांच्या आंतरिक त्वंपदनिष्ठ समाधींची एकरूपता असली तरी योगी व ज्ञानी हे व्युत्थानात नामरूपांना ('नेति नेति' असे म्हणून) मिथ्या पाहतात तर भक्त सगुणावर प्रेमवृत्ति अर्पण करून अखंड आणि अन्तर्बाह्य सर्वत्र परब्रह्माचा आणि ब्रह्माच्या आनंदांशाचाच अनुभव घेतात. म्हणून भक्तांची समाधिस्थिती अखंड कायमच असते. त्यांना व्युत्थानच नसते. 'समाधिं व्युत्थानिं हरि विलसे' (संत देवनाथ) हे भक्तितत्त्व विस्तारपूर्वक विशद केले आहे.[१३]

समन्वयाचे प्रणेते

श्रीगुलाबरावमहाराजांनी समन्वयाचे नऊ प्रकार केले आहेत.[१४] आजच्या भारतीय समाजाच्या परस्पर विद्वेषाच्या काळात त्यांचा आधार घेऊन भारतीय एकात्मता सहज साधली जाऊ शकते. रा.स्व.संघाचे पूज्य गुरुजी गोळवलकर तर म्हणतात -

''हा समन्वय विचार म्हणजे देशातील सामाजिक बंधुभावाला महाराजांनी दिलेलाअधिष्ठान आहे. या समन्वयविचाराचे फार दूरगामी परिणाम होण्याजोगे आहेत. मुसलमान- ख्रिश्चन- पारशी वगेरे सर्व प्रमुख तत्त्वे - त्या त्या धर्मांपेक्षा ऐतिहासिक दृष्टीने प्राचीन असलेल्या हिंदु संस्कृतीत कशी सांपडतात,

याचे महाराजांनी विवेचन केले आहे व त्यानुसार प्रबोधन झाले तर केवळ भारतीय समाजच एकात्म होईल असे नसून जगातील सर्व धर्माचे समाज परस्पर सामंजस्याने राहू शकतील, इतका महाराजांचा समन्वयविचार प्रभावी आहे.''[१५]

समन्वयाचे लक्षण

१) एकाधिकरणक- २) भिन्नवृत्तित्वे सति
३) संप्रदायविच्छेदरहितत्वे सति च ४) पूर्वानेकफलावष्टंभानन्तरम्
५) एकफलजनकत्वम् समन्वयलक्षणम् ।। पत्र.
अर्थ - सर्व संप्रदायांचा आधार एक आहे,
मात्र वृत्ती भिन्न भिन्न आहेत.
सर्व संप्रदायांचा समन्वय केला तरी
कोणत्याहि संप्रदायपरंपरांचा विच्छेद होत नाही.
उलट, सर्व संप्रदायानुसार त्यांना अपेक्षित असलेली
अनेक भिन्न भिन्न फले प्राप्त होऊन,
शेवटी एकच ईश्वरप्राप्तिरूप फल सर्वांना प्राप्त होते,
हे लक्षात घेणे म्हणजे समन्वय करणे होय.[१६]
''भिन्नानां समानरूपता समन्वयः ।।''[१७]

हेही समन्वयाचे लक्षण जुन्या शास्त्रात सांगितले आहे.

सहाही दर्शनांचा समन्वय

सांख्य-योग, न्याय-वैशेषिक, पूर्व व उत्तर मीमांसा ही सहाही दर्शने परस्परविरोधी नसून परस्पर पूरक आहेत. या समन्वय दृष्टीनुसार महाराजांनी या सर्वांवर ग्रंथरचना केल्या आहे. तसेच इस्लाम- ईसाई- पारशी- बौद्ध- जैन वगैरे सर्व उपासना पद्धती वैदिक तत्त्वांचेच अधिकारनुसार नवे नवे उन्मेषआहेत, हे त्यांनी दाखवून दिले आहे.

सर्व धर्मांचे मूळ आधारसूत्र

साकल्याने विचार केला असतां महाराजांनी सर्व धर्मांना मूळ असलेले सर्वांगपूर्ण आणि समजण्याला अगदी सोपे असे लक्षण सांगून नंतर दुसरे ठिकाणी सर्व धर्माचे आधारसूत्र देखील स्पष्ट शब्दांत मांडले आहे.

सत्त्ववृद्धिर्भवेद् येन अन्य गणुद्वयघातिनी ।।
स हि धर्मो न चान्यः स्यादिति स्वमतनिर्णयः ।।५।।

हे धर्माचे मूळ तत्त्व मनुष्यभक्षक रानटी मानवांपासून वेदान्ती ब्राह्मणांपर्यंत सर्वच धर्मांना तंतोतंत लागू पडते. या धर्मलक्षणातून महाराजांनी जगातील सर्व धर्मांना नवे योगदान दिले आहे. यासंबंधी महाराजांचे अत्यंत आत्मविश्वासपूर्णअसलेले एक वाक्य उद्धृत केल्याशिवाय राहवत नाही [१८] -

धर्माचा निर्विकारपद्धतीने विचार करणारा, शूद्रवर्णात सृष्टीमध्ये,
मी एकटाच आहे, असे पक्के समज.(साधुबोध)

या प्रखर आणि दृढ आत्मविश्वासाने केलेली धर्माची तत्त्वमीमांसा त्यांनी त्यांच्या ''संप्रदाय सुरतरू'' या आकर ग्रंथात विस्तारपूर्वक मांडली आहे. एके ठिकाणी तर ते म्हणतात -

''वेद, पुराणे यांचा वरवर विरोध वाटला तरी समन्वयच केला पाहिजे किंवा समजत नाही

म्हणून सोडून दिले पाहिजे - हा आमच्यात 'विशेष' आहे.''[१९]

अशा अनेक संदर्भावरून त्यांचे श्री दत्तोपंत ठेंगडी यांनी दिलेले 'समन्वय महर्षि' हे विशेषण सार्थ होते.

धर्मासंबंधी विचार करताना धर्मसंकर [२०]- धर्म सुधारणा- धर्मसमन्वय[२१] यांचे तुलनात्मक विवेचन त्यांनी केले. त्यानुसार आधुनिकांच्या मतांची चिकित्सा करताना विवेकानंद- रामतीर्थ- लो. टिळक वगैरेंच्या मतांचाही परखड परामर्श घेतला. आधुनिक काळातही प्राचीन धर्मतत्त्वांचा गाभा कायम ठेवून ऋषिपरंपरेचे सूत्र तुटूं न देता- त्यांचा अनादर न करता- परिस्थित्यनुसार धर्मपालन कसे करता येते, याचेही मार्गदर्शन केले.

संगीतशास्त्र

श्रीगुलाबराव महाराजांनी 'गानसोपान' हा ग्रंथ लिहून संगीतशास्त्रात नवी भर टाकली आहे. श्री भातखंडे यांच्याशी झालेल्या पत्रव्यवहारातून भातखंडेंचे नवे विचार प्राचीन ऋषिपरंपरेवर आघात करणारे असल्याने तार्किक आणि अनुभाविक दृष्टीने कसे एकांगी झाले आहेत याचे निदर्शन महाराजांनी केले. 'मातंगमुनी' वगेरे प्राचीन संगीतशास्त्रकारांचा परामर्श घेऊन आपल्या संगीतविषयक चिंतनातून ''परंपरेला धरून असलेल्या आजच्या संगीतविषयक रागदारीच्या नवीन धारणांनाही स्वीकारणारे'' महाराजांचे नवे योगदान आजच्या संगीत-तज्ञांनी समजावून धेणे आगत्याचे आहे.

सामवेदीय संगीत- मार्गीसंगीत- देशीसंगीत आणि भक्तीने परतत्त्वाचा स्पर्श लाभलेले ''कलिमार्गी संगीत'' इत्यादी प्रकारांवरील त्यांचे विवेचन नवीन तर आहेच पण त्यातही 'कलिमार्गी संगीत' ही त्यांची संकल्पना आधुनिक संगीतशास्त्राला नवे योगदान आहे.[२२]

(१) काव्यानेरस, (२) छंदानेताललालित्य,

(३) स्वराने हृदयरंजन व (४) अर्थाने मोक्ष.

हे महाराजांनी गानसोपानात सांगितलेले प्रयोजनचतुष्टय भारतीय संगीताच्या तत्त्वज्ञानाचा गाभा विशद करते.

छंदशास्त्रातील मात्रारचना । जेणे प्रबंध ताल मिळे अनुमाना ।
काव्यशास्त्रातील रसभावना । आणि अर्थ वेदान्त-भक्ति शास्त्रचि ।।
तेथे स्वरे हृदय आकर्षिजे । छंद ताले पुनःपुनः तेथचि स्थापिजे ।
रसे द्रवत्व आणिजे । अर्थे मिळीजे भगवंती ।। २ - ११,१२

याप्रमाणे अनेक नवी नवी सूक्ष्म तत्त्वे उलगडून दाखवून संगीताच्या तत्त्वज्ञानात नवे नवे योगदान देऊन संगीतशास्त्राची निर्मिती केली आहे, पण अजूनही ती लोकांपुढे आलेली नाही.

काव्यशास्त्र

महाराजांनी काव्यसूत्रसंहिता हा १९२ सूत्रे असलेला ५ अध्यायांचा ग्रंथ निर्माण करून काव्यशास्त्रातही नवे योगदान दिले आहे.

१) संसारातील भोगरूप आनंद.

२) काव्यातील अलौकिक रसाचा आनंद.

३) भक्तीतील स्वयंरूप आनंद.

अशा चढत्या पायऱ्या सुचविल्या आहेत.

* काव्यशास्त्र आणि भक्तिशास्त्र यांचे परस्परावलंबन शास्त्रीय पद्धतीने दाखवून 'रसो वै सः'

या आत्मतत्त्वापर्यंत म्हणजे परतत्त्वस्पर्शापर्यंत काव्याला नेऊन पोचविले आहे.

* विकार आणि विचार मिळून स्थायिभाव होत असतो हा नवा सिद्धांत मांडला आहे.
* सृष्टीच्या ईश्वरनिविष्ट असलेल्या स्वरूपाला काव्य म्हटले आहे.
* कवीचे प्रकार सांगितले आहेत.
* स्फूर्तीचे प्रकार स्पष्ट केले आहेत.

याप्रमाणे काव्यशास्त्रतील अनेक नवे नवे सूक्ष्म धागे उलगडून दाखविले आहेत. पण हे करतांना वैदिक आणि पौराणिक परंपरेचा धागा मात्र अगदी मजबूत आहे. परंपरेचा पूर्णस्वीकार असूनही नवे असलेले हे काव्यविषयक तत्त्वज्ञान अभूतपूर्वच आहे. श्रीरामदास- तुकारामादि संतांच्या काव्यविचारांबद्दल तिटकारा दाखवणाऱ्या आधुनिक साहित्यिकांना श्रीगुलाबराव महाराजांचे काव्यशास्त्र हे एक आव्हान आहे.[२३] महाराजांच्या काव्यसिद्धान्तानुसार पाहिले असता पाश्चात्य काव्यविचारांचा तोकडेपणा लक्षात येतो आणि आपल्या भारतीय काव्य परंपरेची वैचारिक खोली किती अगाध आहे याची किंचित् कल्पना येते.

महाराज स्वतः संत होते- कवी होते- शास्त्रज्ञ होते आणि शास्त्रनिर्मातेही होते. या चारही भूमिका त्यांचेकडे एकवटल्यामुळे, यापुढे पाश्चात्य असो, प्राचीन भारतीय असो, किंवा अत्याधुनिक साहित्याची समीक्षा असो- महाराजांच्या काव्यविचारांचा अभ्यास करून परामर्श घेतल्याशिवाय काव्यशास्त्रीय अध्ययनाला पूर्णताच येऊ शकत नाही; इतके मोलाचे योगदान महाराजांनी दिले आहे. [२४]

भारतीय रससिद्धांताचे जागतिक कीर्तीचे विद्वान डॉ. ग.त्र्यं.देशपांडे विश्वसंतसाहित्यप्रतिष्ठानाच्या एका व्याख्यानमालेत म्हणाले होते की, ''श्रीगुलाबरावांची अनध्यस्तविवर्ताची संकल्पना भविष्यकाळात काव्यशास्त्र - शिल्पशास्त्र- संगीतशास्त्र- सौंदर्यशास्त्र- वास्तुशास्त्र-तत्त्वज्ञान- वगैरे सर्व ज्ञानक्षेत्रातील सूक्ष्म प्रमेये उलगडून दाखविणारी सर्वंकष ठरेल यात मला तरी संशय नाही.''

आयुर्वेद

वैद्यकशास्त्रावरील श्रीगुलाबरावमहाराजांच्या मानसार्युवेद ग्रंथात आयुर्वेद आणि ॲलापॅथी यांची तुलना आहे. त्यात पाश्चात्यांच्या जंतुकारणवादापेक्षा आर्यांचा मनोविकार-कारणवाद हाच रोगनिर्मितीच्या मूळाचे विश्लेषण करणारा कसा आहे हे दाखवून दिले आहे. तसेच त्यांचे द्रव्यगुणसंबंधीचे विवेचन पूर्वसूरीपेक्षा नवीन आहे. [२५]

नीतिशास्त्र

नीतिशास्त्रातील तत्त्वांचा तुलनात्मक विचार मांडताना श्रीगुलाबरावमहाराजांनी पाश्चात्य नीतिमूल्यांना गौण ठरविले आहे. पाश्चात्यांनी केवळ भौतिक सुखप्राप्तीचाच विचार केला आहे तर भारतीयांनी पारलौकिक आणि पारमार्थिक उन्नतीला अनुसरून भौतिक सुखासाठी असलेले आचरण परस्पर पूरक आणि सामंजस्याचे कसे असावे, हे सांगितले आहे. म्हणजेच नीतीमध्ये धर्माचा अन्तर्भाव केला आहे. त्यामुळे बरेच वेळा धर्म आणि नीती हे दोन्ही शब्द एकाच अर्थाने वापरले जातात. आणि म्हणूनच धर्माला अनुसरून असलेली 'सन्नीति' आणि अधर्माकडे झुकलेली ती 'कुटिलनीति' असे भेद झाले आहेत.

पाश्चात्यांच्या (१) ॲथोरिटी (आप्तवचन) (२) इंट्यूशन (अन्तस्फूर्ती) (३) युटिलीटी (बहूपयोगिता) आणि (४) इव्होल्यूएशन (विकासवाद) या चारही मतांचे महाराजांनी खंडन केले. पण शेवटी मात्र त्यांच्या समन्वय पद्धतीनुसार महाराजांनी पाश्चात्यांच्या ग्राह्य भागाचा भारतीय नीतितत्त्वांशी

समन्वयही करून दिला आहे.[२६]

नीतिसंकल्पनेत जर परलोकविषयक पापपुण्य संकल्पनेचा अन्तर्भाव केला नाही तर 'लोकांना कळू न देतां' चोरी करणे- व्यभिचार करणे- फसवणे वगैरे सर्व नीतीतच अन्तर्भूत होतात. त्यामुळे ''लोकांना दाखवण्यापुरता नीतिमान्'' असा अर्थ झाल्याने सर्वत्र गोंधळच होईल. आणि नीतिमान पुरुष म्हणजे दांभिक (हिपोक्रॅट) असा अर्थ झाल्याने सर्व समाजाचीच अधोगती होईल. हे सर्व टाळण्यासाठी नीतीला धर्माचे आणि परमार्थाचे अधिष्ठान हेच कसे उचित आहे हे तर्कनिष्ठ युक्तिवादाने नीतितत्त्वविचारातून महाराजांनी स्वमतनिर्णयात मांडलेआहे.

धर्मेऽन्तर्भावयेन्नीतिं नीत्यां धर्मं विपद्यदि ।।[२७]

नीतिः कालानुरोधेन इति स्वमतनिर्णयः ।।४।।

धर्माविरुद्धो भूतेषु कामोऽस्मि भरतर्षभ ।। गीता ७.११

याप्रमाणे महाराजांनी भारतीय नीतीची भूमिका नव्या संदर्भात स्पष्ट प्रतिपादन करून भारतीयांच्या नीतिसंकल्पनेला नवे योगदान दिले आहे.

पाश्चात्य तत्त्वज्ञानांचा परामर्श

श्रीमहाराजांनी डार्विनचा उत्क्रांतिवाद- स्पेन्सरचा अज्ञेयवाद- अणुवाद- संशयवाद वगैरे पाश्चात्य मतांची चिकित्सा भारतीय न्यायघटित तर्क पद्धतीने तावून सुलाखून केली आहे. डार्विनच्या उत्क्रांतिवादाचे खंडन करून शेवटी ते म्हणतात - ''केवळ उत्क्रांती मानणे हे बुद्धीला पटण्याजोगे नाही. उत्क्रांती आणि अपक्रांती दोन्ही होत असतात. म्हूणन परस्पर सहकार्याची भावना वाढणे- द्वेष कमी करणे- विकार नाहीसे करणे- विकारांवर विचारांचा ताबा मिळवणे- ही भारतीयांची उत्क्रांतीची संकल्पना आहे. आणि ती डार्विन स्पेन्सरांच्या मतानुसार नैसर्गिक होत नसून प्रयत्नपूर्वक होत असते.'' म्हणून महाराजांनी पाश्चात्यांचा नैसर्गिक उत्क्रांतिवाद अमान्य केला असून भारतीयांचा प्रायत्निक उत्क्रांतिवाद तात्त्विक दृष्टीने स्पष्ट केला आहे.[२८] तसेच अज्ञेयवाद- संशयवाद- अणुवाद वगेरेंचेही त्यांनी खंडन केले आहे. त्यांचे अलौकिक व्याख्यानमाला या ग्रंथातल्या ९ व्या व्याख्यानातील अणुवादखंडनाचे तात्त्विक विवेचन हे आधुनिक संदर्भातील योगादान आहे.[२९]

इतिहास

पाश्चात्यांनी भारतीय इतिहासाची केलेली विकृती पाहून महाराजांनी इतिहासाची आर्यसंमत मार्गदर्शक तत्त्वेसांगितली.

(१) आर्य हा वंश नसून संस्कृती आहे.(२) आर्य भारतात बाहेरून आले नाहीत.

(३) शूद्रवर्ण आर्यांचाच एक भाग आहे.(४) आर्यसंस्कृती प्राचीन काळी सर्व विश्वात पसरली होती. हे सिद्ध केले. नंतर शैक्षणिक मूल्ये असलेली इतिहास लेखनाची मीमांसा केली. 'सुसंस्कारांचे दान म्हणजे शिक्षण' या शैक्षणिक निकषानुसार लिहिला गेला खरा इतिहासच भारतीय संस्कृतीत प्रमाण मानला जातो. तसेच शत्रूंनी केलेली निंदा आणि मित्रांनी केलेली स्तुती यापेक्षा शत्रूंनी केलेली स्तुती आणि मित्रांनी केलेली निंदा या खऱ्या परिस्थितीच्या निदर्शक असतात म्हणून -

* इतिहासचे प्रयोजन काय? * इतिहास कोणी लिहावा?

* कोणत्या इतिहासावर विश्वास ठेवावा?[३०]

वगैरे अनेक बाबींचे सविस्तर विवेचन केले आहे. भारतीय इतिहासाचे खरे लेखन करताना महाराजांच्या तात्त्विक आणि मार्मिक भूमिकेचा आधार घेऊन भारतीय इतिहास सादर होणेआवश्य

आहे.

सामाजिक आणि राजकीय तत्त्वज्ञान

आज लोकशाही आणि समता ही चलनी नाणी झाली आहेत. पण यासंबंधी श्रीगुलाबरावमहाराज आणि त्यांचे उत्तराधिकारी श्रीबाबाजीमहाराज पंडितांनी लोकशाही एकमत- बहुमत वगेरेबद्दल परखड मतेमांडली आहेत.

लोकशाही कुठे असावी? कशी असावी? कोठे असूं नये? कशी असूं नये? यासंबंधीची स्पष्ट मते मांडली आहेत. लोकशाहीतील दोषनिवृत्तीचे उपायेही सांगितले आहेत.

आज सरसकट प्राचीन भारतीयांच्या वर्णव्यवस्थेवर निंदेचे आघात होत असतात. त्या वर्णव्यवस्थेमागील प्राचीन ऋषींची भूमिका या गुरुशिष्यांच्याजोडीने उकलून दाखविली आहे. आणि भारतीयांच्या तात्त्विक भूमिकेचा- पूर्वग्रह सोडून विचार केला असता लोकशाही- समानता आणि वर्णव्यवस्था यांचा परस्पर विरोधच शिल्लक राहत नाही, हेही स्पष्ट दिसून येते.

आज जरी वर्णव्यवस्था कालाबाह्य वाटत' असली तरी हजारो वर्षे नीती- धर्म- तत्त्वज्ञान- शास्त्रांच्या उन्नत परंपरा आणि याबरोबरच सात्विकपणा- त्यागवृत्ती- सर्वाभूती दयावृत्ती- माणुसकी टिकवून समजाला उन्नत आणि सात्त्विक ठेवणाऱ्या समाजव्यवस्थेची मीमांसाही समजून घेणे आणि त्यांतील आजच्या काळातही ग्राह्य असलेल्या गोष्टींचा स्वीकार करणे अगत्याचे आहे.

समानतेच्या घोषणा करणारे साम्यवादी तत्त्वज्ञान किती फोल ठरले आणि व्यक्तिस्वातंत्र्याचा आणि ह्यूमन राईटचा पराकोटीचा उद्घोष करणारे युरोपियन हिंसक समाज स्वार्थासाठी किती पतन पावले आहेत हे लक्षात घेऊन सामाजिक आणि राजकीय पार्श्वभूमीवर भारतीय नीतिमूल्यांची नित्यनूतनता मनावर अधिक ठसली जाते. त्यामुळे प्राचीन भारतीयांच्या सामाजिक आणि राजकीय विचारांची दखल घेऊन आपल्या विचार पद्धतीत, शिक्षणात आणि आचरणात बदल करणे हीच आजची सामाजिक गरज आहे.

बहुमत आणि एकमत

श्रीगुलाबरावमहाराज बहुमत आणि एकमत यासंबंधी म्हणतात-

* वय- विद्या- शील- पैसा- व्यसन (संकट) आणि कूळ यांहीकरून समान असलेल्यांमध्येच बहुमताचा न्याय शोभतो. यातून जर एखाद्याला एखादी गोष्ट जास्त असेल त्या त्या संबंधात त्याचे एकट्याचे मत प्रमाण धरले जाते.

*बलाचे काम बहुमताने आणि बुद्धीचे काम एकमतानेच होत असते.[३१]

*मला विकतची किंवा पैशाची गुलामगिरी पसंत नाही पण गुणांची गुलामगिरी पसंत आहे.

*हिंदुस्थानात जी वर्णव्यवस्था आहे ती गुलामगिरी सारखी भासते पण ती सद्गुण मिळवण्यासाठी आहे, पोटासाठी नाही.

*समाज कितीही सुधारणेच्या शिखरावर गेला तरी गुलामगिरी राहणारच असे माझे स्पष्ट मत आहे. [३२]

श्रीबाबाजीमहाराज पंडित आर्यधर्मोपपत्ती या ग्रंथात म्हणतात -

*लोकशाहीच्या स्थापनेबरोबर अनीतीची स्थापना होत असते व लोकशाहीच्या या दोषावर ऋषिप्रणीत धर्मावर श्रद्धा हाच उपाय आहे.[३३]

हे विचार जुन्याचे समर्थन करणारे म्हणून टाकाऊ समजण्यापेक्षा त्यांसंबधी योग्य चिंतन करून

समाजाच्या धारणेसाठी व समाजाची सत्त्ववृद्धी होण्यासाठी योग्य तो निर्णय घेता आला पाहिजे.

समारोप

वरील विषयांप्रमाणेच श्रीमहाराजांनी सौंदर्य शास्त्र- ज्योतिष- स्फोटवाद- व्याकरण- लिपी- क्रीडा वगेरे अनेक विषयावर मूलभूत चिंतन केले आहे. जुन्या व नव्या शास्त्रांमधील संकल्पनांचीही न्याय आणि सांख्य दर्शनानुसार तार्किक आणि तात्त्विक चिकित्सा केली आहे. आणि त्यातील उणीवा दाखवून भारतीय विचार पद्धतीतील ग्राह्य भाग उकलून दाखविला आहे. त्या सर्वांचा परिचय करून दिल्यास फार विस्तार होईल म्हणून संक्षेपाने येथे नामोल्लेख करणेच इष्ट वाटते.

बालांध असूनही श्रीगुलाबरावमहाराजांनी अवघ्या ३४ वर्षांच्या कालमर्यादेत साधारणपणे सवाशेच्यावर ग्रंथरचना केली आहे.त्या सर्व ग्रंथांचा सारांश मांडण्याचा- लहान तोंडी मोठा घास घेण्याचा हा प्रयत्न आहे. त्यांच्या लिखाणातील विषयांकडे दृष्टिक्षेप केला असता महाराजांनी बरीच मोठी मानवी संस्कृतीच्या सर्व अंगांना स्पर्श करणारी वैचारिक संपत्ती निर्माण करून ठेवल्याचे आढळून येईल.

महाराजांनी 'सूत्रग्रंथांपासून आकर ग्रंथापर्यंत' विविध प्रकारची रचना मराठी हिंदी आणि संस्कृत या भाषांत केली आहे. त्यांचा लेखनविस्तार गद्यपद्ययुक्त असे चंपूग्रंथ आणि अभंग, ओवी, स्तोत्र, गीते वगैरे पद्य प्रकारांनी भरलेला आहे.प्रकाशित झालेल्या त्यांच्या लहानमोठ्या पूर्ण व अर्पूण ग्रंथांची संख्या सर्वसाधरणपणे सव्वाशेच्या वर आहे. तेवीस हजार पर्यंत ओवीसंख्या आहे. अभंग सव्वादोन हजार, पदे सव्वादोन हजार मिळून साडेचार हजारांच्या आसपास आहेत. गीते सव्वाहजार, श्लोक एक हजारापावेतो असून आर्या, दोहे, चौपाई, सवैय्या चूर्णिका वगैरे अनेक प्रकारच्या वृत्तांत रचना आहेत. स्वतः नवीन तयार केलेली १२२ वृत्ते त्यांच्या चाली, राग, ताल वगैरेसहित महाराजांनी रचली आहेत. ही नवीन वृत्ते मराठी साहित्याला देणगीच आहे. माधुर्यभावाचे अभिव्यंजन उत्कटरित्या करणारीलावणी वृत्तातील गेय पदे तर मधुररसाने ओथंबली आहेत. या सर्व ग्रंथमालेची महत्ता तिच्या पद्धती आणि तर्कनिष्ठता या आधुनिक बुद्धिवादाला शोभणाऱ्या व्यापावर नसून वैचारिक सूक्ष्मता, विषयाच मूळाला जोखून विवेचन करण्याची पद्धती आणि तर्कनिष्ठता या आधुनिक बुद्धिवादाला शोभणाऱ्या पद्धतीवर अवलंबून आहे. इतकेच नव्हे तर या आधुनिक मांडणी बरोबरच महाराजांची सर्व भिस्त आर्यधर्म, वैदिक सिद्धांत, श्रुती, युक्ती आणि स्वानुभव यांच्या प्रामाण्यावर आहे. महाराजांनी वेद, उपनिषदे, पुराणे, स्मृती, रामायणमहाभारतादि इतिहास आणि संतवचनेया सर्वांचा समन्वय करून त्या सर्वांची अगदी पूर्णपणे एकवाक्यता कशी आहे, हे पदोपदी पटवून दिले आहे. ते म्हणतात की वेदांपासून संतवचनापर्यंत सर्वांनी परमेश्वर प्राप्ती हेच एक ध्येय समोर ठेवलेले आहे. यासाठीच अधिकारभेदानुसार त्या सर्वांनी उपदेश केला आहे. त्यांच्यापुढे अधिकारी भिन्न भिन्न पातळीचे असल्यामुळे त्यांच्या उपदेशात भिन्नता आणि विरोधाभास दिसतो पण तो विरोध खरा नसून आभासच असतो. साधकाने श्रवण-मनन करताना त्या सर्वांचा समन्वय केला पाहिजे आणि जर ''समन्वय करता येत नसेल तर समजत नाही म्हणून सोडून दिले पाहिजे पण श्रुती, स्मृती, पुराणादिकांत विरोध आहे, असे त्याने मनात देखील आणता कामा नये'' अशी महाराजांची भूमिका त्यांच्या प्रतिपादनाच्या मुळाशी ठामपणे उभी आहे. त्यांनी खंडनमंडन जे केले ते सर्व समन्वय करण्यासाठीच केले. खंडन केल्यानंतरसुद्धा त्या त्या संप्रदायातील किंवा ग्रंथकाराच्या विचारातील ग्राह्यांश मोकळ्या मनाने उचलून मस्तकी धारण

केला आहे. संप्रदाय कुसुममधु (य १६) या प्रकरण ग्रंथांतील मधुबिंदुंना त्यामुळेच गोडी आली आहेत. अद्वैतापासून तोकट्टर द्वैतापर्यंत सर्व वैदिक संप्रदायरूपी पुष्पातील मध गोळा करून महाराजांनी आपला अद्वैत संप्रदाय माधुर्यरसाने परिप्लुत केला आहे.

शांकरज्ञानसंयुक्त भगवद्भक्त्यलंकृतम्
यद्वाक्यं तत्प्रमाणं स्यादिति स्वमतनिर्णयः।।

या श्लोकात स्वतःच्या मताचा निर्णयकरताना, कोणते वाक्य प्रमाणभूत समजून शिराधार्य मानावे याची कल्पना स्पष्ट सुचविली आहे. शंकराचार्यांचे अद्वैत आणि संताची भक्ती ज्या वाक्यात प्रतिपाद्य असेल ते वाक्य प्रमाण समजावे असा निर्णय दिला आहे. या रीतीने सर्वत्र शांकराद्वैतरूपी सुवर्णाचे भक्तिरूपी अलंकार घडवून महाराजांनी भगवंताच्या सगुणसाकार प्रेमविग्रहाला आपल्या अक्षरवाङ्मयाने सुंदर नटविले आहे.

अनुभवप्रधान ग्रंथांचे प्रकार

भारतीय दृष्टीने तत्त्वज्ञान हे अनुभवाचा विषय आहे त्यामुळेच भारतीय तत्त्वज्ञानाचे ग्रंथ पारमार्थिक अनुभवावर आधारलेले असतात. हा अनुभव श्रवणमनन आणि निदिध्यासन या त्रयीवर अवलंबून असतो. सिद्धपुरुष या साधनत्रयीच्या वर गेलेले असतात. त्यांनी रचलेले ग्रंथ हे भगवद्रचित गीतेप्रमाणे स्वयंपूर्ण आणि सर्वोपकारक असतात. पण साधक देखील आपली साधना दृढ करण्यासाठी अभ्यास करून ग्रंथरचना करीत असतात. म्हणून भारतीय तत्त्वज्ञानाचे ग्रंथ एकूण चार प्रकारात मोडतात. १- श्रवण ग्रंथ, २- मनन ग्रंथ, ३- निदिध्यासन ग्रंथ, ४- साक्षात्कृत ग्रंथ.

१. श्रवण ग्रंथ :- साधकाने श्रवण केलेले अनेक सिद्धांत युक्तिवाद आणि उपपत्तिपूर्वक जसेच्या तसे यात एकत्रित केलेले असतात. वेदान्ताच्या अनेक ग्रंथातील चांगला भाग यात संग्रहीत असतो. लेखकाच्या स्वतःच्या युक्ती आणि अनुभवाला मात्र यात फारशी जागा नसते. ज्याला पुष्कळ ग्रंथ समजून घ्यावयाची इच्छा आहे त्याने एखादा ''श्रवण ग्रंथ'' अवलोकन केला तरी त्याला बहुश्रुतता येते. अनेक ग्रंथांचा अभ्यास करण्याची इच्छा या एकाच ग्रंथाने पूर्ण होते. ''संग्रहीत उसनी वचने'' हा या ग्रंथाचा विशेष असतो.

२. मनन ग्रंथ :- या ग्रंथात गुरुमुखाने श्रवण केलेले शास्त्रातील सिद्धांत तर मांडलेले असतातच पण त्यासोबत अनेक युक्त्या-प्रयुक्त्यांच्या साह्याने प्रतिपक्षाचे उत्तम खंडन आणि स्वपक्षाचे मंडन केलेलअसते. त्यामुळे श्रवण केलेले सिद्धांत मनात पक्के रुजविण्यासाठी हे मननात्मक ग्रंथ उपयोगी पडतात पण 'अनुभवाची कळा' मात्र यातून गोचर होऊ शकत नाही.

३. निदिध्यासन ग्रंथ :- श्रवण व मनन दृढ झाल्यानंतर मुमुक्षू जेव्हा निदिध्यासन करून अनुभव प्राप्त करून घेतो, तेव्हा त्याजकडून जी ग्रंथनिर्मिती होते, तीत त्याच्या अनुभवाच्या मार्गाचे सांग व सोपपतिक विवेचन विस्ताराने आलेले असते. अनुभवाचे वर्णन असले तरी यातून एकच एक प्रक्रिया सुरुवातीपासून शेवटपर्यंत वर्णन केलेली असते. त्यामुळे 'सार्वत्रिक मार्गदर्शन' या ग्रंथापासून मिळणे शक्य नसते. ग्रंथकाराच्या समान स्वभावप्रकृतीचा वाचक असेलतरच त्याला यातून मार्गदर्शन मिळू शकते. विविध प्रकारच्या साधकांना मात्र अनुभवदृष्टीने या ग्रंथाचा सरसकट उपयोग होऊ शकत नाही. ''साधकावस्थेपासून आत्मज्ञान होईपर्यंतचा एका साधकाच्या अवस्थांचा आलेख'' या दृष्टीने निदिध्यासन ग्रंथाचे महत्त्व अनन्यसाधारण आहे.

४. साक्षात्कृत ग्रंथ :- योगवासिष्ठात अज्ञानाच्या सात आणि ज्ञानाच्या सात भूमिकांचे सविस्तर

वर्णन आले आहे.त्यापैकी ज्ञानाच्या चवथ्या 'सत्त्वापत्ति' नामक भूमिकेवर साधकाला आत्मानुभव येतो, निदिध्यासनाचे फल म्हणजे सत्त्वापत्ति.यापलीकडे ज्ञानाच्या आणखी तीन भूमिका आहेत.त्यांना पार करून गेल्यानंतर तो साधक जगद्गुरू या संज्ञेला पात्र होतोअगदि विषयलंपट मनुष्यापासून तों तहत ज्ञानी आणि भक्तापर्यंत सर्वांना तोच मार्गदर्शन करू शकतो.असे थोर महात्मे जेव्हा ग्रंथरचना करतात तेव्हा अज्ञानाच्या पहिल्या भूमिकेपासून ज्ञानाच्या सातव्या भूमिकेपर्यंत असलेल्या प्रत्येकाला त्या ग्रंथरचनेतून मार्गदर्शन मिळू शकते.वेद, पुराणे, भगवद्गीता आणि नारदाचार्य, शंकराचार्य, तुलसीदास ज्ञानेश्वरमहाराज, तुकाराम महाराज वगैरे सत्पुरुषांचे वाङ्मय हे सर्व साक्षात्कृत ग्रंथप्रकारात समाविष्ट होते.'नित्यनवीनता' हाच या साक्षात्कृत ग्रंथांचा विशेष असतो.आनंदाची गोष्ट अशी की, श्रीगुलाबराव महाराजांचे ग्रंथ देखील अगदी असेच नित्यनवीन आहेत त्यांच्या ग्रंथांतून अगदी अडाणी दळणकांडण करणाऱ्या खेडवळ स्त्रियांपासून तो तहत योगी, ज्ञानी ब्रह्मनिष्ठ अशा भक्तांपर्यंत सर्वांना मार्गदर्शनपर प्रक्रिया विपुलप्रमाणात उपलब्ध होऊ शकतात. वेदान्ततत्त्वांना बाध येणार नाही अशा नवीन प्रक्रिया रचून साधकांना त्यांच्या कुवतीप्रमाणे मार्ग सांगण्याची महाराजांची हातोटी पदोपदी प्रत्ययाला येते.

अशा या ग्रंथावलीचा परिचय करून देण्याचे कार्य अत्यंत कठिण आहे.तरी देखील महाराजांच्या वाङ्मयाची साधारणपणे विषयावर विभागणी करून सर्व ग्रंथांचा थोडक्यात परिचय लिहिला आहे. महाराजांच्या ग्रंथांची विभागणी सामान्यतः पुढील १८ प्रकारांमध्ये होऊ शकते.१.सूत्र, २.भाष्य, ३. शास्त्र, ४.आकर, ५.भक्ती, ६.योग, ७.सांख्य, ८.संगीत, ९.आयुर्वेद, १०.प्रकरणग्रंथ, ११.गाथा, १२. निबंध, १३. संवाद, १४. आत्मचरित्र आख्याने, १५ नाटक, १६ भाषा, १७ क्रीडा १८. पत्रव्यवहार, १९. लोकगीते, २०.स्तोत्रे, २१.विविध रचना वगैरे.

सूक्तिरूपी रत्नावलीतील एक यष्टी म्हणजे गळ्यातील रत्नांचा कंठा या संदर्भात त्यांनी आपल्या ग्रंथसंग्रहाच्या प्रत्येक खंडाला 'यष्टी' हे नांव दिले असून ग्रंथमालेला सूक्तिरत्नावली हे नामाभिधान दिले आहे.या ग्रंथमालेत एकूण २० यष्टी असून लहान मोठे, पूर्ण अपूर्ण असे सर्व ग्रंथ त्यात समाविष्ट आहेत.

(ग्रंथांच्या सूचीत प्रथम अनुक्रम क्रमांक असून ग्रंथनामाच्या पुढे यष्टीचा क्रमांक दिला आहे.)

- कृ.मा.घटाटे

संदर्भ-टीपा

(१) साधुबोध ग्रंथाची प्रस्तावना (२) विश्वव्यापिनी-संस्कृति-प्रस्तावना (३) स्वमतनिर्णय श्लो. ३ (४) धारावाही रसो भक्तिःईशे तत्पदगोचरे। त्वंपदज्ञो परो भक्त इति स्वमतनिर्णयः ॥४७॥ (५) आत्मारामा अपि मुनयोर्निग्रंथाऽप्युरुक्रमे। कुर्वन्ति अहेतुकीं भक्तिमित्थंभूतगुणो हरिः॥भाग. न तत्र माहात्म्यज्ञान-विस्मृत्यपवादः॥ नारदीयभक्तिसूत्र

(६) अनध्यस्तविवर्त -

अभिन्नसत्यापररूपत्वे सति, भेदाभानपूर्वकम्, अधिष्ठानज्ञान-अनावरकत्वे सतिच, प्रीतिमात्रत्वात्, अधिष्ठानज्ञान-अनिवर्त्यम् - अनध्यस्तविवर्तलक्षणम् ॥ (वेदान्तपदार्थोद्देशदीपिका पा.१०,आवृत्ति२री)

(७) भगवद्भक्तिसौरभ २.१५ ते १८ (८) प्रीतिनर्तन अध्याय ६ (९) भक्तिपदतीर्थामृत १.४३ (१०) साधुबोध प्रश्न ७४, योगप्रभाव पान २७८ आवृत्ति ३री (११) योगप्रभाव मलपृष्ठ आ.३ व पान २४६ (१२) प्रियलीलामहोत्सव ६.४८ (१३) देवनाथ- समाधींव्युत्थानी हरि विलसे। (१४) सुखवरसुधा पान १२, आवृत्ती शके १८८८.(१५) श्रीगुलाबराव महाराजांची विचारसंपदा- ऋणानुबंध पा.२, १९८७

(१६) प्रथमयष्टी पा. १४७ प्रथम आ. (१७)सांख्यतत्त्वकौमुदी, कारिका १६, वाचस्पति मिश्र. (१८)साधुबोध प्र.५६१ (१९) वेदान्तपदार्थोद्देशदीपिका पान १३, शके १८८८ (२०) साधुबोध प्र. ४८४ (२१) साधुबोध प्र.४८५ (२२) गानसोपान समीक्षा पा.२४, डॉ.रूपा कुळकर्णी नागपूर विद्यापीठ प्रकाशन १९८१ (२३) श्री गुलाबराव महराजांची विचारसंपदा. पा. ३३८. नागपूर विद्यापीठ प्रबंध १९७८ (२४) काव्यसूत्रसंहिता. डॉ. वी के. लेले. हिंदु विद्यापीठ काशी, नागपूर विद्यापीठ प्रबंध१९७८ (२५) मानसार्युव. वैद्यनाथ प्रकाशन नागपूर १९८१ (२६) सुबोध हिंदुधर्म.पा.१६, १७ साधुबोध प्र. ६१७ (२७) स्वमतनिर्णयः ९२, ४ (२८) यष्टी १२.पा.१ ते १७ (२९) अलौकिक व्याखानमाला. य५, पा १७० ते १७४ (३०) साधुबोध. प्रश्न ८०३,८०४,८०५ आवृत्ती १९६१ / विश्वव्यापिनी संस्कृति.-कृ. मा. घटाटे, वि. हिं. परिषद प्रकाशन १९८१ (३१) साधुबोध. प्र. ८४६ (३२) साधुबोध. प्र. ८४८ (३३) आर्यधर्मोपपत्तिपा. २०१, आ. १९७९

मधुराद्वैताचार्य श्रीगुलाबरावमहाराज

श्री गुलाबरावमहाराजांच्या ग्रंथांचे सारांश

१. अन्तर्विज्ञानसंहिता

(संस्कृत यष्टी १६, सूत्रे २३३)

या संस्कृत सूत्रग्रंथात एकूण २३३ सूत्रे आहेत. अन्तर्ज्ञान होण्याच्या प्रयोजनासाठी श्रीज्ञानेश्वरमहाराजांना नमन आहे. सुरवातीला चित्तासंबंधी विवेचन असून जे चित्त बाहेर जाऊन विषयांना जाणते तेच उर्ध्वगती केलेअसता आत्मतत्त्वापर्यंत पोहचते असे सांगितले आहे. नंतर पुढे चित्ताच्या ७ अज्ञानभूमिका व ७ ज्ञानभूमिका यांचा सांगोपांग विचार केला आहे. त्यांचा अभ्यास केला असता साधक तुर्यगा या सर्वोच्च ज्ञानभूमिकेवर आरूढ होतो. त्यालाच जीवन्मुक्त किंवा ब्रह्मविद्वरिष्ठ म्हणतात. या जीवन्मुक्त स्थितीत भक्ती प्राप्त झाली म्हणजे प्रारब्ध दुखाःचा अभिभव होऊन समाधीचा आनंद अखंड मिळू लागतो. या पूर्णत्वेपर्यंतचे विवेचन महारजांनी केले आहे. यातील ज्ञानभूमिकांना श्रद्धा, विचार, ध्यान व ज्ञान हे आधारभूत आहेत. स्वप्न, संभ्रम, संकल्प व स्वानुभूती ही प्रमाणे सांगितली आहेत. या सर्वांचे साह्य घेऊन बाह्यसिद्धी व आन्तर्सिद्धी कशा प्राप्त करून घ्याव्या, याचे मार्गदर्शन आहे. संयम केला असता प्रतिभा उत्पन्न होते. त्या संदर्भातील प्रतिभेची व्याख्या महत्त्वपूर्ण आहे. 'निमित्तानपेक्षं अविसंवादकं ज्ञानं प्रतिभा' या प्रतिभेवर संयम केला असता ज्ञान होऊन चित्ताचा नाश होतो, निर्बीज समाधी साधली जाते व पुरुष पूर्ण होतो. याप्रमाणे अलौकिक ज्ञान व ब्रह्मज्ञान प्राप्त करून घ्यायचे असेल तर सर्वांनी आचार्यादिकांपासून म्हणजे गुरुमुखानेच ते प्राप्त करून घ्यावे, असे आग्रहाने प्रतिपादन केले आहे. येथे शास्त्रज्ञो ऽ पि स्वातंत्र्येणब्रह्मान्वेषणं न कुर्यात् स गुरुमेवाभिगच्छेत् ।। या श्रुतिवाक्यावरील शांकरभाष्याची आठवण येते

२. ईश्वरदर्शनम्

(संस्कृत. यष्टी१६ पाद७ सूत्रे२४३)

ईश्वराचा साक्षात्कार होण्यासाठी या ईश्वरदर्शन सूत्रग्रंथाची प्रवृत्ती झालेली आहे. परंतु या ग्रंथाचे प्रयोजन ब्रह्मज्ञान नसून, ज्ञानोत्तर भक्तीचे शास्त्र जाणल्यानंतर भगवंताचे परमप्रेम मिळावे, यात आहे. 'अथात ईश्वराराधन जिज्ञासा' ।।१।। जिज्ञासा कशाची? तर ईश्वराच्या आराधनेची-म्हणजे भक्तिशास्त्राची! पहिल्या पादात ईश्वराची समान्य सिद्धी केलेली असून ब्रह्मसूत्रासारखी सूत्रे यात आढळतात.

(१) ईश्वर मायायुक्त असला तरी मायेच्या आधीन नसून स्वतंत्र आहे. जैमिनी, तार्किक, शाक्त, अनार्य, अवैदिक, व्याकरण, सांख्य, योग, वगैरे सर्व वैदिक अवैदिक, दर्शनातून ईश्वर मानणे भाग पडते व शेवटी लक्षणेने वेदान्ताचा ईश्वरच सिद्ध होतो. असा सर्व दर्शनांचा संकलनात्मक सिद्धांत दुसऱ्या पादात मांडला आहे.

(२) हा ईश्वर अनेक नसून एकच असल्याची सिद्ध तिसऱ्या पादात केली आहे.

(३) चौथ्यात ईश्वरच व्यक्त आणि अव्यक्त म्हणजे सगुण आणि निर्गुण झाला आहे. त्यात न्यून-पूर्ण असा भेद नाही. निर्गुणब्रह्मच अनध्यस्तविवर्त झाल्याने 'एकदेशी इव साकारासारखे' भासते. प्रीतिमंताना निर्गुण ब्रह्मच रामकृष्णादि सगुणरूपाने प्रतीत होते.

(४) शेवटी चौथ्या पादात व्यक्त आणि अव्यक्ताचे ऐक्य प्रतिपादन केलेले आहे.

दुसऱ्या अध्यायातील प्रथम पादात, निरीश्वरवादाचे समूल आणि सोपपत्तिक खंडन आढळते. विरोध केला तरी स्वसिद्धांतच महाराज प्रतिपक्षाच्या गळी कसा उतरवितात हे पाहणे अतिशय मनोरंजक आहेविरोधादुभयसिद्धिः ॥२३॥ वाद केला तर अनिर्णय. अनिर्णयामुळे मौन ठेवले तर संशय. संशय दाखविला तरी संशयाचा निश्चयच होतो व निश्चय केला म्हणजे अस्तित्व मानावेच लागते. अशी अनर्थ परंपरा दाखवून देऊन महाराजांनी बिनतोड युक्तिवाद केला आहे.

दुसऱ्या अध्यायातील दुसऱ्या पादात ईश्वर कोण? शंकर की विष्णु? असे दोन्ही पक्ष घेऊन मनोरंजक रीतीने परस्परांचे दोष दाखवून परस्परांचे श्रेष्ठत्व मांडले आहे. नंतर देवी श्रेष्ठ की देव श्रेष्ठ? की राम श्रेष्ठ की कृष्ण श्रेष्ठ? याचाही अनिर्णय घोषित केला आहे. शेवटी ''आग्रह धरला तर आग्रहच उरतो आणि आग्रह सोडला तर दोन्ही एकच होतात. असा उत्तम-समन्वयात्मक निर्णय केला आहे. हे अलातचक्रपरिवर्तन मनोवेधक झाले आहे.

दुसऱ्या अध्यातील तिसऱ्या पादात जीव- पत्नी व ईश्वर- पती असा संबंध दाखविला आहे. अंशांशित्व, बिंबप्रतिबिंबत्व वगैरे सर्व भेद व्यावहारिक सत्तेत आहेत. पारमार्थिक सत्तेत किंवा समाधीत जीवेशांचे अत्यंत ऐक्य असल्याने सर्व भेद लीलामात्र आहे.- ''एकाकी न रमते'' या श्रुतीप्रमाणे ईश्वरच स्वतःचा आनंद पुनः पुनः घेण्यासाठी द्वितीय इव झाला आहे असे यात मांडले आहे.

अशा जीवाला स्वतःची जी भिन्न सत्ता प्रतीत होते ती नाहीशी करण्यासाठी भगवदाज्ञारूप विहित धर्माचे पालन करण्यास सांगितले असून शेवटी जीवेशांचे ऐक्य प्रतिपादले आहे.

३. समसूत्री

(संसकृत, यष्टी१६ सूत्र १५)

यात पंधरा सूत्रे आहे. अत्यंत दुःखनिवृत्ती हे सांख्यशास्त्राचे ध्येय आणि परमानंद प्राप्ती मिळून एकच पुरुषार्थ वेदान्तात मानला आहे. त्याच्या प्राप्तीसाठी जडचेतन विवेक येथे सांगितला आहे. जीव स्वतःला जरी बद्ध समजत असला तरी बद्धता हा जीवाचा स्वभाव नाही. स्वभाव असता तर त्याला दुःखनिवृतीची इच्छा होणे कधीच शक्य नव्हते. त्याला मोक्षाचा उपदेशही व्यर्थच झाला असता. केवळ विचाराच्या साह्याने जरी त्याने भ्रमरूप अविद्येचा स्वतःपासून व्यतिरेक केला तरी तो स्वतंत्र आहे, असा त्याला अनुभव येतो. त्यावेळी श्रीहरीची प्रेमभक्ती केली की खरा मोक्ष मिळेल असा विषय महाराजांनी मांडला आहे.

४. दुर्गातत्त्वम्

(संस्कृत, यष्टी१६ अध्याय३ सूत्र७३)

या सूत्रग्रंथात ३ अध्याय असून एकूण ७३ सूत्रे आहेत. दुर्गातत्त्व म्हणजे शक्तितत्त्व होय. हीच शिवाची शक्ती अज्ञानी जीवांना मोह उत्पन्न करते तेव्हा हिलाच अविद्या म्हणतात आणि आत्मज्ञान झाल्यानंतर विद्यारूपिणी भगवच्छक्तिरूपाने हीच प्रतीत होते व सर्वत्र चिति-विलासाचा अनुभव येतो. अशा या दुर्गादेवीची तत्त्वमीमांसा करणारी सूत्रे महाराजांनी रचिली आहेत.

पहिल्या उपदेशात 'अथातो तत्त्वजिज्ञासा' अशी सुरवात करून सत्य व मिथ्या अशी दोन तत्त्वे सांगितली असून पुढे कारण व कार्यासंबंधी काही सूत्रे आहेत. शेवटी जड व चेतनात त्यांची परिणती दाखविली आहे.

दुसऱ्या उपदेशात अज्ञानाचे सत्त्व रज तम हे तीन गुण सांगून आवरण व विक्षेप या दोन शक्तींचे वर्णन आहे. यातील ईश्वराची व जीवाची व्याख्या मार्मिक आहे.

ईश्वर = विक्षेपशक्त्याश्रयं चैतन्यम् ईश्वरः ।।१६।।

जीव = आवरणशक्तिगतं चैतन्यं जीवः ।।१७।।

तसेच वेदान्तातील सहा अनादि पदार्थांची वैशिष्ट्ये प्रतिपादन केली आहेत.

तिसऱ्या अध्यायात चेतनाच्या सांनिध्यामुळे अज्ञान सृष्टी उत्पन्न करते असे सांगून बुद्धीपासून पंचभूतांपर्यंत (पंचीकरण) विश्वोत्पत्ती सविस्तर वर्णिली आहे.

५. काव्यसूत्रसंहिता

(संस्कृत. यष्टी१६ अध्याय५ सूत्रे८९)

या संहितेत एकूण पाच पाद आहेत. साधारणपणे सर्व संतांनी काव्यविषयक विचार फुटकळ रीत्या बऱ्याच ठिकाणी मांडले आहेत. परंतु त्यातील भक्तिप्राधान्यामुळेत्यांच्या काव्यमीमांसेलअर्थ नाही, असा आधुनिक साहित्यिकांचा समज झाला आहे.

समर्थ रामदास श्रीतुकाराम वगैरे संतांनी भक्तिशिवाय इतर काव्याची तुच्छता दर्शविल्यामुळे श्रृंगाराला रसराज मानणाऱ्यांनी त्याकडे पाठ फिरवावी हे साहजिकच आहे. परंतु भक्त व कवी दोन्ही भूमिका महाराजांच्या ठिकाणी असल्यामुळे त्यांनी सर्व संतांच्या काव्यविचारांना शास्त्रीय बैठक देऊन त्यात भक्तिकाव्याला सर्वोच्च राजसिंहासनाचा मान दिला आहे आणि इतर सर्व काव्यप्रकारांना यथायोग्य आसनेप्रदान केली आहेत. अशारीतीने या ग्रंथातील शास्त्रीय मांडणीमुळे यापुढे संतांच्या काव्यदृष्टीला नजरेआड करता येणार नाही येवढे मात्र खरे!

पहिल्या पादात काव्याची व्याख्याच- सृष्टेरन्तः स्वरूपं ईश्वरनिर्विष्टं काव्यम् ।।२।। अशी केली आहे. नंतर कवी म्हणजे - ब्रह्मानंदप्राकट्यकारणं कविः।। असे सांगितले आहे.

पुढे काव्यानंदाचे दोन प्रकार केले आहेत. १.बाह्यविषयापासून होणारा भोगरूप आनंद. २.साक्षीस्वरूपापासून होणारा स्वयंरूप आनंद. स्वयंरूप आनंद ज्याने मिळतो ते भक्तिकाव्य! हा स्वयंरूप आनंद कधीच खंडित होत नाही म्हणून हा श्रेष्ठ व इतर गौण असा युक्तिवाद त्यांनी मांडला आहे. काव्याच्या आशयाला बाह्यविषय समजून जेव्हा आपणाला आनंद मिळतो तो भोगरूप आनंद असून त्यात भक्तिकाव्य सोडून इतर सर्व साहित्याचा समावेश केला जाऊ शकतो.

'विकार-विचारयोरैक्यं स्थायिभावः' ही स्थायीभावाची व्याख्या तर पूर्वसूरींना अनुरसरून असली तरी सर्वस्वी नवीन दृष्टी देणारी आहे.

'रसो वै सः' या वैदिक श्रुतीला आधार घेऊन सर्व विवेचन असल्याने हे काव्यशास्त्र परतत्त्वस्पर्शाने पुनीत झाले आहे. त्यात कवीचे प्रकार करताना उच्छिष्ट, भोक्ता, साक्षी व ईश्वर अशी विभागणी केली आहे. त्यातील साक्षीची व्याख्या लक्षणीय आहे.

''विकारसंस्थाने विकारान् ज्ञात्वा अविकारी भवतीति साक्षी''

तिसऱ्या पादात स्फूर्तीचे तीन प्रकार केले आहे. 'नैसर्गिकी, वैचारिकी व स्वयम्.' पैकी वैचारिकीची व्याख्या तर भक्तिशिवाय ''इतर उत्तम काव्याला'' तंतोतंत लागू पडते.

चवथ्या लक्षणपादात सृष्टीचे दोन प्रकार केले आहेत. ईश्वरजा व जीवजा.

ईश्वरसृष्टिप्रधानं भावनागौण्यं चित्रम् ।।४।।

भावनाप्रधानं ईश्वरसृष्टिगौण्यं काव्यम् ।।५।।

ईश्वरसृष्टीतील संस्कारांमुळे अन्तःकरण्यात जो मृदुसंस्कार होतो तो भोग. आणि भावेनच्या मृदू संस्कारापासून काव्यरूपी तीव्र संस्काराची अन्तःकरणात जी अभिव्यक्ती होते, ती काव्याची

उत्पत्ती. अशा व्याख्या केल्या आहेत.

पाचव्या पादात कवित्व प्राप्त करण्याचे सहा प्रकार सांगितले आहेत. सर्व विकारांचे व गुणांचे वर्णन करीत असता सावधान राहून साक्षित्व सांभाळले म्हणजे काव्याचे अंतिम प्रयाजेन- जीवन्मुक्ती प्राप्त होते व तीच सर्वांनी साध्य करावी, हेच काव्यसूत्रसंहितेचे प्रयोजन महाराजांनी शेवटी मांडले आहे. या ग्रंथावर विस्तृत भाष्य लिहिले गेले पाहिजे. (डॉ. वा. के. लेले यांनी केलेले विवरण ग्रंथरूपाने आहे)

६. शिशुबोधव्याकरणम्

(संस्कृत. यष्टी१६, अध्याय३ सूत्रे १०५)

या व्याकरणग्रंथात संज्ञाप्रकरण, स्वरसंधि व तिङ्गन्त ही तीनच प्रकरणे उपलब्ध आहेत. यांत संस्कृत बरोबर मराठीतही सूत्रार्थ सांगितला आहे. ही तीन प्रकरणेही अपूर्णच असावीत असे वाटते कारण नेहमीप्रमाणे प्रकरणाची समाप्ती केलेली दिसत नाही.

या व्याकरणाचा विशेष म्हणजे याची सुरवात सृष्टीच्या आरंभाप्रमाणे प्रणवापासून आहे. ओंकाराचा अर्थ कोणापासून उत्पन्न न झालेले व कधीही नाश न पावणारे असे ब्रह्म असून तेच यच्चयावत सर्व शब्दांचा अर्थ आहे. ओंकाराचा लक्षणावृत्तीने आणि शक्तिवृत्तीनेही ब्रह्मच अर्थ निघतो असे दाखवून दिले आहे.

७. न्यायसूत्राणि / न्यायसूत्रविवरणम्

(संस्कृत. यष्टी १६, सूत्रे २७

यात एकूण २७ सूत्रे व दोन अध्याय आहेत. ग्रंथ अपूर्ण आहे. यात महाराजांनी संस्कृत व मराठी दोन्ही भाषेत भाष्य करण्याचा उपक्रम केलेला होता. एके ठिकाणी तर्काची व्याख्या पाहण्याजोगी आहे. येन जातं ज्ञानं त्यक्तुं न शक्यते स तर्कः ॥२॥

वेदान्तामध्ये न्यायघटित भाषेतच सर्व युक्तिवाद मांडण्यात येतो. म्हणून वेदान्ताला अविरोधी असलेले न्यायशास्त्र ग्रंथरूपाने मांडण्याची महाराजांची इच्छा होती असे दिसते. कारण शेवटी त्यांनी अध्यायाला 'निगमान्ततर्क क्षणनिष्क्रम' असे नाव दिले आहे. या सूत्रांचे विवरण करण्याचाही महाराजांचा विचार होता पण ते कार्य अपुरे राहिले.

८. एकादशीनिर्णयः

(संस्कृत. यष्टी १६, सूत्रे३४)

एकादशीचा उपवास दोन प्रकारचा- नित्य आणि काम्य. भागवत, स्कंदपुराण, नारदपुराण, या सर्वात उपोषणाचा संप्रदाय अनादि म्हणून सांगितला आहे. शिव व विष्णु या दोघांचेही पूजन यात समान आहे. संन्याशांना देखील उपवासाचे विधान आहे. यापासून मुक्ती व भक्ती दोन्ही प्राप्त होतात, लोकालोकातील फेरा टळतो.

काम्य एकादशीचे फल 'इष्टदेवलोकप्राप्ती असे आहे' ही एकादशी माध्वसंप्रदायाने सांगितली असल्याने 'सादि' आहे. यात विष्णुपूजन असून शिवद्वेष असल्याचे महाराज म्हणतात. त्यांनी आपल्या संप्रदायात मात्र अनादि पौराणिक एकादशीच मानली आहे.

दशमीविद्ध एकादशीचा निषेध केला आहे. तिथीचा लोप असेल तर द्वादशीला उपवास करावा. तिथीची वृद्धी असेल म्हणजे दोन दिवशी सूर्योदयाला एकादशी तिथी असेल तर दोन्ही दिवशी उपवास

करावा. जागरण, नामस्मरण, कीर्तन व अर्चन शास्त्रविधीप्रमाणे करावे.त्यात मुख्य हरिहरनामस्मरणाला प्राधान्य असावे.भक्तीसाठी हाच एक उपाय आहे.वगैरे अनेक विषय लहान लहान सूत्रांत प्रतिपादन केले आहेत.

९.पुराणमीमांसा / पुराणपुरुषमीमांसाभाष्यम्

(संस्कृत.यष्टी१६ अध्याय७ सूत्रे३३७)

यात सात अध्याय असून ३३७ सूत्रे आहेत.महाराजांनीच ७४ विषयांची अनुक्रमणिका यात मांडली आहे.अठरा पुराणे व अठरा उपपुराणे यांचा वैदिक श्रुतिवाङ्मयाशी समन्वय करून, सर्वविरोध परिहार करून, वेदपुराणात सर्वत्र एकच विषय प्रतिपाद्य आहे, हे युक्तीच्या साह्याने पटवून देण्याची महाराजांची इच्छाच या सूत्रग्रंथातून व्यक्त झालेली दिसते.''भारतीय वैचारिक साहित्य वरवर अवलोकन केले असता त्यात परस्पर विरोध आहे असे वाटते पण तसे नाही'' - हेच महाराजांनी सुस्पष्ट दाखवून दिले आहे.

आर्यधर्मातील सर्व मार्ग अधिकारानुसार भिन्न भिन्न असल्याने संप्रदायातील सांप्रदायिकांना मात्र 'स्वमार्ग श्रेष्ठ व इतर त्याज्य म्हणून कनिष्ठ' अशीच निष्ठा असणे सुरवातीला आवश्यक आहे. पण सर्वांना वेगवेगळे मार्ग सांगणारा ईश्वर किंवा श्रीगुरू यांना मात्र त्या सर्व मार्गांची एकपरता स्पष्ट दिसत असते.हीच दृष्टी याही सूत्रग्रंथात आहे.

प्रथम प्रकरणात सुस्पष्ट ब्रह्मबोधक वाक्यांचा समन्वय एकतीस सूत्रांत केला आहे.उपासनेमध्ये उपास्याच्या ठिकाणी ब्रह्मभावना करावयाची असते हे सांगून उपासनाबोधक सर्व अस्पष्ट पुराणवचनांचा ईश्वरपर अर्थ पुढील प्रकरणात मांडला आहे.नंतर जिज्ञासूंना ज्ञेय असलेल्या ब्रह्मासंबंधी अस्पष्ट असणाऱ्या पुराणवाक्यांचा समन्वय केला असून पुराणांना अपौरुषेय म्हणजे ईश्वरनिर्मितच मानले आहे. अति संदिग्ध वाक्येही समन्वित करून दाखविली आहेत.सांख्य, योग, न्यायशास्त्र यांचे स्मृतिरूपत्व मांडून त्यांतील युक्तिवादाच्या साह्याने आणि अनुभवाच्या आधारावर वेदान्ताशी समन्वय करताना सर्व प्रकारच्या विरोधांचा परिहार केला आहे.नंतर न्याय, सांख्य, बौद्ध, जैन वगैरे दर्शनातील श्रुतिविरोधी व अनुभवविरोधी वाक्यांचे खंडन करून भागवतमत सिद्ध केले आहे.

''भेद उपासनार्थम् - - - अभेदो ज्ञानार्थम् ॥७८॥'' - भेद हा उपासनेसाठी आणि ऐक्य हे ज्ञानासाठी. असा ''उत्तम समन्वय'' महाराजांनी यात केला आहे.शास्त्रसमन्वय या ग्रंथात ते म्हणतात की सर्व शास्त्रांतील श्रद्धातत्त्व व यौक्तिक तत्त्वांचा समन्वय करूनही जो भेदाचाच आग्रह धरील तो असूयेने ग्रस्त आहे यात संशय नाही.त्याचप्रमाणे सर्व पुराणांचा अर्थ नारायणपर आहे.'नारायणपरा लोकाः, नारायणपरा वेदाः, नारायणपरा मखाः, नाराणपरा गतिः॥' सर्व पुराणांची गति एकच आहे असे दाखवून सर्व पुराणांचा समन्वय कसा करावा याचे सूत्ररूपाने प्रतिपादन येथे केले आहे.(यावर लिहिण्याचे महाराजांनी सुरू केले आणि फक्त दोन पाने लिहिली गेली)

१०.संप्रदायसुरतरू

(यष्टी ११ अध्याय २२ ओव्या ६०६८, पा.७७९)

साधारण सहा हजारांच्या वर ओव्या आणि अभंग असलेल्या आणि संस्कृत मराठी गद्यपद्यमिश्रित असलेल्या या आकरग्रंथाचे स्थान महाराजांच्या वाङ्मयात सर्वात महत्वाचे आहे. प्रीतिनर्तनादि ग्रंथ फलोपम आहेत.माधुर्यभक्तिरूपी रसाळ फळे प्राप्त होण्यासाठी संप्रदायपुरस्सर, आचरण करून व मनाला तसे वळण लावून जन्मजन्मांतरी ब्रह्मप्राप्तीचा प्रयत्न करण्याचे मार्ग या ग्रंथात सांगितले आहेत.

या ग्रंथात एके ठिकाणी स्वतःबद्दल बोलतांना महाराज म्हणतात की, अपांतरतम मुनी, मनु, व्यास, शुक, नारद, शंकराचार्य, ज्ञानेश्वर तुकारामादि हे सर्व आचार्य कल्पी कल्पी तेच ते अवतरतात त्याप्रमाणे -

''तैसी प्रतिकलींमाझारीं । मजहिं स्मृति धर्माधिकारी ॥१२५॥
कल्पीं कल्पीं आधिकारिक होऊनि । येतो आम्ही ॥१२९॥''

असा स्वतःचा अधिकार सांगून ''अनादि माधुर्यसंप्रदायाचे पुनरुज्जीवन करण्यासाठी या कलियुगात मी मधुराद्वैत संप्रदायाची स्थापना केली आहे,'' असे स्पष्ट म्हटले आहे.

*व्यासांनी वेदाचे चार भाग केले, *शंकराचार्यांनी विरोधी भसणाऱ्या श्रुतींचा समन्वय करून वैदिक धर्माची स्थापना केली, *शुक-नारदादिकांनी भक्तिस्थापना केली त्याप्रमाणे *महाराजांनीही वेद, उपनिषदे, स्मृती, पुराणे, रामायणभारतादि इतिहास आणि संतवचने यांचा विरोध परिहार करून समन्वयपूर्वक सर्वांची भक्तिपरता सिद्ध केली आहे.तसेच सर्व संप्रदायातील ग्राह्य भाग कोणता व अग्राह्य भाग कोणता याचे दिग्दर्शन करून, त्यांच्यातील परस्पर विरोध नाहीसा करून, एकवाक्यात दाखवून दिली आहे. हा श्रीज्ञानेश्वर मधुराद्वैत संप्रदाय नाथसंप्रदाय असून उपास्यत्वेकरून वारकरी पंथाची शाखा आहे. हा ग्रंथ केवळ सांप्रदायिकांकरताच रचलेलाआहे.

''श्रीमान ज्ञानेश्वराचार्य, उमामाता, शिवः पिता । पतिः कृष्णो, राधिकाद्या भगिन्यो गोपिका मम ॥''

या उपास्यपंचकावर ज्याची निष्ठा नाही त्याने हा ग्रंथ अवलोकन केल्यास शापयुक्त निर्बंध महाराजांनी घालून दिला आहे.

आदिनाथ शंकर व मत्स्येंद्रनाथ यांच्यापासून या ज्ञानेश्वर मधुराद्वैत संप्रदायाची नाथ परंपरा असून ज्ञानेश्वर महाराजांनी स्वतः उपदेश करून महाराजांना कृतार्थ केले, असे त्यांनी सांगितले आहे. श्रीकृष्णाचे प्रेम करणे हे भगवान् शंकरापासूनच शिकले पाहिजे. प्रेमाची सर्वश्रेष्ठ अवस्था माधुर्य ही असून त्यातच लालन वात्सल्यादि यच्चयावत्सर्व प्रेमवृत्ती भगवंतावर अर्पणहोऊ शकतात. भगवान् शंकरांनीही गोपी होऊन रासक्रीडेत भाग घेतला होता, असा भक्तीचा इतिहास आहे.या संप्रदायात सर्व गोपिका भगिनी रूपाने आहेत. शिव, उमा, श्रीकृष्ण, गोपिका व श्रीज्ञानदेव यांचे अत्यंत अद्वैत असून प्रेमभक्तिसाठीच पंचायतनरूपाने ते नटले आहेत. श्रीज्ञानेश्वर महाराजांच्या पादुकांची व विष्णुमूर्ती शालीग्रामाची पूजा आणि शंकराची पार्थिवपूजा या नित्योपासना आहेत.

अलंदि हिमवान् काशी प्रयागो व्रजमंडलम् । पंढरी चेति तीर्थानां षट्कमिष्टं इति निर्णयः॥

ही सहा सांप्रदायिक इष्ट तीर्थस्थानेआहेत. सांप्रदायिकांची रोजची दिनचर्या, अर्थार्जनाची पद्धती, कात्यायनी व्रतादिकांची नाविन्यपूर्ण माहिती वगैरे यात आली आहे. ब्रह्मचर्य पालन करायचे असेलतर पति-पत्नी दोघांनी मिळून पालन करावे पण विवाह विरहित राहू नये, असा इतरत्र सहसा न आढळणारा निर्बंध येथे आहे.

गुरुभक्ती ही ईश्वरभक्तीप्रमाणेच केली पाहिजे.ती साधनरूप असून फलरूपही आहे.खरोखर परमार्थांत नामस्मरणाचे महत्त्व साधनरूपाने सर्वात मोठे आहे; पण सामान्यांचे लक्ष कठिणाकडे अधिक असते- सोप्या साधनावर विश्वास बसत नाही म्हणून नामस्मरणाची अवज्ञा होते. पण अन्ततो गत्त्वा शेवटी नामस्मरण हेच परमेश्वरप्राप्तीसाठी प्राथमिक, निकटचे आणि शेवटचे साधन आहे; वगैरे अनेक विषय शास्त्रीय दृष्टिकोणातून खंडनमंडनपूर्वक विस्ताराने उत्तमरीत्या सिद्ध केले आहेत.

सर्व संप्रदायांचे प्रवर्तन ईश्वरानेच केले असून अधिकारानुसार भिन्न भिन्न मार्ग त्यात सांगितले

असतात. त्यात खंडनमंडन जे आढळते ते स्वमतावरील निष्ठा दृढ टिकवून धरण्यासाठी असते. म्लेंच्छ धर्मापासून वैदिक धर्मापर्यंत सर्व धर्माचे अधिकारी वेगवेगळे आहेत. पण भागवत धर्माच्या भक्तीत मात्र पशुपक्षी, म्लेंच्छ, चांडालादिकांपासून ब्राह्मणापर्यंत सर्वजण भगवंतावर प्रेम करून अद्वैतभक्तीची प्राप्ती करून घेऊन तरून जाऊ शकतात. तसेच महाराजांच्या या मधुराद्वैत संप्रदायात देखील उपास्यपंचकारवर दृढ निष्ठा असली तर सर्व जातीचे लोक संप्रदाय नियमांचे पालन करून तरून जाऊ शकतात. पण परंपरेने आलेल्या आचारधर्माचे पालन निष्ठापूर्वक करण्याचा संकेत आहे. भक्ती मात्र सर्वांना सारखी फलदायिनी व उपदेश्य आहे.

या ग्रंथात संप्रदायाला अनुसरून इतके विषय आले आहेत की, हा सुरतरू खरोखरीच मुमुक्षूंच्या सर्व पारमार्थिक इच्छा पूर्ण करणारा यथार्थ कल्पतरू आहे. यात वैदिक, पौराणिक आणि स्मार्तधर्माचे तसेच नित्यनैमित्तिक उपासनांचे परमार्थपरत्व समन्वयपूर्वक सिद्ध केलेले आहे. कलियुगात सर्व धर्मांचा ऱ्हास होईल पण परमप्रेमाचा ऱ्हास कधीच संभवत नाही, म्हणूनच भक्तीचाही ऱ्हास होऊ शकत नाही. त्यामुळे कितीही पतित असला तरी वेश्याधर्मापासून पंचमकारयुक्त वाममार्गापर्यंत प्रत्येकाला उद्धाराचा मार्ग सांगून परमेश्वराने आपले परमदयालुत्व प्रकट केलेले आहे. पण ''प्रत्येकाला त्याच्या स्वतःच्या वरच्या पातळीवरील धर्म आचरणीय आहे खालचा नव्हे'' हे अतिमहत्त्वाचे सूत्र या सुरतरूत दाखवून सर्व धर्मांचे, सर्व संप्रदयांचे, सर्व मार्गांचे ईश्वरकर्तृत्व आणि ईश्वरपरत्व श्रुति-युक्ति-अनुभवांनी सिद्ध करून परस्पर विरोधाचे मूळ नाहीसे करून दाखविले आहे. हे महाराजांचे कर्तृत्व त्यांच्या आधिकारिक अवताराला शोभा देते. (दुसरा भाग लिहिला गेलेला नाही.)

११. नारदीय-भक्त्यधिकरण-न्यायमाला

(संस्कृत. यष्टी २०, श्लोक ६४ / श्रीबाबाजीमहाराज पंडित-मराठी अनुवाद)

भक्तीचे आचार्य भगवान् श्रीनारदमुनी यांच्या भक्तिसूत्रांवर अधिकरणन्यायमालारूपी चौसष्ट श्लोकात भक्तीचे स्वरूप प्रश्नोत्तरात्मक रीतीने अगदी सोपे करून दाखविले आहे. अधिकरणन्यायमाला पूर्ण सूत्रांवर झाली आहे. परंतु त्यावरील संस्कृतभाष्य फक्त २६ व्या सूत्रापर्यंतच उपलब्ध आहे. मराठीतील ओवीबद्ध विवरण तर अत्यंत थोडे म्हणजे २ सूत्रांवरच अपुरे राहिले. पहिल्या सूत्रावर १९० ओव्या असून दुसऱ्यावर ३६८ ओव्या आहेत.

अधिकरणन्यायमालेत भक्ती कां करावी, यापासून सुरुवात आहे. पहिल्यांदा प्रश्न, नंतर पूर्वपक्ष व शेवटी सिद्धांत असा त्यातील क्रम आहे. गूढ सिद्धांत कमी शब्दात व सोप्या भाषेत मांडल्यामुळे सहज समजेल अशी प्रासादिक शैली आहे.

भक्ती 'स्वयंआणि वस्तुतंत्र' असल्यामुळे तिला इतर साधनांची अपेक्षा नाही. भक्ती म्हणजे आत्मप्रीती होय. प्रीती व राग यात फरक आहे. राग बाह्य विषयाबद्दल असतो तर प्रीती स्वयंरूप असते. सगुणभगवंतावर प्रेम करताना आत असलेले स्वप्रेमच बाहेर प्रगट होते म्हणून पूजा करणे वगैरे बाह्यक्रिया भक्तीचेच लक्षण आहे. समाधीत आत्मानंदाचा अनुभव असतोच पण व्युत्थानकाळीही भक्ताचे सर्व प्रेम विस्मरणाच्या भीतीने उत्कट होऊन भगवंतावरच अर्पण होत असते. अशा तऱ्हेने भक्ताची परमानंदस्थिती समाधीत व व्युत्थानात हरिप्रेमरूपाने कायम असते.

१. कर्माने चित्तशुद्धी होते – ईश्वरार्पण बुद्धीने.

२. योगाने चित्त एकाग्र होत - ईश्वराच्या साह्याने.

३. ऐक्यज्ञानाने निरहंकारस्थिती बाणते- ईश्वरभक्ती असेल तर.

म्हणून कर्म, योग व ज्ञान हे भक्तीचे अंगरूप आहेत. तिन्हींना भक्तीची आवश्यकता आहे पण भक्ती उत्कट साधली तर प्रयत्न न केला तरी तिन्ही आपोआप साधले जातात व भक्त पूर्ण होतो. म्हणून भक्ती सर्व साधनांपेक्षा श्रेष्ठ आहे व ती स्वतःच फलरूप आहे. 'ज्ञानाने ऐक्य होते तर भक्तीने ऐक्याभिमान नाहीसा होतो.' अशा प्रकारचे सूत्रमय विचार यात विखुरलेले आहेत.

भगवान् प्रेमवश आहे, गुणांची वश होणारा नाही. व्याधाचे आचरण, ध्रुवाचे वय, गजेंद्राची विद्या, विदुराची जात, उग्रसेनाचे पौरुष, कुब्जेचे सौंदर्य, सुदाम्याने धन हे काय सांगण्याजोगे आहेत? परंतु प्रेम मात्र सर्वांचे ठिकाणी उत्कट होते. त्यामुळेच भगवान त्यांना वश झाला.

अशी ही भक्ती एकरूप असली तरी वृत्तिभिन्नत्वामुळे ती अनेक प्रकारची भासते. यासंबंधी सूर्य व त्याची किरणे यांचा समर्पक दृष्टांत दिला आहे. असा हा मोठा आशय असलेला चिमुकला ग्रंथ आहे.

१२. भक्तिसूत्र : संस्कृतभाष्य
(संस्कृत. यष्टी १६)

भक्तिसूत्रावर अधिकरणमाला व त्यावर भाष्य असा यातील क्रम आहे. हे भाष्य वाचताना श्रीशंकराचार्यांच्या ब्रह्मसूत्रभाष्याचीच आठवण येते. आचार्यांच्या भाष्यात केवळ अद्वैत ज्ञानाची मांडणी आहे. पण यात आचार्यांचे अद्वैत पूर्णपणे स्वीकारले असून त्याहून अधिक म्हणजे भगवत्प्रेमाची मधुरता आहे. आचार्यांचे ज्ञान-वैराग्य आणि संतांची प्रेमभक्ती असा गोड मिलाफ या भाष्यातून रसिकाला प्राप्त होतो. आचार्यांप्रमाणे येथेही श्रुतिस्मृतिपुराणे यांचा समन्वय तर आहेच पण संतवचनांच्या द्वारा केलेले विरोधपरिहारपूर्वक भक्तिशास्त्राची मांडणी अपूर्व झाली आहे. आजच्या काळातील हे भक्तिभाष्य पूर्वसूरींची आठवण करून देते.

सत्तात्रयवादाप्रमाणे भक्ती तर सिद्ध होतेच परंतु सत्ताद्वयवादा- प्रमाणे देखील सगुण भगवंताची सिद्धी करण्यात महाराजांची सिद्धप्रज्ञा यात प्रगट झाली आहे. ते ''यावद् दृष्टि तावत् सृष्टि'' असे तर मानतात, पण ''यावद् दृष्टि तावद् भगवद्विग्रह'' याचे मात्र त्यांनी बिनतोड खंडन करून, आपल्या मधुराद्वैसंप्रदायाचे वैशिष्ट्य प्रस्थापित केले आहे. (अपूर्ण)

१३. भक्तिसूत्रः मराठी भाष्य
(ओव्या ५५८, यष्टी१४)

भगवंताच्या तटस्थलक्षण व स्वरूप लक्षणाचे भेद सांगून स्वरूपलक्षणयुक्त सगुण श्रीहरीवर लालन, वात्सल्य, माधुर्य वगैरे सर्व प्रेमवृत्ती अर्पण केल्या असता प्रेमानंदाची नित्यनूतनता कायमची अनुभवाला येते. कर्म, योग, ज्ञान यापैकी कोणत्याही प्रकाराने भगवंताची स्तुती केली तरी ती स्तुती अती अल्प व एकांगी ठरल्यामुळे जणु निंदारूपच होते. भगवंताची भक्ती अंतःकरणात नसेल तर त्या सर्व साधनामार्गातील कष्ट पापभोगच म्हणावे लागतात. याचे मार्मिक विवेचन येथे वाचावयाला मिळते.

दुसऱ्या सूत्रात भक्तीचे आलंबन असलेले परब्रह्म निरुपाधिक साकार असून (१) विद्यासाकार (२)आनंदसाकार व (३) उभयात्मकसाकार असे महानारायणोपनिषद्गत प्रकारांचे वर्णन सविस्तर केले आहे. हिरण्याक्षादि राक्षसांना जी मुक्ती मिळाली त्यासंबंधी अगदि नवीन उपपत्ती महाराजांनी मांडली आहे. ते राक्षस भगवंताचा द्वेष करीत होते असे म्हणतात पण वस्तुतः ते प्रेमच होते आणि ते

प्रेम माहात्म्यज्ञानसंयुक्त होते, असे युक्तिवादाने व प्रमाणाने पटवून दिले आहे.संस्कृत भाष्यापेक्षा हे भाष्य अधिक उपलब्ध असते तर मराठी वाचकांना पर्वणी झाली असती.(अपूर्ण)

प्रियलीलामहोत्सव

१४. आमंत्रणविलास

(यष्टी ३, अध्याय १७, ओवी २३९१)

प्रियलीलामहोत्सव म्हणजे भागवताच्या पहिल्या स्कंधावर महाराजांनी केलेलविस्तृत भाष्य होय.आमंत्रण विलासातील अध्यायांना सखिप्रेषा हे सार्थ नामाभिधान आहे.आमंत्रण द्यावयाचे म्हणजे सखीला पाठविणे आलेच! यातील शैली गद्यपद्यान्वित व संस्कृत- मराठी- हिन्दी मिश्र आहे.ओवी, आर्या, अभंग, पदे, श्लोक, दोहे, चौपाई, चूर्णिका वगैरे बऱ्याच छंदप्रकारांनी या महोत्सवात आपली हाजरी लावली आहे.नवीन ''गुरुपादछंद'' हा या सर्वात अग्रेसर आहे.शिवपंचाक्षरी व द्वादशाक्षरी मंत्रांनी आरंभ केलेल्या आर्यावृत्तची योजना मोरोपंतांची आठवण करून देते, तर दोह्यांची रचना व्रजभाषेच्या परिसरात फिरवून आणते.

मंगलाचरण करताना निर्गुणवस्तुनिर्देश, सगुणवस्तुनिर्देश, नमस्कार व आशीर्वादरूप मंगलाचरण समर्पक रीतीने योजिले आहेत.

या भाष्यात भागवतात अद्वैतच सांगितले असून तेच निर्गुण ब्रह्म सगुणसाकार होऊन प्रेमवृत्तीला आलंबन झाले आहे, असे प्रतिपादिले आहे.भगवद्विग्रह पांचभौतिक नाही म्हणून त्याचा नाशही नाही असा हाच अनध्यस्तविवर्त भगवान् श्रीकृष्ण होय. हाच वेदान्तवृक्षाचा फलरूप सिद्धांत विरोध-परिहारपूर्वक शास्त्रीय परिभाषेत महाराजांनी विस्ताराने मांडला आहे.

भागवत ही व्यासांची समाधिभाषा असून त्यात वेदांप्रमाणे प्रभुसंमित उपदेश, पुराणांप्रमाणे सुहृदसंमित उपदेश व काव्याप्रमाणे कांतासंमित उपदेश हे तिन्ही प्रकार आले आहेत.

कर्मकांडातील क्रिया, उपासनेतील सगुणध्यान व उपनिषदातील अद्वैतज्ञान असा चढता चढता वेदवृक्ष असून भक्ती पक्वफलरूपा आहे.

स्वधर्माला भक्तीची अपेक्षा आहे पण भक्तीला कर्माची अपेक्षा नाही.म्हणून भक्ती धर्मापेक्षा श्रेष्ठ आहे.

सर्व संसार प्रारब्धावर सोडून परमार्थासाठी मात्र प्रयत्न करावा, असा दैववाद व प्रयत्नवादाचा समन्वय केला आहे.

मन विषयाच्या ठिकाणी कठिण व भगवच्चरणी द्रवित करावे असे सांगितले आहे या दृष्टीने काव्यातील रसप्रक्रियेने ब्रह्मानंद मिळवून घेण्याची नवीन प्रक्रिया येथे मांडली आहे.

सातव्या अध्यायात द्रौपदीची मुले अश्वत्थामा मारतो तेव्हा द्रौपदी संतापतेपण ''गुरुमाता कृपीला देखील मजप्रमाणे पुत्रशोक होईल आणि ती तो सहन करू शकणार नाही'' असे म्हणून ती साध्वी द्रौपदी अश्वत्थाम्याला उदार अन्तःकरणाने क्षमा करते, असे दाखवून द्रौपदीच्या विशाल अन्तःकरणाची कोमलता रेखाटली आहे.

नवव्यात अभक्त ज्ञान्याची विदेहमुक्ती व गोपिकांची अखंडसमाधिरूप नित्यमुक्ती यातील तारतम्य दाखविले आहे.

एकाजीववादाला अनेकजीववादापेक्षा श्रेष्ठ ठरवूनही अनध्यस्त विवर्ताच्या ठिकाणी मात्र दृष्टिसृष्टिवाद लागू होत नाही असे युक्तिसिद्ध विवेचन केले आहे.

''परित्राणाय साधूनां विनाशाय च दुष्कृताम्'' हे अवतार प्रयोजन गौण असून भक्तांच्या प्रेमाची वाढ करणे हेच मुख्य प्रयोजन होय. गौणप्रयोजनापन्न सुरकार्यार्थ झालेला अवतार निजधामाला गेला पण ''येन पालिताः गोपसुंदर्यः स कृष्णो क्वापि नो गतः।'' ज्याने गोपींचे प्रमवर्धन केले तो अनध्यस्तविवर्त श्रीकृष्ण गोकुळ सोडून कुठेच जात नाही, हा अतिमहत्त्वाचा भक्तिसिद्धांत मांडला आहे.

प्रियलीलामहोत्सव

१५आगमन विलास

(यष्टी१४ अध्याय२ ओव्या१२३१)

प्रियलीला महोत्सवाच्या या द्वितीय खंडात भगवंताच्या आगमनाचे फक्त दोन पदन्यास झाले आहेत. यात महाराज सुरवातीला ज्ञानीपुरुषाला भक्ती न करण्याचे कारण विचारतात -

मुक्त जाहलियावरी पूर्ण । प्रारब्धाने करावे भोजन ।
तरी जो कल्याणनिधान नारायण । तयाचे स्मरण कां त्यजावे ।।२५४।।

पुढे वैराग्याच्या चार प्रकारांचे सांग वर्णन करतात. संसारात परमार्थ करू इच्छिणाऱ्यांना ते म्हणतात की सकाळी उठताच इंधनाची चिंता, दुपारी अन्नचिंता, रात्री स्त्रीचिंता असणाऱ्या विषयासक्तांनी संसारात परमार्थ करणे कसे शक्य आहे?

'विश्व आघवे नारायण । जंव न देखती आपुले नयन । तंवचि होनी सांगतो आण । प्रपंची परमार्थ कदा नोहे ।।३४४।। सर्व विश्वात नारायण भरला आहे असे अनुभवण्यासाठी महाराज सांगतात की, ''बाहेर दिसत होते जडमय स्थिर। तेचि हृदयीं प्रगटे चेतनाकार । मग जड चेतनाचा भेद समग्र । जावोनि हरिहर विश्वमय''।।३७।। असा सर्व अभ्यास शिवमंदिरात करावा -

''अभ्यासाठी शिवमंदिर। भजनासाठी कृष्णमंदिर''।।३७०।।

पुढे त्यांनी मातृबुद्धीच्या आधाराने ब्रह्मचर्य कसे साधावे, याची सुंदर प्रक्रिया सांगितली आहे. ज्यांना सर्व स्त्रिया मातृरूपाने दिसत नाहीत त्यांनी संन्यास घेऊ नये. ''यति होऊनी मनात झुरणे। त्याहुनी उत्तम विवाह करणे।।'' नंतर गृहस्थ राहून ब्रह्मचर्य पालनाचा मार्ग दाखविला आहे. तेथे योगयोगांगांची सर्व माहिती आली आहे. ब्रह्मचर्य, अहिंसा, प्रत्याहार, धारणा, समाधिसंबंधी अनुभवपूर्ण उपदेश व नवनवीन प्रक्रिया विस्ताराने लिहिल्या आहेत.

प्राणायामे जिंकिजें मरण । पुनर्जन्म जिंकिजे वासना मोडून ।
माया जिंकावी ज्ञाने करून । भक्तीने अभिमान जिंकावा ।।[५८९/११९]
शेवटी - आपण होवोनी निर्गुण आवडी करोनि भजावे सगुण ।।

असा सगुण निर्गुणाचा अनुभवाचा ठेवा शब्दद्ध करून साधकांचे हाती दिला आहे.

१६. श्रीधरोच्छिष्टपुष्टिः

(संस्कृत. यष्टी १६)

श्रीमद्भागवतान्तर्गत कपिलगीतेच्या श्रीधरी टीकेवर ही श्रीधरोच्छिष्टपुष्टि नावाची टीका आहे.

कपिल मुनींनी देवहुती मातेला जो सांख्याचा उपदेश केला तो उपदेश म्हणजे कपिलगीता होय. यात पंचेवीस तत्त्वे सांगितली असल्यामुळे सांख्य म्हटले गेले आहे, असा नेहमीचा अर्थ न करता महाराजांनी ''एका आत्मपुरुषाविषयी सांगितलेले तत्त्वज्ञान म्हणजे सांख्य' असा नवीन अर्थही दाखविला आहे.

'साम्यक् एकं ब्रह्म तस्य ख्या कथनं संख्या'तस्या भावः सांख्यम् ।। (पा.१४२)

हे कपिलमुनी विष्णूचे अवतार आहेत.पहिल्या ब्रह्मनंदनजन्मात त्यांनी आसुरीला उपदेश केला व दुसऱ्या जन्मात देवहुती मातेला उपदेश केला; असा निर्णय देऊन दोन-कपिल-वादाचा समन्वय केला.

येथे सेश्वरसांख्य सांगितले असून सांख्यदर्शनाच्या अभ्यासाने ब्रह्मज्ञान होते व त्यानंतर भगवंताची भक्ती करावी असा विधी दाखविला.

''भगवद्भक्तौ अतृप्तिरेव आनंदकरी'' असे वियोगोपलालनातील आनंदाचे स्वरूप सांगितले आहे. पुढेभगवद्विग्रहाचे उपादान कारण भगवत्संकल्प असतो आणि निमित्तकारण भक्ताची इच्छा असते असे मांडले आहे आणि शेवटी अनध्यस्तविवर्ताची सिद्धी केली आहे.

ज्ञान झाल्यानंतर प्रारब्धाचा भोगूनच क्षय होत असतोपण अनध्यस्तविवर्ताची भक्ती केली म्हणजे प्रारब्धाचा अभिभव होतो, प्रारब्धफलाची दुःखरूपता आनंदमय होऊन जाते व अविद्यालेश नाहीसा होतो, असा भक्तीचा विशेष दाखविला आहे. (हा प्रकरण ग्रंथ कपिल गीतेच्या फक्त २२ श्लोकावर उपलब्ध आहे)

१७. उच्छिष्टपुष्टिलेशः

(संस्कृत. यष्टी १६ श्लोक १४७)

श्रीमद्भागवतावर सर्वोत्कृष्ट टीका श्रीधराचार्यांची समजली जाते.भागवत ही व्यासांची समाधिभाषा असल्याने वाच्यार्थ देखील समजणे अवघड आहे. पण श्रीधराचार्यांनी गूढार्थ देखील सोपा करून आपल्या भावार्थदीपिकेने प्रकाशित केला आहे. या टीकेचे वैशिष्ट्य असे आहे की शंकराचार्यांचे केवलाद्वैत यत्किंचितही न सोडता भक्तांच्या परमप्रेमरूपा भक्तीचे प्रतिपादन यात केले गेले आहे.

महाराज म्हणतात ''स्वज्ञानशुद्धये'' मी श्रीधराचर्यांचे उच्छिष्ट भक्षण करतो. त्याने मला जे बळ मिळेल त्याच्या जोरावर द्वैतवाद्यांच्या मतांचे युक्तिपर्वूक आणि पूर्णपणे मी निराकरण करीन.

श्रीधराचार्यांच्या टीकेत प्रथम रामचंद्राला नमन आहे.तेथे 'आस्वादित' या शब्दाचा प्रयोग आहे. आ म्हणजे ईषत्= थोडा, असा अर्थ करून महाराजांनी रामावताराची मर्यादा व कृष्णावताराचे पूर्णत्व सूचित करून रामचंद्राचे पूर्णसेवन कृष्णावतारातच पूर्णरूपाने होऊ शकते असा अर्थ विशद केला आहे.

श्रीधराचार्यांनी प्रथम रामाला, नंतर नरसिंहाला व शेवटी श्रीकृष्णाला नमन केले आहे.त्यात नमन रामाला, भजन म्हणजे सेवा नरसिंहाची व गाढ आलिंगन श्रीकृष्णाला अशी भक्तीची चढती पायरी दाखविली आहे.

भार्या, धर्मे भवेद्दासी, सखी चार्थे, सुखे समा।
माधुर्ये, दास्यभावाच्च नमनं कृतवान्मुनिः।।८४।।
मुग्धा, मध्या तथा प्रौढा भेदात् भार्या त्रिधाथवा।
तत्र मुग्धा प्रणमति, मध्या वै भजते प्रियम्।।८५।।
गाढमालिंगति प्रौढा माधुर्येमुनिसत्वतः।।८६।।

असे रसपूर्णकाव्यात्मक वर्णन महाराजांनी रेखाटले आहे. पण यासोबतच ज्ञानवैराग्यासाठी शंकराची सेवाकरावी व रसास्वाद उठू नये म्हणून कृष्णभक्ती करावी असा निर्णय दिला आहे.ही चार श्लोकावरील टीका मंगलाचरूप असून पुढे ग्रंथ निरूपण आहे.(अपूर्ण)

१८. ब्रह्मसूत्र व्याख्या

(मराठी, यष्टी १५, ओव्या ४६)

१९. ब्रह्मसूत्रावरील निरूपणे (गद्य)

(मराठी गद्य यष्टी १८)

महर्षी व्यासांनी ब्रह्मसूत्रे रचली. त्यावर भाष्य लिहून शंकराचार्यांनी अद्वैतवेदान्तशास्त्राचे समूल व सयुक्तिक प्रतिपादन केले. महाराजांच्या मधुराद्वैतात शंकराचार्यांचे अद्वैत व गोपिकादि भक्तांचे माधुर्य एकवटले होते. म्हणून त्यांनी आचार्यांच्या भाष्यावर टीका लिहिण्याचे ठरविले होते. पण ओवीबद्ध टीकेत केवळ ४६ ओव्या उपलब्ध आहेत आणि रुक्मिणीबाई खोलकुटे यांना सांगितलेल्या निरूपणात केवळ २८ पाने गद्य आहे.

सुरवातीला आचार्यांच्या अध्यासभाष्यातील सारांश - ''युष्मत् अस्मत् प्रत्ययगोचर । विरुद्ध जेवी प्रकाश आंधार । ते विषय विषयी परस्पर। अध्यासिले ।।'' असा आला आहे. पुढे यम, नियम, शम, दम, वगैरे साधनचतुष्टयातील प्रत्येकाची व्याख्या एका ओवीत किंवा अर्ध्या ओवीत स्पष्ट आणि सुटसुटीत केली आहे.

निरूपणातील गद्यभाषेत अगदि सोपी व घरगुती उदाहरणें देऊन शेवटी ''दगडामातीपासून जगातील कोणताही पदार्थ रिकामा नसतो; काहीतरी काम करीत असतो . . . म्हणून ''सर्व चैतन्य आहे'' अशी चेतनाचीही सिद्धी केली आहे.

शरीराला मनापासून वेगळे करण्यासाठी शारीरिक कर्म म्हणजे आचरणधर्म आवश्यक आहेत. — पुढे मात्र ज्ञान व परमेश्वरप्राप्तीचा प्रयत्न हाच मुख्यधर्म होऊन जातो.

संकल्पाला सत्यत्व देण्याच्या दृष्टीने जीवेश्वरात भेद सांगून पुढे स्वतः परमेश्वर होणे, हाच धर्माचा खरा अर्थ आहे, असे सांगतात.

धर्म व अधर्मातील भेद फक्त सद्‌गुरूच सांगू शकतात. धर्म संसारी माणसाकडून समजावून घेऊ नये कारण तो स्वार्थाप्रमाणे धर्माचा अर्थ लावीत असतो.

सर्व प्रवृत्तिलक्षण धर्म अनुवादरूप आहेत. त्यांचे पर्यवसान निवृत्तीत आहे. म्हणून अनुवाद खरा धर्म नसून देहासक्ती सोडवून परमेश्वरप्राप्ती करून देईल तोच खरा धर्म! भगवतांचे प्रेम उत्पन्न झाले की आचरणधर्माचा आग्रह सुटतोप़ण आचरणाचा आग्रह नसला तरी आचरण मात्र लोकसंग्रहार्थ धर्मानुसारच होत असते. असा धर्माधर्म विचार अगदी सोप्या भाषेत लहानलहान वाक्यात आणि स्त्रियामुलांनाही सहज समजेल अशा रीतीने निरूपिला आहे.

२०. निगमान्तसुभा

(यष्टी१५ अध्याय२, कविता ८०)

ही श्रीशंकराचार्याच्या ब्रह्मसूत्रभाष्यावर मराठी ग्रंथरचनेची ही सुरुवात आहे. काही सूत्रांचे स्पष्टीकारण आले आहे पण तेहि एकामागून एक नसून वेगळ्या क्रमाने आले आहे. यातील सूत्रे मराठीत आहेत. त्यावर अभंग व ओव्या मिळून भाष्य केले आहे. पण उपलब्ध ग्रंथ अती त्रोटक आहे.

हृदयस्थ परमात्म्याची जी उपासना वेदात सांगितली आहे ती हृदयस्थ जीवाची नसून परमेश्वराची आहे. इंद्र, सूर्यं वगैरे देवतांची उपासना देखील जीवोपासना नसून ब्रह्मोपासनाच आहे. प्राण-उपासना, जीव-उपासना व ब्रह्मोपासना या तीन वेगळ्या नसून तत्तदवच्छिन्न चेतनाचे ठिकाणी ब्रह्मभावना केली असता ती एक ईश्वरोपासनाच होते. वेदात तीच उपदेशित आहे व श्री शंकराचार्यानीही हाच अर्थ आपल्या भाष्यात मांडला आहे.

निगम=वेद, निगमान्त=वेदान्त, सु-भा=चांगला प्रकाश

'वेदान्ताचा उत्तम प्रकाश' हा या ग्रंथनामाचा अर्थ आहे. (अपूर्ण)

२१. श्रीमद्भगवद्गीतासंगति

(ओव्या ५१५, यष्टी १)

गीतेमध्ये भगवंताने काय उपदेश केला यासंबंधी अनेक वाद आहेत. पण सर्व संतांनी गीतेतून एक भक्तितत्त्वाचा उपदेश प्रामुख्याने स्वीकारला आहे. अर्जुन हा भक्त होता. तो विचारतो- माझा धर्म काय तो निश्चित सांग? तेव्हा भगवान् कर्म, उपासना, योग, ज्ञान सर्व थोडक्यात सांगतात. पण शेवटी म्हणतात, ''सर्व धर्मांचा त्याग करून मला एकालाच शरण ये.'' ही भक्ती अथपासून इतिपर्यंत गीतेत सांगितली आहे. कर्मज्ञानादि सर्व मार्ग तिचे अंग आहेत. मुमुक्षू, कर्मयोगी, योगी, ज्ञानी या सर्वांना प्रथमपासून शेवटपर्यंत सगुणभक्तीचाच आधार घेऊन वर चढावे लागते आणि शेवटी अखंड समाधी साधल्या जाते. श्रीतुकाराम महाराजांच्या वचनानुसार ''पावावया भक्तिसुख, ब्रह्मस्थानी प्रस्थान'' ब्रह्मरूप झाल्यानंतर भक्तिसुखाची प्राप्ती होऊ शकते असा जीवन्मुक्तिगत उपदेश गीतेत आहे, असे महाराज स्पष्ट करून सांगतात.

सुरुवातीला विषयानंदही आत्मानंदच कसा आहे, याचे अमृतानुभवातील ओव्यांनुसार वर्णन केले असून प्रत्येक प्राणीमात्राला मुक्तीची इच्छा परंपरेने कशी आहे हे समर्थ युक्तिवादाने सिद्ध केले आहे. पुढे ग्रंथांचे चार प्रकार सांगून संतांचे ग्रंथ नाना प्रक्रियासमन्वित असल्यामुळे प्रत्येकाला स्वोन्नतीचा मार्ग त्यातून निश्चितपणे मिळतो असे प्रतिपादन केले आहे. क्षणैक आंगी वैराग्य चढे। क्षणैक व्यवहारचातुर्य उघडे ।।५२।।असे कनिष्ठ साधकाचे वर्णनही त्यात आढळते. पुढे साधनचतुष्टयाचे सूक्ष्म पैलू हळूवारपणे उलगडून दाखविले आहेत.

नंतर ''तत्त्वमसि' या महावाक्याचे विश्लेषण पूर्णीतेत कसे आले आहे ते सांगितले असून पहिल्या सहा अध्यायात कर्म आणि कर्मत्याग द्वारा देहाहून वेगळा होऊन त्वंपदविवेक सांगितला.

दुसऱ्या सहा अध्यायात्मक उपासनाकांडात उपास्य व्यापक आहे व त्याची परमानंदस्थिती आकलन झाली की उपासकाला भक्ती प्राप्त होऊ तत्पदविवेक होतो.

शेवटच्या सहा अध्यायात भक्त व भगवंताचे ऐक्य झाले की महावाक्याचा अर्थ फलित होतो म्हणजे असिपदविवेक होतो. असे सविस्तर विवेचन आहे.

यात एके ठिकाणी ''कोणी ज्ञान व कर्माचा समुच्चय मानील म्हणून उपासना मध्ये घातली'' असे स्पष्टीकरण आहे.

ज्ञानानंतरही मनोनाश वासनाक्षय करावा हे अनेक प्रमाणे देऊन सिद्ध केले आहे. पुढे व्युत्थानातही ध्यातृ ध्येयाचा भेद भासत नसलेले भक्त अखंड समाधि स्थितीत राहून जगाच्या कल्याणासाठी भूमीवर विचरत असतात. याला योगाचार्य घेरंडमुनींचीही संमती दाखविली आहे. शेवटी पत्नीरूपाने गोपी होऊन हृदयाच्या एकांतात श्रीहरीचे माधुर्यप्रेम मिळावे म्हणून ज्ञानेश्वरकन्येने तातांना आशीर्वाद मागितला आहे.

२२. मनोहारिणी : गीताप्रवचने

(हिंदी निरूपणे १४, दोहे १४, पाने १०८)

या निरूपणांमध्ये लहान मुलांना जसे शिकवितात तसे गीतेतील कठिण विषय सोपे दृष्टांत देऊन महाराजांनी हिंदीत समजावून सांगितले आहेत. भाषा हिन्दी असली तरी सहज समजण्यासारखी आहे. संसारातील सुखदुःखांचे वर्णन इतक वास्तव आहे की वाचताना क्षणभर कां होईना पण वैराग्याचा

अनुभव येऊन मन शांत होते.

नागार्जुनाची कथा सांगत असताना बरीच नावीन्यपूर्ण माहिती आली आहे. ते नाथसंप्रदायाचे सत्पुरुष होते. त्यांनी ''संप्रदायचूडामणि'' नांवाचा तीन हजार श्लोकांचा ग्रंथ रचला. त्यात अमृतीकरणाच्या युक्ती श्लोकबद्ध केल्या असल्याची माहिती आली आहे. तसेच गोरक्षनाथांनी रचलेला ''मत्स्येंद्रपद्धति किमियागार'' हा ग्रंथ मौखिक आहे. जर तो लेखबद्ध केला तर लिहिणारा मूक व अंध होऊ जातो. त्यात साबरीमंत्र व किमया सांगितल्या आहेत. अशा बऱ्याच चमत्कारपूर्णगोष्टींचा उल्लेख व माहिती महाराजांनी विवेचनाच्या ओघात दिली आहे. महाराज स्वतः नाथसंप्रदायी होतेम्हणूनच ही माहिती आपणाला मिळू शकली.

अर्धवट नास्तिकाचे खंडण करताना चमत्काराची इच्छा करणाऱ्यांचे मत कसे विचित्र असते, ते दाखविले आहे. विजेचा बल्ब चमत्कार वाटतो पण सर्व जगाला प्रकाशमान करणाऱ्या सूर्याचा चमत्कार वाटत नाही. कारण नित्य पाहतो म्हणून ''कोणेमे पडे क्षुल्लक वस्तुकाही नाम चमत्कार है।'' असे महाराजांचे मत आहे.

वासना ही शरीराहून भिन्न आहे, हे मार्मिक रीतीने समजावून सांगितले आहेप्रदार्थक्षीण झाला की त्याचा स्वभावही क्षीण होतो. पण देह क्षीण झाला तरी माणसाची वासना क्षीण होत नाही. म्हातारपणी दांत पडून जातात पण खाण्याची वासना क्षीण होत नाही, उलट वाढतेच. मेल्यानंतर वासनेमुळे दुसरा देह प्राप्त होतो. म्हणून वासना देहापेक्षा भिन्न आहे आणि तिचा नाशच केला पाहिजे, वगैरे निरूपण आहे.

अशा प्रकारे वैराग्य, ज्ञान, आणि अद्वैतभक्ती यांचे साध्या साध्या उदाहरणांनी सर्वांना समजेल असे प्रतिपादन केले आहे. गीतोक्त धर्म जनसामान्यपर्यंत पोहचून त्यांची पारमार्थिक उन्नती व्हावी असा महाराजांचा प्रयत्न यावरून स्पष्ट होतो.

२३. गीतेबील मराठी प्रवचने

(य. १७ समयोपदेश- २२ प्रवचने / य. १८ समयोपदेश- ६ प्रवचने)

गीतेवरील श्लोकांवर अगदी सोप्या भाषेत ही निरूपणे सांगितली आहेत. वेदान्ताचा अभ्यास किंचितही न केलेल्या स्त्रियांना देखील अध्यात्म्याची गोडी लागेल व त्यांचीही सांसारिक आसक्ती कमी होईल इतक्या आकर्षक आणि प्रभावी गद्यशैलीत ही प्रवचने आहेत. वाचताना आपण महारजांचे शब्द ऐकत आहोत असेच वाटते. पहिली आठ प्रवचने शांताराम यांना मंडला येथे सांगितली आहेत व काही अठराव्या यष्टीत असलेली रंगुआईना सांगितली आहेत. पहिल्या आठ प्रवचनात अनेक विषय आले आहेत.

*सर्व मनुष्यमात्राला सामान्य असेल असा धर्म कसा असावा, याचे युक्तीपूर्वक सुसंगत विवेचन आहे. *सर्व मनुष्य जातीचा धर्म आर्यधर्मच होऊ शकतो त्यात प्रत्येकाला साधनांचे स्वातंत्र्य असून ध्येय मात्र सर्वांचे एक आहे.

*पायरी पायरीने सर्व धर्माचे पर्यवसान हिंदुधर्माच्या अद्वैतात होते म्हणून सर्वांसाठी असलेला सर्वोच्च धर्म आर्यधर्मच होऊ शकतो.

*ऐतिहासिक दृष्टीने देखील आर्यधर्मच सनातन आहे.

*जगातील सर्व धर्मांची मूळतत्त्वे आर्यधर्मात आहेत. त्यातील एकेका अंशावरच जगातील प्रत्येक धर्म आधारित आहे.

*बाकीच्या धर्मग्रंथात कालगणना ३ ते ६ हजार वर्षापर्यंतच आहे तर आर्यधर्मात लाखो वर्षाची कालगणना आढळते. या सर्वाचा अर्थ एकच की पूर्वी

*सर्व जगात एक आर्यधर्मच होता व आज मात्र त्याचा संकोच होत होत तो भारतापुरताच मर्यादित झाला. या संदर्भात -

*आर्य बाहेरून आले, या मताचे सविस्तर खंडन आले आहे.

*कर्ममार्गाचा विचार करताना पाश्चात्य नीतिशास्त्राची आंतरिक विसंगती महाराजांनी मार्मिक रीतीने दर्शविली आहे.

*उपासना ज्ञान भक्ती वगैरेचे अगदी सोप्या भाषेत विवेचन असून गीतेच्या आधाराने सर्व प्रवचनांचा विस्तार झालेला आहे. परंतु ही प्रवचने पहिल्या अध्यायापासून शेवटपर्यंत अशी नाहीत. समयानुसार वेगवेळ्या अधिकाराच्या स्त्रीपुरुषांना केला गेलेला उपदेश लिहून ठेवला गेला आहे. हे डिक्टेशन नसून स्मरणपूर्वक किंवा सारांशरूपानेही लिहिल्या गेली आहेत. म्हणून हा समयोपदेश आहे.

२४ ऐश्वर्यार्थदीपिका

(ओव्या २५९, श्लोक २७, यष्टी १५)

ईश्वरगीतेच्या अर्थाला प्रकाशित करणारी टीका म्हणजे ऐश्वर्यार्थदीपिका.

महाराजांच्या संप्रदायात उपास्य श्रीकृष्ण व गुरुरूपाने शिव आहेत. भगवद्गीतेवर बरेच लिहिले गेले आहे तेव्हा भगवान् शंकरांनी केलेल्या उपदेशावरही भाष्य लिहावे म्हणून महाराजांनी हा उपक्रम केला.

एकदा सनत्कुमारादि मोठे मोठे ऋषीमुनी हिमालयात बदरिकाश्रमात तप करीत असलेल्या नरनारायणाकडे आले व त्यांनी नारायणांना आत्मविषयक विचारणा केली. आत्मप्रेमाची आवडी अशी असते की पुनः पुनः आत्मकथाच ऐकाविशी व कथन करावीशी वाटते. म्हणून या महात्म्यांनी संशयाचे पांघरूण घेऊन मुद्दामच सुखसंवादासाठी नारायणांना प्रश्न विचारले. तेव्हा भगवान शिवाने केलेला उपदेश नारायणांनी श्रोतृवर्गाला सांगितला. ती हीच ईश्वरगीता होय.

सुरवातीला महाराज ब्रह्माचे तटस्थलक्षण व स्वरूपलक्षण सांगून सच्चिदानंदरूप आणि सगुणसाकार अनध्यस्तविवर्त अशा स्वरूपलक्षणात्मक शुद्धब्रह्माची भक्ती सांगतात. हीच भक्ती श्रीगुरूचेही ठिकाणी करावयाची असते. संप्रदायाची वाट न धरता ब्रह्मज्ञान जर प्रगट केले तर 'गुज घेऊनि चावट, होतील बहु' असे असल्याने गुरुसेवेच्या मार्गानेच ब्रह्मप्राप्तीचा उपदेश केला जातो. जसे कन्या स्वतः आई झाली तरी ती माहेराच्या ओढीने झुरत असते. त्याप्रमाणे शिष्य पूर्ण झाला तरी गुरुचरणसेवेसाठी तो अत्यंत तत्पर आणि प्रेमसंपन्नच असतो. त्याची गुरुचरणांची ओढ कायम असते. शिष्याच्या हृदयासनावर श्रीगुरु नित्य विराजमान असतात. जेव्हा नैमिष्यारण्यात व्यासमुनी आले तेव्हा सर्व ऋषीमुनी प्रेमामुळे व्याकुळ होतात. हृदयात विराजमान असलेल्या व्यासांना बाहेरील तमोगुणात्मक म्हणून कठिण असलेल्या भौतिक आसनावर बसविण्याची कल्पनाच त्यांना कठोर वाटते, सहन होत नाही.

सुवर्णाची पेटी करूनी । देहातील प्राण काढूनी ।
तीत ठेविती निरोधुनी । काय लाभ ॥१२८॥

असे उत्कट प्रेम दाटून आल्यामुळे सूतांसहित सर्व मुनींचे कोमल चित्त व्याकुळ झाले. म्हणून त्या सर्वांनी श्री व्यासांना मन, धन व सेवेसाठी देह असे आपले अन्तर्बाह्य सर्वस्व समर्पण केले. आणि नंतर व्यासांनी कूर्मपुराणातील ईश्वरगीता पुनः प्रगट केली. पण ईश्वरगीतेच्या फक्त २८ श्लोकांवरील टीकाच उपलब्ध

आहे.

२५. षट्पदध्वनि

(ओव्या ५८, यष्टी १५)

भक्तकवीच्या हृदयातील आशय त्यांच्या काव्यात उमटत असतो आणि तो आशय भक्तरसिकच जसाच्या तसा हृदयसंपुटात साठवून ठेवू शकतो. इतर बिचारे दुधाची तहान ताकावर भागवितात. पण हे नीरस तक्रपान महाराजांना पाहवले नाही. म्हणून त्यांनी शंकराचार्यांच्या षट्पदीतील मधुबिंदूंचा आस्वाद आपल्या अनुरचरांना मिळण्यासाठी हा मधुकरांचा गुंजारव निनादित केला आहे. आचार्यांची षटपदी श्रवणमधुर तर आहेच पण तिची अर्थमाधुरीही वरच्या श्रीप्रमी आहे. ज्ञानवैराग्यसंपन्न म्हणजे संसाराविषयी अत्यंत कठोर असलेले अंतःकरण कळवळून भगवान् विष्णूची विनवणी करते, तेव्हा त्यातील विरोधाभास जाणवतो. वज्राहून कठोर असलेले विष्णुदास लोण्याहून मऊ होऊन भक्तिविव्हल कसे असू शकतात याची किंचित कल्पना सामान्य माणसालाही येते.

ब्रह्मज्ञान झाल्यावर ज्ञान्याला 'सदेहब्रह्मज्ञानाहंकृति' उमटू लागते. तोच रसास्वाद! तोच विद्यामद! तोच अविद्यालेश! मनोनाश व वासनाक्षय केला तरच तो नाहीसा होतो. याला उपाय एकच - साधुसेवा! विद्यारण्य या ठिकाणी ध्यानाचा उपाय सांगतात पण तेथेही पुढे भक्तिरस द्रवित झाला तरच ज्ञानाभिमान नाहीसा होतो. साधुसेवा करून हेच शिकावयाचे असते. या अद्वैतभक्तीचे स्वरूप महात्मेच समजावून सांगू शकतात. ये हृदयीचे ते हृदयी घालू शकतात.

ज्ञान झाले की साक्षित्व येते. साक्षी म्हणजे ''अहंतेच्या वृत्तीने अवच्छिन्न असा ब्रह्माचा आभास.'' तो देहाहून भिन्न असतो.

ईश्वर म्हणजे ''विद्यासंप्राप्त-पृथगिव-इदन्तावच्छिन्न-अंतर्यामी''- म्हणजे ज्ञानानंतर पृथगिव भासणारा हृदयस्थ परमात्मा. या ज्ञानसंपन्न साक्षीने हृदयस्थित परमेश्वरावर तैलधारासम प्रेम अर्पण केले म्हणजे अहंता तरंग विरून जातात. म्हणून आचार्य भगवान विष्णूला विनवितात- भगवंता माझ्या या अविनयाला दूर कर, मनाचे दमन कर. असे झाले की प्रारब्धातील सुखदुःखांचे भोग परमानंदरूप होतील व प्रारब्धाचा पूर्ण अभिभव होईल.

महाराजांनी आचार्यांची वाक्यमंजुषा हळूच उघडून त्यातील ज्ञानोत्तर भक्तिरूपी सुंदर रत्ने पुढे ठेवली आहे. (अपूर्ण)

२६. ईशावास्योपनिषद्

(यष्टी १५, अध्याय २, ओव्या २०६)

या यजुर्वेदान्तर्गत ईशावास्य उपनिषद् भाष्यात केवळ दोन अध्याय मिळून २०६ ओव्या उपलब्ध आहेत. केवळ दोन मंत्रांचा अर्थ विस्ताराने आला आहे.

श्रौत (वैदिक) हरिभक्तीची मांडणी विषयवैराग्य व माहात्म्यज्ञानासह पहिल्या अध्यायात केली आहे. कर्मज्ञानसमुच्चयाचे खंडन असून त्यात कर्मार्पणरूपा हरिभक्तीचे प्रतिपादन आहे.

सुरवातीला 'वेद केवळ कर्मबोधक आहेत ब्रह्मप्रतिपादक नाहीत' या पूर्व मीमांसामताचे खंडन केले आहे. नंतर मायागुणरहित अशा निर्गुण व स्वरूपगुणयुक्त अशा सगुण ब्रह्माचे वेदात प्रतिपादन असून परमेश्वराने स्वतः विश्वात व्याप्त होऊन विश्वातील विश्वपणाच नाहीसा केला म्हणून त्याची भक्तीच कर असा पहिल्या मंत्राचा अर्थ सांगितला आहे.

जीव व्यष्टिरूपाने कर्मे करतो व नंतर समष्टीही स्वतःच होतो व त्यातील विषयांचा स्वतःच

आनंद घेतो.असा द्राविडी प्राणायाम करण्योक्षा भक्ती करून एका सगुणश्रीहरीचा नित्य आनंद घ्यावा व त्यात नित्य मग्न रहावे, असे महाराज म्हणतात.

*श्रीहरीला जाणून त्याची सेवा केली की तमोगुण जातो.

*त्याला इंद्रिये अर्पण केली की रजोगुण नाहीसा होतो.

*हरिप्रेमात मग्न झाले की ज्ञानाभिमानाबरोबर सत्त्वगुणही नाहीसा होतो.

*अशी भक्ती केली की जीव स्वतः निर्गुण होऊन जातो.

निर्गुण होऊनी सगुण भोगावे ।। अशा भक्तीने जोपर्यंत सर्वत्र श्रीहरीचा प्रत्यय येत नाही तोपर्यंत वर्णाश्रमादि कर्मे निष्काम होऊन केलीच पाहिजेत.याला दोन समर्पक दृष्टांत महाराजांनी दिले आहेत-

*पक्षी मिळेल ते खात असतात, परिग्रह करीत नाहीत.किंवा *चोर धन मिळवितात पण प्रगट न करता ते धन लपवितात.त्याप्रमाणे धर्माचरण निष्काम रीतीने, बोभाटा न करता, करीत असावे. त्याने शेवटी आपोआप भक्ती मिळते.

येथे 'कर्मासोबत ज्ञानाचा अभ्यास केलाच पाहिजे' या समुच्चयवादाचे खंडन केले आहे.केवळ निष्काम कर्माने भक्ती मिळते किंवा केवळ ज्ञानानेही भक्ती मिळते. पण शेवटी कर्मासंबंधी आणि ज्ञानासंबंधी अलंबुद्धी व्हावीच लागते.म्हणून दोघांच्या एकत्र अभ्यासाची म्हणजे समुच्चयाची गरज नाही असे दाखविले आहे.

एके ठिकाणी सगुणनिर्गुणाचा वेदान्तसिद्धांत सोप्या शब्दात मांडला आहे -

पार्था हे जग वाहिले । म्यां अव्यक्तत्वे आच्छादिले । व्यक्तरूप ते ठेविले । भक्त हृदयीं ।।

मी सर्व जगाचे अव्यक्त रूपाने आच्छादन केले आहे आणि भक्ताच्या हृदयात मात्र व्यक्त होऊन निवास करतो. शेवटी -

एवं श्रीकृष्णचि पति । तत्पदीच परमभक्ती । संसारी असूनि यति । आचार्य तो ।।७३।।

अशी माधुर्यभक्तीची सर्वोच्च अवस्था उपनिषद्प्रणीत आहे, हेही दाखवून दिले आहे.

२७.ईशावास्योपनिषद्

(यष्टी १५ गद्य, यष्टी १५)

हे सहा पानांचे गद्य विवरण अगदी अपुरे व थोडेसे आहे. ''ब्रह्माचे ठिकाणी थरथराट (व्हायब्रेशन) आहे'' या थियॉसफी मताचे खंडन करून महाराजांनी एक नवीन विचार मांडला आहे.जेथे चेतन आहे तेथे इच्छा आहेच असे नाही, पण इच्छा मात्र चेतनाचा आश्रय करून राहते, म्हणून चेतनाला इच्छामय मानता येत नाही. याचे विवरण शंकासमाधान पद्धतीने केले आहे.

''ब्रह्म अक्रिय आहे'' असे जर एखाद्या सिंहपुरुषाने सांगितले तर त्याचे म्हणणे अंगीकार्य आहे. वेदान्त अंगी बाणवून हा सिद्धांत काढावा लागतो, पण साधक जर ते प्रतिपादन करू लागला तर आम्ही त्याचा तिरस्कार करतो.

महाराजांनी सांगितलेला हा विचार महत्वाचा आहे. संतग्रंथामध्ये अनेक ठिकाणी परस्पर विरोध आहे असे आपल्याला वाटते.पण संत लोक अधिकारानुसार उपदेश करीत असतात.त्यातील विरोध खरा नसतो.हेच समन्वयाचे मुख्य तत्त्व मनात पक्के ठसवून घेऊन नंतर संतवाङ्मयाचा अभ्यास केला असता परमार्थ समजू शकतो.पुढे प्रतिबिंबवादातील अनांदगीरींचा नानाजीववाद व ज्ञानेश्वरमहाराजांचा एकजीववाद या दोहीची संगती लावून दाखविली आहे.

२८.ऋग्वेदटिप्पणी

(संस्कृत. यष्टी१६ श्लोक२१)

महाराज प्रांजळपणे सुरवातीलाच सांगतात की ''मला वेदाचा अधिकार नाही. परंतु ज्या ब्राह्मणांना वेदांचा अधिकार आहे ते लोभामुळे आणि मोहामुळे वेदांचा घात करीत आहेत असे दिसते. ''मी केलेल्या वेद-चर्चेमुळे मला पाप लागून मी नरकाला गेलो तरी मी वेदांचे रक्षण करणार. माझ्या एकाच्या नरकपातापेक्षा वेदरक्षण अधिक महत्त्वाचे आहे'' अशी प्रस्तावना करून त्यांनी वेदावरील भाष्यकारांचे तीन प्रकार सांगितले आहेत.

१. वेद ईश्वरपर आहे असे मानणारे.

२. वेदात फक्त कर्ममार्ग आहे असे मानणारे.

३. सगळा वेद व्यवहारपर आहे असे मानणारे.

पैकी *तिसरा पक्ष व्यर्थ आहे कारण व्यवहार क्षणोक्षणी बदलणारा आहे. *सर्व वेद ईश्वरपर आहे असे मानले तर अनेक देवतांची उपासना व्यर्थ होईल. म्हणून याची संगती अशी की- सर्व इंद्रियांचे आहारविहारादि व्यवहार एका पुरुषाला मिळतात. त्याप्रमाणे सर्व देवांची उपासना ईश्वराला मिळते. प्रत्येक इंद्रादिदेवतेला अधिकार व विशिष्ट शक्ती दिली आहे. ज्यांना कामना पूर्ण करून घ्यावयाच्या असतील त्यांनी त्या त्या देवतांचे आराधन करून आपल्या इच्छा पूर्ण करून घ्याव्या.

ऋग्वेदाचा आद्यमंत्र ''अग्निमिळे पुरोहितम्'' आहे. याचे विवरण करताना अग्नीचे दोन प्रकार त्यांनी सांगितले आहे.

१. प्रत्यक्ष ईश्वराच्या सामर्थ्याचा बोध करणारा ''दृष्ट अग्नी'' व

२. अनुमानाने ईश्वराचा बोध करणारा ''अदृष्ट अग्नी.''

या अग्नीचे पुन्हा पाच प्रकार सांगितले आहेत.

१. दिव्य - सूर्यादि शीतनिवराक दृष्ट / अर्ध्यादिकांनी पापनिवर्तन करणारा अदृष्ट.

२. भौतिक - स्वयंपाकादिसाठी असलेला प्रत्यक्ष दृष्ट अग्नी / यात दिलेल्या आहुतींना विश्वव्यापक करणारा दृष्ट अग्नी.

३. जाठर - अन्नपचनादि करणारा दृष्ट / यज्ञकालात व भोजनकालात हिसेंचे पाप लागू न देणारा अदृष्ट अग्नी.

४. औजस - औषधीत असलेला अग्नी. रोगादिकांचे विष परिहार करतो तो दृष्ट / प्राण्यांचे ओज वाढविणारा अदृष्ट.

५. बौद्ध - बुद्धीत असणारा बौद्ध अग्नी. मुखातील शारीरिक आघाताने शब्द उत्पन्न करणारा दृष्ट अग्नी / योगसामर्थ्य उत्पन्न करणारा अदृष्ट अग्नी.

असे 'अग्नीमिळे' या पहिल्या मंत्रावरील भाष्य लिहिणे महाराजांनी संस्कृतात सुरू केले होते. पण फक्त ४ पाने उपलब्ध आहेत. (अपूर्ण)

२९. पांडुरंग चौसष्टी

(यष्टी १, ओव्या ६४)

श्री ज्ञानेश्वर महाराजांच्या अमृतानुभवातील पहिल्या अध्यायावर चौसष्ट ओव्यांचे हे लेणे त्यांच्या कन्येने अर्पण केले आहे. श्रीगुरुंनी जे काही शिकविले त्याची परीक्षा म्हणून प्रत्येक ओवीचा

अनुवाद सादर केला आहे. शिवशक्ती म्हणजे ज्ञान व वृत्ती होत. हरिप्रेम अंगी ठसावला की ज्ञानवृत्तींचे ऐक्य होते व दोनपणा उठला की विश्व भासू लागते. *स्वतःचा आनंद पुनः पुनः भोगण्यासाठी द्वैताच्या मिषाने अद्वैतब्रह्माचे आपणहोऊन स्फुरण होते तेव्हा अज्ञान्याला जड विश्वाचा भास होतो व भक्ताला चिद्विलासाचा प्रत्यय येतो.

पण या अद्वैत ज्ञानात 'अद्वैताचा भोक्ता होणे' हेही वाईट म्हणून भोक्तृत्व विसरण्यासाठी भक्ती केली जाते. वृत्ती आटली की ज्ञान प्रगट होते व ज्ञान आटले की वृत्ती प्रगट होते. श्रीगुरूंनी संकेतदृष्टीचा उपदेश केला की ज्ञान गौण होऊ प्रेमाचे प्राधान्य होते. प्रेमवृत्ती व प्रेमाचे आलंब श्रीकृष्ण एक होऊन जातात. आत बाहेर सर्वत्र श्रीकृष्णाचाच ओतप्रोत अनुभव येतो. अशी शुद्ध निर्विकार स्वाभाविक आत्मस्थिती प्राप्त होण्यासाठी अद्वैताची जाणीव विसरून परमप्रेमरूपा भक्तीचाच सर्वस्वी आश्रय घेतला पाहिजे. ही स्वसुखाची नवाई महाराजांनी या ग्रंथात अविष्कृत केली आहे.

३०. चिरंजीवपदाभ्यास

(यष्टी २, ओव्या १००)

श्रीएकनाथमहाराजांच्या चिरंजीवपदावरील या विवेचनात मुख्यतः वैराग्याचे सविस्तर वर्णन करून साधकाला येणाऱ्या प्रतिबंधांवर सुलभ उपाय सांगितला आहे. वैराग्यरूपी सखा ज्ञानाच्या सातही भूमिका पार करताना सोबतीला असावा लागतो. *साधकाने वैराग्याचा अभ्यास करावा आणि *सिद्धाने विषयापासून जपून राहावे, यासाठी वैराग्याचा शेवटपर्यंत उपयोग आहे.

श्रीगुरूपासून वेदान्तश्रवण करताना मन शब्दाइतके सूक्ष्म होणार नाही तर ते श्रवण (किंवा वाचन) महाशीण होय. साधनसंपन्न शिष्याला 'एकले अवधान' देऊन ब्रह्मबोध होत असतो. त्यानंतर ''अहंब्रह्मास्मि'' चा अभिमान म्हणजे अविद्यालेश नाहीसा करण्यासाठी शब्दखंडनाचा उपदेश अमृतानुभवात श्रीज्ञानेश्वरांनी केला आहे.

पुढे वैराग्याचे दोन प्रकार सांगितले आहेत. *त्रिविध तापांनी पोळल्यामुळे जर वैराग्य आले असेल तर पतनाची भीती असते. अशा साधूंचे पतन कसे लवकर होत असते याचे रोचक वर्णन वाचनीय आहे. त्रिविध तापाने होणाऱ्या वैराग्यापेक्षा *विवेकपूर्वक विचाराने होणारे वैराग्य श्रेष्ठ आहे. १. यतमान २व्यतिरेक ३. एकेन्द्रिय ४. वशीकार, या चार प्रकारांचे विवेचन सविस्तर आले आहे. पण या वैराग्यामुळे विषयांचा द्वेषअंतःकरणात घर करून राहातो. तो नाहीसा करण्यासाठी सर्व विषय भगवंताला अर्पण केले असता, उदासीनवृत्ती नाहीशी होऊन सर्वत्र भगवंतच ओतप्रोत भरला आहे, असा अन्वयाचा अनुभव येतो व पूर्ण भगवत्सुख मिळू लागते.

एवं जाहलिया विरक्ति आणि ज्ञान । तेंचि होवावया रक्षण । अनध्यस्तविवर्त भजन । जैसे तैसे ।।९४।।
ज्ञाने मिळे मुक्ती । भजने दृष्टसुख प्राप्ती । याचि नाव जीवन्मुक्ती । चिरंजीव स्थिती या नांव।९६।।

असा हा चिरंजीव पदाचा अर्थ आणि त्याच्या प्राप्तीच्या अभ्यासाचे वर्णन करून महाराजांनी ''मी संतोच्छिष्ट मस्तकावर धारण करीत असतो'' या स्वतःच्या वचनांचे प्रामाण्य प्रस्थापित केले आहे.

३१. बालवासिष्ठम्

(संस्कृत. यष्टी१६ पा६३-१०५)

यात संस्कृतमध्ये आठ सर्गापर्यंतच योगवासिष्ठाची रचना उपलब्ध आहे. शंकराचार्याच्या ब्रह्मसूत्रभाष्याप्रमाणे पूर्वपक्ष, उत्तरपक्ष व सिद्धान्तपक्ष या पद्धतीची मांडणी यात केलेली आहे. मूळ योगवासिष्ठातील तात्त्विक सिद्धांत अगदी सोप्या संस्कृतात पण मार्मिक शब्दात विशद करून सांगितले

आहेत. त्यामुळे ते सिद्धांत सुभाषिताप्रमाणे लक्षात राहतात.

तातास्तु ब्रह्मज्ञानानंतरमपि गुरोरपेक्षास्ति-इति अमृतानुभवे वदन्ति ।।

याप्रमाणे संतवचनांनी योगवासिष्ठातील सिद्धांतच कसे सोप्या रीतीने सांगितले आहे ते महाराजांनी स्पष्ट केले आहे. (अपूर्ण)

३२. योगवासिष्ठतत्त्व / प्रवचने व निरूपणे

(मराठी, यष्टी १७ समयोपदेश :सुबोध हिंदुधर्म २१ प्रवचने./ समयोपदेश भा.२ य१८)

भगवान् रामचंद्राला वसिष्ठमुनींनी दृष्टिसृष्टिवादाचा उपदेश केला. तेच योगवासिष्ठ! हा वेदान्तातील सर्वोच्च ग्रंथ आहे. महाराजांनी या मूळ बृहद् योगवासिष्ठ ग्रंथाचा आपल्या सांप्रदायिक नित्य पठनीय ग्रंथात समावेश केला आहे. त्यातील सिद्धान्तांचे अगदी सोप्या रीतीने घरगुती दृष्टांत देऊन विस्तारपूर्वक विवेचन केले आहे. परंतु वैराग्य प्रकरण, मुमुक्षुव्यवहारप्रकरण आणि उत्पत्ति प्रकरणातील लीलाख्यान येवढीच निरूपणे उपलब्ध आहेत.अठराव्या यष्टीमध्ये रंगुआईला सांगितलेली निरूपणे अगदी सारांशरूपाने आहेत.

''ब्रह्मसत्यं जगन्मिथ्या'' हे एकच तत्त्व सर्व वेदान्तातून समजून घ्यावयाचे असते पण ''मूर्खांना समजत नाही म्हणून त्याचा शास्त्ररूपी विस्तार केला गेला आहे'' असे महाराज म्हणतात. जसे लहान मुलांना मोठा घास खाता येत नाही म्हणून लहान लहान घास करून द्यावे लागतात त्याप्रमाणे! असे मार्मिक आणि सोपे दृष्टांत देऊन महाराजांनी विषय समजावून दिला आहे.

आत्मप्राप्ती ज्ञानानेच होते, कर्म किंवा उपासनेने होत नाही. पण ज्ञानानंतर लोकांना सन्मार्गाकडे लावण्यासाठी सत्पुरुष शास्त्रानुसारी कर्म करीत असतात. ज्ञानी हा कुत्र्यासारखा अगदी कसाही वागणारा असला तरी त्याची स्वतःची काही हानी नाही पण सद्गुरु होण्यास तो अपात्र आहे असे महाराज परखडपणे सांगतात. आत्मप्राप्तसाठी शम, विचार, संतोष आणि सत्संग ही चार द्वारे आहेत. पेकी सत्संग सर्वश्रेष्ठ आहे आणि शीघ्र फलदायी आहे. या चारही साधनांचे विस्तृत विवेचन निरूपणातून आले आहे. मात्र सद्गुरुसेवा हे सर्वच काही विनायास मिळते अशी सद्गुरुसेवेची महती महाराजांनी प्रतिपादन केली आहे. कर्मयोग व उपासना, यापेक्षा श्रवण व गुरुसेवा हीच श्रेष्ठ आहेत, असे त्यांचे मत आहे.

चमत्कार कर्मानुसार होतात म्हणून महात्म्यांनी चमत्कार करून लोकांना फसवू नये, असा चमत्कार करण्याचा स्पष्ट निषेध केला आहे. पुढे स्वप्नासंबंधीही बरीच माहिती दिली आहे. एके ठिकाणी ''जोपर्यंत जीवन्मुक्ती आहे तोपर्यंत परमेश्वराची भक्ती करण्याकरता परमात्मा नित्य आहे, असे मानावे लागते'' हे वैशिष्ट्यपूर्ण नवीन सूत्र महाराजांच्या या प्रतिपादनातील 'विशेष' आहे. शेवटी ब्रह्माभ्यास कसा करावा यांची सांगोपांग माहिती अधिकार वाणीने सांगून योगवासिष्ठावरील निरूपणे संपविली आहेत.

३३. सुखवरसुधा

(यष्टी १३, हिंदी दोहे १७ व मराठीत विवेचन)

बरेच वेळा संप्रदायातील लोक त्यांच्या आचार्यांना मान्य नसलेले अर्थ आचार्यांच्या वचनातून काढीत असतात. पण असे स्वतःच्या संप्रदायात होऊ नये म्हणून हा ग्रंथ महाराजांनी रचला. महाराजांच्या ग्रंथांचेअर्थकसे करावे? कोणत्या वचनाला प्रमाण समजावे? कोणत्याला समयानुसार समजावे? धर्माधर्मातील विरोध नाहीसा कसा करावा? समन्वय कसा करावा? प्रसार करतांना इष्टनिष्ठा

जागृत कशी ठेवावी? वगैरे संबंधी सतरा हिन्दी दोहे रचून त्यावर स्वतःच मराठीत विवेचन केले आहे.

महाराजांनी संप्रदायरक्षणाची भिस्त कोणावर घातली नाही.''ज्यांनी मला संप्रदाय दिला तेच त्याचे रक्षण करतील.'' अशी दृढ उपास्यनिष्ठा त्यांनी व्यक्त केली.परंतु सांप्रदायिकांसाठी व प्रसारकांसाठी मात्र मार्गदर्शनही केलेले आहे.स्वतःचे ग्रंथ प्रमाण कसे मानावे याबद्दल ते म्हणतात -

पद्यग्रंथ सब मान है, गद्य संनिहित मान । केवल गद्य मरेठि सो, पद अनुसार प्रमाण ॥८॥

*पद्य पूर्णप्रमाण समजावे.

*पद्याजवळील गद्य पूर्ण प्रमाण मानावे व

*पद्यविरोधी नसेल तर समयोपदेशही प्रमाण मानावा.

*समयोपदेश हा निरनिराळ्या लोकांना मार्गाब आणण्यासाठी अधिकारानुसार असल्याने तो एकसारखा प्रमाण होत नसतो.असे विवेकानंद व रामतीर्थाच्या समयोपदेशाच्या उदाहरणांनी त्यांनी दाखवून दिले असून असा प्रकार स्वसंप्रदायात होऊ नये या दृष्टीने त्यांनी हे मार्गदर्शक तत्त्व सांगून ठेवले आहे.महाराजांच्या भक्तिशास्त्रात -

''शांकरज्ञानसंयुक्त भगवद्भक्ति-अलंकृतम् । यद्वाक्यं तत्प्रमाणं स्यादिति स्वमतनिर्णयः॥''

हे तत्त्व मुख्य आहे.शंकराचार्यांनी भगवच्छरीर मायासंपादित स्पष्ट म्हटले पण त्यातील ''आशय'' मायावच्छेद संपादित असा दाखविला.त्या आशयालाच अनध्यस्त विवर्तत्व आणून हे शांकर अद्वैत महाराजांनी मधुर केले.

माउलीच्या अनुग्रहाप्रमाणे अनुभव घेऊन व उगीच धर्माधर्मांमध्ये द्वेष वाढू नये म्हणून, 'शांकरज्ञान व इतर आचार्याच्या भावना' अशी अविरोधी योजना मधुराद्वैतात केली.या संदर्भात केलेले नऊ प्रकारच्या समन्वयांचे वर्णन मुळातूनच अभ्यसनीय आहे.शेवटी ते म्हणतात -

'माझ्या हिताची इच्छा असलेल्याने माझ्या या मधुराद्वैताचा प्रसार करावा.पण हे करताना इतर संप्रदायातील महात्म्यांना स्तुतींनी व नमस्कारांनी संतुष्ट करावे.त्यांचे सिद्धांत घेण्याची जरूर नाही.' अशी इष्टनिष्ठा ठेवून मगच प्रसार करावा.'' अशाप्रकारे महाराजांनी स्वतःच्या संप्रदायाची मार्गदर्शक तत्त्वे यात ग्रथित केलेली आढळतात.ही तत्त्वे समावून घेतल्याशिवाय महाराजांच्या वाङ्मयाचा अभ्यास पूर्णहोऊ शकत नाही.असा हा लहानसा पण अतिशय महत्त्वाचा ग्रंथ आहे.

३४.वेदान्तपदार्थोद्देशदीपिका (संज्ञाग्रंथ)

(यष्टी१३ ओव्या १८ / मराठीत संज्ञांचे स्पष्टीकरण)

श्रीशंकराचार्यानंतर अनेक वेदान्तारंभक संस्कृत ग्रंथात शब्दांच्या शास्त्रीय व्याख्या आलेल्या आहेत.पण संस्कृत येत नसलेल्या मुमुक्षूंसाठी आणि ''मुख्यतः महाराजांचे ग्रंथ समजण्यासाठी'' हा संज्ञाग्रंथ महाराजांनी रचला आहे.साधारणपणे सवापांचशे शब्दांच्या व्याख्या यात आहेत.काही जुन्या संज्ञा असून काही नवीन स्वकृत संज्ञांचीही लक्षणे महाराजांनी सांगितली आहेत.पैकी ''अनध्यस्तविवर्त आणि मधुराद्वैतदर्शन'' यांचे विवरण ही दोन भक्तिमाउलीच्या मस्तकावर खोवलेलशिरपेच आहेत. ''अनध्यस्तविवर्त'' याचा 'अर्थ' वेद, पुराण व संतवाङ्मयात सर्वत्र पसरलेला आहे पण त्या 'अर्था' ला शब्दबद्ध करण्याचे कार्य आजतागायत कोणी केले असेल तर ते महाराजांनीच!

मधुराद्वैतदर्शनाचे स्वरूप मोजक्या शब्दात मांडून वेदान्ताच्या अभ्यासकांना अगदी नवीन दिशा दाखविली आहे. महाराज सांगतात-

१.''जीवन्मुक्तीत भक्ती पाहिजे'' एवढेच या दर्शनाचे ''म्हणणे'' आहे.

२.कैलास व आळंदी हेच माहेर. त्याचा व्रजरूपी सासराशी समन्वय करून शेवटी सासर-माहेराचा अभेद हे ''ध्येय.'' आहे.

३.शांकरवेदान्तातील दृष्टिसृष्टिवादातही ईश्वर व तद्भक्ती यांना अबाधित पाहणे हे ''ज्ञेय''आहे.

४.गुरूचे ठिकाणी पतिभक्तीचा निषेध ही ''मर्यादा''आहे.

५.या दर्शनाला बाध न येईल अशी नानाप्रक्रियांची रचना हे ''प्राविण्य''आहे.

६.धर्मभेदसहिष्णुता हे ''दृष्य''आहे.

७.वेदपुराणांची तुल्यता असून त्यात कोठे परस्परविरोध वाटला तरी त्याचा समन्वयच केला पाहिजे किंवा समजत नाही म्हणून सोडून दिले पाहिजे, हा ''विशेष''आहे. हा ''विशेष'' तर खरोखरीच आज स्पष्टरूपाने कोठेही पहावयास मिळत नाही.

श्रीगुरुसंबंधी विवेचन करताना गुरुवचनासंबंधी वैदिक संस्कृतीची धारणा स्पष्ट शब्दात बोलून दाखविली आहे.

''सर्व शास्त्रे व वेद हे श्रीगुरूंच्या निरूपणातील देवतांनी चोरून घेतलेल्या शब्दांचे अर्थविस्तार होत.'' या संदर्भात ज्ञानेश्वरीतील गुरूपनिषदासंबंधी ते म्हणतात- ''ज्ञानेश्वरीत आचार्योपासनेवर ज्या ओव्या आहेत त्या सद्गुरूपासनारूप रत्नमय अनंत ब्रह्माण्डांचे भक्तिरूप ब्रह्मभांडार होत.'' एकूण काय तर वेदान्ताचा आणि महाराजांच्या वाङ्मयाचा अभ्यास या वेदान्त-पदार्थोद्देशदीपिकेच्या प्रकाशातच करायला हवा, तरच समन्वयात्मक रीतीने त्यातील ज्ञानभांडाराचे थोडेबहुत आकलन होण्यास मदत होईल

३५. शास्त्रसमन्वयः

(संस्कृत. यष्टी१६ श्लोक९८)

हा ग्रंथ पूर्ण झाला पूर्ण झाला असता तर अपूर्वसमन्वयकलाकृती निर्माण झाली असती. शास्त्रामध्ये १.यौक्तिक व २.श्रद्धात्त अशी दोन तत्त्वे असून त्यांचा मननात समन्वय होतो, असे महाराजांनी सुरुवातीला प्रतिपादन केले आहे.सर्व आर्यशास्त्रे ऋषिप्रणीत आहेत. ऋषींनी लोकांच्या अधिकारानुसार निरनिराळी शास्त्ररचना केली परंतु त्या सर्वांचा उद्देश लोकांची बुद्धी विवर्धन करण्याचाच आहे. त्यामुळे त्यात प्रत्येक शास्त्राचा विशेष भिन्न भिन्न असला तरी सामान्य तत्त्व एकच आहे.

'सर्व शास्त्रकार मुनी भ्रांतिवर्जित होते आणि त्यांनी सर्व लोकांना अन्ततोगत्वा परमार्थप्राप्ती व्हावी म्हणूनच भिन्न भिन्न शास्त्रांची उभारणी केली.''

या सर्वांचा कसा समन्वय करावा याचा विस्तारपूर्वक विचार महाराजांना मांडावयाचा होता असे दिसते. पण थोडक्यात म्हणजे अवघ्या ९८ श्लोकातच ग्रंथरचना कायमची थांबली. त्यामुळे समन्वयाचे मार्गदर्शक तत्त्व विस्तारपूर्वक समजावून घेऊन त्यानुसार परस्पर भेदभावना कशी नाहीशी करावी यासंबंधी महाराजांच्या शास्त्रपूत विचारांपासून आपण वंचित राहिलो, असे म्हणावयास हरकत नाही. परंतु 'आहे तेही नसे थोडके'

३६. आगमदीपिका

(संस्कृत. यष्टी१६ अध्याय३ श्लोक२९)

हे संस्कृत भाषेतील लहानसे निबंधवजा प्रकरण आहे. २९ श्लोक व त्यावर गद्य भाष्य आहे.

वेदांचा अर्थ करण्यासाठी प्रत्यक्ष, अनुमान व शाब्द ही तीन प्रमाणे समजून घेणे आवश्यक असल्याने महाराजांनी हा ग्रंथ रचण्याचा आरंभ केला. यात चार्वाक मताचे सुंदर निराकरण केलेले आहे. वेदामधील भिन्न भिन्न इतिहासांचा कल्पभेदाप्रमाणे समन्वय केला आहेव एकाच कल्पात भिन्न भिन्न चरित्र असतील त्यांचेही काय-व्यूहाप्रमाणे समन्वय होतो असेही सिद्ध केले आहे. (अपूर्ण)

३७. युक्तितत्त्वानुशासनम्

(संस्कृत. यष्टी १६)

सर्व शास्त्रात प्रवेश होण्यासाठी युक्तिपूर्वक विचार करण्याची मूलभूत आवश्कता आहे.ती पूर्ण करण्यासाठी या ग्रंथाचा आरंभ महाराजांनी केला होता. यात लहान लहान वाक्ये असून थोडक्यात आणि सोप्या रीतीने विषयाची मांडणी आहे.भाष्याप्रमाणेच खंडन, मंडन व स्व-सिद्धांताची मांडणी यात दिसून येते. पण ग्रंथाच्या सुरवातीलाच लेखवजा उपोद्घात झाला आणि लेखन थांबले.(अपूर्ण)

३८. प्रेमनिकुंज

(यष्टी१० अध्याय५ ओव्या९२५, गद्यपद्यान्वित चंपूग्रंथ)

या गद्यपद्यान्वित प्रेमनिकुंज ग्रंथात महाराजांनी त्यांचा जो नवीन सिद्धांत ''अनध्यस्त विवर्त'' - त्याची खंडनमंडनात्मक शास्त्रीय पद्धतीने मांडणी केली. मुख्यतः शास्त्री-पंडितांसाठी या ग्रंथाची रचना झालेली दिसते. सिद्धांतबिंदू अद्वैतसिद्धी वगैरे मधुसूदन सरस्वतींच्या विद्वन्मान्य शास्त्रीय ग्रंथांप्रमाणेच हा ग्रंथ आहे.परंतु हा ग्रंथ मराठीत आहे.यात अनध्यस्तविवर्त सिद्धांताची सिद्धी करताना वेदान्ताची १०८ मते घेतली आहेत.अकरा मतांचा उपन्यास करून त्यांना सविस्तर शास्त्रीय पद्धतीने उत्तरे दिली आहेत.यात श्रीमधुसूदन सरस्वतींच्या अद्वैतसिद्धांताचे देखील प्रसंगोपात्त खंडन केले आहे. परमेश्वराचा देह मायिक आहे या शंकराचार्यांच्या मताचा देखील एके ठिकाणी परामर्श घेतला आहे पण शेवटी त्यांचे खंडन न करता समन्वय केला आहे आणि तेच महत्त्वाचे आहे.रामानुज, वल्लभाचार्य, मध्वाचार्य वगैरे सर्व वेदान्तमते खंडित केली आहेत आणि शंकराचार्यांच्या अद्वैतसिद्धांतावरच माधुर्य भक्तीला आलंबन असलेल्या श्रीकृष्णाच्या सच्चिदानंदघन सगुण साकार विग्रहाची सिद्धी केली आहे. असा हा शास्त्रीय ग्रंथ महाराजांच्या भक्तिसिद्धांताचा सर्वतः उद्घोष करणारा आहे.याला मधुराद्वैत दर्शनाचा मूलभूत शास्त्रीय ग्रंथ म्हणावा लागेल.

३९. शांतिसुधाकर

(यष्टी २, ओव्या ११८, पा. ६७-७४)

केवळ युक्तिवादाच्या साह्याने वेदान्त समजावून सांगण्यात महाराजांचा हातखंडा होता.त्याचा जीवंत प्रत्यय या लहानशा प्रकरणात प्रकर्षाने येतो.भाषा न्यायघटित असल्यामुळे एकदम समजायला अवघड वाटते पण ज्याला लॉजिकल उपपत्तींची गरज आहे त्याने युक्तीच्या काठिण्याला भिऊन चालणार नाही. ''या निरूपणावर शास्त्रविहित किंवा तर्कसिद्ध पूर्वपक्ष करण्यास तयार असलेल्याने समोर यावे'' असे महाराजांचे आव्हान आहे.या आव्हानातून, शास्त्रशुद्धता आणि तर्कनिष्ठता या दोन्ही कसोटीवर हे साहित्य निखालस उतरत असल्याचे दिसून येते.

बिनतोड युक्तिवादाने वादीचा निग्रह झाल्याची काही स्थळे पाहू-

*सर्वच जर अनित्य आहे तर ''अनित्य'' हे तरी नित्य आहे की तेही अनित्य आहे? असे महाराज विचारतात.या प्रश्नाचे कोणतेही उत्तर दिले तरी वादीचे स्वतःचेच म्हणणे खोडले जाते.

दुसरे ठिकाणी * ''तुझ्या मतात आणि माझ्या मतात 'विरोध' आहे की नाही''? असे महाराज विचारतात.''अविरोध आहे'' म्हटले की वादीची स्वपक्षता हारपते आणि ''विरोध'' आहे म्हटले तर स्वपक्ष ''सिद्ध'' आणि परपक्ष ''असिद्ध'' कां, हेही ठरविता येत नाही.

अशी निग्रहस्थाने अनेक आहेत. बुद्धीची सूक्ष्मता आणि युक्तिवादाची सर्वंकषता मूळातूनच पाहण्याजोगी आहे.अशाप्रकारे अनेकवादखंडनपूर्वक तर्काने शून्याचे खंडन करून 'सत्ता' त्रिकालाबाधित आहे हे पटविले आहे.अखंड इच्छेस्तव सत् चित् व आनंदाची तर्काने सिद्धी केली आहे.शेवटी अनुभव आणि श्रुतिस्मृतींची प्रमाणे देऊन महाराजांनी स्वतःच्या तर्काला गांभीर्य आणि प्रतिष्ठा मिळवून दिली आहे.

८२ व्या ओवीपासून पुढे ''अगा जे जाहलेची नाही । त्याची वार्ता पुससि कायी?'' ब्रह्मापासून विश्वाची उत्पत्ती झालीच नाही या योगवासिष्ठातील श्रेष्ठतम अजाति-सिद्धांताचे सविस्तर विवेचन केले आहे.*सतापासून १- सताची २- असताची किंवा ३- अनिर्वचनीय मायेची उत्पत्ती संभवत नाही.आणि *अज्ञानापासून ज्ञान संभवत नाही. असा अजातिसिद्धांताचा सिद्धानुवाद यात ग्रथित केला आहे. तो केवल युक्तिवादाच्या साह्याने मांडल्यामुळे आजच्या बुद्धिवादी युगात महाराजांनी तत्त्वज्ञानावर चढविलेला हा मराठी अलंकार आहे असेच प्रस्तुत ग्रंथासंबंधी म्हणावे लागेल.

४०. वेदान्त-प्रक्रिया-समुच्चय

(यष्टी१५, ओव्या ५४)

ब्रह्मज्ञान होण्यासाठी अधिकारभेदानुसार ज्या नानाविध उपासना म्हणजे वेदान्तप्रक्रिया. त्यांचा समुच्चय म्हणजे हा ग्रंथ.पण हा अत्यंत लहान व अपुरा आहे.यात सुरवातीला महाराज म्हणतात - ''लोकांसी बोधू होवावा । हा धाडसू चित्तीं नाही'' यावरून त्यांची अनाग्रही वृत्ती दिसून येते.येथे त्यांनी नदीची समर्पक उपमा दिली आहे. नदी समुद्राला मिळते तेव्हा ती निस्तब्ध होऊन विरून जाते परंतु उगमाकडे असलेला विचा खळाळा चालूच असतो.तसेच ब्रह्मरूप झालेल्या शांत जीवनमुक्तांचे शब्दरूपी ग्रंथ संसारग्रस्त लोकांना उपदेशक होत असतात.

१.ईश्वर व गुरु हे जीवकल्पित आहेत पण ते कल्पनेचा परिणाम नसून ब्रह्माचे विवर्त आहेत. २.उपास्य कल्पनेचा परिणाम नसून कल्पनाकृत आरोप आहे. ३. संसार हा कल्पनेचा परिणाम आहे. या तीन कारणामुळे गुरू व ईश्वर हे अनध्यस्त विवर्त आहेत.सुवर्णाच्या ज्ञानाने जशी अलंकाराची निवृत्ती होत नाही तशी ब्रह्मज्ञानाने उपास्याची निवृत्ती होत नाही.

१.शुद्ध ब्रह्म हे ज्ञानाचा विषय असून चिदाभास त्याचा (ज्ञानाचा) आश्रय आहे. २.सगुण ब्रह्म हे भक्तीचा विषय असून शुद्ध ब्रह्म हे तिचा आश्रय आहे.

ज्ञान आणि भक्तीचा हा सूक्ष्म भेद सांगितला आहे तो महत्त्वाचा आहे.* ऐक्याचे मुद्दल न ढळे। आणि साजिरेपणाचा लाभु मिळे।। *देव देऊळ परिवारू। कीजे कोरूनि डोंगरू। तैसा भक्तीचा व्यवहारू। कां न व्हावा।।ज्ञानदेव या भक्तितत्त्वाचे प्रतिपादन समर्थ रामदास वगैरेंची प्रमाणे घेऊन महाराजांनी आपल्या खास युक्तिवादाच्या तर्ककठोर शैलीने केलेले आहे.

४१. वेदान्त निरूपण

(मराठी, यष्टी १५)

या संस्कृत-मराठी मिश्र असलेल्या अपूर्ण प्रकरण ग्रंथामध्ये प्रथम संस्कृत श्लोक त्यावर संस्कृत भाष्य व त्यावर मराठी ओवीबद्ध भाष्य असा क्रम आहे.

पहिल्या आह्निकात ब्रह्माचे लक्षण व मायेचे लक्षण सांगितले असून अनादी सहा पदार्थांचे सांग विवेचन आले आहे.

दुसऱ्या आह्निकात सृष्टीच्या उत्पत्तीचा क्रम सत्तात्रयवादाप्रमाणे सांगण्यात आला आहे.

४२. तत्त्वबोधः

(संस्कृत. यष्टी१६ अ. ३)

हा एक लहानसा प्रकरण ग्रंथ संस्कृत गद्यात असून सोपा आहेय़ात वेदान्तातील बऱ्याच पारिभाषिक शब्दांच्या व्याख्या थोडक्यात व सुटसुटीत आल्या आहेत.

*जगात आत्मा व अनात्मा हे दोनच पदार्थ आहेत. पैकी *आत्मा चेतन व ज्ञानरूप आणि अनात्मा जड व अज्ञानरूप. तसेच *अज्ञान, माया, अविद्या, प्रकृती, प्रधान, अव्यक्त, हे सर्व पर्याय शब्द आहेत, असे सांगितले आहे.

कोणी अनेक जीववाद मानतात, तर कोणी एकजीववाद मानतात, तर कोणी जीव, ईश्वर व ब्रह्म असे तीन पदार्थ मानतात. परंतु ज्या योगाने जीवाला आत्मज्ञान होईल ती प्रक्रिया घेऊन साधकाने पूर्णम्हावे हेच या प्रक्रियाभेदांचे महत्व सांगितले आहे. पुढे सृष्टीची उत्पत्ती सांगताना थोडक्यात पंचीकरण सांगितले आहे. दुसऱ्या प्रकरणात ब्रह्म, जीव, ईश्वर, अविद्या, जीवेश्वरभेद, अविद्याचैतन्याचा संबंध अशा सहा अनादी पदार्थांचे वर्णन आले आहे.

ईश्वरकृत प्रपंच सुखदुःखाला कारण नसून जीवकृत प्रपंचासंबंधीची भावना दुःखाला कारण आहे. प्रपंचापासून जीवाला सुखदुःखे भोगावी लागतात म्हणून सत्तात्रयवादापेक्षा सत्ताद्वयवादाने जीव लवकर ब्रह्मरूप होऊ शकतो, असे व्यवस्थित रीतीने मांडले आहे. सत्तात्रयवाद व सत्ताद्वयवाद/ दृष्टिसृष्टि वाद यांचे सविस्तर विवेचन सोप्या पद्धतीने समजावून दिले आहे.

४३. षड्दर्शनलेशसंग्रह

(संस्कृत. यष्टी १६)

तीन पानांचा हा संस्कृत लेख अगदी अपूर्ण अवस्थेत आहे. यात प्रमाणाचा विचार पूर्ण झाला असून प्रमेयासंबंधीचे थोडकेसे विवेचन होताच हा लेख अपुरा राहिला आहे.

४४. भक्तिपदतीर्थामृत

(यष्टी १, अध्याय ५, ओव्या ३१७)

''तत्त्वमसि'' या सामवेदान्तर्गत महावाक्याने जीवब्रह्माचे ज्ञानैक्य नेहमी करून दिल्या जाते. पण ज्ञानैक्य झाल्यानंतर याच महावाक्याच्या साह्याने परमप्रेमरूपा भक्ती कशी प्राप्त करून घ्यावी, याचे सांग आणि सविस्तर केलेले विवेचन महाराजांनीच प्रथम केले आहे. हे शांकरवेदान्ताला महाराजांनी दिलेले फारच महत्वाचे नवीन योगदान आहे. जागतिक तत्त्वज्ञानक्षेत्रातील विचारांना नवी दिशा महाराजांनी दिली आहे.

या महावाक्यातील तीन पदे भक्तिरूपी अमृताचा उद्भव करणारी असून त्या तीर्थामृतावरील लहरी म्हणजे पांच अध्यायरूपी पांच तरंग होत अशी परंपरित उपमा दिली आहे.

पहिल्या 'तत्' या पदाचा अर्थ परमेश्वर असा आहे. त्यातील तटस्थ लक्षणात्मक साक्षिस्वरूपाचा परित्याग करून राहिलेल्यास्वरूपलक्षण म्हणजे सगुणसाकार आनंदघन भगवान् श्रीकृष्णाचा विग्रह

होय, असा भक्तिपर अर्थ विवेचिला आहे. सुवर्णाचे ज्ञान झाल्यावरही अलंकाराची आवड असल्यामुळे आपण अलंकार जसे मोडीत नाही तसेच आत्मज्ञान झाल्यावरही सगुण भगवंताचेप्रेम कमी होऊ शकत नाही, त्यामुळे नित्यनूतन आत्मप्रेमाप्रमाणे भगवद्विग्रह देखील नित्य-नूतन ठरतो व भक्तांचे प्रेम गंगौघाप्रमाणे सतत त्याच्या चरणावर अर्पण होत असते.

'त्वं' पद म्हणजे स्वतःच्या अज्ञानादि विशेषस्वरूपाचा परित्याग करून उरलेले चैतन्यच ब्रह्म होय असा जीवाला ज्ञानानुभव येतो. पण त्यांचे ठिकाणी 'अहंब्रह्मास्मि'रूपी अविद्यालेश कायम राहतो. तो नाहीसा करून देहासकट सर्वच ब्रह्मरूप करण्यासाठी स्वरूपलक्षणयुक्त श्रीकृष्णाची भक्ती केली जाते. हाच त्वंपदज्ञ किंवा त्वंपदलक्ष्य भक्त होय.

'असि' या पदाने तत् आणि त्वं या दोघांचे ऐक्य होत असते. हीच ऐक्यरूपा भक्ती होय. त्वंपदज्ञ भक्ताने स्वरूपलक्षणात्मक श्रीहरीवर अखंड प्रेम अर्पण करीत राहणे म्हणजे अखंड ऐक्यावस्था होय. या भक्तीने ज्ञानाभिमान पूर्ण नाहीसा होतो व ब्रह्माची शुद्ध निर्विकल्प अवस्था भक्ताला मिळते. सर्वत्र केवळ चिद्विलासाचा प्रत्यय येतो.

या तत्त्वमसि-पदांचे विवेचन करताना, भक्तीतले दहा रस, पतिव्रतेची उपमा, सुवर्णालंकाराच्या दृष्टान्ताने अनध्यस्तविवर्ताची सिद्धी, श्रीकृष्णरूपी प्रेमवृक्षाचे रूपक इत्यादींचे काव्यगुणांनी श्रेष्ठ आणि प्रासादिक विवरण झाले आहे.

फिटलियाही वाचाऋण । न यावा भक्तिधनाभिमान ।
यालागी ऐक्यत्वे श्रीकृष्णचरण । प्रीतीने सेवू ।।५-५।।

याप्रमाणे अहंब्रह्मास्मीचे वाचाऋण फिटल्यानंतर 'मी भक्त आहे' असा भक्तीचा अभिमानही नाहीसा करणे हे या ग्रंथाचे मुख्य प्रयोजन आहे.

धारावाही रसो भक्तिरीशे तत्पदगोचरे ।
त्वं पदज्ञो परो भक्त इति स्वमतनिर्णयः।।

भगवंताप्रमाणे स्वतः देखील अनध्यस्तविवर्त शरीर धारण करून भक्ताने आपले परमप्रेम भगवंताला तैलधारावत् अखंड अर्पण करीत असावे, अशी अर्पणरूपा परा भक्ती या महावाक्यातून कशी प्राप्त करून घ्यावी, याचे महाराजांनी शास्त्रशुद्ध विवेचन केले आहे.तत्त्वमसितून भक्ती सांगणारा वेदान्तातील हा एकमेव शास्त्रीय ग्रंथ आहे.

४५. निगमान्तपथसंदीपक

(यष्टी१ अ५ ओव्या१६९)

निगम म्हणजे वेद. निगमान्त म्हणजे वेदांचे अंतिम स्वरूप-शुद्ध निर्विशेष परब्रह्म. ब्रह्मप्राप्तीच्या पथाला प्रकाशित करणारा दीपक म्हणजे निगमान्त-पथ-संदीपक!

श्रीबाबाजी महाराज पंडित जेव्हा श्रीगुलाबरावमहाराजांच्या संप्रदायाचे उत्तराधिकारी प्रतिनिधी झालेत त्यावेळी संप्रदयातील अनेक बुद्धिमान व विद्वान असलेल्या व्यक्तींनी या ग्रंथाचे निरूपण करण्याची विनंती केली. श्रीबाबाजी महाराजांनी या ग्रंथातील प्रत्येक ओवीचा सविस्तर अर्थ समजावून सांगितला, तेव्हा कुठे सर्वांनी त्यांना स्वीकारले. असा हा श्रीगुलाबरावमहाराजांच्या वाङ्मयातील सर्वात कठिण ग्रंथ आहे. ज्ञानेश्वर माऊलीचा 'अमृतानुभव' आणि ज्ञानेश्वरकन्येचा 'निगमांतपथसंदीपक' या दोन मराठी ग्रंथांची जोडी तत्त्वज्ञानाच्या प्रांतात अतिशय महत्वपूर्ण आहे. असे म्हणावयास मला तरी मुळीच हरकत वाटत नाही.

श्रीबाबाजीमहाराज म्हणत की 'महाराजांच्या सर्व ग्रंथांचा चांगला अभ्यास झाला म्हणजे हाही ग्रंथ समजेल.यात नवीन वेदान्त काहीही नाही.महाराजांनी सर्वत्र जे प्रतिपादन केले आहे तेच येथे आहे. पण नवीन शब्दयोजनेमुळे आणि सूत्रात्मकतेमुळे कठिण वाटते येवढेच.' यातील प्रकरणाच्या शेवटी विषय सांगितला आहे पण त्यावरूनही आकलन करणे कठीण जाते. यातील श्रीगुरुवर्णनाची एक ओवी पाहू-

पाहे ईशत्व त्रासले। ते त्वद्-बोधे सुखावले।
मग येवोनि ओटंगले। तव संकेती ।।३।।

अशा प्रकारच्या सुरेख शैलीतल्या अर्थगंभीर ओव्या या ग्रंथाचे वैशिष्ट्य आहेत.

४६.भगवद्भक्तिसौरभ

(यष्टी २, अ.८, ओव्या ८३१)

रुक्मिणीस्वयंवरावर लिहून अनेक भक्तांनी आपली आवडीची धणी फेडून घेतली आहे.ज्यांनी जन्मतःच विषयांचा त्याग केला त्यांनी सुद्धा भगवंताच्या लीला आवडीने वर्णन केल्या. रुक्मिणीशी विवाह इतिहासदृष्ट्या व्यावहारिक असला तरी परमार्थदृष्टीने अलौकिक असाच आहे. रुक्मिणीने श्रीकृष्णाला सुदेव ब्राह्मणाच्या हस्ते पत्र पाठविले. त्यातील सात श्लोकात रुक्मिणीने जी शब्दयोजना केली तीतून अद्वैतज्ञानपूर्णमाधुर्यभक्तीचा संप्रदाय कसा प्रवृत्त झाला, हेच महाराजांनी या ग्रंथात समजावून दिले आहे.रुक्मिणी स्वतः तर भगवंताशी ऐक्य पावलीच पण इतरही सर्व भक्तांना स्वतःबरोबर नेऊन भगवंतावर प्रेम अर्पण करण्यास सतत प्रवृत्त करीत आहे.

पहिल्या परागात अद्वैत भक्तीचे स्वरूप श्रुति-युक्ति-अनुभवाने सिद्ध केले आहे.नंतर श्रीकृष्ण म्हणजे पुरुष व रुक्मिणी म्हणजे प्रकृती म्हणजे अविद्या, या रूपाकाचे खंडन आहे.हे रूपक जर मानले तर विवाह म्हणजे अविद्येचा- प्रकृतीचा- म्हणजे पर्यायाने रुक्मिणीचा मृत्यूच मानावा लागतो.ब्रह्म आणि वृत्ती यांचा खेळ म्हणजेच हा विवाहादि प्रसंग होय असा 'परम-अर्थ' महाराजांनी उलगडून दाखविला आहे.

पहिल्या श्लोकात रुक्मिणी म्हणते ''मी गृहिणी असल्याने माझ्या गृहमंदिरातील स्वामी तूंच आहेस, हे मी जाणते.पण कुलवधूच्या नात्याने मी तुझ्याशी प्रत्यक्ष बोलूशकत नाही म्हणून घरच्याघरी पत्र पाठविण्याचा विचित्र प्रसंग आला आहे.ब्रह्म आपल्या वृत्तिभावाला सोडून राहूं शकत नाही तसा तूंही शक्तिस्वरूपिणी अशा मला सोडू शकत नाहीस. मी अद्वैतज्ञानसंपन्न असली तरी मला माझ्या प्रेमवृत्ती तुला अर्पणकरावयाच्या आहेत.'' नदी जशी समुद्राकडे वाहताना सर्व ओढे-नाले वगैरेंना घेऊन समुद्राला मिळते तसे रुक्मिणीने सर्व सखींना सोबत घेऊन कृष्णचरणाब्धीला मिळण्याचे ठरविले व हा माधुर्य संप्रदाय प्रवृत्त झाला.ती म्हणते ''हृदयात तुझे व माझे ऐक्य आहेच पण विवाह झाल्यामुळे बाह्यतः देखील तुझ्या व माझा संयोग होईल.या प्रेमवृक्षाला फळे येतील व फळातील प्रेमबीजे इतर कामिनींच्या हृदयात पडून हा अनादी संप्रदाय पुढेही अनंत काल चालत राहील.पण यासाठी तू द्वारकेहून येण्याचे कष्ट घेऊ नकोस.तूं विभू असल्याने माझ्या हृदयातही तूं आहेसच.फक्त आतून बाहेर ये म्हणजे झाले.''

''पत्र लिहिण्याच्या धीटाईमुळे मला जर पतिव्रता समजणार नसशील तर वेश्या म्हणून कां होईना माझा अंगीकार कर. जर विवाह केला तर कुलवधूप्रमाणेसलज्ज होऊन राहवे लागेल. पण राक्षसविधीने मला नेलेस तर लोक माझी निंदा करतील त्यामुळे माझे पूर्णप्रेम पूर्णपणे तुजवरच राहील'' असा हा निःशंक भक्तिउद्रेक झालेला आहे.

सहाव्या परागात संधिसमाधीचे वर्णन आहे.'' आशा सोडूनि संधीत जाती। ते समाधि साधती जेथल्या तेथ''. दोन वृत्तीच्या मधली स्थिती म्हणजे स्थिती म्हणजे संधी. तेथे म्हणजे अंबेच्या मंदिरात असताना 'मला उचलून ने' असे रुक्मिणी विनविते.

एक महत्वाचे म्हणजे रुक्मिणी व कृष्ण हे दोघेही अनध्यस्त विवर्तच आहेत असे दाखवून दिले आहे. केवळ ज्ञान्यांना निर्गुणानंद मिळतो पण भक्तिद्वारा होणारा अन्वयाचा आनंद मिळत नाही. उलट दोन प्रीतिवृत्तींच्या संधीत निर्गुणानंद व प्रीतिवृत्तीत सगुणानंद; अशा दोन्ही आनंदाचा लाभ भक्तांनाच होत असतो.

अशा प्रेमभक्तीच्या सूक्ष्म छटा उलगडून दाखविताना योग व ज्ञानाचे विश्रामस्थान असलेल्या भक्तीची विरोधपरिहारपूर्वक मांडणी केली आहे. अद्वैतज्ञानाने संयुक्त व भगवद्भक्तीने अलंकृत अशा माधुर्य संप्रदायाची स्थापना रुक्मिणी आईने कशी केली, याचे युक्ती व अनुभवाच्या खुंमी भरलेले विस्तारपूर्वक विवेचन यात आले आहे.

४७. प्रीतिनर्तन

(यष्टी२ अ६ ओव्या५६४)

या ग्रंथाच्या नावाला शोभतील असे चार 'अभिनय' आणि सहा 'पदन्यास' यात आहेत. निरूप्याभिनयात, भक्तीतील प्रेमाचे आलंबन स्वतःहून अभिन्न आणि नित्य असते; खरा ऐक्यानुभव भक्तिशिवाय येत नाही. म्हणून ज्ञानोत्तर अद्वैत भक्तीची आवश्यकता आणि स्थापना यांचे निरूपण यात केले आहे.

ईश्वर किंवा श्रीगुरूला मातापिता समजून त्यावरच विकार अर्पण करण्याची प्रक्रिया सांगितली आहे. या 'प्रेमज स एवाहंते'मुळे वागृण उत्पन्नच होत नाही आणि या लालनप्रेमात देखील पूर्ण एकतानता प्राप्त होते. असे लालनाभिनयात सांगितले आहे.

वात्सल्यभिनयात वत्सलप्रेमाला काव्यदृष्ट्या देखील रसत्व प्राप्त करून दिले आहेआणि यशोदेच्या वात्सल्य प्रेमाचा इतिहास शब्दाच्या कुंचल्याने चित्ररूप केला आहे. त्यातील प्रेमछटांचे रंग सामान्य रसिकलाही रंगवून टाकतात.

यशोदेची भजनाची रीती । मी म्हणे न बोलवेल श्रुती ।
विश्वरूप दाखविताही विश्वपती । जिणे वात्सल्यभक्ती न सोडिली ।।

गर्गनारदादि मुनी क्षणोक्षणी सांगतात की हा परमात्मा आहे पण यशोदा ते सर्व अन्तःकरणात साठवून ठेवे.

''तेही ऐकोनि साठवी हृदयी । तान्हा म्हणोनि दे भात दही ।।

म्हणून महाराज म्हणतात, ''मला श्रीकृष्णापेक्षा यशोदाच वरिष्ठ वाटते. तिची क्रोधविकार अर्पण करण्याची रीत तर विलक्षणच -

सोहं क्रोध विकार वेताटी । पाहोनी चळचळ कांपे जगजेठी । देवपद विसरोनी मिठी । भक्तपदी घाली।।

आणि अभेदभक्तीही विलक्षणच -

स्तन घालोनिया वदनी । अखंड पय पाजी जागुनी । मायपुत्रा अभेदपणी । मिठी तेव्हा ।।

जणुं काय या वात्सल्यभक्तीच्या निरूपणातून मातृहृदयातील अमृतच स्रवत आहे, असे वाटते.

माधुर्याभिनयात अनध्यस्त विवर्ताची सिद्धी, वाचाऋण मेल्याने फिटत नाही म्हणून भक्तीची आवश्यकता आणि ही भक्ती मिळाली की जीवन्मुक्ती; नंतर विदेहमुक्तीची व्यर्थता, अशा अनेक

प्रकारच्या उपपत्ती देऊन माधुर्यप्रेमाची आवश्यकता प्रतिपादन केली आहे.

हेचि माधुर्य । हेचि कांतकांतासुरतसुख । गुरुशिष्याचे मुखा मुख । स्पर्शो हाचि ।।

या माधुर्यातील संभोगश्रृंगाराचे आणि विप्रलंभशृंगाराचे पाचव्या व सहाव्या पदन्यासात वर्णन केले आहे.

१. परस्त्री होऊन मानसिक संयोग भक्ती करणे ही गुप्तसंभोगरूपी श्रृंगारभक्ती.

२. तीव्र संवेगाने गोपी होऊन प्रत्यक्ष संयोग प्रेम करणे ही प्रकटशृंगारभक्ती. ही संयोगभक्ती सांगत असताना ज्ञान आणि भक्तीतील फरक मार्मिक आणि स्पष्ट दाखविला आहे.

''अद्रुते चेतसि ब्रह्मानुभव'' म्हणजे ज्ञान ।।

''द्रुते चेतसि ब्रह्मानुभव'' म्हणजे भक्ती ।।

नंतर विप्रलंभ शृंगाराचेही दोन प्रकार केले आहेत.

३. मनोवृत्तीला सखी कल्पून तिच्याजवळ प्रियविरहाचे उपपालन करणे हा गुप्त विप्रलंभशृंगार.

४. तीव्र संवेगाने प्रत्येक दृश्य वस्तु सखी वाटून तिच्याजवळ निजप्रियविरहवृत्त कथन करणे हा ''प्रकट विप्रलंभ शृंगार. यात शेवटी सद्गुरु-विश्वासरूपी वृत्तीच्या सत्संगतीमुळे श्रीकृष्णाचा आविर्भाव होतो आणि विरहिणीच्या सर्व वृत्ती भगवंताशी एकतानता पावतात. या आंधळ्या गौळणीच्या सर्व प्रेमाचे माधुर्य, जयदेवकवींच्या गीतगोविंदाच्या निमित्त्याने अंतिम पदन्यासात आविर्भूत झाले आहे.ही गोपी जड मुरलीला चेतन सखी समजून तिला आपला मनोभाव सांगते.''भगवान जेव्हा तुझे चुंबन घेतील तेव्हा माझी दशा त्यांना सांग.'' वियोगोपलालनाचे यथार्थ चित्र रेखाटताना महाराज म्हणतात रसास्वादविघ्न गोपींना येऊ नये म्हणून निर्गुणात लपून गोपींच्या एकतानतेचे रक्षण भगवान करतो.ते रक्षण झाले की गोपींच्या प्रेमवृत्ती पुन्हा उफाळून येतात.

जे सगुणहोते अंतःकरणी । ते लपू पाहे निर्गुणी।

अवघिया वृत्ती ते क्षणी । चमकती साच्या ।।

अशी ही वियोगातील उत्कटता संयोगातही कायम राहते.तेच वियोगोपलालन प्रेम 'संयोगेऽपि वियोगोपलालनम्'' होय. भगवंताच्या अंकावर शयन केलेली गोपी पुनः वियोग होइल की काय या भीतीने ''हा श्याम, हा श्याम,'' अशी आर्त हृदयाने साद घालतेहेच माधुर्यभक्तीचेसारसर्वस्व या प्रीतिनर्तनात महाराजांनी शब्दाच्या कुंचल्याने मूर्तिमंत साकार केलेले आहे.

४८. नित्यतीर्थः (आळंदी महिमा)

(यष्टी२ ओव्या५७ यष्टी२)

श्रीज्ञानेश्वरमाऊलीचा प्रेमसाकार सगुण विग्रह हा अनध्यस्त विवर्त आहे आणि त्याच्या सांनिध्यामुळे आळंदीक्षेत्र प्रलयातही नाश पावून न शकणारे असे नित्यतीर्थ झाले आहे. या विषयाची मांडणी सांख्याच्या सत्कार्यवादानुसार, दृष्टिसृष्टिवादानुसार आणि योगशास्त्रानुसार केली आहे.

प्रेम कधीतरी क्षीण होऊ शकेल याला युक्तिवादच नसल्यामुळे त्याची नित्यताही आपोआपच सिद्ध होते. माउलीचे अवतार कार्य केवळ भक्तिस्थापन हे असल्यामुळे ''कु-जन-हनन अवतारी'' शरीराप्रमाणे माऊलीचे ठिकाणी आरोपित तमोगुणही भासत नाही.

१. योगाभ्यासाने ''विक्षिप्त'' भूमिकेवर चित्त असताना याक्षासारखे शरीर होते.

२. ''एकाग्र'' भूमिकेवर चित्त असताना ध्यानाहारी शरीर होते.

३. ''निरुद्ध'' भूमिकेवर चित्त असताना सत्त्वसम शरीर होते.

असे ते सत्त्वसम शरीर रज व तम गुणांनी कधीच अभिभव पावत नाही. याला कर्कटी राक्षसी, शुक्राचार्य, काकभुशुंडी वगैरेंची प्रमाणे दिली आहेत. अशाप्रकारे योग्याचे शरीरच जर प्रलयात नाश पावू शकत नाही तर माउलीचे अवतार शरीर व त्यांचे निवासस्थान आळंदीक्षेत्र कशी नाश पावतील! असा आळंदीचा महिमा श्रुति-युक्ति-अनुभव या साधनत्रयीने मांडून महाराजांनी आपल्या तातांचे यथार्थ वर्णन केले आहे.

४९. प्रियपाहुणेर

(यष्टी२ अ४ ओवी१८३)

परमप्रिय श्रीकृष्णाचा पाहुणचार करावयाचा म्हणून महाराजांनी आदरसत्काराचे चार प्रकार केले आहेत. ग्रंथातील अध्यायांना आदर म्हणून संबोधिले आहे. भगवंताचा सत्कार करण्यासाठी प्रथम घरातले शत्रू घालवून दिले पाहिजेत म्हणून संम्राज्ञी भक्तिदेवीने स्वतःच मती आणि रती अशी दोन रूपे धारण केली. आणि मतीच्या प्रचंड सैन्याने प्रवृत्तीचा सर्वस्वी नाश केला असे रूपक आहे.

दुसऱ्या अध्यायात उपासना व भक्तीतील भेद सांगितला. पण दोघांचीही साधकाला अत्यंत आवश्यकता आहे असेही प्रतिपादन केले. पुढे माधुर्यभक्तीची मर्यादानिष्ठा व पुष्टिनिष्ठा वर्णन करून भक्तीचेआलंबन असलेल्या अनध्यस्तविवर्ताची सिद्धी केली. आणि शेवटी ज्ञानोत्तर भक्तीच्या अवीट गोडीचे वर्णन केले. विषयभावरहित गणिका प्रेमाची उत्कटता ज्या माधुर्य प्रेमात मिसळलेली आहे त्या ओव्या रसाळ आहेत.

नवल आवडीचा झरा । बह्मभाव सांडूनी गोरा । काळा कृष्ण नोवरा । गोडसा वाटे ।।६२।।
योगे नित्य आलिंगन । विरहोपलालन, अतृप्तीव तृप्ती ।।६४।।
अशा प्रकाराच्या सुरेख ओव्यांनी हा ग्रंथ ओतप्रोत भरलेला आहे.

५०. भक्तितत्त्वविवेक

(संस्कृत, यष्टी १६ श्लोक १३९)

या भक्तिग्रंथात केवळ दोन अध्याय असून १३९ श्लोक उपलब्ध आहेत. भक्तिशास्त्राला पोषक असलेले काव्यशास्त्रीय विवेचन यात आहे. यातील सर्व संस्कृत श्लोक सोपे आणि प्रासादिक आहेत. त्यातून अनध्यस्तविवर्त श्रीकृष्णाचे प्रेम कसे असते? आत्मानंदाची वृत्तिव्याप्ती कशी असते? वगैरे संबंधी विवेचन आले आहे. अहंतेचा विलय झाल्यानंतर ''इदंता इव'' असा परमेश्वर भासतो व तोच अनध्यस्तविवर्त श्रीकृष्ण आहे व त्यावर प्रेम केले पाहिजे. या सिद्धांतांची नव्या रीतीने मांडणी करण्यात आली आहे.

५१. प्रियप्रेमोन्माद

(संस्कृत. यष्टी१६ श्लोक१७)

या सतरा श्लोकात महाराजांनी विरोधालंकाराने सजवून प्रेमाच्या उन्मादावस्थेचे वर्णन केले आहे. हे वर्णन काव्यगुणांनी परिपूर्ण आहे. सुरवातच मुळी ''अलं प्रिय नमस्कृतिः'' ने झाली आहे. बरोबरच आहे उन्मादात नमस्कार कसा होणार? या दृष्टीने प्रथम श्लोकाचे औचित्य मनाला आकृष्ट करते. पुढील काव्यकल्पना तर अगदी एकापेक्षा एक वरचढ आहेत.

* वन्हिसुता गंगा मेघरूपी सागराला मिळाली. त्यातील दीन मास्यांना मात्र थंड पाणी सहन

होत नाही. उलट ते ''महातापेन जीवति'' उष्णतेने जीवंत राहतात.

* जिथे स्त्रिया शोक करीत नाहीत त्याला शून्यमंदिर म्हटले आहे.

* मी पित्याचा घात करणारी नाही किंवा व्यभिचारिणीही नाही. मग हे श्रीकृष्णा तू माझेवर कशी कृपा करणार? सांग बरे!

तुझे ऐक्य आणि तुझा विरह हे दोन्ही परस्परविरोधी असलेले वैरी माझ्या हृदयातून बाहेर जात नाहीत, तेव्हा माझी स्थिती काय होत असेल याची कल्पना तरी करता येईल काय? वगैरे सुंदर सुंदर कल्पनांच्या भराऱ्या यात आढळतात. त्यांचा स्वतंत्रपणे आस्वाद घेण्यातच खरा आनंद आहे.

५२. गोपिकापादपीयूषलहरी

(यष्टी१५ ओव्या७०)

''यथाव्रजगोपिकानाम्'' या सूत्रात श्रीनारदांनी गोपिकांना सर्वोच्च मान देऊन गौरव केला आहे. त्या गोपिकांबद्दल भगवान श्रीकृष्णाच्या मनात काय भावना आहेत ते पाहण्यासारखे आहे. भगवान म्हणतात की, गोपिका बद्ध की मुमुक्षु की मुक्त आहेत? भक्त की भगवान् आहेत? याचा निर्णय करताना वेदींनीही मौन धरले आहे.

* कृष्णाबद्दल गोपिका गाऱ्हाणी सांगतात म्हणून 'मुमुक्षु' वाटतात.
* 'अखिलदेहिनाम्-अन्तरात्मदृक्' अशा असल्याने मुक्त वाटतात,
* रासक्रिडेत कृष्णरूप घेऊन खेळतात म्हणून त्या भगवानच आहेत असे वाटते.

पण भगवान् म्हणतात -

* तुम्ही गोपी माझ्यापेक्षा श्रेष्ठ आहात. तुम्ही मला प्रिय आहां असे म्हणतानाही मला लाज वाटते. कारण तुम्हा सर्वांचे प्रेम माझ्या 'एकावरच' आहे. व मला मात्र प्रिया 'अनेक' आहेत म्हणून कमीपणा माझ्याकडेच येतो.
* निःसाधन होऊन धर्म सोडून तुम्ही मला मिळविले म्हणून तुम्ही केलेल्या प्रेमाचा उपकार मी फेडू शकत नाही.
* धर्मानेच मी प्राप्त होतो ही माझी प्रतिज्ञाही तुम्ही बुडविली. बरे
* तुम्हाला ब्रह्म म्हटले तर पृतिथगिव राहून तुम्ही माझ्याशी क्रीडा करता आणि तेही माझ्या माहात्म्याला न विसरता!
* तुम्हाला मी एकच आहे व मला मात्र तुम्ही अनेक आहात.
* मला द्वैत दिसते तर तुम्हाला अद्वैत.
* मी मायेने तुम्हाला रमवितो पण तुम्ही मायेसह मला प्रेममय मानतां आणि मजवर प्रेमच करता. --असे तुमचे उपकार मी कधीच फेडू शकत नाही. तात्पर्य, गोपी भक्त की भगवान् हा निर्णय करताना शब्दच कुंठित हेतात. म्हणून,

अनिर्वाच्य प्रेम जो यथार्थ । त्याचि मूर्ति गोपिका ।।३३।।

असा महाराजांनी निर्णय केला आहे. या अध्यायात कृष्णाची गोपीपरता दाखविली आणि दुसऱ्यात गोपींची कृष्णपरता महाराज दाखविणार होते. पण ग्रंथ अर्पूणराहिल्यामुळे ते सारे तसेच राहिले आहे.

५३. गोविंदानंदसुधा

(संस्कृत. यष्टी२ श्लोक५३)

या लहानशा संस्कृत प्रकरणग्रंथात अनध्यस्तविवर्त व भक्तीच्या इतर सिद्धान्तांची व्यवस्थित मांडणी केली आहे.शिव, कृष्ण आणि श्रीगुरू हे तिन्ही विग्रह एकच असून त्यांची परोक्ष आणि अपरोक्ष अशी दोन्ही प्रकारची भक्ती केली पाहिजे असे युक्तिवादाने पटवून दिले आहे.

* परोक्ष अनध्यस्त विवर्त म्हणजे शिव व कृष्ण.
* अपरोक्ष अनध्यस्तविवर्त म्हणजे श्रीसद्गुरु.
* शिवभक्ती ही रागनिवृत्तीसाठी- वैराग्यासाठी केली जाते.
* कृष्णभक्ती ही रसास्वादरूपी वाचाऋण नाहीसे करण्यासाठी करायची असते.
* भक्तीचे गौणी, मध्यमा व परा असे तीन भाग केले असून नवविधाभक्तीतील पहिले आठ प्रकार मिळून गौणी भक्ती होते.आत्मनिवेदनाचे दोन प्रकार - सर्वचे अर्पण व स्वचे अर्पण. लालन आणि वात्सल्य हे मध्यमाभक्तीचे म्हणजे ज्ञानोत्तर भक्तीचे प्रकार होतात. त्यांनतर संयोग आणि वियोगोपलालन रूप माधुर्यभक्ती म्हजणे पराभक्ती म्हणून सांगितली आहे. तिचे तत्त्व एका श्लोकात अगदी थोडक्यात सांगितले आहे.

अदृष्टे दर्शनोत्कंठा, दृष्टे विश्लेषभीरुता । दृष्टे-अदृष्टे परं दुःखं, तदप्यस्ति महत्सुखम् ।।४५।।

हीच वियोगोपलालन पराभक्तीची परमोच्च अवस्था आहे.

५४. निदिध्यासनप्रकाश (योगग्रंथ)

(यष्टी१ अध्याय८ ओव्या५४७)

नानाविध प्रक्रिया । परी उपयोगी पडेल जी जया । ती ती उत्तम तया । आत्मज्ञानी ।।

ज्याला वेदान्ताच्या ज्या प्रक्रियेने आत्मानुभव येईल तीच प्रक्रिया त्याचेसाठी उत्तम! असा निश्चय ठेवून प्रत्येकाने स्वमताचा दुराग्रह व परमताचा द्वेष सोडून द्यावा; असेमहाराजांचेमत या प्रक्रियाप्रचुर ग्रंथात स्पष्ट झाले आहे. अगदी निरक्षरापासून शास्त्रपंडितांपर्यंत कोणत्याही मुमुक्षूला, सिद्धरचित ग्रंथातून म्हणजे संतवाङ्मयातून ब्रह्मबोध करून देणारी एखादी प्रक्रिया नेमकी सापडतेच. त्याप्रमाणे नाना-प्रक्रिया-समन्वित असा हा निदिध्यासनाला प्रकाशित करणारा लहानसा ग्रंथ साधकांना कामधेनू वाटेल.यातील काही प्रक्रिया अगदी सोप्या आहेत असे वाटते तर काहीतील अवाक्षरही कळत नाही.''तुका म्हणजे श्रेष्ठ ग्रंथ ज्ञानदेवी । एक तरी ओवी अनुभवा'' या वचनाप्रमाणे यातील एखादी प्रक्रिया जरी खऱ्या पारमार्थिकाला मिळाली तरी तो जीवनात कृतार्थ होऊन जाईल.

अज्ञ किंवा विषयी अशा पामर मनुष्याने विवेक करून मुमुक्षु कसे व्हावे? मुमुक्षु झाल्यावर ज्ञानानुभव कसा घ्यावा? समाधी साधल्यावर व्युत्थानदशेतील जगत्सत्यबुद्धी सगुणाच्या प्रेमभक्तीने नाहीशी कशी करावी? संधिसमाधी व भक्ती यांचा समन्वय कसा करावा? वगैरे गोष्टीचे अज्ञजनांपासून जीवन्मुक्तापर्यंत सर्वांना मार्गदर्शन तर आहेच पण विदेहमुक्तीतही भक्ती कायम असते, यांचेही निरूपण महाराजांनी येथे केले आहे.

या चंपूग्रंथात गद्य तर आहेच पण पद्याचेही ओवी दोहा, चौपाई, श्लोक, अभंग असे प्रकार समाविष्ट आहेत.

पहिल्या अध्यायात हरिनामप्रक्रियेने ब्रह्मभाव करा साधावयाचा हे सांगितले असून शेवटच्या अध्यायात जीवन्मुक्ती व विदेहमुक्तीतील भक्ती ब्रह्मभावाला पूर्णत्वाला नेते, असे निरूपण केलेआहे. अशाप्रकारे भक्तीच्या संपुटात नानाप्रक्रिया समन्वित झाल्या आहेत.दुसऱ्या अध्यायात ओंकारोपासनेच्या विविध प्रक्रिया सांगितल्या आहेत.तिसऱ्यामध्ये गीता-योगवासिष्ठातील दृष्टिसृष्टिवादातील शुद्ध अनुभव

आणि परमप्रेमलक्षणा भक्ती यांचे ऐक्य सांगितले आहे. चवथ्यात समाधी साधल्यानंतर व्युत्थानदशेत संधीचे अनुसंधान ठेवावे व भोजनादि सर्व वृत्ती कृष्णार्पण कराव्या म्हणजे संधीमुळे समाधीचे रक्षण होते व प्रेमवृत्तीमुळे भजन होऊन अखंड समाधी साधली जाते. पांचव्या अध्यायात पंचकोशांचे निराकरण करण्यासाठी आणि ज्ञान, उपरती, विरक्ती आणि भक्ती प्राप्त करण्यासाठी प्रक्रिया सांगितल्या आहेत. भक्तीचे साह्य असेल तर ज्ञान, उपरती व विरक्ती यांचा एकत्र अभ्यास होऊन लवकर पूर्णता येते असे मांडले आहे. सहाव्यात छांदोग्य, बृहदारण्यक, कैवल्य, तलवकारादी उपनिषदे, स्मृति-पुराणे व स्वानुभवाच्या आधाराने सत् चित् आनंदाचे विवेचन करून तत्प्राप्तीच्या प्रक्रिया सांगितल्या आहेत. सातव्यात ''सांख्यद्वारा जड-चेतन विवेक करून आत्मनिश्चय करावा, योगाने हृदयात एकदेशीय-इव आत्म्याचा अनुभव घ्यावा आणि वेदान्ताने सर्वत्र चेतनच भरले आहे असा व्यापक अनुभव घेऊन सुखी व्हावे'' असे प्रतिपादन केले आहे. आणि शेवटी आठव्या समासात *ज्ञानानंतर वैराग्य व मनोनाश साधण्यासाठी भक्ती करावी; असा योगवासिष्ठीय तत्त्वानुसार भक्तीचा अर्थपूर्णसमन्वय केला आहे आणि *जीवन्मुक्तीगत भक्ती व विदेहमुक्तीगत भक्ती कशी अनिर्वचनीय असते याचेही विवेचन केले आहे.

अशा प्रकारेनिदिध्यासनाला अथपासून इतिपर्यंत प्रकाशित करणाऱ्या व साह्य करणाऱ्या भक्तीचा उद्घोष या ग्रंथात ओतप्रोत भरलेला आहे.

५५. ध्यानयोगदिवाकर (योग)

(यष्टी २ अ ५, ओव्या ३१८ यष्टी २ उत्तरार्ध)

ध्यान हे योगाची सातवी पायरी असूनही ध्यानयोगाने स्वतंत्रपणे देखील ज्ञानसिद्धी होऊ शकते असे सांगून महाराजांनी ध्यानयोगाच्या अनेक प्रक्रिया यात निरूपण केल्या आहेत. ध्यान करताना प्रथम आपले शरीर 'ईश्वर-सजातीय असे शुद्धसत्वमय' करून नंतर ईश्वर किंवा सद्गुरूंचे सगुण ध्यान करावे. असा ध्यानयोगाचा नियम सांगितला आहे. त्यासाठी *पदस्थ ध्यान, *पिंडस्थ ध्यान, *रूपस्थ ध्यान व *रूपातीत ध्यानांच्या प्रक्रियांचे सुस्पष्ट विवेचन केले आहे.

१. पदस्थ ध्यानाची प्रक्रिया सांगताना ज्ञात आणि अज्ञात जप भगवंताला कसा अर्पण करावा? अनाहत नादाचे दहा प्रकार कसे ऐकू येतात? सिद्धी कशा प्राप्त होतात? यांचे विवेचन आहे.

२. पिंडस्थ ध्यान वर्णन करताना कुंडलिनी व चक्रांची माहिती व त्यांचे अध्यात्मिक स्वरूप सांगितले आहे. *समाधीत ब्रह्मसुख व *व्युत्थानात श्रीगुरूंच्या व्यापक प्रेमाचा अनुभव कसा असतो, त्याचे वर्णन आहे.

३. रूपस्थ ध्यान सांगताना श्रीज्ञानेश्वर, श्रीजनार्दनस्वामी, श्रीएकनाथमहाराज व श्रीतुकाराममहाराजांचे अभंगातून ही प्रक्रिया हस्तामलकवत् काढून दिली आहे. यात *मुद्रांचे प्रकार, *समाधिप्राप्ती, *तुरीया आणि *उन्मनी स्थितीचे सांगोपांग विवेचन केले आहे. *व्युत्थानदशेत ओंकाराचा सगुण श्रीहरीच्या रूपाने अनुभव येऊन भगवद्भक्तीची सिद्धी कशी होते, याची माहिती वाचावयास मिळते.

४. रूपातीत ध्यान म्हणजे अभावयोग होय. यात क्लेश अधिक असल्याने ''रूपस्थ ध्यानातील सुहास्य वदनात स्वीय मनोधर्म मिळवून महायोग साधावा.'' यात योगसहित भक्ती केली म्हणजे सत् चित् व आनंदाचा प्रत्यय येऊन समाधिबोध स्थिर होतो आणि अन्वयाने श्रीगुरूंचा सर्वत्र व्यापक प्रत्यय येतो. पण भक्तिपुढे तटस्थ ध्यानाचा निषेधच केला आहे. समाधीतून व्युत्थान झाले की श्रीगुरु व हरिहर अनध्यस्तविवर्त रूपाने भेटतात. श्रीगुरूच हरिहर रूपाने विघ्ननाश करून शिष्याच्या बोधाचे रक्षण

करीत असतात. म्हणून परोक्ष अशा हरिहरांपेक्षा अपरोक्ष सद्‌गुरूंचीच भक्ती सर्व प्रक्रियांचे महाफल होय असे समर्थपणे प्रतिपादन केले आहे. अशा रीतीने प्रथम साधनरूपाने व शेवटी फलरूपाने गुरूभक्तीच सर्वत्र प्रतिपादन केली आहे.

तया वृत्तिसंधीचे ज्ञान । साक्षित्वे राहवे म्हणून । ते निर्गुणचि गुरूकृपे करून । सगुणपणा आणावे ।।

असा जीवाला सदेह सच्चिदानंदाचा अनुभव आणून देणारा योगग्रंथ खऱ्या पारमार्थिक साधकाने अनुभवण्याजोगा आहे.

५६. सोपानसिद्धि (योग)

(यष्टी २ पा ७७-८२)

आत्मज्ञान, वैराग्य आणि मनोनाश या तीन्हींचा अभ्यास एकदम करावा, असेवासिष्ठादि वेदान्तग्रंथात सांगून ठेवले आहे. कधी कधी वैराग्य आणि मनोनाश करण्यापूर्वीच एखाद्याला गुरुकृपेने ब्रह्मज्ञान होऊन जाते. अशा ब्रह्मविद् भूमिकेत स्थित असलेल्या साधकाला, जीवन्मुक्तिसुख मिळावे म्हणून, या बहुप्रक्रियासंपन्न ग्रंथाची रचना महाराजांनी केली आहे. कोणत्याही एका प्रक्रियेचे साह्य घेतले असता साधक कृतार्थ होऊ शकतो.

१. विरक्ती व उपरती आहे पण ज्ञान नाही अशा साधकाला देहपातानंतर पुण्यलोक मिळतात म्हणून त्याने ज्ञानाभ्यास करावा.

२. आत्मज्ञान झाले पण विरक्ती व उपरती नसली तर तो देहपातानंतर विदेह मुक्त होतो. त्याला जीवन्मुक्तीसुख मिळत नाही. त्याची दृष्टदुःखनिवृत्ती होत नाही. त्यासाठी यात अनेक उपाय आहेत.

साक्षीत मुरावे. विकार प्रबल असल्याने गुरुभक्तीच्या साह्याने साक्षीची ओळख करून घ्यावी. भस्त्रा कुंभक, योगाभ्यास, संधिदर्शन वगैरे अनेक उपायांपैकी एका प्रक्रियेचा अभ्यास करावा. विरक्ती उपरती मिळवाव्या आणि जीवनमुक्तीसुख व दृष्टपरमानंदप्राप्ती करून घ्यावी. असा उपदेश या ग्रंथांत केला आहे. अर्थात हा ग्रंथ साधकांकरिता पाथेय आहे.

५७. हिरण्ययोग (स्वप्नयोग)

(यष्टी१५ ओव्या१६३)

हिरण्य म्हणजे सुवर्ण. ते अलंकाराच्या आकारात मिळते. अलंकारात आपली आवड मुख्य असते. आवडीचा सुवर्णालंकार मिळाला म्हणजे सुवर्णयोग झाला. त्याप्रमाणे शुद्ध परब्रह्मरूपी सुवर्णावर अलंकाररूपी म्हणजे अनध्यस्तविवर्त सगुणसाकार रूपाने भगवद्‌प्राप्ती होणे म्हणजेच खरा हिरण्ययोग साधणे होय. ही भगवत्प्राप्ती मनाच्या मृदू मध्य व तीव्र संवेगापैकी मध्यसंवेगाने, म्हणजे स्वप्नाच्या साह्याने, लवकर साधू शकते. ''स्वप्ननिद्रावलंबनाद्‌वा'' या समाधिपादातील योगसूत्रामुळे ही स्वप्नसाधनप्रक्रिया वरच्या दर्जाची असून महाराजांनी तिचे सात श्लोकात सूत्रबद्ध विवरण केले आहे. पण महाराजांनी स्वतःच केलेले चार श्लोकांचे विवरणच उपलब्ध आहे.

हृदयीचे लोपोनि बाहेरी धुंडावे । ते देवासी नावडे स्वभावे । निजपुत्रे भिकारी व्हावे । हे नावडें श्रीमंता।।

भगवंताचा शोध बाहेर घेण्यापेक्षा हृदयात असलेल्या भगवंताचाच साक्षात्कार करून घ्यावा. प्रथम ध्यान करून मृदू संवेगाने अंतःकरणात भगवान् आले की मग स्वप्नात दर्शन घ्यावे. त्यानंतर तीव्र संवेग होतो व हृदयात भगवान् प्रत्यक्ष होतात. ''येथे फलव्याप्ती होत नसून वृत्तीव्याप्ती होत असते. म्हणून भोक्तृत्व स्फुरत नाही व आनंदही कमी होत नाही'' – हे सर्व साधण्यासाठी स्वप्नाचे साह्य घेण्यास सांगितले आहे पण या ठिकाणी स्वप्नातील इतर पदार्थांप्रमाणे भगवान्, श्रीगुरु किंवा सत्पुरुष

मनःकल्पित नसतात. कारण जागृती व स्वप्न यांना आधार ईश्वरच असतो. तो जागृतीत दर्शन देऊ शकतो तसा स्वप्नातही दर्शन देऊ शकतो. मिथ्यात्व आहे ते सृष्टीचे, भगवद्देहाचे नव्हे; मग स्वप्न असो वा जागृती असो. भगवद्देह अनध्यस्तविवर्त असून भगवतांच्याच इच्छेने प्रगट होतो. भक्ताची इच्छा त्याचे उपादान कारण कधीच नसते. असे युक्तिसिद्ध प्रतिपादन यात आले आहे.सृष्टिदृष्टिवादात शंकेला जागा तरी होते पण दृष्टिसृष्टिवादात तर मुळीच जागा नाही. असे महाराज म्हणतात.

सत्ताद्वयवादात स्वप्न जागृत समान । त्यात स्वाप्निक भगवद्दर्शनहि तीव्र संवेगू ।।

निद्रागत स्वप्नापेक्षा शिथिलांग आसन-ध्यान करूनही मध्यसंवेगात ईश्वर प्राप्ती करून घेता येते नंतर तीव्र संवेग करून ''जागृती स्वप्नी पांडुरंग'' असा अन्वयाचा अनुभव घेऊन हिरण्ययोग साधावा. असा स्वप्नयोग-प्रक्रियेचा हा ग्रंथ आहे.

५८. योगांग-यम-लक्षण (योग)

(य१५ प्रकरण१)

आजकाल योगाची आवड सगळ्यांना दिसते. पण त्यातील यमनियमादिकांकडे कोणी लक्ष देत नाही. त्यामुळे योगाची सिद्धी म्हणजे समाधी साधणे कधीच होणे नाही. योग प्राप्त करून घ्यायचा असेल तर शमदमादि षट्साधनसंपन्न होऊन मग श्रीगुरूचे मार्गदर्शनाखाली साधना करायची असते. परंतु आधुनिक लोक साधनसंपन्नतेचा त्याग करून योग साधण्याचा प्रयत्न करताना दिसतात. म्हणून योगाची इच्छा करणाऱ्यांनी या ''यम'' लक्षणाचे रोज वाचन करून अभ्यास करावा असे हे लहानसे प्रकरण आहे.

यम :- १.अहिंसा, २.सत्य, ३.अचौर्य, ४.आर्जव, ५.क्षमा, ६.धृती, ७.शौच, ८.ब्रह्मचर्य, ९.मिताहार व १०.दया.

या दहा गोष्टींना यम म्हणतात. यातील प्रत्येकाचे विवरण महाराजांनी सोप्या गद्य भाषेत केलेले आहे. याप्रमाणे ''यम'' साधण्याचा रोज प्रयत्न केला तरच योग साध्य होण्याची शक्यता आहे.

५९. योगप्रभाव [पद्य]

(यष्टी१५ अध्याय २ ओव्या २९४)

महाराजांनी योगाच्या प्रक्रिया अनेक ठिकाणी सांगितल्या आहेत. यामध्ये मात्र योगशास्त्राची सामान्य भूमिका, योगाचा अधिकारी व योगाचा अर्थ इतकाच मर्यादित विषय मांडला आहे.

''जीव शिवाचा व्हावया मेळ । वरी समाधिलाभ निखळ'' यासाठी योग आहे. योगाचा प्रयत्न करणारे दोन प्रकारचे अधिकारी आहेत. एक साधक व दुसरा आत्मज्ञानी. साधकाचे लक्षण सांगताना ''सत्संगती शिवाय प्रत्येक क्षण ज्याला सूतकासमान वाटतो तो योगाचा अधिकारी.''

पुत्र, दारा, धन । जयासी वाटे वमनासमान ।। असा कडक वैराग्यसंपन्न साधक असावा लागतो. अशुद्ध चित्त एकाग्र केले तर वासनाच तीव्र होतात व साधकाचे पतन शीघ्र गतीने होते. एकाग्र चित्तात सामर्थ्य प्रगट होते पण वासना निवटल्या नसल्यामुळे सामर्थ्याची योग्य रितीने योजना करता येत नाही.

''जयासी नाही विषयविरक्ती । तेणे चुकोनि न जावे योगपंथी ।

उद्याचे मरण अंगावरती । आजचि ये अविरक्ता'' -म्हणून हठयोग फार सांभाळून व गुरूच्या मार्गदर्शनाखालीच केला पाहिजे. असद्वासनेबरोबर सद्वासनाही नाहीशा केल्या पाहिजे, अन्यथा जडभरता प्रमाणे पुनर्जन्म होतो किंवा वासिष्ठातील कथेप्रमाणे शुक्राचार्य अप्सरे मागे जसे गेले,

तशासारखे होते.

ग्रंथ न पाहता पूर्वापार । न करिता रहस्य विचार ।

अनुभवी श्रीगुरूचा चरणाधार । नसता, शास्त्र महाभ्रमू ।। अशा शास्त्ररूपी महाभ्रमातून सुटण्यासाठी श्रीगुरूंचीच चरणकमले हृदयात ठसली पाहिजेत. याप्रमाणे सोप्या रीतीने साधकाला पथ्ये सांगितली आहेत. तसेच आत्मज्ञानी पुरुष देखील योगाभ्यास करून प्रारब्ध दुःखाचा अभिभव करतात. यासंबंधी कूर्मपुराणाचा दाखला देऊन हा विषय स्पष्ट केला आहे.

योगाची सार्वत्रिक उपयुक्तता प्रतिपादन केली आहे. तीर्थ व्रत तप वगैरे साधने करीत असताना चित्ताची एकाग्रता केल्याशिवाय आणि बाह्य विषयांकडे जाणाऱ्या चित्तवृत्तींचा निरोध केल्याशिवाय त्यांची फलसिद्धीच होऊ शकत नाही. म्हणून चित्तवृत्तिनिरोधरूप योग हा सर्व परमार्थाचा पाया आहे, हेही पटवून दिले आहे.

''ईश्वरप्रणिधानाद्वा'' या योगसूत्राचे विवेचन नाविन्यपूर्ण आहे. स्वतःच्या प्रयत्नांचा भरंवशावर निर्गुण आत्मप्राप्ती (समाधी) करून घ्यावी आणि सामर्थ्य नसेल तर मात्र सगुणभगवंताची आराधना करून घ्यावी. या दोन्ही मध्ये साध्य एकच प्राप्त होते. म्हणून साध्यात तरतमभाव नाही. या दोन्ही प्रकारात गौण मुख्य असा भेद नसून समानताच आहे; वगैरे युक्तिवाद सरळ सोप्या भाषेत मांडले आहेत.

एके ठिकाणी भोंदू योग्यांची वास्तपुस्त केली आहे. तीही रोचक आहे. गुरूंनाही महाराजांनी मार्गदर्शन केले आहे. ''शिष्य शिकवावे जरी । तरी वागावे साधका परी'' हा विचार अनुभवी पुरुषांच्या आचरणाचा आधार आहे. तसेच प्रारब्धामुळे पाप घडले तर व्यवहारात कसे वागावे? याचे विस्तृत विवेचन मूळातूनच वाचून पाहण्याजोगे आहे.

योगमार्गातील दोष सांगत असतांना महाराजांनी स्वतःचीच उदाहरणे दिली आहेत. प्रांजळपणा आणि आंतरिक कळवळा महाराजांच्या विवेचनातून प्रकर्षाने जाणवतो. त्यामुळे साधकाची हिम्मत खचत नाही. तसेच गुरूपासूनच सर्व मिळाल्यामुळे अहंकारही उत्पन्न होत नाही.

गुरूपासोनि विद्या घेता। तरी स्वयेचि जळूं लागे अहंता ।

आणि शास्त्र वाचूनी विद्या घेता।तरी निरहंता अभ्यासावी लागे ।।

शेवटी समारोपात महाराजांनी दाखविलेली योग आणि भक्तीची एकरूपता लक्षणीय आहे.

व्युत्थांनीं दास्य, संप्रज्ञाती आलिंगन । असंप्रज्ञातीं एकीभवन ।

साक्षात्कारे प्रेमैकतान । युक्ततम मान्य भगवंता ।।

१. व्युत्थानात सगुण भगवंताचे दास्य.

२. संप्रज्ञातसमाधीत त्याला आलिंगन,

३. असंप्रज्ञात समाधीत द्वैताची विस्मृती म्हणजे जीवशिवाचे पूर्ण निर्गुणरूप ऐक्य.

४. अशी पूर्णावस्था प्राप्त झाल्यानंतर ''समाधिं व्युत्थानीं हरि विलसे'' या साक्षात्कारानुसार समाधी असो की व्युत्थान असो दोन्ही दशेत एक प्रेमभक्तीच राहते व निर्वृत्तिक अशी अखंड समाधी साधली जाते. हीच व्यापक सगुण साक्षात्काराने होणारी प्रेमैकतान स्थिती होय. ही प्राप्त होण्यासाठी साधकाने स्वतःहून करावयाचे ते एकच -

जीवी धरिला परमात्मा । मग यत्न करावा फळसीमा ।

मरण प्रसंग आलिया यमा । भिऊचि नये ।।

६०. योगप्रभाव (गद्य)

मधुराद्वैताचार्य श्रीगुलाबरावमहाराज

(मराठी / सूत्रे ४४ पाने ५००)

असंप्रज्ञात समाधी साधणे, हाच योगाचा खरा प्रभाव होय. ईश्वरप्रणिधानाच्याच योगाने हा प्रभाव लवकर दिसतो. महाराजांनी योगाच्या अनेक प्रक्रिया अनेक ठिकाणी सांगितल्या आहेत. पण या योगग्रंथाला ''या सम हा'' असे म्हणावयाचा मोह होतो. या उपदेशात्मक गद्य ग्रंथात निरूपण प्रश्नोत्तररूपाने असल्यामुळे आकर्षकता वाढली आहे.

ही निरूपणे माधान, काजळी आणि शुक्लेश्वर वाठोडा येथे झालीत. श्री.त्रिपुरवार आणि श्री.हरिअण्णा केवले यांनी लेखबद्ध केलीत आणि महाराजांनी तपासूनही घेतलीत हे महत्वाचे आहे.या प्रसंगाचे वर्णन त्रिपुरवारांनी सुंदर केले आहे.

''माधानला हे निरूपण उत्तररात्री शिवमंदिरात होत असे.योगसूत्रांचे निरूपण प्रथम सांगून नंतर महाराज भक्तांची रीती कथन करीत असत. योगक्रियेने साध्य होणाऱ्या गोष्टी नुसत्या निस्सीम भगवत्प्रेमामुळे किती सौलभ्याने मिळतात हे मोठ्या मार्मिक रीतीने सोपपत्तिक व सोदाहरण पटवून देत. भक्तांची रीती समजावून सांगतांना जेव्हा संतांची वचने उद्घृत करीत तेव्हा महाराजांची छंदोमय रसाळ वाणी, शिवमंदिराचा रम्य परिसर, पहाटेचा प्रशांत समय आणि शीतल वायू या सर्वांचे मीलन होऊन अभूतपूर्व आनंदाचे भरते येत असे!''

या निरूपणांमध्ये वैराग्यादि साधनसंपत्ती, ध्यान, धारणा, वगैरेंचे सांगोपांग विवेचन साधकासाठी केलेले असून त्यात सिद्धी कशा प्राप्त होतात पण त्या सोडून पुढे कसे जावे; यासंबंधीची बरीच माहिती आलेली आहे.

३५ व्या सूत्रावरील प्रवचनात ज्ञानेंद्रियांब धारणा केली असता दिव्य रूप-रसादि विषय प्राप्त होतात. हे विषय रज तम विरहित असून सूक्ष्मभूतांच्या सत्वांशाचे बनले असतात. हे भासू लागले असता चित्त एकाग्र होते व आपोआप बाह्य विषय सोडून वैराग्य साधू लागते.

योगसाधनेने हृदयातच वेदांचे श्रवण

शब्दाचे ठिकाणी धारणा केली असता योग्याला दहा प्रकारचे अनाहत नाद ऐकू येतात आणि ईश्वरप्रणिधानासहित धारणा असेल तर हाच अनाहत नाद पुढे ओंकारपूर्वक वैदिक श्रुतींच्या रूपाने हृदयात स्पष्ट ऐकू येतो. वेदांची उत्पत्ती अशी प्रत्यक्ष ऐकू येते. यावरून वेदवाणी ईश्वरनिर्मित आहे व ती जीवाच्या उद्धारासाठीच आहे, हा वैदिक सिद्धांत महाराजांनी योगशास्त्रद्वारा प्रत्यक्ष सिद्ध करून दाखविला आहे.

तसेच या ग्रंथात ''क्लेशोऽधिकतरस्तेषां अव्यक्तासक्तचेतसाम्'' या गीतोक्त वचनाप्रमाणे योगातील निर्गुणप्राप्तीसाठी होणारे क्लेश ईश्वरभक्तीमुळे कसे नाहीसे होतात आणि भक्ताला पूर्ण निर्विकल्प असंप्रज्ञात समाधी कशी सहज मिळते वगैरेंची सांगोपांग माहिती आणि अनेक प्रक्रिया प्रासादिक मराठी भाषेत सोप्या रीतीने समजावून दिल्यामुळे मराठीभाषी साधकांवर फार मोठे उपकार झाले आहेत.

नाथसंप्रदायातील योगमार्ग आणि भागवत संप्रदायातील भक्ती यांचा सुंदर मिलाफ करून महाराजांनी आपले प्रक्रियाकुशलत्व यातही स्पष्ट दाखविले आहे. भारतीय संस्कृतीची अविच्छिन्न अशी ऋषीपरंपरा महाराजांपर्यंत आली आहे आणि ती तशीच पुढेहि चालेल्मसे धर्मसंस्थापनार्थाय संभवामि युगे युगे- या गीतवचनावरून आणि महाराजांच्या परतत्त्वस्पर्शाने पुनीत झालेल्या वाणीतून स्पष्ट दिसून येते.

६१. ज्ञानेश्वरी निरूपण (योग)

(यष्टी१५ ओव्या१०२)

महाराज स्वतःला ज्ञानेश्वरकन्या म्हणवीत! त्यांची ज्ञानेश्वरीवर निरूपणे नित्य चालत. पण दुर्दैवाने त्यातील अगदी त्रोटक निरूपणे उपलब्ध आहेत. पण तरीही त्यातील विचारांची परिपूर्णता मात्र कमी झालेली नाही.

तयापासी पांडवा । मी हारपला गिवसावा । जेथ नामघोष बरवा । करिती माझा ।। ज्ञाने. अ ९-२०८

या ओवीतील विचारधन पाहून आश्चर्य वाटते. यात सुरवातीला भगवंताचे शरीर मायामय पाचंभौतिक नाही हे सिद्ध केले आहे. भगवंताचे स्मरण करताना ''मुखी नाम'' आणि ''अंतरी काम'' असतील तर तो श्रीराम भेट देत नाही. आत आणि बाहेर सर्वत्र एक आत्मारामच भरून जातो तेव्हा जागृती, स्वप्न व निद्रा यात सर्वत्र त्याचाच प्रेम घनदाट होतो. याचे वर्णन महाराजांनी रसशास्त्रानुसार पटवून दिले आहे.

सच्छिष्याला जागृतीत भगवंताचा वियोग व गुरूचरणांचा संयोग असतो; स्वप्नात भगवद्संयोग व श्रीगुरुवियोग असतो. अहंब्रह्मास्मि असे ज्ञान नेहमी कायम असल्याने अज्ञानावस्था त्याला कधीच नसते. म्हणून निद्रेतही तो पूर्ण ज्ञानसंपन्नच असतो. हृदयात भगवान् असतात व बाहेर श्रीगुरु असतात, अशा प्रकारे भगवद्भक्ती व गुरुभक्ती यांच्या जोडीमुळे संयोगवियोगात सर्वत्र भक्तीचा प्रेमानंदच व्यापून राहातो. व्युत्थानावस्थाच नाहीशी होते. हीच अखंड समाधी होय.

ती कुंडलीनी जगदंबा । जे चैतन्य चक्रवर्तीची शोभा ।

जिया विश्व बिजाचिया कोंभा । साऊली केली ।। ज्ञाने. ६-२७२

चैतन्यचक्रवर्ती परब्रह्माची शक्ती म्हणजेच वेदान्तातील शुद्धबुद्धी. तीच मांत्रिकांची अलौकिक शक्ती. तीच प्रणवाची आद्यरेषा. अशा या योगातील सर्परूपिणी कुंडलिनी शक्तीच्या आधारानेच पुराण व ज्योतिःशास्त्रातील विरोधाचा समन्वय महाराजांनी केला आहे. पृथ्वीचा आधार सहस्त्रफणी आहे असे पुराण सांगते तर पृथ्वी अंतरिक्षात निराधार आहे असे ज्योतिषशास्त्र म्हणते. यांचा समन्वय असा -

आपल्या शरीरात कंदस्थानी कुंडलिनी शक्ती आहे आणि कटिस्थानी पृथ्वीचे स्थान आहे. कुंडलिनी शक्तीच्या आधारावर पृथ्वी स्थिर आहे. या पिंडातील स्थितीप्रमाणेच ब्रह्माण्डातील पृथ्वीचा आधार सहस्त्रफणी आहे. हीच गुरुत्वाकर्षण किंवा चुंबकीय शक्तीच्या रूपाने दृष्य विश्वात प्रतीत होते. हिच्या अस्तित्वामुळेच सूर्य, चंद्र, तारे वगैरे सर्व खगोल स्वस्थानी स्थिर असूनही नियमितपणे फिरत असतात.

अशा प्रकारे पिंडात जी कुंडलिनी आहे तीच ब्रह्माण्डात सहस्त्रफणीच्या (म्हणजे गुरुत्वाकर्षण शक्तीच्या) रूपाने आहे. अशा समर्थ युक्तिवादाच्या जोरावर ज्योतिष व पुराणांचा महाराजांनी योगानुसार समन्वय करून कुंडलिनी जगदंबेचे कारणरूपत्व सिद्ध केले आहे.

६२. सांख्यसुरेन्द्र (पद्य)

(यष्टी १४ सूत्रे ५८ ओव्या १२१६)

सांख्यदर्शन हे वैदिक षड्दर्शनांपैकी अत्यंत महत्वाचे असून वेदान्तदर्शनापूर्वीचे याचा अभ्यास करणे प्रत्येकाला हितावह आहे. यातील पुरुषाची बहुता, प्रकृतीची स्वतंत्रता व नित्यता सोडली आणि प्रकृती ईश्वराच्या स्वाधीन आहे; असेमानले तर हेच दर्शन वेदान्तात समाविष्ट होते. पूर्णब्रह्मरूप

होईपर्यंत वेदान्तातही अनेकजीववाद गृहीत धरून मायेचा आत्म्याहून व्यतिरेक करावाच लागतो.म्हणून सांख्यदर्शन हे वेदान्ताला पूरकच आहे.

''सांख्य निरीश्वरवाद म्हणती । तो न शिरो माझे चित्ती''

असे म्हणून महाराजांनी वेदांतदृष्ट्या सांख्याचा समन्वय करून, गीतोक्त सेश्वर-सांख्यदर्शनाचा विचार आपल्या चारपांच ग्रंथात सविस्तर मांडला आहे.

कपिलमुनी हे सांख्यदर्शनाचे आचार्य! त्यांचे दोन अवतार! ब्रह्मदेवाचे पुत्र होऊन प्रथम त्यांनी आसुरींमुनींना सांख्याचा उपदेश केला व नंतर कर्दमपुत्र होऊन देवहुती मातेला उपदेश केला.विष्णूनेच हेदोन्ही अवतार घेतलेपण काही ठिकाणी कपिलांना अग्नीचेअवतार म्हटले आहे कारण त्यांनी सगरपुत्रांना क्रोधाने जाळले होते.अशाप्रकारे हा कपिलत्रयाचा संशय महाराजांनी निरसन केला आहे.

आद्य शंकराचार्यांनी कपिलांच्या ''प्रधान कारणवादाचे'' खंडन करतानाच फक्त कपिलांचा निषेध केला आहे आणि इतरत्र मात्र सृष्टीच्या उत्पत्तीची मीमांसा सांख्यदर्शनातूनच घेतली आहे.

महाराजांनी''सांख्य'' शब्दाचा अर्थ ''संख्यावाचक'' करण्यापेक्षा ''एकब्रह्मप्रतिपादक शास्त्र'' असा करणे उत्तम होईल असे दाखवून

सम्यक् बोधे, सम्यक् ख्याति । संख्या म्हणिजे तिये प्रति ।
संख्यासंबंधशास्त्रनिगुती । सांख्य ऐसे ॥१४८॥

असा वेगळा अर्थ करून सांख्य शास्त्राच्या लक्षणातच नाविन्य आणले आहे.

१. सांख्यांच्या अत्यंत-दुःखनिवृत्ती या परमपुरुषार्थाला अखंडसुखप्राप्तीची जोड देऊन पूर्णता आणली.

२. सुखापेक्षा दुःखापासून जीव शीघ्र वेगळा होऊ शकतो म्हणून प्रकृती दुःखरूप मानली आहे. त्यामुळे विवेक वैराग्य लवकर साधते हे ''कपिलमनन रहस्य'' महाराजांनी उकलून दाखविले.

३. प्रकृती किंवा माया ब्रह्माच्या एकदेशावर असते, सर्वदेशीय व्यापक नसते; हा श्रुतिसिद्धांत सांख्य व वेदान्तात समान आहे.

४.पुरुषाला परमार्थतः बंध नाही.तो स्वभावतःच मुक्त आहे.हा विचार सांख्य व वेदान्तात एकच आहे(कपिलसूत्र७ पान२३३)

५.सांख्यांची प्रकृती ईश्वराच्या परतंत्र मानली व पुरुषबहुता सोडली की सांख्यदर्शन वेदान्तात समाविष्ट होते.

हे पांच महत्वाचे मुद्दे मांडले आहेत.याचा विस्तार करीत असतांना विज्ञानभिक्षूंच्या सांख्यावरील टीकेचे पूर्णपणे खंडन केले आहे. त्यात बौद्धमत, जैनमत, अणुवाद, मीमांसक वगैरेंचाही खरपूस समाचार घेतलेला आहे.

६३. सांख्यसुरेंद्र (गद्य)

(यष्टी१४ समयोपदेश सहा प्रवचने २३-२८)

अविद्येचे दोन प्रकार- मूलाविद्या व तूलाविद्या, सत्तात्रयवाद, पारमार्थिकसत्ता, व्यावहारिक सत्ता व प्रातिभासिक सत्ता यांचे सोप्या रीतीने वर्णन केले. बौद्ध दर्शनाच्या चार भावना क्षणिकत्व, दुःखत्व, स्वलक्षणत्व, शून्यत्व यासंबंधीच्या विरोधाचे व योगानुसार असलेल्या समन्वयाचे विवेचन मूळातून वाचावयास हवे.या योगाच्या चार भावना बुद्धाच्या शिष्यांना न समजल्यामुळे चार निरनिराळे पंथ निघाले; वगैरे अगदी नवीन उपपत्ति येथे महाराजांनी मांडल्या आहेत.

सांख्यदर्शन हे निरीश्वर आहे की सेश्वर आहे, या संबंधीच्या विविध पक्षांचा समन्वय आणि स्वमतनिर्णय महाराजांनी केला आहे.

''ईश्वरासिद्धेः'' या सूत्रात नैयायिकांचे खंडन केले आहे. ईश्वर हा सत्त्वगुणसंपन्न असल्याने त्याचे ऐश्वर्यपाहून मूर्ख आणि आसक्त पुरुषांना वैराग्य न होता त्यांच्या वासनाच वाढतील म्हणून मूर्खांसाठी 'ईश्वराची सिद्धीच होऊ शकत नाही' असे सांगितले आहे. आणि

''ईदृशा-ईश्वरसिद्धिः सिद्धा'' या सूत्रानुसार मात्र ''आत्मा हाच ईश्वर'' म्हणत असाल तर आम्ही ईश्वर मानतो असे सांख्याने स्पष्ट सांगितले आहे. यातील २४ वे प्रवचन गुरुशिष्य यांच्या संवादरूपाने असल्यामुळे फारच रोचक आहे.

नास्तिक, बौद्ध वगैरेंचे खंडन तर इतके स्वयंपूर्ण आहे की पुन्हा दुसरा युक्तिवाद नकोच वाटतो. प्रत्येक युक्तिवादातील समर्पकता आणि महाराजांच्या बुद्धीची सूक्ष्मता या ग्रंथात जागोजाग आढळते.

६४. सांख्यसूत्रावरील काही विचार

(मराठी. यष्टी १५)

यात फक्त चार सूत्रांवर मराठीत गद्य विवरण उपलब्ध आहे. 'अथ' या शब्दाने मंगलाचरण करून त्यावरील विवरणात अनुबंधचतुष्टयाचा विचार केला आहे. साधनचतुष्ट्यसंपन्न मुमुक्षू कसा असावा, याचे सांगोपांग वर्णन आहे.सांख्यातील त्रिविध दुःख कसे असते, याचेही विवेचन सुरेख असल्याने वाचकांचे मन आकर्षिले जाते. तसेच, स्त्रीदुःख, पुत्रदुःख, धनदुःख यांचे विवेचन वाचले तर क्षणभर कां होईना- वैराग्य उत्पन्न होते. असे हे लहानसे लेखवजा प्रवचन आहे.

६५. सांख्य : एक निबंध

(यष्टी१४)

या निबंधात 'नर' या शब्दाचा पर्याय 'पुरुष' शब्द असून या पुरुषाला आत्मज्ञान करून घेऊन नराचा नारायण व्हावयाचे असेल तर सांख्य- योग- वेदान्त या चढत्या मार्गाने जावे लागते. साधनचतुष्टयसंपन्न होऊन, प्रकृतिपुरुषांचा विवेक करून, नंतर शरीराच्या द्वारा योगमार्गाचा अभ्यास करून, शरीरातून वेगळे होऊन, आत्मानुभव घ्यावा लागतो; आणि वेदान्ताने ईश्वराशी ऐक्यज्ञान करून घेऊन नारायण होता येते.अगदी शेवटी भक्तीने सगुणनिर्गुणाचे ऐक्य अनुभवलेजाते असा हा मार्ग सांगताना महाराजांनी पंचीकरण व सांख्यवेदान्त यांचा समन्वय केलेला आहे.

६६. सांख्यसार

(यष्टी१४)

श्री भालेराव यांना सांख्यावर निरूपण सांगितले आहे पण तेही पूर्ण उपलब्ध नाही. यात सांख्याच्या अत्यंतदुःखनिवृत्तीला परमानंदप्राप्तीची जोड देऊन सांख्यवेदान्ताला एकरूपकत्व आणले आहे. सांख्यसुरेन्द्रात विज्ञानभिक्षूंचे खंडन केले परंतु येथे मात्र विज्ञानभिक्षूंनी केलेल्या सांख्य-वेदान्ताच्या समन्वयाला मान्यता देऊन महाराजांनी स्वतःचे गुणग्राहकत्व प्रकट केले आहे.

* सांख्यांची प्रकृती म्हणजे न्यायशास्त्रातील अणुअवस्था. तीच वेदान्ताची माया.
* सांख्यांचा पुरुष म्हणजेच न्यायातील ईश्वर, म्हणजेच वेदान्तातील शुद्ध ब्रह्म.
* सांख्यांच्या प्रकृतीला ईश्वराधीनत्व दिले आहे.
* पुरुषांचे अनेकत्व सोडले की सांख्यच वेदान्ताला पूरक होते असे समन्वयपर निरूपण यात आहे.

६७. छंदप्रदीप

(यष्टी१५ कविता११७)

संगीतशास्त्रावर महाराजांचेदोन प्रकरण ग्रंथ आणि श्री भातखंडे यांचेशी झालेला त्यांचा पत्रव्यवहार प्रसिद्ध आहे. तसेच पदांची गाथा या ग्रंथात एकूण १२३ प्रकारची नवीन वृत्तरचना केली असून तिला तालबद्ध करून स्वतःच्या प्रत्येक पदांना चाल लावून दिली आहे. त्यासंबंधीचा विस्तृत ग्रंथ रचण्याचा महाराजांचा विचार असावा. म्हणून या ग्रंथाची सुरुवात झालेली दिसते.

श्रीज्ञानेश्वरमहाराजांनी 'वाचे बरवे कवित्व' म्हणून काव्याचा गौरव केला आहे. आणि श्रीतुकाराममहाराजांनी 'काव्याचा विटाळ नको' असे म्हणून काव्यप्रकाराची नालस्ती केली आहे. यांचा महाराजांनी समन्वय करून छंदप्रदीपाची सुरवात केली आहे.

माउलीचे म्हणणे भक्तीपर काव्याबद्दल व श्रीतुकाराममहाराजांचे म्हणणे भक्तिरहित काव्याबद्दल लावले म्हणजे सहज समन्वय होतो. तो स्वीकारून काव्य- संगीताविषयी महाराजांनी ग्रंथ लिहिले.

हरिप्रेमे वेडे होवावे । मग सुचेल तंव कवित्व श्रम करावे ।
अथवा कवित्व-श्रम उपासन करावे । तरी फळ पावे ।।

* हरिप्रेमाने सर्व विसरून कवित्वाची स्फूर्ति झाली तर काव्य निर्मिती करावी किंवा * भगवंताचे प्रेम मिळण्यासाठी मुद्दाम काव्य करण्याचे श्रम करावे म्हणजे हळूहळू भगवंताकडे चित्त लागून आपोआप भगवत्प्राप्ती होईल. असे सिद्धस्थितीतील व साधनस्थितीतील दोन प्रकारचे कवित्वप्रकार सांगितले आहेत.

हे कवित्वाचे श्रम करीत असतांना सर्व छंदप्रकार समजावून घेणे जरूर आहे. त्या सर्वांची माहिती सोप्या संस्कृतात व शुद्ध मराठीत, पद्यात व गद्यात महाराजांनी स्पष्ट केली आहे. त्यांचा अभ्यास करावा व भक्तिपर काव्य करून उपासना करावी असा महाराजांचे सांगणे आहे. श्लोक, गीति, वसंततिलका, अभंग, साकी, तेलाला, गझल, दादरा, चतुस्ताल, दीपचंदी आर्या, रूपक वगैरे साधारण ११ प्रकार कविताबद्ध करून सविस्तर वर्णिले आहेत. त्यातील अभंगाचे सात प्रकार पाहून ग्रंथकाराचे वैशिष्ट्य जाणवते.

६८.गानसोपान

(संस्कृत-मराठी / यष्टी१५ श्लोक४५ ओव्या५३३)

संस्कृत श्लोक व त्यावर संस्कृत किंवा मराठी गद्य-पद्यात्मक भाष्य असा हा संस्कृतमराठीसंमिश्र ग्रंथ आहे. भारतीय संगीतशास्त्रात मार्गी व देशी हे दोन प्रकार असून त्यांची माहिती सामवेद, मातंगमुनीचे ग्रंथ, संगीतरत्नाकर व त्यावरील कल्लीनाथांची टीका वगैरे अनेक संस्कृत ग्रंथातून व पुराणातून आली आहे, परंतु त्या सर्वांचे समन्वयपूर्वक एकसूत्रीकरण करण्याचा प्रयत्न या ग्रंथात पहावयाला मिळाला असता. पण हा ग्रंथ अपूर्णराहिल्याने एकसूत्रीकरणाची फक्त दिशा कळू शकते.

या ग्रंथाची सुरवात नित्य नम्य अशा शिष्यपंचायनातील शिष्याला म्हणजे व्यंकटेश देशपांडे यांना नमस्कार करून झालेली आहे. 'व्यंकटरावबाबापासून संगीत शिकलो', असे शब्द महाराजांच्या विनम्रप्रवृत्तीचा परिचय करून देतात. आजपावेतो ग्रंथाच्या सुरवातील शिष्याला वंदन केल्याचे उदाहरणच ऐकिवात नव्हतेपण यासंबंधी 'मला गुरुत्वाचा अभिमान येऊ नये म्हणून मी शिष्यपंचकाला नमन

करतो' अशी शास्त्रीय व्युत्पत्ती महाराजांनी लावून दाखविली व व्यासांनी आपल्या शिष्याचे- जैमिनीचे मत स्वग्रंथात प्रमाण म्हणून घेतल्याचे उदाहरणही दिले.

''मार्गी-देश-विभेदेन गीतं द्वेधा''

१.मार्गी संगीत :- सामवेद, गांधर्ववेद, शिव, विष्णु, ब्रह्मदेव नारदादिकांनी जे गायन केलेले जे मार्गीसंगीत ते मंत्ररूप आहे.याने अदृष्टरूप पुण्य उत्पन्न होऊन तत्काळ फलदायी होते.दीपरागाने दिवे लागणे, मेघरागाने पाऊस पडणे वगैरे मार्गीसंगीताचे परिणाम होत.

२. देशी संगीतः- हे रुचीप्रमाणे विकास पावत गेले. पण यातही ईशप्रेम असेल तर ते सामवेदतुल्य आहे असे महाराजांनी सांगितले आहे.

महाराजांनी या ग्रंथात देशी संगीताचेच विवरण केले आहे व पुढील नवीन रागादिकांसाठी ''भाविसंगीत हेतुक'' सूचना दिल्या आहेत.

महाराजांनी मार्गीसंगीतासाठी गांधर्वसंहितेचे निरूपण करण्याचे ठरविलेहोतेप्रण तो ग्रंथ आज उपलब्ध नाही.१.मल्हार सुगराई- रामदासी मल्हार, २.सूरदासमल्हार, ३.मीरामल्हार वगैर मार्गी व देशी मिळून रुचीप्रमाणे ते देशी संगीत विकास पावले.ते देशी संगीत असूनही साधूंनी त्याच्या द्वारा भगवत्प्राप्ती करून घेतली आहे म्हणून त्याला मार्गी संगीततुल्यता आहे, अशी संप्रदायव्यवस्था लावून दिली.अनार्य रागांची उपेक्षा केली आहे पण -

''सुधराई'' हा राग समर्थ रामदासांनी घेतल्यामुळे व तानसेनाचे नाव भविष्यपुराणात असल्याने ''मियामल्हार'' व ''सुधराई'' हे राग या ग्रंथात समाविष्ट केले. त्यामुळे महाराजांची संतवचनांवरील व पुराणशास्त्रावरील निष्ठा किती जबरदस्त होती हे जाणवते.

जुन्या संस्कृत ग्रंथात असलेले प्राचीन राग व व्यवहारात वर्तमान असलेले अर्वाचीन राग यांचे वर्णन असलेले संगीतच येथे महाराजांनी वर्णन केले आहे आणि गुरूंड (इंग्लीश) व यावनी राग रजःतमः प्रधान असल्याने त्यांना या ग्रंथात स्थान दिलेले नाही.

श्रुती व स्वरांचे विवेचन करताना नादोपासना सांगितली आहे.नादोपासनेने निर्गुण ब्रह्मप्राप्ती व सगुण परमेश्वरप्राप्ती दोन्ही होण्याचे उपाय सांगितले आहेत. नादशास्त्राचे विवेचन करताना -

आत्मज्ञाने तथा नादो मनो विलयकारणे । आत्मध्यानादपि श्रेष्ठं नादं नादविदो विदुः ।।

ध्यान व नाद या दोन्ही साधनांनी मनोलय होऊ शकतो पण नादोपासनेने मन लवकर एकाग्र होते व ओंकाररूपी अनाहत-नादाच्या दहाव्या मेघनाद नामक प्रकारात आत्मदर्शन होते असे सांगून नादशास्त्राचा व पर्यायाने संगीताचा वेदान्त प्रक्रियेत अन्तर्भाव केला आहे.

६९. मानसायुर्वेद (संस्कृत)

(यष्टी१६, श्लोक६२ अध्याय४)

७०. मानसायुर्वेद (मराठी)

(यष्टी१५ पा३५३-३७०)

''आयुर्वेदो मानसोऽयं मुक्तये न तु भुक्तये ।।''

हे दोन्ही ग्रंथ नुसते वैद्यकग्रंथ नसून मानस-आयुर्वेदरूप आहे.या 'मानस' शब्दातच महाराजांचा आशय काय आहे हे दिसून येते.''धर्मार्थकाममोक्षाणां आरोग्यं खलु मूलकारणम् '' आरोग्य नसेल तर परमार्थाचा प्रयत्न करणेही मनुष्याला कठीण जाते.म्हणून शरीर निरोगी आणि मन स्वस्थ पाहिजे. त्यानंतरच चित्तजय होऊन आत्मदर्शन होऊ शकते.यासाठीच या ग्रंथाचा उपक्रम महाराजांनी केला

आहे. केवळ वैद्यकावर ग्रंथ लिहून लोकांना व्याधिमुक्त करण्यासाठी ग्रंथनिर्मिती केलेली नाही.

पाश्चात्य वैद्यकशास्त्र केवळ शरीरातील रोग काढून टाकण्याचा प्रयत्न करते, पण आर्यशास्त्र औषधीच्या प्रभावसंज्ञक गुणांनी मनोमल नाहीसे करून नंतर औषधीच्या पार्थिव गुणांनी रोगांचा प्रतिकार करते. त्यातही ''प्रभावावर'' विशेष जोर देते. त्यामुळेच आयुर्वेदीय औषधे सावकाश परिणाम करतात पण त्यांचा प्रभाव चिरकाल टिकून राहतो. पाश्चात्य औषधाने मनाची पुष्टी किंवा शुद्धी दोन्ही होत नाहीत. मूळांना सोडून फांद्यांवर उपचार करणे, यासारखा पाश्चात्य वैद्यकातील उपाय असल्याने महाराजांना पाश्चात्य वैद्यक फारसे मान्य नाही. पण शल्यचिकित्सा प्रत्यक्ष असल्याने महाराजांनी मान्य केली आहे.

महाराजांनी मनोविकारपासून त्रिदोष व त्यापासून रोग असा क्रम सांगितला आहे. कोणत्या विकारापासून कोणता दोष कुपित होतो व त्यापासून कोणता रोग होतो हे स्पष्ट केले आहे.

तीव्राद्रागाद्भेवद् वातो, द्वेषात्पित्तं प्रजायते । कफः संजायते मोहात् तमसोऽति जडः स्मृतः।।१९।।
चित्तमशुद्धं हि तीव्रं चेद् दोषतामियात् ।।१८।। रागादिदूषितं चित्तं गदजालं तनोति हि ।।१४।।
सर्वेषामपि रोगाणां अधर्मः कारणं महत् । आरोग्यकारको धर्मो वैद्यशास्त्रेऽपि बोधितः।।१७।।

मनातील विकार हेच स्थूलरूपाला आले की रोगरूप होतात. जसे काम या विकारापासून क्षय रोग होतो. ''कामशोकभयाद्वायुः, क्रोधात्पित्तम्'' हे माधवनिदानाचे मत आहे. तुमचे मन जर खंबीर असेल तर विषारी वातावरणाचा जोर मुळीच चालणार नाही. आणि मन खंबीर व शुद्ध करण्यासाठी सत्संगतीची जरूरी आहे.

सत्यवादिनं अक्रोधं अध्यात्मप्रवणेंद्रियम् । सद्वृत्तं निरतं शांतं विद्यान्नित्यं रसायनम् ।।''

साधुपुरुषाच्या सेवेमुळे मनाचे विकार कमी होऊन मनाची शुद्धी होऊ लागते आणि शेवटी रोगांची निवृत्ती होते. अशा रीतीने मन आणि शरीर दोन्ही आत्मप्राप्तीसाठी सुयोग्य होतात.

''औषधं सर्वरागाणां श्रद्धया हरिसेवनम्''

श्रीहरीच्या प्रेमसेवेत चित्त गुंतले की शारीरिक आणि मानसिक व्याधी यांचे सकट सर्व भवरोगच नाहीसा होतो. याचे सविस्तर विवेचन करताना १.औत्सुक्य = विषयोत्कंठा, २. मोह = कार्याकार्य न समजणे, ३.अरति = उठताबसता कोठेही बरे न वाटणे. या तीन मुख्य असाध्य व्याधींच्या लक्षणांचे वर्णन केले आहे.

चिकित्सेचे दोन प्रकार -१ रोगानुत्पादनीय व २. रोगनिर्वतनीय. पैकी आयुर्वेदात पहिलीला अधिक महत्व असून त्यासाठीच अधिक प्रयत्न केले गेले आहेत. उलट पाश्चात्य वैद्यकीत मात्र रोगनिर्वतनीय प्रयत्नच महत्वाचे मानले गेले आहेत. त्यात जंतु-कारणवाद मुख्य आहे. तर आयुर्वेदात मनोविकारकारणवाद प्रमुख आहे. पाश्चात्य वैद्यकात रोग्याविषयी दया काढून भीती भरली जाते. त्यामुळे आईमुलगा, पतिपत्नी, भाऊभाऊ वगैरे रोगपीडित झाले तर एकमेकापासून दुरावतात. आणि भीतीने त्यांची मने कमकुवत झाल्यामुळे स्वतःही रोगाला बळी पडतात, याचे मुद्देसूद विवेचन केले आहे. तसेच आर्युवीय मानसोपचार आणि हिप्नाटिझम एक नव्हेत, त्या दोहोत महदंतर आहे; हेही महाराजांनी विस्ताराने सांगितलेआहे.

७१. भिषगिन्द्रशचीप्रभा
(यष्टी १६ संस्कृत)

ही वाग्भटांच्या अष्टांगसंग्रह या ग्रंथातील फक्त दोन श्लोकांर उपलब्ध असलेली टीका आहे.

या दोन श्लोकांवर दोन अध्याय महाराजांचे संस्कृत भाष्य आहे.

सुरवातीला अष्टांगसंग्रहात चित्तरूपी महासर्पाचे रूपक आहे. त्याचे शब्दन् शब्द स्पष्टीकरण महाराजांनी विस्तारपूर्वक व अगदी सोपे दृष्टांत देऊन केलेले आहे. तृष्णा, द्वेष, चांचल्य, काम, क्रोध, राग, लोभ, वगैरे सर्व विकार सर्पाचे ठिकाणी लावून दाखविल्यामुळे रूपकातील स्वारस्य स्पष्ट व्यक्त झाले आहे. महाराजांनी आयुर्वेदाचा उपयोग करून घेणाऱ्यांचे चार नाविन्यपूर्ण प्रकार केले आहेतः-

१. पामरांना विषयसुख मिळण्यासाठी.

२. विषयी लोकांना धर्मश्रमपरिहार होण्यासाठी.

३. मुमुक्षूंना तितिक्षावर्धनार्थ व परोपकारार्थ.

४. सिद्धांना भक्तियोगवेदान्ताप्रमाणे प्रारब्धाचा अभिभव करण्यासाठी.

अशा प्रकारे चौघांना वैद्यकशास्त्राचा उपयोग आहे.

''सिद्धानामपि भक्तियोगाभ्यां प्रारब्धाभिभवेऽपि प्रमादेन शारीरव्याधि-मनोव्याकुलता-विजयार्थं वेदान्त-योगशास्त्रापेक्षावत् वैद्यकशास्त्रस्याऽपि आवश्यकोपयोगः'' प्राप्त पुरुषांनी देखील प्रारब्धाभिभव करण्यासाठी व मानसव्याधिजय करण्यासाठी योगाचा आश्रय करावा आणि शारीरव्याधिजयासाठी औषधीचा उपयोग करावा असेयात स्पष्ट प्रतिपादन केले आहे. एकूण या चारही ग्रंथात वेगवेगळे विचार मांडले आहेत. त्यातील एक विचार केवळ व्यवहारदृष्टीनेही अतिशय महत्वाचा आहे.

''मला रोग होऊ शकतील'' ही भीतीच सर्व रोगांचे मूलकारण असल्याने सत्संगतीचा आश्रय घेऊन व भक्तिवेदान्ताचा अभ्यास करून सर्व प्रकारच्या भीतींचा त्याग करावा व आरोग्य संपन्न व्हावे. असे स्थूलदृष्टीने म्हणता येईल.

७२. वैद्यवृंदावन

(य १८ संवादरूप पाने३५ ग्रंथ अपूर्ण)

७३. भिषक्पाटवोपपत्ति

(य१८ अध्याय३)

धर्म अर्थ काम मोक्ष हे चारी पुरुषार्थ प्राप्त करून देणारे शरीर सुस्थितीत ठेवणे प्रथम आवश्यक आहे. सबब परमेश्वराने मनुष्यासाठी आथर्वणापासून आयुर्वेद निर्माण केला आहे. पण संस्कृतभाषा लोकांना कळत नसल्यामुळे सामान्य लोकांना समजण्यासाठी महाराजांनी मराठीत ग्रंथ रचण्याचा उपक्रम केला. हा ग्रंथ गुरुशिष्य-संवादरूपाने आहे. यात शरीराचे तीन प्रकार सांगितले आहेत.

मैथुनज, रसज, व योगज. पैकी मैथुनज शरीरासाठीच औषधींची व्यवस्था आहे. तसेच रोगांचेही दोन प्रकार करून विवरण आहे.

* सर्व प्रकारच्या व्याधी या दुष्कर्मावर अवलंबून असून दुष्कर्म घडण्याला पूर्वीचा प्रज्ञापराधच कारणीभूत आहे, असे महाराजांनी स्पष्ट मांडले आहे. त्यामुळे -

* ''नीच कर्म करणाऱ्यास औषधे देऊ नये''

असे सुश्रुताचे वचन त्यांनी प्रमाण म्हणून स्वीकारले आहे.

* सर्व प्रकारच्या रोगांना निश्चयाने बरे करणारे अमोघ रसायन ''जितेंद्रिय, क्रोधरहित, सत्यवादी, धर्ममग्न असे सत्पुरुष होत;'' परंतु ते दुर्मिळ असल्याने औषधींचा उपयोग करावा यासाठी आर्युवेद निर्माण केला आहे.

यात महाराजांनी १शल्यतंत्र २शालाक्य तंत्र ३भूतविद्या ४कायचिकित्सा ५कौमारभृत्य ६अगदतंत्र

७.विज्ञानतंत्र ८.मनीकरण ९.रसायनतंत्र यांची माहिती सांगितली आहे.पैकी विज्ञानतंत्र हे नवीन आहे. द्रव्य, ओज, व गुणांचे वर्णन सूक्ष्मरीतीने केले आहे व ओज सत्पुरुषांच्या ऋतंभरा प्रज्ञेलाच कळते म्हणून त्यांचे महत्व आहे. शेवटी महाराज म्हणतात,

''माझे द्रव्यविवेचन कठिण असल्यामुळे लौकर ध्यानात येत नसले तरी मी जिवंत असेपर्यंत याजवर कोणी टीका करणारा भेटावा, अशी माझी फार इच्छा आहे.'' पण महाराजांची इच्छा पूर्ण करणारा त्यांना भेटला नाही. शेवटी यात २५-३० औषधी लिहिल्या असून ग्रंथ अपूर्ण राहिला आहे.

७४.वैद्यनंदिनी

(य १८. अध्याय ३, पाने ७)

शरीर निरोगी करून ब्रह्मज्ञान करू घ्यावे म्हणून आयुर्वेद निघाला असल्याने तो उपवेद आहे. याचे पर्यवसान ब्रह्मज्ञानात आहे.

याची परंपरा ब्रह्मदेव, दक्षप्रजापती, अश्विनीकुमार, इंद्र, भारद्वाज ऋषी अशी असून नंतर भारद्वाजांनी पृथ्वीवर प्रसार केला.

रोगाची व्याख्या :- ''ज्याच्यापासून पीडा होते तोरोग'' अशी व्यापक केली आहे.त्यामुळे शारीरिक, आगंतुक, मानसिक व स्वभाविक असे ४ प्रकार केले आहेत.

१. शारीरिक रोग औषधीने दूर होतात.

२. आगंतुक रोग देवांच्या शांतीने किंवा औषधीने दूर होतात.

३. मानसिक रोग म्हणजे हिस्टेरिया तर आहेच पण शोक, क्रोध वगैरे विकारांनाही मानसिक रोगात समाविष्ट केले आहे. असे हे मानसिक रोग धैर्याने दूर करण्यास सांगितले आहे.

४. स्वाभाविक रोग म्हणजे भूक तहान हे असून ते जन्मापासून लागले आहेत असे प्रतिपादन केले आहे. पण यांच्या निवारणाचा उपाय मात्र सांगितलेला नाही. योगाभ्यास केल्याने भूक तहान जाते असे इतरत्र आहे.

दुसऱ्या अध्यायात त्रिदोषांची व्याप्ती सांगितली असून तिसऱ्यात प्रकृतिव्यवस्था सांगितली आहे, पण तिसरा अध्याय अपूर्ण आहे.

७५. स्वमतनिर्णयः

(संस्कृत यष्टी१६ श्लोक११२)

यामध्ये महाराजांनी वेदांत, भक्ती, व्यवहार, आर्युव, धर्मशास्त्र, तीर्थक्षेत्रे, सण, संप्रदाय, ब्रह्मचर्य, संन्यास, दैव, प्रयत्न वगैरे पारमार्थिक, धार्मिक आणि व्यावहारिक विषयांवर स्वतःची महत्वपूर्ण निर्णायक मते व्यक्त केली आहेत. म्हणूनच याला 'स्वमतनिर्णयः' असे यथार्थ नाव दिले आहे. वाचल्यानंतर वाणीवर रेंगाळत राहतील असे श्लोक आहेत. त्यामुळे याला सुभाषितसंग्रह म्हटले तर फारसे वावगे होणार नाही.

शांकरज्ञानसंयुक्तं भगवद्भक्ति-अलंकृतम् । यद् वाक्यं तत् प्रमाणं स्यादिति स्वतमनिर्णयः।।३।।

श्रद्धयैवाचरेत् कर्म, युक्त्या तत्त्वविवेचनम् ।।१६।।

* दैवप्रमाणे अर्थ आणि काम पुरुषार्थाचे सेवन करावे. आणि धर्म व मोक्ष यासाठी मात्र प्रयत्न करावा.

* ज्याने सत्त्वशुद्धी होते तोच धर्म. ५

* समर्थ महात्म्यांच्या सच्चरित्राचे अनुकरण करावे व इतर सोडून द्यावे.पण अश्रद्धा मनात देखील आणू नये. ३१.

वगैरे प्रकारचे सुभाषितवजा महाराजांचे स्वमतनिर्णय मार्मिक असून लक्षात राहण्याजोगे आहेत. महाराजांचे सिद्धान्त आणि विचारसरणी सूत्ररूपाने लक्षात येण्यासाठी या ग्रंथाचे महत्व अनन्यसाधारण आहे.

७६. संप्रदायकुसुममधु

(संस्कृत. यष्टी१६ श्लोक२१)

यात कोणत्या संप्रदायापासून कोणती भावना महाराजांनी घेतली आहे ते एकेका श्लोकात सांगितले आहे.

गुणग्रहण आणि दोषत्याग या तत्त्वानुसार महाराजांनी सर्व संप्रदायांच्या आचार्यांच्या भक्तिभावनेला पोषक असलेल्या भावना आपल्या मधुराद्वैतदर्शनात स्वीकारल्या आहेत. यावरून त्यांचे मनात इतर संप्रदायाविषयी द्वेषबुद्धी मुळीच नव्हती असे दिसून येते.

१. नारदीयपांचरात्र, २. पाशुपत, ३. शैव, ४. शाक्त, ५. पूर्णप्रज्ञ, ६. रामानुज, ७. निंबार्क, ८. राधिकावल्लभ, ९. चैतन्य, १०. वाल्लभ, ११. गाणपत्य, १२. सौरागम, १३. प्रत्यभिज्ञा, १४. रामानंद १५. वैट्ठल, १६.शांकर;

या सोळा संप्रदायातून कोणत्या कोणत्या भावना घेतल्या, याचा स्पष्ट निर्देश करून महाराजांनी त्यानुसार अनध्यस्तविवर्त साकार श्रीहरीला प्रेम अर्पण करण्यास सुचविले आहे.

७७. सच्चिन्निर्णयः

(संस्कृत यष्टी१६ श्लोक ३६)

परब्रह्माच्या सत् चित् आनंद यातील सत् व चित् या दोहोचे स्वरूप थोडक्यात गद्यपद्यान्वित भाषाशैलीने सोप्या रीतीने पटवून दिले आहे. एकूण श्लोक केवळ ३६ आहेत.

७८. कान्त-कान्ता-वाक्यपुषम्

(संस्कृत. यष्टी १ व १६. श्लोक३५)

या संस्कृत गद्यपद्यान्वित प्रकरण ग्रंथात शिवशक्तीचे स्वरूप थोडक्यात पण स्पष्ट रूपाने विशद केले आहे.– जोपर्यंत अज्ञान आहे तोपर्यंत ब्रह्म व माया विसंवादि म्हणजे परस्पर विरोधी आहेत असे जीवाला वाटत असते; पण ज्ञानी होऊन तो भक्त झाला की अज्ञानरूपाने भासणारी मायाच शक्तिरूप होऊन जाते. म्हणजेच कांतकांतेचा विरोध नाहीसा होऊन त्यांचा संप्रद हातो. अशा प्रकारे ''कांतकांतावाक्यपुष्पम्'' म्हणजे कांत श्रीकृष्ण व कांता शक्ती यांचा अर्थ सांगणारे हे वाक्यरूप पुष्प होय.

यातील वेदान्त-प्रक्रियेचा अधिकारी तपाने पापनिर्मुक्त झालेला परवैराग्यसंपन्न असा साधक आहे. त्याला आत्मज्ञानाने सच्चिदंशाचे ज्ञान होते पण आनंदप्राप्तीसाठी त्याने भक्तीच केली पाहिजे. ही भक्ती कोणाची तर फलोपम अवतार श्रीकृष्णाची. नीलकंठाचार्यांनी ब्रह्मवृक्षाचे रूपक वर्णन केले आहे. १. भूरूप - शुद्धब्रह्म २. बीजरूप - मायोपहित शबल ब्रह्म ३. अंकुर - ब्रह्मदेव ४. तरू - विराट ५. फल- शिव-विष्णूंचे अवतार श्रीकृष्णादि.

अशा फलोपम श्रीकृष्णाची भक्तीच आनंददायिनी असते. यात वृक्षाचे वृक्षाचे मूळ आणि फल दोनही शुद्ध परब्रह्मरूप आहेत.

नंतर अनादि सहा पदार्थ कोणते ते सांगून परविद्या व अपराविद्या यांचे वर्णन केले आहे. पण

मायेची बाधा भक्ताला होत नाही.याला दृष्टांत दिला आहे की - चक्रवाकाला ज्याप्रमाणे मृगजल दिसत नाही तसे भक्ताला देखील माया मुळीच अनुभवाला येत नाही.

''अज्ञानिभिः संप्रवृष्टा भक्तोऽविद्यां न पश्यति ।'' तो स्वतःच शक्तिरूप होऊन जातो.

७९चित्तोपदेश

(यष्टी२ श्लोक१०६)

समर्थ रामदासांचे मनाचे श्लोक आणि महाराजांचा चित्तोपदेश हे दोन्ही ग्रंथ आमरण पठनीय आहेत.सामान्य जनाला मुमुक्षू करण्यामध्ये आणि मुमुक्षूला पारमार्थिक वाटचालीत शेवटपर्यत म्हणजे विदेहमुक्तपर्यंत घेऊन जाण्यात ते सारखेच तत्पर आहेत.

संतांचा उपदेश देहाला होऊ शकत नाही आणि आत्म्यालाही होऊ शकत नाही.देह आणि आत्मा यांना सांधणारा दुवा म्हणजे मन होय म्हणून त्यालाच उपदेश संभवतो म्हणून दोन्हीही समर्थ महापुरुषांनी ''मन एव मनुष्याणां कारण बंधमोक्षयोः'' अशा या मनालाच उपदेश करून परमार्थमार्गावरील अनेक खुणेचे दगड दाखवून दिले आहेत.सामान्य माणसाने विषयातील दोष पाहून त्यावरून मन काढून घ्यावे.यासाठी–

मना सर्वदा भोग ते रोग होती । मना सज्जना योगही दुःख देती ।
मना अंति रे नाही कोणी कुणाचे । ...॥६॥

असा अंतःकरणाला भिडणारा उपदेश केला आहे.नंतर श्रीहरीच्या प्रेमासाठी- काम आणि अर्थ हे दोन पुरुषार्थ दैवावर सोडून द्यावे व धर्म आणि मोक्ष यासाठी मात्र आत्यंतिक प्रयत्न करावा. या संदर्भात दैव आणि प्रयत्न यांची नाविन्यपूर्णयोजना केली आहे.

वैराग्य झाले की सतत नामस्मरण करावे. त्याने मीपणा सुटतो आणि देवदूर नाही, असाच अनुभव येतो.

तुझ्या अंतरी जे तुलजाणताहे । मना तोचि प्रत्यक्ष रे ब्रह्म पाहे ॥२०॥

असे साक्षीचे स्वरूप प्राप्त होते.नंतर -

मना सोडुनी सर्व संसार-धंदा । सदा आवडीने भजावे मुकुंदा ॥३४॥
नको घाबरूं वैभवाच्या वियोगे ॥१७॥

वैराग्यरूपी मित्राची संगत शेवटपर्यत ठेवावी.सद्गुरूच विष्णुरूपाने व शंकररूपाने असतात.त्यांचीच भक्ती सुरवातीपासून विदेहमुक्तीपर्यंत केली पाहिजे, असा मतितार्थ या प्रकरण ग्रंथातून ध्वनित केला आहे.कर्म, उपासना, ज्ञान, आणि भक्ती या सर्वांचे यथास्थित वर्णन सूत्ररूपाने एके ठिकाणी आढळते.

मना कर्म निष्काम दे चित्त शुद्धी । मना विष्णुभक्ती करी स्थीर बुद्धी ।
मना मुक्तीचा दायकू पूर्ण बोध । परंतु तिथेही हरिप्रेम मोद ॥५७॥

असा हा हरिप्रेमाचा आमोद प्राप्त होण्यासाठी सद्गुरुभक्तीच एक कारण आहे, हेच प्रामुख्याने सांगितले आहे.अशा प्रकारे मनाला पूर्ण परमार्थप्रवण करण्यात या चित्तोपदेशाची इतिकर्तव्यता आहे.

८०.सद्वैजयंती

(मराठी.यष्टी२ आर्या१०८)

गीति-छंदात असलेल्या या आर्याशतकात एकशे दोन संतविभूतींना महाराजांनी मानवंदना दिली आहे.बहुतेक सत्पुरुष १९ व्या शतकातील व काही समकालीन आहेत.महाराजांनी हिंदू, मुसलमान, ब्राह्मण, शूद्र वगैरे कोणत्याही जातीत कां असेना, ज्यांना आत्मसाक्षात्कार झाला आहे, त्या

साधुपुरुषांना या वैजयंतीमालेत आदरपूर्वक स्थान दिले आहे.

प्रथम ज्ञानेश्वरमहाराजांचे सचीवरूपाने आळंदीला महाद्वारात पायरीशी असलेले हैबतीराय यांना नमन केले व नंतर माउलीच्या शेजारी समाधिस्थ असलेले नरकेसरी सरस्वती यांना ज्ञानेदवांचे मित्र म्हणून गौरविले आहे. स्वामी विवेकानंद, रामकृष्णपरमहंस, वासुदेवानंदसरस्वती, शेगांवकर गजाननमहाराज, ताजुद्दिनबाबा वगैरेंचा अंतर्भाव समान रूपाने या स्तुतिसुमनमालेत आहे.

समयानुसार उपदेश करताना कधी कधी सिद्धान्त-विरोधी मते मांडूनहि पुढच्याला त्याच्या योग्यतेनुसार मार्ग सांगावा लागतो, म्हणून काही ठिकाणी वरील सत्पुरुषांच्या मतांचे खंडन केल्याचे आढळते. याचे कारण एवढेच की तेवढी सिद्धान्त-विरोधी मते सोडून बाकीचे सिद्धांत समान असल्याने महाराजांना ते संतरूपाने वंदनीयच वाटतात.

दुसरे असे की योगवासिष्ठानुसार ज्ञानाच्या सात भूमिकेपैकी चौथ्या ''सत्त्वापत्ति'' भूमिकेवर आत्मसाक्षात्कार असतो.''इयं ज्ञानकला राजन् सकृत् जाताभिवर्धते।।वासिष्ठ।। जो संसारापासून सुटला तो सातही भूमिका केव्हाना केव्हा पार करणारच. पण त्यांच्या त्या त्या ज्ञानभूमिकेनुसार त्यांच्यात काहीना काही तुटी राहते. त्यामुळे महाराजांनी त्यांचे खंडन केलेले दिसते. तरीही त्या सर्वांना नमन करण्यात महाराजांच्या अंतःकरणाची नम्रता दिसून येते आणि चुकीची मते खंडन करण्यात त्यांचा स्पष्टवक्तेपणाही दिसून येतो.

सुखवरसुधेत एके ठिकाणी महाराजांनी स्पष्ट केले आहे की - ''यांनी ग्रंथरचना न करता केवळ समयोपदेशावरच भागविले आहे आणि समयोपदेश हा व्यक्तींच्या अधिकारानुसार केलेला उपदेश असतो. त्यामुळेच कोठे कोठे सिद्धांतहानी झाल्यासारखी दिसते'' म्हणून महाराजांनी त्यांच्या मतांचे खंडन केलेले आहे, त्यांच्या साधुत्वाचे नव्हे! याप्रमाणे महाराजांनी त्यांना श्रेष्ठ वाटणाऱ्या साधूंना स्तुतिसुमने वाहिली आहेत.

८१बाराखडी

(मराठी. यष्टी २ वाक्ये ३२)

आजकाल लहान मुलांना गणपतीचा 'ग' शिकविण्याचे ऐवजी गाढवाचा 'ग' शिकविण्यास सुरुवात झालेली आहे. संस्कृतचे उच्चाटन करण्याचा प्रयत्न ब्राह्मणांपासून तो सरकारपर्यंत सर्वजण अहमहमिकेने करीत आहेत. तेव्हा संस्कृत नको असले तरी चांगले संस्कार होण्याला आधुनिक समाजाची हरकत असू नये. त्या दृष्टीने लहान मुलांना अक्षर ओळख करून देण्यासाठी महाराजांनी रचलेली बाराखडी उपयुक्त आहे.

बालमनावर या बाराखडीचा परिणाम चांगला होत असल्याचे दिसून येते. व्यवहारापासून परमार्थापर्यंत अनेक शिकविण्यासाख्या गोष्टी लहान मुलांच्या तोंडात बाराखडीच्या रूपाने घोळत असतात. या बत्तीस वाक्यामध्ये नादरूपाने होणाऱ्या गमतीच्या चालीचीही छटा असल्याने मुले ही वाक्ये आवडीने म्हणतात एवढे मात्र खरे!

१. ज जा जाता येता ओळख दीजे.

२. ब बा बोल गोड असूं दीजे. - या दोन वाक्यांत व्यवहारचातुर्याची शिकवण आहे.

३. म मा मायबापकी सेवा कीजे. - येथे धर्म शिकविला आहे.

४. ह हा हठ करणे सोडून दीजे - यात चांगुलतेची शिकवणआहे.

५. ल ला लहानपण न सोडीजे - यात नम्रता शिकविली आहे

६. ठ ठा ठामक ठुमक न राहीजे. - येथे लोकेषणेचा त्याग आहे.

७. ढ ढा ढोंग ढांग सोडून दीजे.- - येथे खोट्या सोंगाचा त्याग आहे.

अशा नादमधुर वाक्याने मुलांना म्हणताना मजा वाटते.

अशी ही बाराखडी लहानांनीच काय पण मोठ्यांनीही पाठ करून तदनुसार ''वागावे'' अशी आहे. या रचनेवरून महाराजांनी लहान बालकांच्या शिक्षणाचीही काळजी घेतली होती हेही जाणवते.

८२. त्रिकाण्डसार

(मराठी. यष्टी२ अभंग१६)

महाराजांच्या प्रत्येक ग्रंथात ज्ञानोत्तर भक्तीचे प्रतिपादन असतेच पण यात ती प्रतिपादित नाही, हेच आश्चर्य आहे. ज्ञानपूर्व उपासना मात्र यात आहे. पण ती ज्ञानात पर्यवसित होणारी आहे.

कर्माने चित्तशुद्धी,

चित्ताच्या स्थैर्याकरिता उपासना आणि

त्यांनतर ओंकाराच्या साह्याने व्यतिरेकाचे निर्गुणज्ञान.

या क्रमाने येथे ज्ञान-प्रक्रिया सांगितली आहे. आत्मप्राप्तीसाठी चित्तशुद्धी आवश्यक आहे. निष्काम धर्माचरण केल्याने चित्तशुद्धी होते. धर्माचे पालनासाठी प्रसन्नच पाहिजे. हे सिद्ध करताना ईश्वरेच्छावादाचे खंडन केले आहे. धर्माचरणाने सत्त्वबुद्धीच व्हावयाला हवी आणि जर सत्त्ववृद्धी होत नसेल तर त्या धर्माचाही निषेध केला आहे. नंतर चारी वर्णांचे धर्म वेगवेगळे असल्याचे पटवून दिले आहे.

चित्तशुद्धीनंतर चित्त एकाग्र होण्यासाठी संतांकडून उपासना घ्यावी. वैदिक उपासना कठीण असल्याने पौराणिक उपासना घ्यावी. उपासनेत एकनिष्ठ असावे. पण पतिव्रता स्त्री जशी दुसरीच्या पतीचा द्वेष करीत नाही किंवा त्याची इच्छाही करीत नाही, त्याप्रमाणे दुसऱ्याची उपासना मोडूं नये आणि आपलाही विश्वास पूर्ण जतन करावा.

पुढे ज्ञान मिळविण्यासाठी विवेक, वैराग्य, शम, दम, उपशम, तितिक्षा, श्रद्धा, समाधान आणि मुमुक्षा यांचा अभ्यास करावा म्हणजे सद्गुरुप्राप्ती होते. त्यानंतर त्यांची सेवा करावी. प्रश्न विचारून शंकांचे समाधान करून घ्यावे. म्हणजे श्रीगुरु श्रवण, मनन व निदिध्यासन करवून शिष्याला जीवब्रह्मैक्य करून देतात. अशी कर्मोपासनापूर्वक ज्ञानसाधना निरूपण केली आहे.

८३. प्रमादकल्लोळ

(यष्टी१५ ओव्या१२७, प्रमाद-१०२)

या ओवीबद्ध प्रकरणात प्रमादांचे निरूपण केले आहे. हे वाचताना समर्थ रामदासांनी वर्णिलेल्या मूर्ख लक्षणाचेही स्मरण होते. यात -

* व्यवहारातील लहानसहान प्रमाद,
* मुमुक्षुदशेतील प्रमाद,
* जिज्ञासूंचे प्रमाद सांगितले आहेतच, परंतु त्याही पलीकडे म्हणजे
* वैराग्यावाचून मुक्त होणाऱ्या ब्रह्मज्ञान्यांचे प्रमादही वर्णन केले आहेत. हे मात्र विशेष आहे.

बद्धमुमुक्षुदशे आत । कालानुरोधे प्रमाद बहुत ।
वैराग्यावांचोनि होता मुक्त । प्रमाद तेथही सांपडती ॥८॥

प्रमादी कोण कोण असू शकतात?

* धन मिळविण्यासाठी स्वतःच्या व्याधीवरही दृष्टी न देणारा.
* मार्गावर श्रद्धा ठेविली म्हणून वेदांचाहि अव्हेर करणारा.
* आपल्या कजाग आईने पत्नीचा विनाकारण छळ केला तरी मातृभक्तीमुळे काही न बोलणारा.
* विरक्ती नसून स्वाभिमान सोडणारा.
* विनोदाने आईला हंसणारा.
* संस्कृत विद्येचे रक्षण न करणारा.
* प्रयत्न न करता फळाची उतावळी करणारा.

याप्रमाणे व्यवहार, श्रवण, मनन, निदिध्यासन या अवस्थेतील प्रमादही महाराजांनी सांगितले आहेत. हे प्रमादवर्णन स्वतःची सुधारणा करण्यासाठी आरशाप्रमाणे अतिशय उपयुक्त आहेत.

८४. अभंगाची गाथा

(यष्टी९पूर्वार्ध. अभंग २१५८)

आजच्या बऱ्यास साहित्यिकांना तुकाराम नामदेवादिकांचा शतकोटी अभंग रचण्याचा उल्लेख अतिशयोक्ती वाटते. पण अल्पवयीन असलेल्या महाराजांनीच अभंग व पदे मिळून २१५८+२२४४ मिळून अंदाजे ४४०२ म्हणजे साधारण साडेचार हजार रचना केली असून लेखबद्ध न होऊ शकलेली रचना कितीतरी अधिक होती. महाराजांचे लेखबद्ध झालेले वाङ्मय त्यांनी निर्माण केलेल्या वाङ्मयाच्या १/२० देखील नाही. जेव्हा ते ओवीबद्ध निरूपणे करीत तेव्हा चार चार लेखक बसून लिहून घेण्याचा प्रयत्न करीत. परंतु हळूहळू सांगितल्याशिवाय महाराजांची वाणी लेखबद्ध करणे शक्य होत नसे. आणि आश्चर्य हे की दोनचारशे ओव्यानंतर महाराज तत्क्षणी रचलेल्या ओव्यांची संख्याहि सांगत. असा हा अमृतवर्षावाचा अनुपम सोहळा ह.भ.प.पांगारकर यांनी स्वतः अनुभवल्याच्या प्रसंगाचे सुरेख वर्णन केले आहे. महाराजांचा सहवास प्राप्त झालेली मंडळी देखील अशाच आठवणी सांगतात. म्हणून नामदेवादि संतांच्या अभंगसंख्येबद्दल कोणी शंका घेतली तर त्यांच्या बुद्धीची कीव करावीशी वाटते.

महाराजांच्या पहिला अभंग वयाच्या १५ व्या वर्षीच रचला गेला (चरित्र पा. ४९) पण पुढे अमरावतीला आल्यानंतरच अभंग लिहून ठेवण्याचा नियमित क्रम सुरू झाला.

अभंग म्हणजे भंग नसलेला संपूर्ण भावकाव्य. यात भावना अथपासून इतिपर्यंत परिपूर्ण रीतीने व्यक्त झालेली असते. यात कवीच्या अन्तःकरणातील आशय सोप्या शब्दात आणि थोडक्यात व्यक्त झालेला असतो. सामूहिक भजनप्रसंगी गर्दी असते, विघ्नेही बरीच येत असतात, परंतु सत्पुरुषांना स्वतःची भक्तिभावना समर्थपणे काव्यबद्ध करताना अडचण जाणवत नाही. भोवतालच्या लोकांना आपल्या म्हणण्याचा अर्थ समजावा आणि सर्वजण भक्तिरसात न्हाऊन निघावे अशी त्यांची इच्छा अभंग रचनेच्या माध्यमाने पूर्ण होत असते. हे अभंग रचनेचे वैशिष्ट्य आहे.

महाराजांच्या सभोवताल मोठी विद्वान पंडित मंडळीही असे, त्यामुळेवरच्या पातळीवरील अभंग रचना विशेष करून झाली. दिसतेया गाथेमध्ये साधारण १८-१९ विषयांवर अभंगरचना आलेली आहे.

१.मंगलाचरण २.श्रीकृष्णरूप ३.नाम ४.संत ५.सद्गुरुमहिमा ६.उपासना ७.करुणा ८.भक्ती ९.वेदान्त १०.उपदेश ११.श्रीकृष्णलीला १२.विरहिणी १३.पौराणिक १४.योग १५.कलह १६.रूपक १७.प्रभाती १८.संकीर्ण १९.स्तुती, २०.आरती वगैरे असून २१.एकूण आख्यानेही १९ आहेत.

यामध्ये विरहिणीच्या अभंगात महाराजांची म्हणजे या ज्ञानेश्वरकन्येच्या माधुर्य भक्तीची कोमल भावना अप्रतीम उमटली आहे.

रडतां रडतां गुंजा झाले डोळे । न दिसे सांवळे अझोनिया ।।१४०८।।
हृदयीच हारपतां । धुंडाळतां न दिसे ।।१४१२।।
अंतरी वियोग बाहेरी दिसेना । उपाय सुचेना कोणताही ।।१४१४।।

भागवतातील गोपीगीतावरील अभंग हे भांषातर असूनही त्यात व्यक्त झालेली भावना मुळापरीस गोड आहे. त्यातील मूर्तिमंत कारुण्याने अन्तःकरण द्रव पावते. प्रणयकलहामध्ये -

पहिलेपासोनि तुझा माझा संग । मध्ये कां प्रसंग निकराचा ।।१४६८।।
मुक्ती देऊनिया फसविले फार ।

अशा मुक्तीवरील भक्तीचा रस चाखलेली ही आंधळी गौळण भगवंताशी जो प्रेमकलह करते तो मनोज्ञ आहे. ज्ञान आणि भक्तीचा अत्यंत सुरेख संगम सर्वच अभंगातून व्यक्त झाला आहे.

अंतरी निर्गुण बाहेरी सगुण । सम प्रेमखूण दोहींचीही ।।
एक ज्ञानें मिळे, एक भक्तिसिद्ध । एथ नाही भेद, वेद वाणी ।।८५०।।
जाणोनि निर्गुण भजावे सांवळे । भक्तीचे सोहळे तेव्हा साच ।।८४६।।
निर्गुण होऊन सगुण भोगावे ।।
केव्हा मी पडीन एकटा धुळींत । मुखे आरोळीत नाम तुझे ।।१।।
केव्हा अपमान होईल या जनी । थुंकितीं पाहोनि केव्हा मज ।।६८२।।

हे अभंगातील कारुण्य अनुभवण्याजोगे आहे.

तुज बहुजण मज तूं एकला । म्हणूनि विकला मती माझी ।।

वगैरे अभंगात करुणेचा सागर उचंबळला आहे. ज्ञानपर अभंग वाचताना वसिष्ठ मुनीच दृष्टिसृष्टिवाद सांगत आहेत की काय असे वाटते.

नामस्मरण करताना योगाचे इतर कष्ट न घेता अष्टांग योग साध्य होतो हे ४६व्या अभंगात १६ चरणामध्ये सविस्तर आणि सोप्या रीतीने सांगितले आहे.

योगाचे अष्टांग नामींच मिळती । नाम ते वेदान्तीं मिश्रीत की ।।१।।
शिष्य तोचि हरी, गुरु तोचि नंद । प्रेमात प्रसिद्ध गोपीरूप ।।१३।।
हाचि निर्विकल्प समाधीचा ठेवा । परी तीव्र व्हावा नामवेग ।।१४।।
नव्हे हे रूपक नव्हे सन्निवेश । पाहतां प्रत्यक्ष प्रतीती हे ।।१५।।

अशा प्रकारे सर्व अभंग ज्ञानाने संपन्न असूनही भावविव्हल आहेत, प्रेमभक्तीचा पाझर फोडणारे आहेत. पण वैचारिक पातळी जरा वरची असावी लागते एवढे मात्र खरे!

ही अभंगरचना कशी होत असेल त्याचे सुरेख वर्णन आपण त्यांच्या चरित्रावरून पाहू. काशीरामबापू देशमुखांची ही आठवण आहे.

''तुकारामांचा अभंग किंवा ज्ञानेश्वरीतील एखादी ओवी काहीतरी एक, प्रथम एका इसमाने वाचावे आणि त्यावर महाराजांनी स्वकृतभजन करावे. एक चरण महाराजांनी म्हणावे. त्याचे मागून तेच चरण मंडळीने म्हणावे व लागलीच त्याचे पुढील चरण महाराजांनी स्वयंस्फूर्तीने म्हणावे याप्रमाणे एक तास, दोन तास व कधी कधी तीनतीन तास भजन एकसाखे चालत असे. करुणरसात भजन चालले असता श्रोत्यांचे अंतःकरण करुणेने भरून यावे. प्रेमयुक्त भजनाचा भाग आला म्हणजे प्रेमाश्रूंच्या धारा

श्रोत्यांच्या नेत्रातून एकसारख्या वाहू लागाव्या. भक्तिरसाचे वेळी श्रोत्यांचे अंतःकरण भक्तिभावाने थबथबून जावे व एखाद्या नास्तिकाचेसुद्धा अंतःकरण त्यावेळपुरते पाझरून जावे आणि वीरसाचे वेळी अंगात स्फुरण चढावे. याप्रमाणे ज्या ज्या रसात भजन चालले असेल तो तो रस त्यावेळी मूर्तिमंत वठत असे आणि मंडळी त्यात दंग होऊन जात असे. त्यांच्या त्यावेळच्या प्रासादिक वाणीत इतके काही अद्‌भूत आणि विलक्षण सामर्थ्य असे की माझ्यासाख्या पामराने त्याचे यथायोग्य वर्णन करणे अशक्य असे. ज्या भाग्यवान् मार्मिक श्रोत्याने त्याचा प्रत्यक्ष अनुभव घेतला असेल तोच त्याची खरी थोरवी जाणे! मी स्वतः पुष्कळ भजने ऐकली, अनेक कीर्तने पुराणे ऐकली, पण महाराजांच्या भजनासारखे भक्तिरसाने ओथंबलेलेव अंतःकरणाला पाझर फोडणारे प्रासादिक भजन मी आजपर्यंत मुळीच ऐकलेनाही.''
(त्रिपुरवारकृत चरित्र इ.स.१९०४,पान १३५)

असा हा अभंगरचनेचा अनुपम सोहळा पाहण्याचे भाग्य लाभणे कठीण! पण या गाथ्यातील एखादा जरी अभंग अनुभवण्याचा प्रयत्न केला तर त्या प्रेमसोहळ्याचे पुसटसे कल्पनाचित्र तरी महाराजांच्या कृपेने निश्चितपणे पाहता येऊ शकेल.

८५. पदांची गाथा

(मराठी-हिन्दी-संस्कृत, यष्टी ९,उत्तरार्ध पदे २२४४,पाने. ४९४)

प्राचीन संस्कृत कवींनी बांधलेल्या अक्षरवृत्तांचे नियम काव्यप्रकाशादि ग्रंथात सविस्तर आहेत. पण मात्रावृत्तांचे नियम बांधून त्यांची रचना नियमित करण्याचा प्रयत्न आजपर्यंत कोणी केल्याचे लक्षात नाही. महाराजांनी नवीन १२२ वृत्ते तयार करून व त्यांचे नियम बांधून ते कार्य केले आहे. ही मराठी कवितेला मिळालेली महाराजांची देणगी आहे. यासंबंधी आर्या व श्लोक मिळून अठरा कवितेत स्वतःच्या या उपक्रमाची सूत्रबद्ध माहिती महाराजांनी दिलेली आहे.

देशी संगीताचे 'नियमबद्ध' आणि 'अबद्ध' असे दोन प्रकार झाल्याने पदछंदाच्या चालींना मात्रावृत्तांच्या नियमात बसविण्याचा महाराजांचा प्रयत्न होता. स्वतःच्या सर्व पदांना त्यांनी या नियमात जवळ जवळ बसविले आहे पण तुलसीदास, सूरदास वगैरेंची पदवृत्ते व गीतगोविंद देखील स्वकृत नवीन नियमांनी बद्ध करण्याचा त्यांचा विचार होता.

* आपल्या आवडीप्रमाणे कोणीही कोणताही राग गावा - असे कोणी म्हणेल तर त्यावर महाराज म्हणतात, ''असे केले तर संतांच्या गीत-काव्यातील रसाची हानी होते. आणि रसहानी शक्यतोवर कमी व्हावी म्हणून या नवीन नियमांची योजना मी केली आहे.''

* संतांच्या वाणीत वर्तमान शास्त्रानुसार पाहिले तर शुद्ध किंवा भ्रष्ट दोन्ही प्रकार असू शकतात. परंतु त्यांना अभिप्रेत असलेला आशय त्या चुकीच्या प्रयोगात देखील पूर्णपणे आलेला असतो. म्हणून त्यांना नियमबद्ध करून शास्त्रात स्थान देणे महत्वाचे आहे. त्या अबद्ध शब्द योजनेला जुने नियम लावून शुद्धीचा प्रयत्न केला तर रसहानी होऊन आशयालाच फार मोठ धक्का पोचतो. अतएव पाणिनींनी देखील विश्वामित्र शब्दासाठी ''मित्रे चर्षौ'' हे सूत्र तयार करून आर्षप्रयोगांना शास्त्रीयत्व दिले आहे.'' म्हणून महाराज म्हणतात-

न कोणि केला सुविचार याचा । म्हणोनि हा सार्थक यत्न साचा ॥१६॥

-असे असल्यामुळे हे मात्रावृत्तशास्त्र पूर्णत्वाला जावयास हवे होते. परंतु जेवढे झाले तेवढे देखील बरेच आहे. महाराजांनी ध्रुवपदमात्रा, अंतरापूर्वदलमात्रा आणि उत्तरदलमात्रा व त्यांची उदाहरणे देऊन सर्व माहिती लिहून ठेवली आहे. तेवढ्यावरच ''दुधाची तहान ताकावर भागविणे'' या न्यायाने समाधान

मानणे भाग आहे.

वृत्ताचे नांव	धृपदमात्रा	अंतरार्पूवलमात्रा	उत्तरदलमात्रा	उदाहरण
१.कमलारंगी	१०	१६	१०	जमुनातीर खडी...

१२२ज़ननीवृत्त ...

(टीप :- जेथे मात्रांचा नियम लागत नाही तेथे अक्षरगण बसविण्याचा महाराजांचा विचार होता.)

या गाथेमध्ये मराठी, वऱ्हाडी, हिन्दी, व्रजभाषा आणि संस्कृत या पाच भाषेत भक्तिरसाने ओथंबलेली आणि रागतालादि संगीताचे सर्व नियम लावून गेय झालेली सव्वादोन हजार पदे आहेत आणि त्यांची २४ प्रकरणात विषयवार वाटणी केलेली आहे. तसेच त्यात सात आख्याने व १२-१३ प्रकरणे आहेत.

१.मंगलाचरण २.रूपपर ३.नामपर ४.संतपर ५.सद्गुरूमहिमा ६.उपासना ७.करूणा ८. भक्ती-वेदान्त ९-ज्ञानपाठ १०.उपदेश ११.श्रीकृष्णलीला १२.विरहिणी १३.प्रणयकलह १४.पौराणिक लीला १५.योग १६. रूपक १७.प्रभाती १८. संकीर्ण १९. स्तुतिसंग्रह २०. तुंबडी २१. स्त्रोगीते २२. आरत्या

२३.आख्याने- १.जंबुफलाख्यान २.चिंधीचे आख्यान ३.सखूचे आख्यान ४.राधाविलास ५.उलूखलबंधन ६.यज्ञपत्नीआख्यान ७.हरिहराख्यान -

२४. अक्ललकोट स्वामींचे स्तवन २५. योगवासिष्ठ २६. दृष्टिसृष्टिवाद २७द्रौपदीचा धावा २८. रुक्मिणी पत्रिका २९. रुक्मिणी स्वयंवर ३०. विश्वरूपदर्शन ३१. रासक्रीडा ३२. दशमस्कंदसार ३३. रामायण आणि ३४. संस्कृत पदे असा बराच मोठा विस्तार आहे.

संस्कृतात - शशिधर प्रियकर कमलाकांत मुखमुरलीलोलम् ।
वंदे गोपालम् ।।२२१७।। कमलारंगीवृत्ती, राग- छायानट, ताल- तेताला,
प्रभाती- उठा अनंता श्रीभगवंता फार वेळ जाहला ।।२०८७।।
रूपक- अनाजने आदमीको खाया ।।१५४०।।
सद्गुरूपासूनि बाई, नवल आयकिले । तीन वर्षांच्या कुमारिकेला वृद्ध बाळक झाले ।।१५३९।।

वगैरे वेदान्त अर्थाने भरलेली पण विनोदाच्या रूपकात असल्यामुळे ''कूट'' झालेली अशी रूपकपर पदे देखील मनोरंजक आहेत.

कटाव, लावणी वगैरे वृत्तातील रचना मनोहारी आहे. संतकवींनी लावणीवृत्तात रचना केलेली फार कमी आढळते. पण महाराजांचा माधुर्यभाव व्यक्त होण्यास लावणीसारखी प्रभावी शैली नाही. माधुर्याची सर्व लावण्यमाधुरी लावणीतून रसिकाच्या मनाला विद्ध करते. या आंधळ्या गौळणीच्या पदांची बहार काही औरच आहे.

महाराज कशाला पाहता माझ्याकडे । सहा महिने झाले तुमसि मसि वाकडे हो ।।ध्रु.।।
मी गालावर कर ठेवूनि ढळढळ रडे । तुम्हाला सटवी सवतचि बहु आवडे ।
घ्या आदर करूनी, उचलुनी खांदे कडे । लवंढिचे जातही नाही अझुनी मढे हो ।।१४४६।।
काय करू मज काही सुचेना, अक्कल गेली जळून । मेल्या दैवानं घेतलं पिळून ।।ध्रु।।
रडुं कोणाच्या पुढे साजणी गळा मोकळा करून । कोण समजावल पोटसी धरून ।
अभिसार करूं तरि दोन्ही नयन आंधळे । करूं दान तरी तांदुळ ना जोंधळे ।।

या आंधळ्या गोपीच्या विरहज्वाला अती तीव्र आहेत. हृदयाला जाळणाऱ्या आहेत. महाराजांचे

कोमल हृदय तर यात व्यक्त होतेच पण ती पीडा रसिकालाही हरिवियोगाने पेटवून टाकणारी आहे. आणि शेवटी या विरहिणीचे आंधळेपण आणि घरात जोंधळेही नसल्याची अगतिकता पाहून मूर्तिमंत कारुण्य उभे राहते.

असा हा पदसंग्रह म्हणजे लालन-वात्सल्यापासून तर मधुर कारूण्यरसापार्यंत भक्तीतील सर्व रंगीबेरंगी छटा आसमंतात पसरवून टाकणारा आणि त्यातील सौरभाने सर्व दिशा धुंद करून टाकणारा माधुर्यरसकल्लोळ आहे. या अमृताचा बिंदू जरी चाखून अनुभवला तरी देखील आकंठ तृप्ती मिळेल. तुका म्हणे श्रेष्ठ ग्रंथ ज्ञानदेव। एक तरी ओवी अनुभवा ।। त्याच माउलीच्या प्रिय कन्येचा हा अमृताहुनी गोड असा संगीतकलश असल्याचा रसिकांना अनुभव येईल.

८६. अलौकिक प्रवास

(यष्टी२)

यात कथारूपाने महाराजांनी उपदेश केला आहे. दोघे मित्र फिरावयास जातात तेव्हा तहानेने व्याकूळ होतात. त्यांना एक तळे दिसते. त्यातून पाण्याचे चार दांड निघून पुनः परस्पर मिसळले असतात. असा विचित्र देखावा दिसत असतो.

या रूपकावर महाराजांनी देवयोनी, मनुष्ययोनी, पश्वादितिर्यक् योनी व स्थावर योनी यांच्या प्रतिमा बसविल्या आहेत. दृष्टांताने वर्णन केले असल्यामुळे विषय वाचनीय झाला आहे. शेवटी वैराग्य उत्पन्न हाऊन ज्ञानप्राप्तसाठी एक मित्र आपल्या मित्ररूपाने असलेल्या गुरूला शरण जातो, अशी लेखाची परिणती आहे.

८७. अमोघनिरूपण

(यष्टी २, निबंध)

ॐ कार म्हणजे प्रणव. त्यासंबंधीचा हा निबंध महाराजांनी अगदी लहानपणी चांदूरबाजारच्या कुर्याभाईंना सांगितला आहे. ओंकाराचे वर्णन करून त्यासंबंधी बरीच नवनवीन माहिती यात आली आहे. प्रणवाची सिद्धी करून त्याचे मनोमय, प्राणमय व वाङ्मय असे तीन भेद व त्यांची कार्ये सांगितली आहेत. प्रणवाचे माहात्म्य आणि राम-कृष्णांच्या नामांची त्याचेशी तुल्यता वर्णन करून ॐ कार जपाचे विधान केले आहे.

८८. बौद्ध निबंध

(यष्टी१५)

या प्रश्नोत्तरात्मक त्रोटक अर्पूण्लेखात, केवळ बुद्धीच्या द्वारा देखील धर्म सिद्ध होतो, याचे विवेचन आढळते. बौद्ध याचा अर्थ ''बुद्धधर्मसंबंधी'' असा नसून ''बुद्धीने निश्चित होणारा'' असा आहे.

या दृश्य जगात चिरस्थायी समाधान म्हणून नाही. हजारो पुरुष भुकेने व्याकूळ होतात तेव्हा एखाद्याला उदारपणाचे समाधान मिळते. ते देखील क्षणभर. पण क्षणिक समाधान पुरेसे वाटत नाही म्हणून समाधानाची वृद्धी करण्याची तृष्णा वाढतच गेलेली दिसते. पण विचार करून अदृश्य तत्त्वाकडे अंतःकरणप्रवाह जाऊ लागला म्हणजे दया हा गुण वृद्धिंगत होऊ लागतो. अनेकांच्या अन्नावर आणि शुश्रूषेवर पोसले जाणारे शरीरही विचारवंताला नकोसे होते. तेव्हा कुठे सुखासमाधानाची वाढ झालेली अनुभवास येते. म्हणून तृष्णा आहे तोपर्यंत जगातील कोणीही दुःखबेडीतून मुक्त होणे शक्य नाही, असा सिद्धांत निष्पन्न होतो. हे सर्व अध्यात्मशास्त्राचे व सर्व धर्माचे बीज आहे. त्यासाठीच धर्माचरण वगैरेचा

आश्रय करून अखंड सुखप्राप्तीचा प्रयत्न केला पाहिजे,असा हा धर्मशास्त्राचा विषय केवळ बुद्धीने देखील, शुद्ध विचार केला असता निष्पन्न होतो, असे या निबंधात मांडले आहे.

८९. वेदांतनिरूपण

(संस्कृत-मराठी, यष्टी१५ अ२, ओव्या२५)

या संस्कृत-मराठी मिश्र असलेल्या अपूर्णप्रकरण ग्रंथामध्ये प्रथम संस्कृत श्लोक, त्यावर संस्कृत भाष्य व त्यावर मराठी ओवीबद्ध भाष्य असा क्रम आहे. पहिल्या आह्निकात ब्रह्माचे लक्षण व मायेचे लक्षण सांगितले असून १.ब्रह्म २.माया ३.जीव ४.ईश्वर ५.जीवश्वरभेद ६.मायेचा ब्रह्माशी संबंध; या सहा अनादि पदार्थांचे सांग विवेचन आले आहे. दुसऱ्या आह्निकात सृष्टीच्या उत्पत्तीचा क्रम सत्तात्रयवादाप्रमाणे सांगण्यात आला आहे.

९०. सिद्धिसार

(यष्टी१५ दोन प्रकरणे)

योगशास्त्रात ज्या सिद्धी सांगितल्या आहेत त्या सामान्य लोकांना चमत्कार वाटतात परंतु त्या प्रत्येकाचे ठिकाणी बीजरूपाने असून स्वाभाविक आहेत. प्रयत्न केला तर त्यांचा विकास होत असतो. मनाला बाह्य विषयापासून परावृत्त करून ते एकाग्र केले की सिद्धी तर प्रगट होतातच, आणि बाह्य विषयांची जरूर न लागता स्वाभाविक आनंद मिळू लागतो.

हे सिद्ध करीत असताना महाराजांनी पाश्चात्य उत्क्रांतिवादाच्या विचारसरणीबाबत मूलगामी विवेचन केले आहे –

*अमीबाच्या उत्क्रांतिपूर्वी ज्ञान होते की अज्ञान? याचा विचार केला आहे. डॉ. ड्रप्स वगैरे विद्युन्मानसशास्त्रवेत्त्यांचा परामर्श घेतला आहे.

*उत्क्रांतिवादाचा शेवटचा दुवा मानव असला तरी त्यालाही इतर प्राण्यांपासून शिकण्यासारखे गुण आहेत. कोंबड्यापासून योग्य वेळी जागणे, कुत्र्यापासून इमानीपणा, गाढवापासून संतोष भंगू न देणे वगैरे अनंत गुण माणसाला घेता येण्याजोगे आहेत. पण -

* योगाचा अभ्यास केला तर हे सर्व गुण आणि सिद्धी आपोआप मिळतात आणि त्या बाह्य नसून बीजभूत आणि स्वाभाविक आहेत असे कळून येते.

दुसऱ्या प्रकरणात *स्पेन्सरचे खंडन केले असले तरी ''क्रिया व कर्ता एका शक्तीचेच परिणाम'' या त्याच्या मताचे स्वागत केले आहे. नास्तिक लोक बाह्य अशा जडाला खरे समजून वाद करतात तर आस्तिक ''चेतन जो अहं'' त्यावर भिस्त ठेवून चालतात. या सर्वांचा परामर्श घेऊन चेतनाशिवाय जडत्व असे मुळीच नाही, असा निष्कर्ष निखळ युक्तिवादाच्या साह्याने महाराजांनी काढला आहे. शेवटी ज्ञान म्हणजे काय याची सांगोपांग चर्चा करून 'आपले साक्षीस्वरूप जाणून घेणे' हे वेदान्ताचे तत्त्व तर्कनिकषावर देखील कसे तावून सुलाखून सिद्ध होते योच विवेचन या त्रोटक प्रकरणातही वाचावयास मिळते.

९१. अलौकिक व्याख्यानमाला

(यष्टी५, नऊ व्याख्याने पाने-१७३)

या व्याख्यानांच्या प्रारंभी महाराजांनी संबोधित केले आहे.''सर्व दृश्य आणि अदृश्य सभासदांनो'' हे पहाताच आपण शांत आणि उदात्त वातावरणात जातो आणि ही वातावरण निर्मिती अगदी शेवटपर्यंत टिकून राहते. विचारांची पातळी कधी खाली येत नाही. सावकाश रीतीने ती विश्वप्रेमापर्यंत जाऊन पोचते.

नंतर सत्पुरुषांच्या सहवासाने ध्यान-धारणा-समाधीपर्यंत महाराज वाचकाला घेऊन जातात.

या सुरवातीला विचारकांचे दोन प्रकार केले आहेत. १. दृश्यवादी आणि २. अदृश्यवादी! दृश्यवादी साऱ्या विश्वाची उभारणी दृश्य अशा जडावर उभारतात तर अदृश्यवादी अदृश्य अशा चेतनाला विश्वाचा पाया समजतात. पण ज्ञानाचे साधन मात्र दोघांचेही एकच आहे. ते म्हणजे चित्त. त्या चित्तासंबंधी महाराजांनी अगदी मानसशास्त्रीय पद्धतीने विचार करून पाश्चात्य जडवाद्यांचे उत्तम खंडन केले आहे.

ज्ञानाचे साधन जे मन ते शुद्ध व अशुद्ध या दोन प्रकारचे असते. अशुद्धचित्त नेहमी देहास चिकटून असते तर शुद्धमन हे देहास सोडून अदृश्यभावांकडे ओढले जाते आणि निग्रहाने प्रयत्न केला असता परमेश्वर ओळखण्यास कारणीभूत होते. हा विषय नेहमीच्या व्यावहारिक दृष्टांतांनी समजावून देऊन ही चित्तचिकित्सा व्यवस्थित केलीआहे.

आपल्या मनाची शाश्वत सुखाची इच्छा सच्चिदानंद ब्रह्माचा आनंदांश व्यक्त करते. अशुद्ध अवस्थेत हेच प्रेम देहापुरते मर्यादित असते तर शुद्ध दशेत तेच विश्वव्यापक होऊन जाते. याची सांग परिपूर्ण माहिती तिसऱ्या व्याख्यानात आली आहे.

या प्रेमाच्या उन्नतीसाठी गुरुभक्तीची आवश्यकता प्रतिपादन केली आहे. या संदर्भात गुरू कसा असावा? शिष्याने त्याचेशी कसे वागावे? गुरूने गुरूचे गुरुत्व कसे सांभाळावे? वगैरे गुरुशिष्य संबंधविचार सखोल मांडला असून भोंदूगिरी व आजची शोचनीय अवस्था यांचाही गंभीर विचार केला आहे.

स्वप्न, संभ्रम, संकल्प, स्वानुभूतिपरंपरा या अलौकिक प्रमाणांचे लौकिक व वैदिक प्रमाणांपेक्षा श्रेष्ठत्व सांगितले असून त्यांच्या द्वारा अद्वैत ज्ञान आणि शेवटी परमप्रेमरूपा भक्ती कशी मिळवून घ्यावी यांचा विचार केला आहे. हे सर्व मांडत असताना उत्क्रांतिवाद, संशयवाद, अणुवाद, आत्मतेसंबंधीचे वाद, शून्यवाद वगैरे अनेक पाश्चात्य विचारांवर युक्तिवादाने मात करून आर्य-सिद्धांत बिनतोड पटवून दिले आहेत. श्रुती, युक्ती व अनुभव या प्रमाणत्रयीच्या आधारावर अदृश्यभाव हाच सर्व विश्वाचा आधार असून तोच सत्-चित्-आनंद रूपाने विश्वातील प्रत्येक प्राणिमात्राचे गन्तव्य ध्येय असल्याचे सिद्ध केले आहे.

आजच्या बुद्धिवादी युगात मानसशास्त्रीय दृष्टीने विचार करून, अगदी तर्कनिष्ठ पद्धतीने भारतीय आणि पाश्चिमात्य विचारसरणींची तुलना करून, या ग्रंथात महाराजांनी पारमार्थिक सिद्धांतांचे मूलगामित्व, सर्वस्पर्शीत्व आणि श्रेष्ठत्व अप्रतीम रीतीने मांडलेले आहे.

९२. युक्त्या

(यष्टी१८ समयोपदेश)

महाराजांचा 'युक्तिवादाने परमार्थातील प्रमेये पटवून देण्याचा बाणा आहे.' त्यानुसार यात सर्वत्र युक्तिवादावर भर दिलेला आहे. या प्रकरण ग्रंथात एकूण तीन युक्त्या असून पहिल्या युक्तीत सामान्य चेतनाची म्हणजे ब्रह्माची सिद्धी केली आहे. दुसऱ्या युक्तीत सांख्य व वेदान्त यांचा समन्वय केलेला आहे. तिसरीत अतिव्याप्ती असंभव वगैरे प्रमाणातील दोषसांगून लक्षण आणि प्रमाणासंबंधी युक्तिसंपन्न विवेचन केलेले आहे.

९३. गुरुचरण कौमुदी

(यष्टी१८ समयोपदेश)

पंचदशीवर मराठीमध्ये टीका करण्याची महाराजांनी सुरुवात केली. होती. एकूण तेवीस श्लोकांव निरूपण झाले आहे. अगदी सोप्या भाषेतील महाराजांचे विवेचन बालांपासून वृद्धांपर्यंत सर्वांना सहज समजेल असे आहे.

९४. निरूपण

(यष्टी१८ समयोपदेश)

जेथे दोन महात्म्यांचे बोलणे परस्पर विरुद्ध असते ते वस्तुविषयक असेल तर समन्वय होत नाही पण क्रियाविषयक असल्यास समन्वय होऊ शकतो. हा विषय मांडतांना चार्वाक मताचे खंडनही महाराजांनी यात केले आहे.

९५. साधुबोध

(यष्टी८,प्रश्नोत्तरे९३८)

''साधुबोधात मुख्यतः प्रश्नोत्तररूपाने धर्म व व्यवहार या दोन्ही विषयांची उत्कृष्ट चर्चा केली आहे. या प्रश्नोत्तरात समर्पकता व मार्मिकता विलक्षण भरली आहे ती इतकी की असे प्रश्न विचारणारा व त्यांची उत्तरे देणारा यांना खरोखरच धन्यवाद आहेत. महाभारतातील यक्षप्रश्नांची आठवण हा ग्रंथ वाचून होते.

या ग्रंथातील प्रश्नांनी धर्म व व्यवहार यातील शेकडो कानेकोपरे उत्तम रीतीने धुंडाळले असून त्यांच्या उत्तरांनीही असा सुस्पष्ट प्रकाश पाडला आहे की वाचकाला सुचलेल्या स्वतःच्या शंकांचे निरसन तर होतेच पण त्यासारख्या कितीतरी शंका असू शकतात हे पाहून आश्चर्य वाटते

.''खडे तात्त्विक बोल व सुटी सुभाषिते'' हा उत्कृष्ट ज्ञानप्रद वाङमयाचा एक चांगला नमुना व कसोटी आहे. ती कसोटी या ग्रंथाला अगदी पुरी लागते'' असेसाहित्यसम्राट नरसिंह चिंतामण केळकर म्हणतात ते अगदी खरे आहे.

चवथ्या आवृत्तिमध्ये सूची तयार केलेली आहे. साधारण सव्वीस प्रकरणे आहेत. ईश्वर,भक्ती, योग, संगीत, इतिहास, सुधारणा, कौटुंबिक वगैरे.

२- ईश्वर कोठे असतो? : जेथे ज्याची पूज्यबुद्धि असेल तेथे.

५८- कपटी कोण? : वारंवार शरण येऊन चुकी करतो तो.

४२०- अति काय सोडावे? : भगवत्प्रेमावाचून सर्व काही.

४२१- नास्तिक कोण? : दुसऱ्यास धर्म सांगून आपण वागत नाही तो.

७९७- इतिहास व शास्त्रातील फरक. इतिहास कसा लिहावा, याचे मुद्देसूद मार्गदर्शन. ० नोकर कशाने वठणीस येतात? ० पतीचे केव्हा ऐकू नये? ० तोंडवर गोड व कडू बोलण्यावरून कोणाविषयी काय समजावे? ० कोण कोण कडू बोलले असता काय काय करावे? ० पाहुण्यांचा सत्कार कसा करावा? ० घरातील फूट कशी नाहीसी करावी? वगैरे अनेक विषयांवर थोडक्यात समर्पक उत्तरे दिली आहेत. ती वाचली की सुभाषितासारखी ती लक्षात राहतात हे या ग्रंथाचे वैशिष्ट्य आहे.

९६. मणि-मंजूषा

(यष्टी २,मणी १३५)

साधुबोधग्रंथात प्रश्न व नंतर उत्तर असा क्रम आहे. पण या मणिमंजूषा प्रश्न नसून केवळ उत्तरेच आहेत असे म्हटल्यास चालेल. रामकृष्णपरमहंस किंवा विवेकानंदांची वचनामृतांची जी लहान

लहान पुस्तके आहेत तशीच रचना असल्यामुळे परमार्थाच्या साधकांकरता आणि व्यावहारिक तत्त्वे समजावून घेण्यांना ही मणिमंजूषा उपयोगी आहे. या मंजूषेतील विचारमणी साधकांच्या जीवनाला मार्गदर्शन देण्यास समर्थ आहेत.''तुका म्हणेश्रेष्ठ ग्रंथ ज्ञानेदवी । एक तरी ओवी अनुभवावी'' ही संतोक्ती येथेही लागू होते असे म्हटल्यास वावगे होणार नाही.

९७. सुवर्णकण

(यष्टी१८ समयोपदेश,कण-४२)

यात लहान लहान परिच्छेद आहेत. त्यांना क्रमांक दिलेले आहेत. प्रत्येक परिच्छेदाचा विषय भिन्न भिन्न असून तेवढ्यातच प्रस्तुत विषयाचे पूर्णनिरूपण महाराजांनी केले आहे. म्हणून यांना सुवर्णकण हे नामाभिधान यथार्थ असल्याचे दिसून येते. मणिमंजूषेया ग्रंथात समाविष्ट होण्यासारखे हे बेचाळीस सुवर्णकण आहेत.

९८. स्वमंतव्यांश-सिद्धांत-तुषार

(हिंदी. यष्टी६ प्रश्नोत्तरे१२९ पाने६२)

संवादरूपाने रचलेला हा हिंदी ग्रंथ माधुर्यभक्तीची अथपासून इतिपर्यंत सांगोपांग चर्चा करून भक्तीची पुनर्स्थापना करण्यात अग्रेसर आहे असे म्हणावयास हरकत नाही.

तुम्ही कोण आहात? तुम्ही येथे कलियुगात कशाला आलेत? भक्ती म्हणजे काय? प्रेम म्हणजे काय? प्रेमाचा विषय कोण? वगैरे नानाविध प्रश्न यात विचारले आहेत. त्या सर्वांची समर्पक उत्तरे वाचून मनाला समाधान होते आणि बुद्धीला परतत्त्वस्पर्शाचा आभास होतो.

महाराजांना भक्तीची स्थापना करण्याची आज्ञा श्रीनारदाचार्यांनी दिलेली आहे. असेवाचून ग्रंथकर्त्याविषयी आपल्या आशा आकांक्षा उंचावतात आणि ग्रंथकाराचा अनुभव आकाशासाखा व्यापक असल्याचा प्रत्यय येऊन, त्या पूर्णही होतात.

रामावतारात वनात रामाला पाहून तेथील ऋषिमुनींना रामाला आलिंगन देण्याची इच्छा होते पण राम त्यांना ''मी या अवतारात मर्यादा घालून घेतली आहे म्हणून कृष्णावतारात गोपिका होऊन मला आलिंगन द्या'' असे सांगतात. श्रीकृष्णच पूर्णावतार असून त्याचीच माधुर्यभक्ती करता येते. असा सिद्धांत उपनिषदे, पुराणे आणि गीतेच्या प्रमाणांनी महाराजांनी सयुक्तिक मांडला आहे.

निर्गुणापेक्षा सगुणात गोडी जास्त आहे. निर्गुणापेक्षा सगुणाची भक्ती कमी कष्ट देणारी व अन्वय प्राप्त करून देणारी आहे. ज्ञानाच्या किंवा योगाच्या समाधीनंतर व्युत्थानदशेत विषयांचा द्वेष राहत असल्याने वृत्ती उदासीन असते. पण भक्ती असेल तर सर्व नामरूपे सगुण श्रीहरीची आहेत असा चिद्विलासाचा प्रत्यय आल्यामुळे सर्वत्र श्रीहरीचे प्रेमच भरून जाते. अन्वय पूर्णपणे साधतो. ''समाधी व्युत्थानी हरि विलसे'' असा अखंड समाधीचा अनुभव येऊन तो जीवन्मुक्तदशेत विचरण करतो. ही अद्वैतभक्ती निराकरणीय नसून फलस्वरूपा आहे.

यात सर्व जगत स्वप्न असून, ब्रह्मज्ञानसहित अद्वैतभक्ती हीच खरी जागृती आहे, असा सिद्धांत योगवासिष्ठाच्या आधाराने मांडला गेला असल्यामुळे या ग्रंथाला अपूर्वता आली आहे. असा हा हिंदी ग्रंथ तत्त्वज्ञानाच्या अभ्यासूंना अत्यंत उपयुक्त आहे.

९९. दुर्मतहृदयभंजन

(यष्टी१५)

उपलब्ध असलेली चार पाने म्हणजे ग्रंथाचा केवळ प्रारंभ आहे.पण तोही इतका मार्मिक आहे की महाराजांनी पुनः येऊन केव्हा तरी तो सांगावा व आपण ऐकावा अशी रुखरुख मनाला लागून जाते. ''दुर्मत'' याचा अर्थ ''शांकर अद्वैताच्या विरोधी मते'' असा महाराजांनी केला आहे.यात नास्तिकाचे खंडन तर आहेच पण सांख्य, न्याय, मीमांसा वगैरे आस्तिक दर्शनांचेही खंडन आले आहे.

संस्कृतमध्ये पूर्वाचार्यांनी असे दुर्मतखंडन पुष्कळ करून ठेवले आहे पण मराठीत मात्र हा ग्रंथ, पूर्णझाला असता तर वैशिष्ट्यपूर्ण झाला असता.

१००.प्रश्नोत्तरे

(यष्टी१५ प्रश्न-१६)

स्वतःची उन्नती कशी करून घ्यावी, वगैरे प्रश्नांची उत्तरे देऊन अगदी थोडक्यात युक्तिवादाच्या सहाय्याने ज्ञान-भक्तीपर्यंतचे विषय महाराजांनी यात घेतले आहेत.या त्रोटक रचनेमध्ये धर्म, नीती, ईश्वर, महात्मे, योग, गुप्तविद्या वगैरे विषयांसंबंधी कमीत कमी शब्दात पण सोप्या रीतीने मूलभूत मांडणी केली आहे.महाराजांची शिष्यबोधाची हातोटी पाहून बुद्धी थक्क होऊन जाते.हा ग्रंथ साधुबोधातच समाविष्ट करावयास हवा.

या तीनही ग्रंथात व्यवहारापासून परमार्थापर्यंत खूप विषयांवर मूलभूत आणि निश्चयात्मक विचार मांडून बालापासून वृद्धांपर्यंतच नव्हे तर ज्ञानी भक्तांपर्यंत सर्वांना मार्गदर्शन केलेले आहे.

१०१वृत्तिक्षीरसागर

(यष्टी१५)

तत्त्वानुसंधान, अद्वैतकौस्तुभ, वेदान्तपरिभाषा, शिखामणि वगैरे संस्कृतात ग्रंथ आहेत.हिंदीमध्ये स्वामी निश्चलदासांचा वृत्तिप्रभाकर ग्रंथ आहे.पण त्यात दादूपंथी सिद्धांताचे मिश्रण असून वेदान्तसिद्धांताचा संकोच झाला आहे. म्हणून महाराजांनी ''वृत्तिक्षीरसागर'' ग्रंथ रचला. पण त्यातील फक्त एकच प्रकरण उपलब्ध आहे.

स्वप्नामध्ये सर्व वृत्ती व विषय आत्मचैतन्यानेच प्रकाशित असतात तसेच जागृतीतही आहे, असे सांगून वृत्तीचे प्रमा व अप्रमा असे प्रकार करून विषयाचा विस्तार केला आहे.

दृष्टिसृष्टिवाद हा सृष्टिविषयी आहे ब्रह्माविषयी नाही, म्हणून ब्रह्माची ज्ञातसत्ता होऊ शकत नाही.तसेच शुद्धब्रह्म, अनध्यस्तविवर्त ईश्वर, वेद व श्रीगुरू यांचे ठिकाणी दृष्टिसृष्टिवादाप्रमाणे मिथ्यात्व येत नाही, याचे युक्तिबद्ध विवेचन वाचावयास मिळते. हा ग्रंथ पूर्ण झाला असता तर वेदान्तातील सत्ताद्वयावादाच्या तत्त्वप्रणालीच्या आधारावर भक्तीचे सुसूत्रत्व व शास्त्रीयत्व मराठी वाचकांच्या निदर्शनास आले असते.

१०२.बालबुद्धिविवर्धिनी

(यष्टी१८ समयोपदेश)

हे प्रकरण म्हणजे पिता आणि कन्येचा मार्मिक संवाद आहे.यात शिक्षण, सुखदुःखांचे प्रकार, विश्वास, बुद्धी वगैरे संबंधी शास्त्रीय माहिती सोप्या रीतीने पित्याने मुलीला करून दिली आहे.त्यात पुढे प्रमेय व्यवहारसंबंधी विषय सुरू होऊन ग्रंथ अपूर्ण राहिला आहे.

१०३.पत्रव्यवहार- ११९ पत्रे

(संस्कृतात ११ व मराठीत / पत्रे / लेख / समीक्षा : यष्टी१,यष्टी२,यष्टी७,यष्टी१२)

पत्रे हा अत्यंत दृश्य स्वरूपाचा भावात्मक स्फुट वाङ्मयप्रकार आहे.यात रसात्मकतेचा सुखद अनुभव देण्याचे उदंड सामर्थ्य आहे.मनाचा स्वाभाविक जिव्हाळा यात ओथंबलेला असतो.महाराजांच्या पत्रांतून तत्त्वबोधामुळे प्राप्त होणाऱ्या अर्थगरिमेला भावमाधुर्याबरोबर वैचारिक सौंदर्याचीही जोड मिळालेली आहे.महाराजांच्या प्रेमळ व्यक्तिमत्वाचे रम्य दर्शन घडविणारी काही पत्रे आहेत तर कठोर होऊन मंडळीला वठणीवर आणणारी रौद्रदर्शन घडविणारी काही पत्रेही यात आहेत. परंतु दोन्ही ठिकाणी जातिवंत कळकळच शब्दाशब्दात उमटलेली दिसते. साधी धावती भाषा, हितगुजात्मक मजकूर, सुटसुटीतपणा यात आहे. महाराजांवर प्रेम करणाऱ्या मंडळींची पारमार्थिक उन्नती करण्यासाठी असलेल्या जिव्हाळ्यातून ही सर्व पत्रनिर्मिती झालेली आहे.प्रत्येक पत्र हे त्या त्या व्यक्तीला पारमार्थिक अनुभव घेण्यासाठी दिलेली वेदान्ताची प्रक्रिया आहे, असाच त्या प्रत्येकाचा अनुभव आहे.सत्पुरुषांना लोकांची अवनती पाहवत नाही.जवळ आलेल्या लोकांचा पारमार्थिक विकास करावा ही महाराजांची अंतःकरणापासून इच्छा होती.प्रभुसंमित आणि सुहृत्संमित असा उपदेश त्यांच्या वाणीतून स्त्रवत होता. आज्ञापरतंत्र अशा शिष्यांना स्पष्ट शब्दात योग्य समज देऊन महाराज कधी त्यांचे दोषापनयन करीत तर कधी ज्यांना परमार्थांसाठी संसार सोडवत नाही त्यांना स्वैरकथा निरूपण करून प्रेमळ मित्राच्या रूपाने सन्मार्गावर आणण्यासाठी प्रयत्नांची शिकस्त करीत; असे या पत्रसंभारावरून दिसून येते.

प्रथमयष्टीतील ताईला पाठविलेली अकरा पत्रे तर योगमार्गाची प्रक्रियाच आहेत. त्यात योगमार्गाची माहिती आहे.निर्गुण सोहंचा उपदेश आहे.व नंतर सगुणाचा साक्षात्कार कसा होतो, याचेही वर्णन आहे आणि ताईंच्या भीतीचे निराकरण करतांना, –

तूं जरी गेलीस नरकात । तरी मी होऊनी तव सुत ।
उद्धार करीन निश्चित । मग भय व्यर्थ कां जननी ।।४।। (पत्र ७)

-असा भरंवसा देतात.एके ठिकाणी तर 'मी तुला विश्वरूपही दाखवीन' असे आश्वासन महाराजांनी दिले आहे.स्वतः निर्गुणाचा अनुभव घेऊन सगुणावर प्रेम अर्पण करावे ''निर्गुणहोवोनी सगुण भोगावे'' हो पूर्णब्रह्मानंदानुभव आपल्या अनुयायांना प्राप्त व्हावा, यासाठी महाराजांनी साक्षेपाने सतत प्रयत्न केल्याचे या पत्रांमधून दिसून येते.

सातव्या यष्टीत तीव्र मुमुक्षा नसेल तर परमार्थाकडे हळूहळू प्रवृत्ती होण्यासाठी, परमार्थाला विघातक होणार नाही असा व्यवहार कसा करावा याचे त्यांनी विवेचन केले आहे.स्त्रीने पतिव्रताधर्म, पुत्राने मातृपितृसेवावगैरे स्वतःचे धर्म सोडू नयेत.तीव्र मुमुक्षा जोपर्यंत होत नाही तोपर्यंत धर्माचरणच करायला हवे. पण तीव्र मुमुक्षा झाल्यानंतर मात्र गुरुसेवा हाच मुख्य धर्म ठरतो. वगैरे नानाविध प्रकारच्या अधिकाऱ्यांना त्यांच्या त्यांच्या अधिकारानुसार मार्गदर्शन केलेले आहे.स्त्रीपुरुष-चातुर्यविषयक पत्रामध्ये व्यवहारात क्षुल्लक वाटणाऱ्या गोष्टीतही कसे वागावयास हवे, याचे मार्मिक विवेचन आढळते.

महाराजांचे त्यांच्या पत्नीला लिहिलेले पत्र आणि पत्नी निर्वतल्यावर शब्दबद्ध झालेले कारुण्य जेव्हा पत्नीप्रेमपरागरूपाने उमटते तेव्हा ''मला काटे आहेत पण तू या गुलाब फुलाला चिर विरहाने सुकवू नकोस.''सौरभ मिळेलतुजची, जीवन सुकवूनि, न पाकळ्या गाळी.'' गुलाबाच्या पाकळ्या गळू देऊ नकोस'' अशी भावनोत्कट करुणा वाचकाच्याही हृदयाला हेलावून सोडते.

भगवान् श्रीकृष्णाला म्हणजे पतीला लिहिलेले पत्र माधुर्यरसाने ओथंबलेले आहे.तसेच पुत्रशोक निवृत्तिसाठी लिहिलेला वैराग्योपदेश आणि चिदाकाशातील वर्णन वाचून महाराजांच्या आध्यात्मिक

सामर्थ्याचीही कल्पना येते.

नागपूरकर मंडळींचे व्यावहारिक व पारमार्थिक दोष दूर करण्यासाठी लिहिलेली पत्रे अभ्यसनीय आहेत. सद्‌गुरूचा उपदेश घेतला तरी आरुढपतीत होण्याची जी भीती असते, त्या दृष्टीने ती पत्रे महत्वाची आहेत. ही पत्रे म्हणजे साधकांना धोका दाखविणारे दीपस्तंभ आणि हिम्मत देणारे आधारस्तंभ आहेत.

प्रश्नकदंबा योगी, ज्ञानी व स्वतःला आत्मज्ञानी भासविणारे साधू, यांना ओळखण्यासाठी प्रश्नमालिका दिली आहे. यात फक्त प्रश्न आहेत उत्तरे मात्र नाहीत. यापत्रांचा अभ्यास करणारा भोंदूगिरीमध्ये सहसा फसणार नाही.

या पत्रसंग्रहात निबंधरूप पत्रे आहेत. बहिणाबाईच्या अभंगाचे रसग्रहण आहे. डार्विन-स्पेन्सरचे खंडन आहे. संगीतावर भातखंडेशी विचारविनीमय आहे. ब्राह्मणब्राह्मणेतर वादाचा खंडनमंडनपूर्वक निर्णय आहे. महाराज स्वतः शूद्र असून त्यांची वेदनिष्ठा व शास्त्रनिष्ठा इतकी मजबूत आणि खोल रुजलेली आहे की पाहणारा थक्क होतो. त्यांची ''स्वजाति बांधवांस विनंती'' या सात पत्रात बहुजन समाजाबद्दल कळकळ आहे, दोष दूर करण्याची तळमळ आहे, शिक्षणाविषयी आस्था आहे पण त्यासाठी वैदिक धर्माचा बळी देण्यास ते मुळीच तयार नाहीत. ''धर्माविषयी अतूट श्रद्धा आणि स्वजातिबांधवाच्या नैतिक उन्नतिसाठी आत्यंतिक प्रयत्न'' असा सहसा न आढळणारा सुरेख मिलाफ या पत्ररूपी निबंधांमध्ये आढळतो. सर्वत्र जातिवंत कळकळच शब्दाशब्दातून उमटलेली दिसते.

जिव्हाळ्याच्या मंडळींना लिहिलेली पत्रे वात्सल्याने परिपूर्ण आहेत. हे वात्सल्य मंडळींना परतत्त्व स्पर्शापर्यत नेऊन सोडण्याला समर्थ आहे. नागपूरकर मंडळींना असलेली पत्रे विचार शुद्ध करण्यासाठी प्रवृत्त झालेली दिसतात. परस्पर प्रेमवृद्धी होऊन आध्यात्मिक आणि वैश्विक प्रेमापर्यंत घेऊन जाणारी ही पत्रे मनाला आश्वस्त करतात. आपण चुकलो तरी महाराज उपेक्षा करणार नाहीत; साम दाम दंड भेद या सर्वांचा वापर करतील, पण आपली अधोगती होऊ देणार नाहीत अशी खात्री वाटते.

ही पत्ररूपाने असलेली निबंधरचना पाश्चात्यमतदुर्विदग्धांना नामोहराम करून भारतीय आध्यात्मिक संस्कृतीची आणि त्यातल्या त्यात मधुराद्वैत संप्रदायाची पताका सर्वोच्च फडकवितांना दिसते. असा हा पत्रसंग्रह भावमाधुर्याबरोबर वैचारिक उंचीची जोड मिळाल्यामुळे अप्रतीम झालेला आहे.

१०४. स्त्रीगीते

(यष्टी२, अ५, गीते-१६३ / पाने-२४)

१०५. स्त्रीगीतसंग्रह

(यष्टी४ गीते-१२५५)

पहिला ६ प्रकरणांचा लहानसा १६३ ओव्यांचा एक प्रकरण ग्रंथ असून दुसऱ्या ग्रंथात १०९२ ओव्या आहेत. सद्‌गुरुभक्ती साधनदशेपासून सिद्धदशेपर्यंत कशी चढती वाढती असते व तीच पुढे फलरूपा कशी होते; वगैरे वेदान्तविचाराने भरलेली, अगदी अडाणी स्त्रियांनाही समजेल अशी, श्रवणमधुर प्रासादिक रचना आहे. या सर्व ओव्या गेय असून त्यांच्या आठ चाली आहेत. १०९२ ओव्या दळणकांडण करताना, झोपाळ्यावर किंवा भोजनप्रसंगी रचल्या गेल्या आहेत. त्याही अर्थमाधुरीने ओथंबलेल्या आहेत.

या स्त्रीगीतांची रचना महाराजांनी त्यांच्या पत्नी व प्रियशिष्या असलेल्या सौ. मनकर्णिकादेवी

यांच्या सोबत केलेली आहे. झोपाळ्यावर बसून दोघेही मिळून गोड गळ्याने ही गीते म्हणत तेव्हा सर्वजण तल्लीन होऊन जात. मातोश्रीचे कंठमाधुर्य महाराजांच्याच तोडीचे होते. दोघेही मिळून गाणी म्हणूं लागत तेव्हा त्या प्रसंगाला अपूर्वबहार येत असे.

जेवण प्रसंगी केलेलीरचना तर भाजी तिखट झाली, पोळी जाड झाली वगैरेसारखी असून विनोदछटायुक्त आणि मोहक आहे. लालन, वात्सल्य, माधुर्य वगैरे सर्व भावनांचे अविष्कार या गीतांतील अष्टविध चालीतून प्रकट होत असताना त्यातील सामवेदीय स्वरांची श्रवणमधुर लकेर ऐकणाऱ्यांच्या हृदयाला भेदून जात असे; असे तत्कालीनांनी वर्णन केले आहे.

महाराज हे गोपीभावाने श्रीकृष्णपत्नीरूप झाले होते. स्त्रीभावातील प्रेमाची उत्कटता ही त्यांना सर्वोत्कृष्ट वाटते. त्या परिपूर्ण प्रेमात त्यांनी स्वतःच्या सर्व वृत्ती श्रीकृष्णाला अर्पण केल्या. पुरुषत्वाचा अभिमान नाहीसा होऊन, तत्सुखसुखित्वरूप प्रेम प्राप्त होऊन, पूर्ण अद्वैतस्थिती अंगी बाणविण्यासाठी, त्यांनी ज्ञानेश्वरकन्या होऊन भगवंताचे पाणिग्रहण केले.

''वासुदेवः पुमानेकः स्त्रीरूपम्- इतरं जगत्''

हे मीराबाईनी रूपगोस्वामींना दिलेले उत्तरच जणु काय त्यांनी साकार करून दाखविले. अशा प्रकारे स्वतः स्त्रीत्व बाणवून मायबहिणीच्या नात्याने इतर स्त्रियांना केलेला हा उपदेश महत्वाचा आहे. प्रापंचिक विषयातून सोडवून गुरुप्रेम, हरिहरोपासना, अद्वैतज्ञान आणि पराभक्ती या क्रमाने त्या काळातील स्त्रियांची पारमार्थिक उन्नती करण्याचा महाराजांचा हा प्रयत्न आजच्या धकाधकीच्या काळातही स्त्रियांना मार्गदर्शक आहे. यातील रचना इतकी सोपी आणि वेधक आहे की ती वाणीवर सहज रेंगाळत राहते.

मायबाप बंधू । सोयरे गणगोत ।
संसारी बुडविती । धरूनि माझा हात ।।(पा. ६)
जंव वरी धन । तोवरी या ना या ना ।
आपुल्या अर्थासाठी । लोक म्हणती काका नाना । (पा. ६)
संसार दुःखमूळ । विंगळ्याचा माज । किंचित सुख येथे । नाही गुरूराया मज ।।(पा. ६)

ही सरळ सोपी रचना मनातील विषयांना दूर सारून क्षणभर कांहोईना पण वैराग्याचा विचार मनात ठसविते. सगुण निर्गुण समसमान आहेत हा एकनाथांचा उपदेशच -

सगुण विरलावस्था, ते निर्गुण । निर्गुणीं घनी भाव ग बाई । साकार नारायण ।।७२६।।

या ओवीने किती सोप्या रीतीने सांगितला आहे ते लक्षात येईल.

प्रथम वैराग्य होण्यासाठी सुवासिनी स्त्रियांनी परमेश्वर म्हणूनच पतीची सेवा करावी. पुढे वैराग्यादि साधनसंपन्न झाल्यानंतर मात्र सर्व संसाराचा त्याग करून सद्गुरूला शरण जावे व त्यांनी सांगितलेल्या मार्गाने ईश्वरोपासना करून भक्तिसंपन्न व्हावे आणि शेवटी जीवन्मुक्तिसुख अनुभवूं लागावे, असे येथे उपदेशिले आहे.

देवाची दंभपूजा । पतीलागी वांकुडे । तिचा व्यर्थ गेला जन्म । कल्पवरी नर्की पडे ।।१७।।
स्वासीनी बाईयांनो । भावे करा पतिसेवा। विधवांनो तुम्ही मनी । आठवा रमाधवा ।।१८।।
ओळविलेल्या मना । पुनः विषय न द्यावे । ऊन हिंव सुख दुःख । अंगे सहन करावे ।।२४।।
वैराग्य झाल्यावरी । सोडावा सर्व संग ।।३०।।
गुरूसी शरण जावे । निर्लज्ज होऊनिया ।।३१।।

गुरूचे गुणदोष । पाहूच नये ग कधी ।।

अशाप्रकारे विसाव्या शतकाच्या सुरवातीला स्त्रियांना केलेला उपदेश त्यांना मानसिक समाधान आणि पारमार्थिक मार्गाची जोड करून देणारा आहे. पारमार्थिक तळमळ लागल्याशिवाय भगवत्सुख प्राप्त होणे शक्य नाही. म्हणून संसाराविषयी वैराग्य शिकवून स्त्रियांना परमार्थाच्या सर्वोच्च टोकावर नेऊन बसविल्याची अनेक उदाहरणे महाराजांच्या चरित्रातून व पत्रव्यवहारातून दृष्टोत्पत्तीस येतात.

अशा या लोकगीतात्मक स्त्रीगीत संग्रहातील कविता म्हणजे
महाराजांच्या गोड वाणीतून निघालेला, अमृतत्व प्रदान करणारा,
अनाहत नादातील मुरलीरव आहे की,
ती सामवेदीय सूक्ते आहेत याचा संभ्रम होतो.

१०६. तुंबडी

(वऱ्हाडीभाषा / यष्टी२ अ६ ओव्या१८४)

(सुमदगंधछंद)

तुंबडी नावाच्या गांवठी वाद्यावर खेडवळ लोक निरनिराळ्या प्रसंगी पोवाडे, गाणी, वगैरे लोकगीते गावून मनोरंजन करीत असतात. या वाद्याचे सूरच असे असतात की भावना एकदम उत्तेजित होऊन स्वतःचा विसर पडतो.

एकदा शुक्लेश्वर वाठोडा (विदर्भ) येथे पयोष्णी नदीच्या तीरी काही मंडळी भांड्यात खडे भरून तुंबडीवाल्याची नक्कल करून लागली. तेव्हा महाराजांनी तुंबडीवाल्याच्या भाषेत वेदान्ताची तत्त्वे गोवून ही रचना केली.

यातील सुमदगंधछंद आपल्या नावाप्रमाणेच आहे. ''मद'' हा वाईट पण हा ''सुमद'' आहे. त्याच्या गंधातील मदामुळे जी लय लागते ती मनाला उन्मत्त करून परमार्थाकडे लावणारी आहे. प्रवचनादिंच्या श्रवणामुळे तितका परिणाम होत नाही, परंतु ही तुंबडी ऐकता ऐकताच भावना उद्दिपित होऊन अगदी वृद्धांपासून तो मुलांपर्यत सर्वजण मंत्रमुग्ध होऊन जातात, तल्लीन होतात. .

यातील भाषा अगदी खेडवळ आणि प्रसंगी ग्राम्यही आहे. पण मुलांच्या बोबड्या भाषेत बोलले तरच त्यांना कळते त्याप्रमाणे खेड्यातील लोकांना शहरी भाषा दूरची वाटते. त्यांना ग्राम्य भाषेतूनच चटकन कळते. म्हणून प्रसंगी अगदी शिव्याही देऊन वेदान्त-भक्तीपर्यंत सर्व काही परमार्थ अस्सल वऱ्हाडी लोकभाषेत महाराजांनी आणला आहे.

लेकराबाळामंधी साल्या व्यर्थ जन्म गेला । होवोनिया वृद्ध नाही कां बे मेला ।।
कोण आहे तुम्हाला बे म्हातारपणी वाली । मराल तुम्ही, जसी तुमची माय बहिण मेली ।
म्हणूनी मी सांगते ते ऐका तुंबडीवाली ।।

अशा रांगड्या भाषेतील वैराग्याचा उपदेश कोणाच्या हृदयाला भिडणार नाही?

शास्त्राचा हा सार, ब्रह्म खरे, जग खोटे । यावाचून आणिक काय, सांगति शास्त्र गोटे ।।

हा वेदान्ताचा सार कोणा अडाण्याला समजणार नाही! निष्काम कर्म, उपासना, ज्ञान, वैराग्य, भक्ती वगैरे सारे काही या तुंबडीत ठासून भरले आहे, तेही अगदी हलके आणि पचेल असे! निष्काम कर्म केले की काय होते ते महाराज सांगतात -

तेव्हा वाढे भोगाविण मनाचा उल्हास । प्रपंचाचे ठायी मन सहज उदास ।

राग, द्वेष, काम, क्रोध, सर्व मागे सारा । बाईल पुत्र धनावर मुता तीन धारा ।।१७।।
भोंदूं साधूंचा समाचार घेताना ते म्हणतात -
हागरे मुत्रे होऊ पाहती साधूच्या समान ।।
शब्दगर्वे मोडताती नीतिधर्म कोंब ।। वेदान्त सांगति जैशी शिमग्याची बोंब।

या प्रमाणे सर्व परमार्थाचा सार या लोकभाषेतील तुंबडीत आणून ठेवला आहे. यातून महाराजांची लोकहितदक्ष प्रवृत्ती दिसून येते.

१०७. रुक्मिणी स्वयंवर

(यष्टी ९(उ.)पदांची गाथा क्रमांक १३६५/ वऱ्हाडीभाषेतील दडंगी लावणी २०)

लावणीवृत्तातील हे आख्यान विदर्भातील कुणबीभाषेत आहे.कुणबी भाषेतील सर्व लकबी यात उतरलेल्या आहेत. संस्कृतात व ग्रंथ लेखनाच्या प्रौढ भाषेत लिहिणारा कवी अगदी कुणबी भाषेतील वाक्प्रचार आणि बारकावे जसेच्या तसे आपल्या काव्यात आणतो, असे पाहिल्यानंतर दोन गुरुबरावमहाराज होऊन गेले असावेत, असा काही वर्षानंतर विद्वानामध्ये वादग्रस्त मुद्दा उत्पन्न होण असंभव नाही, इतकी या लावणीची शैली भिन्न आहे. यामुळे भाषाशैलीवरून ग्रंथकाराची भिन्नता मानण्याचा सिद्धांत अपुरा आहे, हे लक्षात येईल.

रुक्मिणीने द्वारकेला सुदेव ब्राह्मणाला पत्र घेऊन पाठविले, पण भगवंताचे रूप पाहतांक्षणी तो घरदार सारे काही भूला गेला.द्वारकेला तो महिनाभर राहिला आणि भल्ली मोठी दानदक्षणा घेऊन वापसी निघाला. तेव्हा त्याला रुक्मिणीनेदिलेल्या पत्राची आठवण आली. म्हणून परत आला आणि कृष्णाला पत्र दिले. पत्र वाचताच श्रीकृष्णाच्या डोळ्यातून अश्रुधारा वाहू लागल्या.
देववाचिता भीमकिपत्र आसा येति डोया ।।१०।।
काही नको माह्यासंग रथ, हत्ति घोडे ।।
माडीवरती बसुनिशिन्या मंग येई ते पारी । तशीच मंग घालिन खांद्यावरी ।।११।।
मोहरा मग देल्या काहाडुन ।।

वगैरे अगदी कुणबाऊ भाषेतील रचना लावणीवृत्तामुळे नादमधुर झाली आहे.असे हे सुरेख आख्यान वाचनीय तर आहेच पण श्रवणीय देखील आहे.

१०८.रुक्मिणी पत्रिका

(यष्टी९/उ.पदांची गाथा.पदे ७६९- ७७६ / वऱ्हाडी, आर्या ८)

आर्यावृत्तात केलेल्या या आठ आर्या मराठी आणि हिन्दी दोन्ही भाषेत आहेत. रुक्मिणी विनंती करते की,
हीच विनंती प्रभुजी न स्त्रीलिखितास तुच्छ मानावे ।।१।।
रुक्मिणीने लिहिलेल्या पत्रिकेचा सारांश यात आला आहे.शेवटी हिंदीमध्ये असलेल्या आर्येत रुक्मिणी म्हणते,
तुमबिन ये जग भासत मोहे, सब मायामय सपना ।।८।।
भगवंता तुझ्याशिवाय हे सारे जग मायामय खोटे असे स्वप्नच आहे, असा स्वानुभव रुक्मिणी भगवंताला निवेदन करते.याप्रमाणे ज्ञानोत्तर भक्ती येथे रुक्मिणीने व्यक्त केली आहे.

१०९. श्रीज्ञानेश्वरमातृपितृभावनाष्टक

अपराध-क्षमापन स्तोत्र

(यष्टी २उ पा २-५)

मातृपितृभावनाष्टकामध्ये महाराजांनी आपली लालन भक्ती ज्ञानेश्वरमाउलीच्या चरणांवर समर्पण केली आहे. गुरुमाऊलीच्या कोमल पायांवर नमन केले की आपली जड काया देखील ब्रह्मरूप होऊन जाते, असा स्वानुभव त्यात सांगितला आहे. स्वतःचा अधिकार नसताना कृतार्थ केल्याबद्दल कृतज्ञता त्यांनी व्यक्त केली आहे. या माधुर्य आणि प्रसादयुक्त स्तोत्रात स्वागता, वसंततिलका, उपेंद्रवज्रा, शार्दूलविक्रडित इत्यादी वृत्तांत रचना आहे.

ज्ञानेश्वरक्षमापन स्तोत्र हे शंकराचार्यांच्या शिवापराधनमापन स्तोत्राचे अनुवादरूप आहे. पण तेही स्वतंत्र स्तोत्राएवढेच रसपूर्ण आहे. त्यात महाराज स्वतःबद्दल म्हणतात,

स्वांगीचे लपवोनि दोष जगती साधुत्व संपादिले ।
श्रीज्ञानेश्वरसद्गुरूजननिये अन्याय कीजे क्षमा ।।११।।

मी इतका पापी आहे तरी पण तुम्हाला योग्य दिसेल तसे करावे.

११०. कृष्णपंचपदी

(हिंदी-मराठी यष्टी २पू पा१-३)

या पांच कडव्यांमध्ये तीन मराठी व दोन हिंदी आहेत. महाराजांचा गोपीभाव होता. त्यांनी श्रीकृष्णाला पती मानून उपासना केली. तोच भाव या पांचही पदांमध्ये उत्कटतेने व्यक्त झाला आहे. उपदेश करतांना मिळमिळीत शब्द महाराज कधीच वापरत नाहीत.

अंधा हो परधन परनारी किमपि मन नाही लाना बे ।
संतसंगमो अंग धुमाकर तनकी आग बुझाना बे ।।
दारा पुत्र गोत्र वित्त हे नाशिवंतचि सकळ हो ।
भवपुरीमध्ये तुमची विभुविण कोण करील कळकळ हो ।।

अशा प्रकारचा रोखठोक उपदेश क्षणभर का होईना पण मनाला मानवतो. शेवटच्या पदात गोपीभावाने जे भगवंताला आळविले आहे ते कानामध्ये गुणगुणत राहते.

सावळ्या गोपीरमाणा ये बापा ये ।।ध्रु०।।
नाथाघरिचे पाणि वाहता म्लान जाहली कांती ।
आता देवा मम हृन्मंदिरी नित्यचि घे विश्रांति ।।

अशी ही माधुर्यप्रेमाने रसरसलेली आणि उपदेशाने भरलेली ही पंचपदी काव्यगुणांनी देखील नटलेली आहे.

१११. गुरुपंचपदी

(हिंदी/यष्टी२ कडवे-६)

पहिल्या पदात देव आणि गुरु यांची तुलना केली आहे.

* देव अवतार घेतात आणि शेवटी निजधामाला जातात तर श्रीगुरू हृदयात वास्तव्य करतात आणि चिद्रूपाने विश्वात भरून जातात.

* देव दुखःरूप जड जगाचा पूर्णपणे नाश करीत नाही पण श्रीगुरु त्या जगालाच चिन्मय करून टाकतात.

गुरुशिवाय प्रेम-ज्ञान वगैरे प्राप्त होऊ शकत नाही. महाराज आपला भक्तीसिद्धांत यातही

सांगतात.''ज्ञानेश्वरकन्या सब जनको ब्रह्मज्ञान-उपर भक्ति सिखावे'' ब्रह्मज्ञान झाल्यानंतर अद्वैतभक्ती कशी करावी हे मी शिकविते'' असे महाराज म्हणतात.

दोरीवर भासणाऱ्या सापाप्रमाणेच ब्रह्मावर भासणारे जग आत्मज्ञानाने बाधित झाल्यावर श्रीगुरुकृपेने सत्संग मिळतो आणि रासेश्वर श्रीकृष्ण हृदयातच प्रकट होतात.''हृदयमाहीं प्रभू रसके रंगा'' अशी मनोहारी पदरचना व्रजभाषेत केलेली आहे.ही नेहमीची हिंदी वाटत नाही.उत्तर हिंदुस्थानातील ग्रामीण भाषाच वाटते.पण ही देखील साधी आणि प्रासादिक आहे.आपले हृद्‌गत प्रकट करण्याकरता महाराजांना कोणतीही भाषा चालत असे.त्यांच्या भावनेची उत्कटता आणि विचारातील तर्कनिष्ठुरता संस्कृत, हिंदी किंवा व्रजभाषा यातील कोणत्याही भाषेतून तेवढीच प्रकट होताना दिसते जेवढी मातृभाषा मराठीतून! हा महाराजांचा विशेष या पंचपदीतही व्यक्त झाला आहे.

११२. आत्मचरित्र

(यष्टी १५)

महाराज जन्मांध असूनही ज्ञानी, भक्त व सर्वसिद्धिसंपन्न होते.असे असूनही व्यवहारात मात्र त्यांच्यात आणि त्यांच्या शिष्यवर्गात किंचित मनोमालिन्य झाले असल्याचे त्यांच्या आत्मचरित्रातून दिसून येते.महाराजांनी शिष्योन्नतीसाठी स्वीकारलेल्या असत्याभासाला सत्य समजून त्यांच्याच शिष्यांनी महाराजांविषयी संशय घ्यावा, मनात अढी ठेवावी हे पाहून उद्विग्न वाटते.श्री बाबाजीमहाराज पंडितांसारख्या शिष्यवरासंबंधी ''मी पंडिताला वश झालो'' असे महाराजांनी उद्गार काढले ते अपवादभूतच! पण इतरांचे बाबतीत त्यांना बरेच वेळा हार खावी लागली.तरी देखील त्यांनी ज्याला आपला म्हटले त्याला सोडलेनाही.उलट जन्मोजन्मी तो पूर्ण होईपर्यंत त्याला आधार देण्याचेवचन दिले.असे असूनही महाराजांना त्यांच्या मंडळीकडून जो त्रास झाला त्याचे कारण त्यांनी स्वतःकडेच घेतले आहे.त्यांनी शिष्यांमधील दोषच दाखविले असते तरी कदाचित् त्यांचेजवळ कोणी राहिलेही नसते.

महाराजांनी शिष्योन्नतीसाठी शिक्षणाच्या तीन प्रकारांचे अवलंबन केले.

१.लालन रूपाने रक्षण करणे :- या दशेत शिष्याला गोड बोलून प्रेम उत्पन्न करावे लागते. वे.शा.सं.श्रीनिवासशास्त्री हरदासांच्या बाबतीत महाराजांनी शेवटपर्यंत हेच केलेले दिसते.

२.पालन :- दोषापनयन करीत असताना रागावणे, मारणे, स्वतःचे दोष दाखविणेवगेरे अनेक प्रकार करून शिष्याची वृत्ती कितपत चळते याची परीक्षा घ्यावयाची असते.त्यात तो उत्तीर्ण झाला की मग ''आपणासारिखे करिती तात्काळ'' असा अनुभव श्रीगुरु प्रदान करतात.

३.स्वातंत्र्य :- शेवटी शिष्याला स्वातंत्र्य प्रदान करणे.हेतिन्ही प्रकार श्रीबाबाजीमहाराज पंडितांचे ठिकाणी महाराजांनी योजिलेलेस्पष्ट दिसून येतात.उलट लालनदशेतील शास्त्रीबोवांना महाराजांनी शेवटपर्यंत कसे निभावून नेले याचेच आश्चर्य वाटते.दोषापनयन या दुसऱ्या दशेत नानाजी कवीमंडन, मुळे मास्तर, जीजीबाई वगैरेंचे मनात संशय उत्पन्न झाले पण महाराजांनी तेही सहन केले व त्यांचे दोषापनयन करण्याचा कसोशीने प्रयत्न केला.तो कितपत साधला हे या प्रकरणग्रंथात दिसत नाही पण त्यामुळे महाराजांना बराच मानसिक त्रास झाला एवढे मात्र खरे! महाराजांवर प्रेम असूनही नानाजी त्यांना जेवणाचे बाबतीत वाटेलते बोलत, त्यामुळे जेवणाचे बाबतीत आग्रह करणारा महाराजांना शत्रूसारखा झाला.असो.

या आत्मचरित्रात, ''अस्माकं सुचरितानि एव सेव्यानि नो इतराणि'' हे श्रुतिवचन महाराजांनी सार्थ करून दाखविले आहे.माझे दोष असे असे आहेत तिकडे लक्ष देऊ नका, किंवा त्यांचे अनुकरण

करू नका असे महाराजांनी स्पष्ट सांगितलेआहे.महाराज म्हणतात, ''मी पैशासाठी असत्याभास करीत होतो त्यामुळे महाराजही प्रसंगी असत्याभास करतात तर मग आपणास करावयास काय हरकत आहे?'' असा मंडळीचा समज माझ्या या दोषामुळेच झाला. माझ्यात थोडेसे दोष असले तरी मी मोठा भगवद्भक्त व विद्वान आहे असे मंडळीला वाटूं लागल्यामुळे मला त्यांना सोडवेना व माझ्या आज्ञेप्रमाणे त्यांच्याच्याने वागवेही ना! अशी स्थिती झाली.''

१. थिआसॉफिस्ट लोकांपासून शास्त्रीबुवांचा संग तुटावा याकरता ''शास्त्रीबुवांनी माझी पुस्तके विहीरीत टाकली'' असे मी भक्ताकडून थिआसफिस्ट लोकांना सांगितले. तेव्हा शास्त्रीबुवांचे मनावर ''मी खोटे बोलणारा आहे'' असा विलक्षण परिणाम झाला.

२. एकदा शास्त्रीबुवांनी उसने घेतलेल्यांच रुपये भालेरावांनी शास्त्रीबुवांच्या पगारातून, त्यांना न कळता, मला काढून दिले; तेव्हा नुसता साधु नसून याच्या व्यावहारिक ढंगही आहेत असा विचित्र परिणाम झाला.

३. एकदा भालेरावच्या घरात भांडण लागले तर बरे असे मी सुचविले.

४. तरुण मुलांच्या हातूनच पुस्तके वाचून थिआसफीस्टांमध्ये इकडच्या तिकडे करविले.

५मुळ्यांजवळ शास्त्रबोवांची स्तुती करावी. शास्त्रीबुवाजवळ मुळ्यांची स्तुती करावी वगैरे अनेक गैरसमज मुद्दाम घडवून आणल्याचे महाराजांनी नमूद केले आहे. बापू हरदासच्या बाबतीत शास्त्रीबुवा, गंगाधरच्या बाबतील मुळे व नानाच्या बाबतीत तात्याजी कवीमडंन यांची मते माझ्या बाबतीत कलुषित झाली होती.

७. ''पुण्याच्या लोकांना काहीतरी विलक्षण चमत्कार पाहिजे होता त्याचा मी निषेध करीत असे. 'मी परस्त्रीगामी आहे' असे त्या लोकांना सांगून मी पुण्यातील कटकट टाळली.'' याप्रमाणे महाराज स्वतःसंबंधीचा प्रकार स्पष्ट नमूद करतात.

स्वतःच्या योगसाधनेसंबंधी महाराज बऱ्याच गोष्टी येथे सांगितल्या आहेत पण त्यांनी ''विष्णुपंत धामापुरकारांना जो प्राणामयाम सांगितला तो ग्रंथाप्रमाणे सांगितला. मी जसा करीत होतो तसा सांगितला नाही'' वगैरे बरीच नवीन माहिती या आत्मचरित्रात मिळते.

''साधुला कशा प्रकारच्या अडचणी येतात हाच या पुस्तकातून खऱ्या वागणाऱ्याने बोध घ्यावा'' हा आत्मचरित्राचा उद्देश जरी महाराजांनी सांगितला असला तरी शिष्याला मात्र यातून फार मोठा बोध घेण्याजोगा आहे. शिष्य क्षणोक्षणी अनेक अपराध करीत असतो. पण श्रीगुरूंचे शिष्यावर प्रेम असते म्हणून ते शिष्याच्या कुप्रवृत्तींना वळण लावण्याचा प्रयत्न करीत असतात. शिष्याच्या मनातील एकही कुप्रवृत्ती श्रीगुरूंना खपत नाही. पण त्यांच्या या प्रयत्नाविषयीच शिष्याने संशय घेतला तर बिचाऱ्या गुरुमाउलीला तर कष्ट होतातच पण शिष्याचीही उन्नती खुंटते. ''सद्गुरूचिया खेळा । लोणकरी सकळा । जीविताचे ।। ज्ञाने०।। हे प्रेमतत्त्व अंगी बाणवून मगच श्रीगुरूंचे सेवेत किंवा त्यांच्या सहवासात जावे. हेच साधकाने या आत्मचरित्रापासून घेण्याजोगे आहे.

११३. सूचनाप्रकरणम् १ - २ - ३

(यष्टी १ ओव्या २९ / यष्टी २ ओ १०)

सूचनाप्रकरणातील युक्तिवाद फारच मनोरंजक आहे.

मी नेणे शास्त्रव्युत्पत्ती । हे अवघेचि लोक जाणती । नये व्याकरण मजप्रती । पुण्यपतनांती श्रुत हे ।।९।। माझे असत्य भाषण । मंडळी सर्व जाणे आपण ।।११।। हे पातक लेखन । जरी म्या नसते

लिहिलेसे जाण । तरी असत्य भाषण । दोष मजवरी ।।१३।। आणि सत्य लिहिले असेल जरी । तरी ही पापे मजवरी । एवं पाहता दोहीपरी । पापनिष्ठ मी ।।१४।।

अशाप्रकारे बिनतोड युक्तिवाद केला आहे.तो कशासाठी तर स्वतःचे दोष दाखविण्यासाठी! ही नम्रता आणि युक्तिनिष्ठता पाहून इतर आत्मचरित्रांपेक्षा यात काही तरी वेगळे आहे हे निश्चित जाणवते.

येथे आधुनिक आत्मचरित्र-लेखनाचे निकष लावले तर मनाचा मोकळेपणा, सत्यावादिपणा, इतरांना दोष न देण्याची प्रवृत्ती वगैरे बरेच गुण दिसून येतात. परंतु इतका चांगुलपणा आजच्या प्रसिद्धियुगात बसतो की नाही याबद्दल मात्र संशयच आहे. दुसरा महात्वाचा मुद्दा असा की येथे सत्यान्वेषणाला महत्व नसून ''बोधपरता'' हाच या आत्मचरित्राचा गाभा आहे.

११४. आख्याने : अभंगाची १९ / पदांची ७

भक्त आपल्या मनातील भक्तिभाव त्या त्या आख्यानातील प्रसंगांच्या निमित्ताने भक्तकवी साकार करीत असतात हा भक्तीपर आशय कवीच्या अंतःकरणाचेच दर्शन घडवून देत असतो. त्यामुळेच या आख्यानातील कारूण्य, दीनता वगैरे कोमल भाव श्रवण केले असता रसिकही द्रवित होतात.अशी महाराजांनी रचलेली पदांची आणि अभंगांची आख्याने कीर्तनासाठी उपयुक्त आहेत.

पदांची ७ व अभंगांची १९ आख्याने आहेत. त्यातील काही अपूर्ण आहे. त्यातील पदांची आख्याने गेय आहेत.

अभंगांची आख्याने १८/ (यष्टी ९ पूर्वार्ध)

१. पूतनामोक्ष (अभंग३०) २. कृष्णतूला (अभंग४३)
३. पुण्यधामाचे (अभंग३९) ४. चिंधीचे आख्यान (अभंग३५)
५. भिल्लीणी-पार्थ (अभंग१५) ६. मृतिकाभक्षण (अभंग१८)
७. नौकाक्रीडन (अभंग२९) ८. निळी नारी (अभंग२५)
९. बिल्वमंगल (अभंग३) १०. सुरथ-सुधन्वा (अभंग४६)
११.कर्माबाई (अभंग३६) १२. अजापाल (अभंग२४)
१३. शुकगणिका (अभंग२४) १४. रंतिदेव (अभंग५)
१५.कुशिष्य (अभंग१५) १६. उपमन्यू (अभंग४५)
१७.नारायणदास (अभंग३०) १८ विमला-सुशीला (अभंग१७)
१९.पार्थगर्व हरण (अभंग५)

पदांची आख्याने ६ / (यष्टी ९ उत्तरार्ध पदांची गाथा)

१. जूंकल आख्यान (पदे ७९) २. चिंधीचे आख्यान (पदे ७५)
३. सखूचे आख्यान (पदे १२१) ४. राधाविलास (पदे७६)
५. उलूखलबंधन (पदे ४७) ६. यज्ञपत्नीचे आख्यान (पदे ६८)
७. हरीहराख्यान (पदे २२)

११५. पतिव्रताचरितामृत

(यष्टी१५ अध्याय४ ओव्या२३५)

भारतीय संस्कृतीत स्त्रीचे स्थान हीन दर्जाचे आहे असा गैरसमज पसरला आहे.याचे कारण एकच, ते म्हणजे तारतम्याचा अभाव!. व्यवहारदृष्ट्या स्त्री अबला असली तरी परमार्थदृष्ट्या तिचा

अधिकार आणि तिला दिलेल्या सोयी फार मोठ्या आहेत हे लक्षात घेतले जात नाही. पुरुषाला कठिण धर्म, कर्म आणि उपासना वगैरे आचरण्यास सांगितले आहे पण स्त्रीने पतीला गुरू व परमेश्वर समजून सेवाधर्म पाळला की तिला ईश्वरप्राप्ती होऊ शकते. स्त्रीचे स्वाभाविक कर्मच धर्मरूप आहे, उलट पुरुषाला त्याच्या स्वभावाला मुरड घालून कर्म व उपासना करावी लागते; आणि इतकेही करून शेवटी अन्ततो गत्वा स्वतःला स्त्री समजून माधुर्यभक्ती करावी लागते ती वेगळीच! स्त्रियेच्या भजने पुरुष बुडती । परी पतीच्या भजने स्त्रिया तरती ।। म्हणून पतिव्रता पतीपेक्षाही श्रेष्ठ ठरते.

व्यवहारदृष्ट्या स्त्रीला स्वातंत्र्य दिले तर पतिपत्नीचे परस्पर प्रेम नाहीसे होते. स्त्रीच्या लज्जागुणाचा नाश होतो व शेवटी संसारसुख देखील पूर्पाणे मिळू शकत नाही. आणि शेवटी व्यवहार व परमार्थ दोन्ही दुरावतात.

चार पुरुषार्था पैकी १. धर्माचे ठिकाणीच स्त्री दासी आहे. २. अर्थाचे बाबतीत मैत्रीण आहे. ३. कामपुरुषार्थात स्वामिनी आहे. आणि ४. मोक्षपुरुषार्थात तर ती स्वतंत्र असून पुरुषापेक्षा कैक पटींनी श्रेष्ठ आहे. कारण पुरुषालाही स्त्री होऊनच भगवंताला सर्व प्रकारचे प्रेम समर्पण करावे लागते. हा स्त्रीत्वाचा फार मोठ गौरव आहे.

* पतिव्रत्य पाळताना होणारे श्रम ती आनंदाने सहन करते. ते तिचे सहजकर्म असल्याने तिला अभिमान येत नाही पण पुरुषांना मात्र कर्म उपासनेचा अहंकार येतो व तो सोडण्याचा त्यांना पुनः प्रयत्न करावा लागतो.

* पुरुष धर्मपालन करताना कामना ठेवतो, संकल्प करतो. पण पतिव्रतेचे धर्मपालन निष्काम असते. ''तत्सुखसुखित्वम्'' हे तिला सहजच साधते. पतीला ईश्वर मानणे तिला किती सोपे जाते याचे महाराजांनी सविस्तर वर्णन केले आहे.

एवं पतिसेवेविण । न जाये सर्वथा क्षण । पतिचरणध्यानाविण । हृदय मन मोकळे नव्हे ।।

आणि शेवटी शेवटी तर तिला सर्व सृष्टी पतिरूप भासून लागते.

असा हा पतिव्रताधर्म भगवती उमामातेने स्वतः पालन करून तोच आदर्श सर्व जागपुढे ठेवला आहे. हीच माधुर्यभक्तीच्या संप्रदायाची स्थापना होय. पण या अपुऱ्या ग्रंथात केवळ पातिव्रत्याची महती व मीमांसाच तेवढी समाविष्ट आहे. चरितामृत या नावावरून अपूर्ण राहिलेल्या या ग्रंथात असेच काहीसे मधुरतम विचार आणि चरित्रे पुढेही आली असती असे वाटते.

११६. सुखपर्व नाटक

(संस्कृत-मराठीमिश्र यष्टी१५)

नाटके तर सर्वच लिहितात पण भगवद्भक्ताने रचलेल्या नाटकाची रचना, त्यातील आशय आणि काव्यगुणांचा आस्वाद घेताना एक विशिष्ट मनोभूमिका असावी लागते. जर भगवद्प्रेमाने चित्त कधीच द्रवत नसेल तर मात्र या नाटकाकडे त्याने दुर्लक्ष करावे हेच उत्तम!

सुरवातीला नांदीमध्ये महाराज म्हणतात, ''यातील कथा कल्पित नाही. शास्त्रीय असल्यामुळे विषय देखील कल्पित नाही. पण कार्य मात्र कल्पित आहे'' ते कार्य म्हणजे श्रोत्यांच्या अंतःकरणात प्रीतिप्रवाह निर्माण करणे.

भारतीय युद्धात झालेल्या आप्तसंहारामुळे पांडवांच्या मनात शोकसागर उसळला होता. आणि युधिष्ठिर तर अगदी कोलमडून गेला होता, त्यावेळी श्रीकृष्णांनी कुरुकुलाचा मनस्ताप शांत करण्यासाठी जो प्रयत्न केला त्यासंबंधीचे कथानक या नाटकाचा विषय आहे.

महाभारतातल्या अनेक व्यक्तींसंबंधी आज गैरसमज आहेत. त्याकालीही परस्पर गैरसमज होतेच पण -

''अपि चेत् सुदुराचारो भजते मां अनन्यभाक् । साधुरेव स मन्तव्यः ...।

या भगवद्वचनाप्रमाणे बाह्यतः दुष्ट किंवा दुराचारी असलेला कर्ण भगवंताला किती प्रिय होता याचे या नाटकात प्रत्यंतर येते.

कर्ण, धृतराष्ट्र, गांधारी वगैरेंची अंतःकरणे भगवंताच्या उत्कट प्रेमाने आर्द्र होती; पण त्या प्रेमाला एकटा भगवान्च साक्षी होता आणि तोच स्वहस्ते परहस्ते त्यांची प्रेमस्थिती उलगडून दाखवितो यातच या नाटकाचे सारसर्वस्व एकवटले आहे.

सुरवातीला भगवान् शंकर नारदांना युधिष्ठिराचा कर्णविषयक असलेला मनस्ताप दूर करण्यास सुचवितात -

''युधिष्ठिरस्य मनस्तापं यथोपशमेत् तथा आचरितव्यं भवता वीणापाणिना ।''

पुढे नारदमुनी पित्याकडे म्हणजे ब्रह्मदेवाकडे जातात तेव्हा ब्रह्मदेव त्यांना उत्थापन देऊन म्हणतात

''परमार्थी तो न म्हणावा आपुला''

या उक्तीचा मान मला ठेवलाच पाहिजे; असा पित्याचा पुत्रविषयक परमार्थसाधक व्यवहार पाहून विस्मय वाटतो.

चवथ्या प्रवेशात गांधारीला पुत्रशोकामुळे पांडवांचा त्वेष दाटून येतो पण युधिष्ठिराचा कोणताच अपराध न दिसल्यामुळे ती हृदयातच जिरवून टाकते. यात तिची भाविव्हलता आणि तिचा विवेक या दोन्हींचा संघर्ष दिसून येतो.

धृतराष्ट्रालाही क्रोधावेग येतो पण तेवढ्यातच ''पशुपक्षांकरिता देखील तिळतीळ तुटणारे युधिष्ठराचे अंतःकरण माझ्याविषयी किती कोमल आहे हे मी जाणत आहे'' असा विवेक त्याच्या अंतःकरणाचा ताबा घेतो.

विदुर म्हणतो ''धृतराष्ट्रा तुझ्या डोळ्यातून पडलेले अश्रुबिंदू धर्मज्ञ युधिष्ठिराच्या अंतःकरणाला ब्रह्मास्त्रापेक्षा अधिक झोंबत आहेत.'' या वाक्याने धृतराष्ट्राचेही क्रोधायमान अंतःकरण विदीर्ण होऊन जाते.

भगवान श्रीकृष्ण युधिष्ठिराला कर्णाबद्दल सांगतात -''सत्यप्रतिज्ञ कर्ण आपल्या निश्चयापासून यत्किंचितही ढळला नाही.''

कर्ण म्हणतो, ''मी पांडवाचा भाऊ आहे हे सांगू नको. तसे करशील तर महात्मा युधिष्ठिर राज्य करणार नाही.'' कर्णाच्या मनात युधिष्ठिराबद्दल केवढा आदर! कर्ण म्हणतो ''दुष्टान्न भक्षणे झालो दुर्मती । त्याचे प्रायश्चित पाहिजे मजला मरण''

भगवान् अर्जुनाला कर्णाविषयी स्पष्ट सांगतात-''माझा भक्त कधी नाश पावत नाही, हे तू पक्के समज. मी जसा तुझ्यावर प्रसन्न आहे तसा कर्णावरही आहे त्या महात्म्यासंबंधी भलताच समज करून चिडून जाऊ नकोस.''

सहाव्या प्रवेशातील युधिष्ठिर व अर्जुनाचे वाग्युद्ध विविध रसांनी मिश्रित आहे. कारुण्य, क्रोध, आदर, वैराग्य वगैरे अनेक परस्परविरोधी भावना एकत्र आल्या आहेत. आपल्याला ते वाचताना क्रोध केव्हा येतो व कारुण्यामुळे डोळ्यातून पाणी केव्हा येते हे कळतही नाही.

अर्जुन धर्मराजाला म्हणतो ''अशा वाग्बाणाने मला टोचून आपणाला काय पुरुषार्थ मिळत आहे? अहो, गुरुपेक्षाही भावाचा शोक आपल्याला ज्याअर्थीअधिक होत आहे, त्याअर्थी हा आपला धर्मप्रेम आहे की मोह? मला माझ्या प्रिय गुरूचा वध झाल्यामुळे हे जग शून्य भासत आहे. गुरुपुत्र अश्वत्थामा जेथे असतील तेथे मी निघून जातो. ते माझा वध करोत अथवा रक्षण करोत.''

पुढे लौमेशमुनी येतात व युधिष्ठिराला सांगतात - ''अश्वत्थामा यांची भेट घेऊनच अर्जुनाचा शोक शांत होईल'' पुढे ते कर्णाविषयी सांगू लागतात. पण तेथेच नाटक अपूर्ण राहते.

काव्य-नाटक-साहित्य-संमिश्रं नूतनं हितम् । रंजकं मोक्षदं शुद्धं नित्यमेतद् उपास्यताम् ।।

महाराजांनी वार्णिलेले हे सर्व गुण या नाटकात आढळतात. हे रंजक आहे, मोक्ष देणारे आहे पण पूर्ण नाही, याचेच दुःख वाटते.

भगवंताच्या सहावासात येऊनही अनेक व्यक्ती सदोष राहतात. पण त्यांचा भगवद्प्रेमाचा धागा मात्र अतूट असतो. त्याकडे पाहूनच भगवान् त्यांच्या दोषांकडे दुर्लक्ष करतात. महाराजांनीही तो प्रेमतंतू आपल्यापर्यंत आणून पोचविला आहे. त्याला अनुमोदन देणेहेच या नाटकाचे फलित!

११७. मात्रामृतपानम् (गंगामाहात्म्य)

(संस्कृतगद्य. यष्टी१६)

या अपूर्ण ग्रथांचे केवळ तीन अध्याय उपलब्ध आहेत. कलियुगामध्ये गंगा कायम राहील व तिचे पापनाशन सामर्थ्य कधीही नष्ट होणार नाही. हेमत महाराजांनी खंडनमंडनपूर्वक आणि समन्वय करून मांडले आहे. पाहिल्या अध्यायात श्रुतिवचनांचा म्हणजे वेदांचा आधार घेऊन व दुसऱ्या अध्यायात पुराणवाक्यांचा आधार घेऊन आपले विचार सद्युक्तिपूर्वक व प्रमाणपुरस्सर सिद्ध केले आहेत. यावरून महाराजांच्या मनात गंगेबद्दल किती पूज्यबुद्धी वसत होती हे दिसून येते.

११८. पत्नी-प्रेम-पराग

(मराठी विरहगीत. १४आर्या)

बालवयातील मातृवियोग आणि तारुण्यातील पत्नीवियोग यासारखे मोठे दुःख आणखी कोणतेही नाही. वयाच्या अगदी तारुण्यात २४व्या वर्षी महाराजांना त्यांची पत्नी सौ. मनकर्णिका यांचा चिरवियोग झाला. त्यातून हे काव्य साकारले. या विरहगीताची कालिदासाने लिहिलेला अजविलाप व जगन्नाथाचा करुणाविलास यांचेशीच थोडीफार तुलना होऊ शकते. परंतु जगन्नाथ पंडित आणि कालिदास हे दोघेही मोठे कवी होते जरूर पण संत नव्हते. त्यामुळे त्यातील कारुण्याला निराशेची झांकोळी आहे पण महाराजांच्या पत्नीप्रेमपरागात ''पुढील जन्मी घाली मज माळ'' या वाक्याने त्यातील कारूण्यरसकल्लोळांना पुनर्मीलनाच्या प्रकाशाची किनार लाभली आहे.

''मी अंध असून तुज सुदंरीकडून काम करविले म्हणून रागावून तूं काय परंधाम सेवितेस? मला सोडून परपुरुष रामाला वरतेस? अशा लहानशा अपराधाला कठोर शिक्षा देण्यासाठी तुझ्या कोमल हृदयाला ही नवीन गुरुदीक्षा कोणी दिली?''

''मी गुलाब आहे. मला कांटे असणारच. मी तुला एवढीच विनवणी करतो की तूं आपल्या हृदयात माझ्या रूपाने ''संकटकहि गुलाबफुल पाळी''

गुलाबाच्या पाकळ्या गळाल्यातर कोठले सौंदर्य आणि कोठला सुवास? म्हणून तूं विरहाग्नीने ''न पाकळ्या गाळी'' हृदयातून तरी मला घालवू नकोस.''

या प्रकारे रामाचा सीतावियोग आणि महाराजांच्या पत्नीप्रेमपराग यांची तुलना होऊ शकते.

महाराज म्हणतात ''रामही जानकीचा शोध करतो आणि मी त्या रामचंद्राचा दास! मला कुठले वैराग्य असणार!'' अशा प्रकारची विनम्र जाणीव महाराजांचे अंतःकरणात आहे.

संतसाहित्यात सहसा न सांपडणारे पत्नीप्रेम या महापुरुषाने आपल्या काव्यात साकार केले आहे, हे विशेष.कविकुलगुरू कालिदास व जगन्नाथ पंडित यांच्या विरहगीतांपेक्षा काही आगळेपण यांत निश्चितच आहे.

११९. श्रौतक्रीडाविशेष (कैवल्यपट / मोक्षपट / साप-शिडी)
(मराठी-संस्कृतमिश्र / यष्टि१५,पृष्ठ१९)

श्री महाराजांनी खेळतां-खेळतां वेदान्त शिकविला आहे. खेळाच्या मिषाने परमार्थातील भावना दृढ कशा कराव्या याचा जणुं अभ्यासक्रमच आखून दिला आहे.

रोज हा मोक्षपट खेळल्यास रात्री श्रीगुरु-देवतादिकांची स्वप्ने पडून पारमार्थिक मार्गदर्शनाचे आश्वासन महाराजांनी दिले आहे.

या लेखात भावना करून खेळणे अत्यंत महत्वाचे आहे. खेळतांना माझी सोंगटी स्वर्गात गेली, नरकात गेली किंवा मोक्षात गेली आहे न म्हणता ''मीच त्या त्या लोकात जाऊन सुखदुःखे भोगीत आहे'' अशी भावना दृढ करीत जाणे महत्वाचे आहे.

या १९पानी पुस्तिकेत खेळाचे सर्व नियम दिले आहेत. त्या नियमांचे उल्लंघन करण्याची सक्त मनाई आहे. नियमांसोबत २८५ स्थाने असलेला सापशिडींनी भरलेला हा मोक्षपट आहे. यातील सर्व स्थाने वेद, पुराणे, गीता, स्मृति आणि योगातील साधना मार्ग यांच्यातून घेतलेले आहेत. खेळखेळतां खेळतां या सर्व स्थानांचे म्हणजे त्रिभुवनातील लोकालोकांचे ज्ञान मिळते. पुण्य कोणते, पाप कोणते, याची स्पष्ट कल्पना येते. शिड्यांनी वर मोक्ष व शेवटी भक्तिपर्यंत जाण्याचे मार्ग आहेत तर सर्पांच्या द्वारा नरक-महानरक आदि खाली पतनाच्या मार्गांचे विवेचन केले आहे.

या खेळात मधून उठून जाता येत नाही. पारमार्थिक साधना म्हणून ही अतिशय उत्तम प्रक्रिया महाराजांनी सांगितली आहे. असा हा मोक्षपट भारतात एकमेव आहे. मुलांपासून वृद्धापर्यंत सर्वांनाच खेळातून मनोरंजन व त्यातून परमार्थ प्राप्तीचा मार्ग; म्हणून याला खूप महत्व आहे.

१२०. हरिपाठाच्या प्रतिज्ञा व
१२१. हरिपाठाचा अर्थक्रम

श्री ज्ञानेश्वरमाऊलीच्या हरिपाठाच्या २८ अभंगावर महाराजांनी प्रतिज्ञा म्हणजे प्रतिपाद्य विषय लिहिले आहेत. हरिपाठ हा लहानसा अभंगात्मक मंत्ररूप ग्रंथ आसून त्याचा नित्य पाठ करणाऱ्यांची अन्तकाळी आणि संकटाचे वेळी रक्षण करण्याची जबाबदारी माउलीने घेतली आहे.

वारकरी संप्रदायात ज्ञानेश्वरी, एकनाथी भागवत आणि ज्ञानदेवांचा हरपिाठ ही वेदान्तातील मराठी प्रस्थानत्रयी आहे. या हरिपाठात 'भगवंताचे निर्गुणस्वरूप हेच सगुणापेक्षा श्रेष्ठ आहे' वगैरे वेदान्तबाह्य कल्पनांचे या लहानशा ग्रंथात पूर्णपणे निराकरण केले आहे.भगवंताचा सगुणसाकार विग्रह, नामस्मरण, भक्ति वगैरे सर्वांचे अद्वैतज्ञानाच्या पार्श्वभूमीवर समन्वयात्मक विवेचन अगदी सोप्या भाषेत केले आहे. लहानापासून वृद्धांपर्यंत वारकऱ्यांची ही प्रातःसंध्या आहे.

जसे वेदांचे स्वरूप मंत्रमय असल्याने त्यांचा पाठ करतांना क्रम बदलता येत नाही पण

अर्थासाठी आणि वेगवेगळ्या यज्ञादि कर्मांसाठी विनियोगांचा क्रम वेगळा असतो त्यानुसारच हरिपाठाचे २८ अभंगांचे स्वरूप आहे. त्याचा पाठक्रम बदलता येत नाही. पण त्यातील विषय पाहून महाराजांनी नवा ''अर्थक्रम'' सांण्तिला आहे. याप्रमाणे संस्कृतातील वेद-वेदान्ताची परिष्कार पद्धती मराठीत आणून महाराजांनी वारकरी संप्रदायाला मोठे योगदान दिले आहे. तसेच वारकरी संप्रदायात हरपिाठाचे २७ अभंगच म्हणण्याचा परिपाठ आहे. पण महाराजांनी २८ अभंगांवर प्रतिज्ञा लिहून आणि अर्थक्रमानुसार मांडणी करून २८ वा अभंग माउलीचाच असल्याचे स्वीकारलेले आहे, हेही महत्वाचे आहे.

१२२. ज्ञानपाठ

(यष्टि ९, १६ अभंग १४४ ते १५९)

महाराष्ट्रातील सर्व संतांनी श्रीज्ञानेश्वर-तुकाराम-एकनाथादि सर्वांनी नामस्मरण सर्वश्रष्ठ साधन म्हणून गौरविले आहे. नराचा नारायण करण्याचे सामर्थ्य सर्वांत अधिक नामस्मरणात आहे म्हणून त्यांनी नामाचे महत्व गायलेले अनेक हरिपाठ लिहिले आहेत. महाराजांच्या संप्रदायात ज्ञानेश्वरांच्या हरिपाठाला प्रातःसंध्येचे महत्व आहे. पण यासोबतच महाराजांनी हा १६ अभंगांचा ज्ञानपाठ लिहून एक नवीन ज्ञानप्रक्रिया उकलून दाखविली आहे.

या ज्ञानपाठामुळे ज्ञान होते आणि ज्ञानाचे प्रारब्ध देखील पूर्णपणे अभिभूत होऊन जाते. संतसेवेने ज्ञानोत्तर भक्तीचे बीज अन्तः करणात अंकुरित होते. सगुण निर्गुणाचे ऐक्य होते. बहुतांश महाराजांच्या ग्रंथात ग्रंथपठनाची फलप्राप्ति शोधूनही सांपडत नाही परंतु भक्तिपदतीर्थामृताचेफळ भक्ति प्राप्त होते तसेच याही ज्ञानपाठाच्या नित्य आवर्तनाने ज्ञान-भक्तिपूर्ण परमार्थ साधला जातो हे फल सांगितले आहे.

ज्ञानपाठ ऐसा गाती नित्य कोणी । तया चक्रपाणी प्रसन्न हो ।
ज्ञानेश्वर कृपे सर्व मनोरथ । होऊनि परमार्थ राहती ते ।।१५९.

पाठ करणाऱ्याचेसर्व मनोरथ परमार्थरूप होऊन राहतील आणि त्याला चक्रपाणी प्रसन्न होवो, असा आशीर्वाद दिला आहे.

१२३. नवीन भाषा : 'नावंग'

१२४. नावंगचा शब्दकोश

(यष्टी १५)

महाराजांना एक नवीन भाषा आणि तिचे व्याकरण यांची रचना करावयाची होती असे दिसून येते. त्यांनी त्या भाषेचे नाव ''नावंग'' असे ठेवले आणि तिचे १४ नियम सांगितले. त्याप्रमाणे ''मराठी-नावंग'' असा शब्दकोशही तयार केला. ६५० शब्दांचा हा कोश आहे. पुढे क्रियापदे व धातु यांचेही काही नियम दिले आहेत. ही भाषा नवीन आहे. महाराज म्हणतात ''ही सर्व रूपे मराठी प्रमाणे बनविली आहेत. संस्कृतप्रमाणे केल्यास कर्मणीचा सर्वकाळी उपयोग होईल व स्वतंत्र प्रत्यय लागेल.''

या नियमावरून असे वाटते की ही स्वतंत्र नवीन भाषा निर्माण करण्याचा महाराजांचा प्रयत्न होता.

१२५. सांकेतिक लिपी / लघुलिपी

श्री गुलाबराव महाराजकृत लिपी

स्वर

अ		ऐ	
आ		ओ	2
इई		औ	2
उऊ		अं	
ए		अः	

व्यंजने

क		ह	
च		य	L
ट		ॐ	
त		श्री	
प			

- Maharaj Gulabrao


क
ख
ग
घ
ङ्
च
छ
ज
झ
ञ
ट
ठ
ड
ढ
ण
त
थ
द
ध
न
प
फ
ब
भ
म
य
र
ल
व
स
क्ष
ज्ञ

श्रीमहाराजांनी स्वतः चर्मचक्षुहीन असूनही डोळसांकरिता नवीन लिपी तयार करून दिली हे एक आश्चर्यच आहे. या लिपीसंबंधी महासंगणकाचे निर्माते भारताचे थोर वैज्ञानिक डॉ. विजय भटकर म्हणतात की ''या लिपीवर योग्य रीतीने संशोधनकार्य झाल्यास संगणक क्षेत्रात मूलभूत क्रांती घडून येईल, असा मला विश्वास आहे.''

इ. सन १९७७ मधे श्रीगुलाबरावमहाराजांची विचारसंपदा या प्रबंधाचे मुद्रण जवळजवळ पूर्ण होण्याच्या वेळी माझे मित्र श्री माधव भास्कर चांदले यांना अमरावती येथील श्रीज्ञानेश्वर मंदिराच्या ग्रंथालयात या लिपीचे हस्तलिखित सांपडले आणि त्याचा अंतर्भाव प्रबंधग्रंथात जशाचा तसा करण्यात आला. याचे सर्व श्रेय श्री बाळासाहेब चांदले यांचे आहे.

नियम

१. वर्गातील प्रथम अक्षराचे डावीकडे एक बिंदू दिल्यास त्याच वर्गातील दुसरे अक्षर होते व दोन बिंदू दिल्यास तिसरे अक्षर होते.

२. वर्गातील प्रथम अक्षराचे उजवीकडे एक बिंदू दिल्यास त्याच वर्गातील चौथे अक्षर होते व खाली बिंदू दिल्यास त्याच वर्गातील अन्त्याक्षर होते.

३. 'ह' या अक्षराबद्दल ० ही खूण आहे व 'य' बद्दल ए ही खूण आहे.

ए (य) यालाच सदरहु दोन नियम लागू केले असता अनुक्रमे र ल व स हे वर्ण तयार होतात.

टीप :- (क) आणि (च) यांच्याखाली ''दोन दोन बिंदू'' दिले असता अनुक्रमे (क्ष) व (ज्ञ) ही अक्षरे होतील.

- Maharaj Gulabrao

१२६

मायर्सची समीक्षा

जर्मन तत्त्ववेत्ता फ्रेड्रिक मायर्स याचे ह्यूमन पर्सनॅलिटी या ग्रंथाचे दोन मोठे खंड आहेत. त्यात मनावर केलेले सूक्ष्म संशोधन आहे. त्यात त्याने मनाचे अन्तःस्वत्व (पूर्वीचे अनंत संस्कार असलेले अव्यक्त मन) आणि वर्तमानस्वत्व (वर्तमान काली झालेलेसंस्कारयुक्त मन) असे दोन भाग करून मनुष्याच्या मानसक्रियेचे विश्लेषण उत्तम रीतीने केले आहे. त्यातील बराच भाग महाराजांना मान्य असून काही विश्लेषणाबद्दल भारतीय सांख्य-योग-शंकराचार्यादिकांचे मतच बरोबर असल्याचे महाराजांनी दाखवून दिले आहे.

त्यात अंतःस्वत्व वर्तमान स्वत्वावर कसे कार्य करते व त्यापासून रोगी, वेडे, बुद्धिमान यांच्या मानसिकतेत कोणकोणता परिणाम होतोव ज्ञानाच्या कक्षा कशा व्यापक होत जातात आणि नव्या संशोधनाला ते पूरक कसे होते; वगैरे अनेक बाबींचा विचार यात आला असून त्यावरील महाराजांची

टिपणे अत्यंत महत्वाची आहेत.

या संदर्भात अनेक विषय समर्थपणे हाताळले गेले आहेत. त्यात – निद्रा, स्वप्न, प्राणविनीमय, अतीन्द्रिय ज्ञान व अतीन्द्रिय शक्ती, जीवन म्हणजे काय, मृत्यू म्हणजे काय? आन्तर्संस्कार-बाह्यसंस्कार, स्वप्नांची सत्यता, इल्यूजन-हॅल्यूसिनेशन, व्यक्तित्व-जातित्व, कणादांचा अणुवाद, आकाश-ईथर यापासून ज्ञानमात्र अस्तित्वापर्यंत महाराजांनी परामर्श घेऊन त्यावर स्वमतनिर्णय दिले आहेत.

इंद्रियशक्तींचा विचार करताना- कोणत्याही इंद्रियापासून कोणत्याही दुसऱ्या इंद्रियद्वारा मिळणारे ज्ञान मिळू शकते, यासंबंधी महाराजांचे विवेचन जणुं स्वतः महाराजांनाच लागू होते.

डार्विनच्या उत्क्रांतीच्या संदर्भात पाहिले असता जड.उत्क्रांतिवाद (शरीर) व चेतन-उत्क्रांतिवाद (जीवाचा चित्तोत्क्रणवाद) यांचेनुसार विवेचन करून महाराजांनी उत्क्रांतीला वेगळा आणि यथार्थ आयाम दिला आहे.

अनिच्छेन्द्रिय-ज्ञान व अनिच्छेन्द्रिय-कृती यासंबंधीचे विवेचनही महत्वाचे आहे. याप्रमाणे मायर्सच्या संदर्भातील महाराजांची नोटस् घेण्याची पद्धती आणि समीक्षा पहाण्यासारखी आहे.

१२७

नागपुरातील चर्चा

न्यायमूर्ती भवानीशंकर नियोगी ,डॉ. ल.रा.परांजपे, भाउसाहेब खापरे आदि मंडळींशी महाराजांची 'माणूस श्रद्धेने चालतो की लॉजिकने चालतो' यावर चर्चा झाली. तीत महाराजांनी ''सामान्य माणसापासून ग्रेट थिंकर्सपर्यंत'' सर्वजण लॉजिकनेच चालत असतात, पण जेव्हा त्यात इमोशन्स मिसळल्या जातात तेव्हा ग्रेट थिंकर्सच्या विचारातही चुका होतात. सतत लॉजिकचाच आधार घेणारे स्पेन्सर आणि कांट आणि आपणाकडील श्रीहर्ष आणि श्रीशंकराचार्य लॉजिकनेच गेले म्हणून त्यांचे निष्कर्षही बरोबर आले; असे महाराजांनी प्रतिपादन केले. या लहानशा चर्चेत महाराजांनी श्रद्धा आणि लॉजिकसंबंधी मुद्देसूद विवेचन करून लॉजिकचेच महत्व जास्ती असल्याचे सिद्ध केले आहे.

१२८

शिक्षणरत्नाकर

(य१८.ओवी३९.अपूर्ण)

महाराजांनी शिक्षणशास्त्रावर संस्कृतात सूत्रे रचली होती पण ती हरवल्याने या मराठी ग्रंथाला आरंभ केला.यातील पहिलाच अध्याय उपलब्ध आहे.भारताच्या शास्त्ररचनेच्या परंपरेनुसार १.अधिकरण, २.अधिकारी, ३.विषय, ४.प्रयोजन हा युक्तिसिद्ध अनुबंधचतुष्टय यात कायम आहे.

१. पशुहून मनुष्यात जे वेगळेपण आहे– जो विशेष आहे- ते अधिकरण. त्यावरच शिक्षणसंकल्पनेची उभारणी आहे. मनुष्याने स्वतःचा उच्च असलेला वेगळेपणा सोडून देऊन त्याने पशुत्वाकडे जाऊ नये यासाठी शिक्षणाची गरज आहे.

२. मी पशुहून उच्च आहे, असे ज्याला वाटते तो शिक्षण घेण्यास अधिकारी.

३. जीवाला अर्थ आणि काम दैवानुसारच मिळतात, पण धर्म करण्यासाठी त्याला पूर्णस्वातंत्र्य

आहे. म्हणून जीवाने सत्कर्मादी करून तमोगुण घालवावा. नंतर चंचल असलेला रजोगुण घालविण्यासाठी केवळ सात्विक कर्मेच करावीत. आणि सत्वसंपन्न व्हावे. याप्रकारे सत्त्ववृद्धी होणे, हाच विषय होय.

४. प्रयोजनाचे गौण आणि मुख्य हे दोन प्रकार आहेत.

गौण प्रयोजनाचे ३ प्रकार :-

१.शारीर-बल :- दुःखांचे आघात होऊनही सत्कर्म न सोडणेहे बल. हेच शारीर बल-शिक्षण.

२.कौशल्य :- शुभ आणि अशुभ विकारांचा योग्य उपयोग करून घेणे, हे कौशल्य. ही नैतिक-शिक्षा.

३.शुद्धी :- मनाचे असद्विकार जाऊन केवळ चांगल्या इच्छा स्फुरत राहणे. ही शुद्धी होय. ही स्वधर्म-आचरणाने होते.

४. मुख्य वेदांत प्रयोजन :- वरील तिन्ही गौण प्रयोजने सिद्ध झाल्यावर- मनातले सर्व विकार नाहीसे होऊन सर्व ठिकाणी आत्मप्रत्यय येणेहे वेदांत-शिक्षण असून शिक्षणाचे खरे उद्दिष्ट आहे.

याप्रमाणे अनुबंधचतुष्टय आणि त्यातील शिक्षणचतुष्क या पहिल्या तरंगात स्पष्ट केले आहेत. हा ग्रंथ पूर्णझाला असता तर हा शिक्षण-क्षेत्रातील भारतीय मानबिंदू ठरला असता.

१२९

११८ पत्रांचा सारांश

(सूक्तिरत्नावली यष्टी १(११)+य२उ(२१)+य७(४०)+य१२(४४) य१५(२)+य१८(पत्र१) खंडान्तर्गत)

काव्यरूप पत्रे

१) पत्नीस पत्र - ओव्या १४.(य२(उ)पत्र१.सौ.मणिकणिका आईस)- प्रपंचात परमार्थ.

२) पत्नीप्रेमपराग - आर्या१३. (य२(उ)पत्र) पत्नी सौ.मनकर्णिकेच्या निर्वाणानंतरचे संतसाहित्यातील पत्नीप्रेमाचे एकमेव विरहगीत

३) श्रीकृष्णास पत्र - ओव्या३५(य२(उ)पत्र४) विरह-भक्ती व सगुण भक्तीची श्रेष्ठता.

४) सर्व उपासनांचे एकच प्राप्तव्य- ओव्या१५ (य२(उ)पत्र२. सौ.रंगुबाईस) सगुणरूप व विश्वरूप.

५) स्त्री व पुरुषांचे चातुर्यवर्णन- ओव्या ३२. (य२(उ)पत्र२०. लक्ष्मणराव केकरें)- स्त्री पुरुषांनी संसारात कसे वागावे? आणि अंतरी परमार्थ कसा धरावा?

६) वेदांतरहस्य - ओव्या१२.(य१२.पत्र२.हरिभाऊ केवलें पत्र१)

७) वेदांतरहस्य - ओव्या.१३ (य१२.पत्र३हरिभाऊ केवलें पत्र२)

×) हरिभाऊ केवलेंचे पत्र. ओव्या.४१

८) भक्तिप्रेमाचे ७ निर्देश - ओव्या२२. (य२(उ)पत्र६.हरिभाऊ केवलेंना पत्र-३) ज्ञानाहून भक्तीचे उत्तमत्व वर्णन.अंतःसभा व बाह्य सभांविषयी भ्रमनिरास.

९) वेदांतरहस्य - आर्या१.(य१२पत्र६.हरिभाऊ केवलें. पत्र-४)

१०) सगुण-स्फुरणाचे रहस्य - ओव्या २३. (य२(उ)पत्र५.हरिभाऊ केवलेंना पत्र-५)

११) ब्रह्मानुभवाचा उपाय. - ओव्या १९.(य१२.पत्र४.गणपतराव सावळीकर)

१२) भिन्न भिन्न मार्गांचा समन्वय - ओव्या २९. (य२(उ)पत्र७. श्रीनिवास शास्त्री हरिदास)

१३) वैराग्य निरूपण - श्लोक १८ (य१२.पत्र१८.काशीनाथ धर्माधिकारी) नामस्मरण-कर्माग्रह की कर्मत्याग?- विषयदोष दर्शन- यतमान वैराग्य- व्यतिरेक वैराग्य- एकेन्द्रिय वैराग्य-वशीकार व पर वैराग्य- अपरा व परा विरक्ति.

×) काशिनाथ धर्माधिकारी यांचे महाराजांना पत्र आर्या १८.

१४) वेदान्त निरूपण श्लोक ३०.(य१२.पत्र१७) बाबा गर्दे पत्र३

१५) समाधि, धर्म, उपासना व भक्ती यातील भेद - श्लोक ३५, (य१२पत्र१९.बाबा गर्दे) नामस्मरण- संधिसमाधि- समता व विषमता - भक्ताने धर्म सोडून नये व कर्मठाने भक्ताला हसूं नये- शूद्र व ब्राह्मण यांचे धर्म- प्रारब्धाने धर्म सुटला तरी त्याचे दुःखफल सत्पुरुष आनंदाने स्वीकारतात-उपासना व भक्तीतील भेद- स्वतः निर्गुणहोऊन सगुणची भक्ती.

१६) देवासच्या राजांना पत्र १. अभंग १३. (य१२.पत्र९)

१७) देवासच्या राजांना पत्र २. अभंग ५.(य१२.पत्र१०) कर्म, श्रद्धा, विवेक,४ पुरुषार्थ.

१८) देवासच्या जगदेवराजे पवारांना पत्र (य१२.पत्र११) इंग्रजीपेक्षा संस्कृत शिक्षणाची आवश्यकता- प्रेमसमाधी- चमत्कार- बाह्यसमाधी- आन्तर समाधी- व्यवहारदशा -नास्तिकवादावर

प्रश्न -माझा उणेपणा.

१९) प्रयत्नवाद : दोहा, सवैया व चौपाई १३.(हिन्दी) (य२(उ) गणेशप्रसाद मंडला पत्र१९)

संस्कृत पत्रे

२०) मातृसेवा : श्लोक २६.(य७ पत्र१. यमुनाबाई केकरेंना पत्र) तीव्र मुमुक्षेपर्यंत स्वधर्म- वैराग्य व ज्ञान- सांख्य-योग-वेदान्त- उंदीरशांतिसंपन्नता- चित्तशुद्धीवांचून संसार सोडू नये.

२१) सत्पुरुषांच्या ठिकाणी पुत्रभावना : श्लोक ४७.(यष्टी७पत्र२. यमुनाबाई व विठ्ठलराव केंकरेना) पुत्रभावनेचा उपदेश- रामकृष्ण परमहंस - जग अनिर्वचनीय व भावनामय, एकजीववाद व अनेकजीववाद किंवा दृष्टिसृष्टिवाद व सृष्टिदृष्टिवाद- पशुभावना, नरभावना व दिव्यभावना- ज्ञान्याचे ठिकाणी पुत्रभावना व ब्रह्मभावना- ईश्वर व त्याच्या भक्तांचा अभेद- सेवेची रीती- सांख्य : त्रिविधदु:खे- योग - वेदान्ताने सांख्ययोगांचा समन्वय.

२२) सांख्य-योग-ज्ञान : श्लोक ४३.(यष्टी७/पत्र३. यमुनाबाई व रुक्मिणीबाई केंकरेना) सांख्यनिरूपण, योग- सांख्य+योगाने व्यतिरेक अनुभव,वेदान्ताने अन्वयानुभव- अज्ञान्यांसाठी धसंकल्पना.

२३) नास्तिकमत खंडन : श्लोक ३२.(य१२पत्र८. बाळकृष्णपंत केंकरेना) जगताचे कारण- उत्क्रांतिवाद- जगदुत्पत्तीचा मनोसंवेगसिद्धान्त- साधनांचा क्रम- चित्तजयाचे मार्ग.

२४) स्वधर्म व ज्ञानमार्ग : श्लोक ५०.(य७पत्र४. यमुनाबाई व विठ्ठलराव केंकरेना पत्र) पुत्रभावना- धर्मच मित्र- पापपुण्यांची अनुमानाने सिद्धी- साधकदशेत स्वधर्म- पतिसेवा उपासनातत्त्व- मातृभावना- सांख्य+योगातील वेदान्तविरोध व वेदान्तानुकूलता- चित्ताच्या पाच भूमिका- भक्ती, नीती व विरक्तीने ज्ञानाचे रक्षण- विचारपद्धति.

२५) वेदान्तविवेचन : श्लोक५३.(य१२पत्र७. विठ्ठलराव केंकरे) वेदान्तरहस्य- अध्यारोप व अपवाद- अनादि ६ पदार्थ- जगताचे मूळ- आत्मक्रीड आत्मरति- परिणाम आणि विवर्त- भक्तिरसानंद- कर्ममार्ग- ज्ञानमार्ग- जीव एक की अनेक? वाचस्पतींचे मत- न्यायाचे ४पदार्थ- पंच भेदकल्पना- जीवाचे स्वतंत्र्य- प्रारब्ध/ प्रयत्न? आत्म्याची अविनाशता- तत्पदाची व्याख्या- त्वंपदाची व्याख्या- स्वरूपज्ञानाचे साधन- सत् चित् व आनंद- जगदुत्पत्तिक्रम- ईशसृष्टि व जीवसृष्टि- स्थूल भूतांची उत्पत्ति- वेद अपौरुषेय कसे? विश्वाचा स्वरूपनिर्णय- श्रवण- मनन- निदिध्यासन- केवळ शब्दच तारतात- तीन अधिकारी- आत्मा कोणता?- जगत् काय?- कर्ता कोण?- जन्मरण कोणाला? मरणोत्तर मार्ग.

२६) धर्म व अधर्म यांचे विश्लेषण : श्लोक २८. (य७पत्र५.दुर्गाताई परूळेकर) धर्म अधर्म- पापुण्यानुसार गती- मनुष्यजन्ममहत्व- ज्ञानयत्नाच्या मर्यादा- स्त्रीधर्म- बुद्धीच्या ३ दोषांची निवृत्ती- भक्तिपर्यंत धर्म- भक्तीचा अहंकार- चमत्कार- सद्गुरुविवेचन- आजपाजप- सांख्य-योग-वेदान्ताचे साह्य- प्रारब्धनिवृत्तिसाठी ज्ञानोत्तर भक्ति.

२७) बाह्य उपचार - श्लोक १४.(य७पत्र९. दुर्गाताई परूळेकर) दुर्गा नामाचे साफल्य- भगवान् उपचारापेक्षा प्रेमानेच वश- उपचार श्रीमंताकरता- दीनांना भावच पुरे- तूं जगन्माता हो.

२८) वैराग्य-उपासना-ज्ञान : श्लोक ३३. (य७पत्र६. रघुनाथराव भगाडे) कामक्रोधलोभांचा त्याग कसा करावा?- गृहस्थाश्रमाला दान आवश्यक- संसार केव्हा सोडावा?- सामाजिक कार्य, नित्यनैमित्यिक कर्मे व व्रते यांचा उपयोग- धर्माचरण रहित भक्तीचा निषेध- माध्वभावना- रामानुजभावना- वल्लभाचार्य व शंकराचार्य- गुरुशिष्यांची परस्पर परीक्षा- वर्णाश्रम भजनात नव्हे पण भोजनात पाळावे- वेदांतून श्रवण- सांख्यन्यायाने मनन-निदिध्यासन.किंवा ब्रह्मसूत्रशांकरभाष्यातून तिन्ही करावे, त्यानंतर

जीवन्मुक्ति-सुखासाठी भक्ति.

२९) वेदान्त व रससिद्धान्त : श्लोक ४५.(य७पत्र८. गोविंदराव तांबे) प्रत्यक्ष, अनुमान व शाब्दप्रमाणांचे खंडन- वेदप्रामाण्याचे श्रेष्ठत्व- ब्रह्माचे अंश : सद्-चिद्-आनंद, मायेचे अंश : नामरूप- वेदविद्या/ब्रह्मविद्या- फलव्याप्ति/वृत्तिव्यप्ति- सांख्याने सदंश, वेदान्ताने चिदंश व भक्तीने आनंदांश कळतो- योग व ज्ञानाने अव्यक्त आनंद आणि काव्य व भक्तीने व्यक्त आनंद मिळतो- काव्याचे प्रकार- काव्य व गानातील भेद- काव्याचे प्रयोजन- वर्ज्य काव्य- उपदेशाचे ३ प्रकार : राजाप्रमाणे वेद, मित्राप्रमाणे पुराणे व कांतेप्रमाणे काव्य- काव्यरसाचे स्वरूप- काव्याने भगवत्प्राप्ति- स्थूलातून सूक्ष्मात जाणे- घेण्डाचार्यसंमति- आत्मप्रेम हाच स्थायीभाव- व रसरूप होणे म्हणजे श्रीकृष्णरूप होणे- भक्ताचे शरीरही ब्रह्मरूपच.

३०) धर्म- आन्तर्बाह्य वैराग्य श्लोक २५. (य७पत्र७.श्रीनिवासशास्त्री हरिदास) भगवद्देह शुद्धसत्वात्मक- प्रवृत्ति लक्षण बाह्यधर्म व निवृत्तिलक्षण आंतर्धर्म- बाह्य व आंतर ज्ञान- आत्मज्ञान नष्ट होते काय? वैराग्य : बाह्य व आंतर्- बाह्य आष्टसिद्धीचे वर्णन- साधू व आवतारांची तुलना- सिद्धीचा उपयोग- सत्पुरुषांचे आचरण.

<u>समीक्षा व लेख</u>

३१) मानभावमत समीक्षा (६ शंका) डार्विन मत समीक्षा (३० मुद्दे) स्पेन्सर मत समीक्षा (२५ मुद्दे) (य.१२,पत्र१. श्री.जठार)

×) श्रीमंत जठार यांचे पत्र

३२) थियॉसफीची समीक्षा (य२(उ)पत्र१४.श्री.मुळेमास्तर)- जडवादी जडशक्ति विषयसुखांच्या साधनाकडे लावतात तद्वतच - हिप्नॉटिझम- प्राणविनिमय, इलेक्ट्रिकसायको विद्युन्मानसशास्त्र- सायकिकल रिसर्च, सायकोमेट्री- सायकोग्राफी- मानसोल्लिपिका, स्पिरीच्युआलिझम- प्रेमवाहन- रॅशनल फिलॉसफी- युक्तिसिद्ध तत्त्वज्ञान इ.संबंधी पाश्चात्य समज. अदृश्यशक्तीचा व्यवहाराकडे उपयोग म्हणजे सगळीच गुप्तशक्ति जगरूपाने अस्तित्वात आणणे- अदृश्यशक्ति आणि आर्यधर्म- इन ट्यून ऑफ इनफायनेट- थियॉसफीची समीक्षा.

३३) कुमारस्वामींचा 'आर्य-राष्ट्रीय विज्ञानवाद' (य१२पत्र२५)

३४) संगीत (य१२.पत्र२२. विष्णु नारायण भातखंडेंना पत्र)- भातखंडेंची समीक्षा- लक्ष्य संगीत- ॲटोमिक व इलेक्ट्रानिक थियरी- ईथर- टिंडालचे मत- गाण्याने रोगनिवारण- मार्गी संगीत- समय महत्व.

×) भातखंडे यांनी पाठविलेले पत्र

३५) जैनमत समीक्षा (य७.पत्र२३. श्रीनिवासशास्त्री हरिदास)- जैनमतात नित्यमुक्त, मुक्त व बद्ध असे तीन जीव- पण त्यांच्या ग्रंथात २ च प्रकार- नित्यमुक्त म्हणजे ईश्वर; म्हणून जैनांनी सर्व ग्रंथातून हा भाग वगळला- पण ते गुप्त रीतीने नित्यमुक्त जीव मानतातच-

''आर्याचे म्हणणे योग्य आहे हे सिद्ध करण्याशिवा मला व माझ्या हितचिंतकांना दुसरे कोणतेही काम नाही.''

३६) इस्लाम व ख्रिश्चन मत समीक्षा (य१२.पत्र३२. मुमुक्षू मासिकास)- हिंदु मुसलमान सख्य की द्वेष? कर्म उपासना ज्ञान / शर्यत, तारिकत, हकीकत ईश्वरापासूनच आले. ख्रिश्चन धर्मात क्रिया ईश्वरापासून तर तत्त्वज्ञान जीवबुद्धीतून- म्हणून धर्म व तत्त्वज्ञानाची फारकत- तापसी व सुफी- ख्रिश्चन

व मुसलमान- हिंदु व मुसलमान- गवताप्रमाणे ७७० वेळा जन्म- ईश्वराला विसरणे=संसार, बायकामुले संसार नव्हे- अज्ञानाने बंध- अल्ला म्हणजे आई- कुराणात ईश्वरमातृत्व- हिंदु व ख्रिश्चनांचे ऐक्य- बुद्ध हिंदूचा अवतार- सर्व धर्मांचे वैचारिक ऐक्य- पण आचारभिन्नता- हिंदुमुसलमानद्वेष धार्मिक नसून राजकीय- सर्व धर्मतत्त्वांचा ध्यानाने शोध.

३७) श्रीतुकारामांचे सदेह वैकुंठागमन १. ((य१२.पत्र२६.मुमुक्षू मासिकास)- देहाची पांचभौतिकता- रसाने तैजसदेह- मंत्राने, कुंडलिनी सामर्थ्याने किंवा जात्यंतर परिणामाने दिव्यदेहत्व- उदा. नंदीश्वर, राजसेवक, अर्जुन, धर्मराज- मायिक देह- माझा विश्वासतंतू.

३८) श्रीतुकारामांचे सदेह वैकुंठागमन २. ((य१२.पत्र२७.मुमुक्षू मासिकास)- श्रीतुकारामांनी आत्महत्या केली नाही - अर्थवाद : गुणवाद, अनुवाद, भूतार्थवाद- ज्ञान्याला मृत्यूची इच्छा? यथेष्टाचरण?- योगवासिष्ठ- तीव्र संवेग- मनुष्य व देवतांची भेट- विश्वरूपासाठी व्यापक सत्त्वदृष्टी- शंकराचार्य.

३९) मानभावांचे योगवासिष्ठ (१) (य१२.पत्र३८) धर्मोपदेशक होण्याची हाव- पुराणे भाडकथा? सर्वधर्म ऐक्य?- धर्मोपदेशक- १) तत्त्वसारायण हा थियॉसफीचा संस्कृतग्रंथ- खलात कुटलेला समन्वय- २) सिद्धान्तसूत्रे : निरंजनभाष्यातील आधुनिक उत्क्रांतिवाद- ३) महानुभावांचा युगधर्म, अन्यव्यावृत्ति व वज्रसूचिउपनिषद्- श्रीतुकाराम व मध्यवमुनींच्या नावावर मानभावांचे अभंग- गुरूची कोणती आज्ञा पाळावी- स्तन्य देणारे ज्ञानेश्वर- वंशप्रचारक शंकराचार्य- बीजपुरुष उपनिषद्- अंकुर वासिष्ठ - वेदान्ती कोणाशी चर्चा करीत नाहीत?

४०) मानभावांचे योगवासिष्ठ २. (य१२.पत्र३९.मुमुक्षू मासिकास)– पंडुगीतेतील मानभाव धर्म व महंतवर्य दत्तराज- मी यौक्तिक भाषा वापरणारा- आत्म्याचे अनेक अर्थ- आत्मा चैतन्यरूप की चैतन्यरूपाच्या पलीकडे? आत्मा जड की चेतन?- चैतन्य ३ प्रकारचे- देवता व चक्रांचा क्रम भलताच- मणिपूरचा नैयायिक- घोटाळा- योगविरुद्ध प्रतिपादन- संप्रदायवेदान्ताचा अर्थ)

४१) मानभावांचे योगवासिष्ठ ३. (य१२.पत्र४०.मुमुक्षू मासिकास)– या योगवासिष्ठातील ''युगधर्म'' श्रुतिस्मृतिपुराणोक्त नव्हे- मूळ योगवासिष्ठ शांकरमताचे- मानभावमताला मी वाईट म्हणत नाही- वेदान्तग्रंथातील घोटाळे- इतिहासदृष्टि नको.

×) गोविंदसुतांचे मूळ पत्र

४२) आचार्यव ज्ञानेश्वरांचे तत्त्वज्ञान एकच (य१२.पत्र४१. मुमुक्षू मासिकास)-

०) आचार्य व ज्ञानेश्वर १. (श्रीबाबाजीमहाराज पंडितांचा लेख - य१२ पत्र४५. मुमुक्षू मासिकास)- श्रीगुरूंचे मनोरथ- शंकराचार्यांचा मायावाद - ज्ञानदेवांचा अज्ञानी लोकांच्या दृष्टीने अविद्येचा अंगीकार - अज्ञानखंडन - ज्ञानखंडन - आचार्य व विद्यारण्यांचा चिद्विलास/विवर्तवाद- समसत्ता/विषमसत्ता- अज्ञान शब्दमात्र - तिघांचेही एकमत.

०) आचार्य व ज्ञानेश्वर २.(य१२.पत्र४५.मुमुक्षू मासिकास)- वे.सं.बाळशास्त्री हुपरीकरांचे खंडन.

×) वे.शा.बाळशास्त्री हुपरीकरांचे पत्र

४३) संत बहिणाबाईची कविता (य१२.पत्र३४.मुमुक्षू मासिकास)- वेदरहित आत्मज्ञानी- ब्रह्मज्ञान्याला प्रारब्ध नाही- बहिणाबाई वसिष्ठांचा अवतार- भोंदूंना पैजारा- श्रवण व गुरुकृपेने आत्मज्ञान- भक्तीचे वर्म- ज्ञानोत्तर भक्ति- माझ्या ग्रंथात बहिणाबाईपेक्षा अधिक काही नाही.

४४) उमाजी नाईकाचे चरित्राचे रसग्रहण (य१२.पत्र१२.श्री.तांबे) लेखी वादाचा आग्रह.

आर्यांचे भौतिक विज्ञान

४५) वेदांतेतर शास्त्रे अभ्युदयासाठी- (य१५पत्र२ श्री द.ग.खापरे)- महत्वाची ४सूत्रे- दादासाहेब खापर्डे- ब्राह्मणद्वेष- आत्मनिर्देश- मतभेदसहिष्णुता- ॲटम थियरी व विवर्तारभ्यमाण (नवाशब्द)- उष्णता, प्रकाश व विद्युत- किरणसप्तसमवायोपपत्ति- रेडियम थियरी- न्यायशास्त्रद्वारा ऐहिक सृष्टिशास्त्र- भाषान्तराचे मूळ

४६) न्यायशास्त्रातून नवे भौतिक शोध (य७.पत्र३५.श्री.देवरस)- न्यायशास्त्र चार्वाकखंडन व भौतिक उन्नतीसाठी- आर्यभौतिक शास्त्राने नास्तिकतेला आळा- भाषांतराच्या मूळाप्रमाणे न्यायातून शोध लावावे- प्रत्यक्ष खंड वाढवावा- वायूचे लक्षण- मूव्हींग इथर म्हणजे वायू? इंमूव्हींग इथर म्हणजे आकाश?- आर्यांचा व अनार्यांचा मतभेद धर्मात असो, पण ऐहिक विद्येत नाही- आवाहन- भौतिक शोध लावणे कर्तव्य ठरवा.

४७) न्यायातून भौतिक विज्ञान- (य७.पत्र३६.श्री.देवरस) संस्कृत पंडितांनी इकडे मोर्चा वाळवावा- अद्‌भुताची मर्यादा- यांत्रिक विमाने व देवी विमाने- जुन्या व नवीन विमानातील साम्य- वराहमिहीर- मायामतय ग्रंथ- अग्निपुराण- रुद्रयामलतंत्र- गोविंदपादाचार्यांचे रसग्रंथ इ. प्राचीन संदर्भ- भाषान्तराच्या मूळाप्रमाणे ग्रंथरचना व्हावी- वैदिक संदर्भ प्रमाण घेऊन नवीन शोध लावावे- जगदीशचंद्र बोस- चार्वाकाचा भूतचतुष्टयवाद- दीधितिकार- वायू/ईथर- प्रकाशच सूक्ष्मवायुरूप- इथरचे कंपन- माझी भूमिका.

४८) न्यायशास्त्राचा अभ्यास कसा करावा? (य७पत्र१८.हरिदास, मुळे, भालेराव, खापरे, पाध्ये, दिनकर)- शास्त्रीय शब्दांचे शास्त्रीय अर्थ घेऊनच विचार करावा- सामान्य प्रामाण्याचे परतोग्रहण- सन्निकर्ष- दृष्टिसृष्टिवाद- ज्ञातसत्त्व- सर्वज्ञता- न्यायशास्त्रसंबंधी प्रश्न १.द्रव्याचे निर्गुणत्व २.संख्या नित्य की अनित्य.३.ईश्वर, काल, दिक् ४.आकाश, काल, दिशा व आत्मा यांचे विभुत्व- पंडितांची निरनुभव वृत्ती- शास्त्रावरील आक्षेपांना त्याच शास्त्रातून उत्तर शोधावे- शास्त्राविषयी अनादर होऊ देऊ नये- सोहागपूरचा नैय्यायिक)

४९) न्यायशास्त्र, महाराजांची भूमिका (य७.पत्र२२.श्री.हरिदास)- समन्वय लक्षण- न्यायप्रदीप या आधु.ग्रंथाची समीक्षा- न्यायावर प्रश्न- आगमनिर्णय- आगमर्पूवसिद्धीला संस्कृत भाषा आणि सूत्रसिद्धी व ज्ञानाला कोणतीही भाषा- समन्वयाची व्याख्या- महाराजांचे ग्रंथ म्हणजे भाषान्तर आहेत काय?- योग्यांना प्रश्न)

५०) न्यायातून भौतिकशास्त्रे (य७.पत्र२५. हरिदास, मुळे, भालेराव, खापरे, पाध्ये, दिनकर)- बृहत्खंडः- प्रयत्नवादमीमांसा- तीव्र संवेग व दृष्टिसृष्टिवाद- मधुसूदनांचा अद्वैतसिद्धी जल्पग्रंथ- खंडणावेशात होणाऱ्या चुका- न्यायाचेपरिष्कार वेदान्तात अयोग्य- चमत्कार वेदान्ताच्या विरोधी म्हणून निषेध- प्रक्रियाभिन्नत्व म्हणजे काय?- दृष्टिसृष्टिवाद- प्रयत्न व प्रारब्ध- चमत्कारांचा निषेध. अणुखंडः- न्यायशास्त्रातून मानसशास्त्र, भौतिकशास्त्र, विज्ञान, गणित वगैरे शास्त्रांची व्यवस्था- आर्यांचे गणित व कालगणना- न्यायातून सायंसः उष्णता- प्रकाश- वीज- गती- इथर- इलेक्ट्रान थियरी- लाईट व गतीची थियरी- धातूची थियरी- संस्कृत ग्रंथ भाषांतराचे मूळ व्हावे- न्यायाचा जोर द्रव्यगुणनिरीक्षणाकडे वाढवावा- रेडियम थियरी- सायंटिफिक वैशेषिक शास्त्रात फिजिक्सला सवड.

स्वजातिबांधवांना विनंती

५१) जातिभेदविषयक संवाद (य१२.पत्र३१.मुमुक्षू मासिक)- ब्राह्मणांनी विद्या चोरली काय?- धर्मांतर व देशांतर- धर्मातील अनीतीचे प्रकार- पतितपरावर्तन- सर्व धर्मांचे ऐक्य विचाराने, आचाराने नव्हे - ब्राह्मणांना कठीण धर्म व इतरांना सोपा कां?- धर्माचे ऐहिक प्रयोजन मुळीच नाही- विश्वकुटुंबाच्या महात्म्यांचे वागणे- जातिभेद रजोगुणाच्या संकोचासाठी- दयेचा अर्थ- हिंदु धर्म नष्ट होईल काय?- कठिण शास्त्रांचे प्रयोजन.

५२) वेदाध्ययनाचा अधिकार (य१२पत्र३०.मुमुक्षू मासिक)- मराठा बांधवांचे चरणी विनंती- ब्राह्मणब्राह्मणेतर विवाद अर्थात शिक्षणाने - वेदाधिकार कोणाला? जैनातील जातिभेद- स्वामी दयानंदांचा वदतो-व्याघात)

५३) वेद न शिकविण्याचे कारण (य७पत्र२९.श्री.मुळेमास्तर)- ऐहिक स्वार्थासाठी? की पुराणातील खोटी विद्या शिकवून खरी विद्या आपल्याजवळ राहण्यासाठी? की धर्मपरतंत्रतेमुळे?

५४) धर्म नको तर वाद कशाला? (य७पत्र३०.मुळेमास्तर)- मी शूद्र असूनही अप्रिय लिहितो ते केवळ विचारामुळे- शूद्रांची चूक अधिक आहे- ब्राह्मणेतरमंडळी स्वतःचे हिंदुत्व मान्य करतात काय? धर्मामुळे की ऐहिक विद्येमुळे वेद श्रेष्ठ वाटतात?- वैदिक धर्मच तारेल व स्वधर्म तारणार नाही, याची खात्री काय?- धर्म नको असेल तर वाद कशाला?

५५) यज्ञोपवीत धारणाचा हक्क (य१२.पत्र२८.मुमुक्षू मासिक)- जानवे घालून ब्राह्मण, क्षत्रिय की वैश्य व्हावयाचे? जाती गुणकर्माने की जन्माने? संस्कार कोणावर? यज्ञोपवीतादि भेदचिन्हे कशाला? धर्मात आग्रह नको- यज्ञोपवीत प्रकरण मत्सर वाढविणार

५६) गोपाल काला (य७पत्र१९.हरिदास व मुळेमास्तर)- वर्णाचा संशय असला तरी फुकट जाती मोडू नये.

५७) वर्णाश्रम व ब्रह्मज्ञान (य१२.पत्र३७.श्री.वाळिंबे)- कर्म आणि ब्रह्म एकच- सिद्ध व साधक स्थितीतील फरक- घृतायुर्न्याय- सिद्धावस्थेत कर्म सोडणे हाही अंहकार; म्हणून धर्माचरण कायम- कर्म व ब्रह्माची विषमसत्ता म्हणून अविरोध- कृष्ण, शुक, जनक, राम, वसिष्ठ हे सर्व समान- ज्ञानी कसाही वागू शकतो पण पूर्वसंस्कारानुसारच वागतो- वर्णाश्रमाला तुच्छ समजणे देहाभिमानाचे लक्षण- अज्ञानी, मंदज्ञानी व दृढज्ञानी यांची विहित कर्माने किंवा उपासनेनें हानी होत नाही- जीवन्मुक्तीत भजन हा स्वभाव.

महाराजांसंबंधी गैरसमजुती

५८) माझ्यासंबंधी गैरसमजुती (य१२पत्र४२.मुमुक्षु मासिक)- स्वतःला शूद्र म्हणण्याचे कारण- ग्रंथरचना महाराजांची की ब्राह्मणांची? महाराज ग्रंथ ऐकून इकडचे तिकडचे लिहितात काय?- शौचाचे वेळी ग्रंथवाचन- यक्षिणीसाधन- गृहस्थाश्रमाचा आग्रह- ब्रह्मचर्याच्या २ परीक्षा- ''परिस्थितीने अधर्मात गेलो तरी दुसऱ्याला धर्म सुचवून मरेन''

५९) मला विद्वान ठरविणे कठीण- (य७पत्र११.मुळे,हरदास, भालेराव,खापरे) श्रीवासुदेवनंदसरस्वती- महाराजांची विद्या.

६०) माझी निंदा- (य१२पत्र५.वे.सं.पंचभाई)- माझ्यात चमत्कार नाहीत- लोकनिंदा- श्रीतुकाराम महाराजांचे उदाहरण- देवतांची विघ्ने- पुण्यातील अपमान : अमृतपानयोग- ईश्वर काय करणार?

६१) माझेवरील आक्षेप (य१२.पत्र२३.श्री.खापरे)- चमत्कार- कृष्ण, गोपिका, राम शंकराचार्य, व्यास, तुकाराम यांचे विषयीही शंका घेणारे आहेत तर माझे काय? दुसऱ्याच्या महत्वाकांक्षा मी मारतो काय? सर्व युक्ती जुन्याच हे दाखवून द्यावे- युक्ती जुन्या तर योजना नवीन- नव्या युक्ती नवा अवयवनिचय- अनुभव जुना पण परिभाषा नवीन- दुसऱ्याच्या युक्तींवर मी कां चिडतो?- शिक्षणाची व्याख्या- मनन- शब्दांचे अर्थ फिरविता येत नाही, हा नवा नियम- आमगनिर्णय - मी वादातून पळून कां जातो - वाद, जल्प, वितंडा व अतिवाद यांच्या व्याख्या- माझा प्रमाद.

६२) माझे संबंधी अपप्रचार (य७पत्र१४.केसरीला पत्र)- मी साधु नसल्याने शिष्यशाखेची जबाबदारी नाही - वर्णाश्रम - मी कोणाला शिष्य म्हणवीत नाही- शिष्य म्हणविणाऱ्याने माझ्या ग्रंथांच्या विरुद्ध तरी जाऊ नये.

<u>योगविषयक</u>

६३) योगातील स्थाने- (य१२पत्र४६.श्री.मुळेमास्तर)- योगातील तीन स्थाने- अनाहत नादाचे दोन प्रकार- स्पर्श विचार- रूप विचार.

६४) योगाने गुरुपरीक्षा- (य१२पत्र३६) संसारतप्त- वर्णाश्रमाने चित्तशुद्धि झालेले व पाश्चात्तापादग्ध- साधूची लक्षणे- संत एकनाथ व तुकारामांनी सांगितलेल्या कसोट्या- संशयी साधकांचे प्रकार :- १)अधिकार नसलेले २)फसलेले ३)साधनसंपन्न- गुरुदर्शनाची रीति

६५) राजयोग व हठयोग (य७.पत्र२७.श्री.तोंबे)- राजयोग व हठयोग- अभ्यास व वैराग्याची जोडी- मृत्युभयाचा त्याग- योग साधण्याचा उपाय- योगातील जाणून घेण्याच्या गोष्टी- भक्तिपेक्षा योग सोपा- सत्त्वगुणाची शक्ती.

६६) योग आणि विपर्यास- (य१२पत्र३३) वैराग्यावाचून योगाभ्यास- चमत्काराने फसगत- योगाचा अधिकार?- वैराग्य व अभ्यासाची जरूरी- चमत्कारांनी योग नष्टप्राय- योग आलॉजी ऐवजी इझ्म झाला-

योगावरील प्रश्न- सविकल्पातून निर्विकल्प कसे होते- निद्रेचा निरोध- प्राणायम व ईश्वरप्रणिधान- कुंडलिनीः भावना व साक्षात्कार?- साक्षात्कार ही योगाची अन्त्यदशा की मध्यदशा- सत्त्व व तमाचा निरोध कसा करावा?- योगात सर्वांची उत्तरे.

६७) राजयोग (य१२पत्र२०.विठ्ठल रामचंद्र सी.मुंबई)- मनाचा निरोध– राजयोगातही स्वप्रयत्न- योगाचा अधिकार- एका स्त्रीची गोष्ट- मस्तकावर हात ठेवणे- शास्त्रप्रत्यय, गुरुप्रत्यय व आत्मप्रत्यय.

६८) प्राणायाम व ध्यान- (य१२.पत्र१५.भट वकील)- जाती जन्मसिद्ध एकाग्रता हाच उपाय- प्राणायामातील ध्यान, प्रत्याहार, धारणा - शिवोभूत्वा शिवं यजेत्- अहंग्रहध्यान- तांत्रिकरीति- ध्यानाची महाराजांची नवी रीति- मंत्रासंबंधी विचार- ओंकार शब्दब्रह्म- स्फोटवाद- अजपाजप.

६९) बाह्य व आंतर् समाधि (य१२पत्र११.देवासराजे)- इंग्रजीपेक्षा संस्कृत आवश्यक- प्रेमसमाधि- चमत्कार- नास्तिकाला प्रश्न- ईश्वरसिद्धि.

७०) भूताकाश, चित्ताकाश व चिदाकाश (य२(उ)पत्र१७.बापू हरदास)- चित्ताकाशात जाण्याचे अडथळे- प्रयत्नवाद- यतिवेषाचे अनुग्रह.

७१) मृतदर्शनाचा मार्ग-(य२(उ)पत्र१६) मृतदर्शन- तीन प्रकारचे आकाश- परलोकाचे दोन मार्ग- प्रयत्नप्रशंसा- चित्ताकाशातील पुत्र न दिसण्याचे कारण.

७२) हिप्नोटिझम व योग (य१२पत्र३५.रामचंद्रबापू माधानकर)- वेदान्त व व्यवहार- प्लेटोची

नीचता- साक्रेटीस, डेकार्ट, कांट- थियॉसफी- आर्यांचे शील- हिप्नोटिझम- मुसलमानी योग- धर्माचरणाचे महत्व- हिप्नोटिझमने धनप्राप्ति तर योगात वैराग्य, अभ्यास, परवैराग्य- भोंदू योग्यांना प्रश्न- विकार आणि चक्रे- धारणा आणि समाधि- लय योगातील रंग- योगाचे व हिप्नोटिझमचे अधिकारी.

७३) सिद्धासनाची प्रक्रिया (य२(उ)पत्र३.रामचंद्रबापू माधानकर)- ओव्या ४, कर्म, उपासना, व ज्ञान यांचे रहस्य- सिद्धासनाची प्रक्रिया.

७४) ज्ञानेश्वरदर्शनाची प्रक्रिया (य२(उ)पत्र९.श्री.केशवराव देशमुख महाराज)- ओव्या २१. ज्ञानदेवांचे अन्तर्यामीत्व- निष्काम कर्माची महती.

७५) लययोग (य२(उ)पत्र१३.मुळेमास्तर)- ओव्या २४.- मनाचे विश्लेषण -मनाचा जडभाग - वेणुनादश्रवण- लयचिंतन प्रक्रिया- विश्वरूप दाखविण्याची प्रतिज्ञा व साधना- वेदपठणाचा अधिकार- पुराणांचा अधिकार- थियॉसफीचे खंडन.

७६) वैराग्य व योग प्रक्रिया (य७पत्र१६.श्री.चिंतामणराव तांबे)- अभंग २३. वैराग्यावाचून समाधीचे बोल म्हणजे दारुड्याचे बडबडणे- अंतरी उदास हो- विश्वास अर्धवट नको- सांसारिकसुख देणारे मोठे नव्हेत- व्यर्थ चिंता- बंध व मोक्ष- म्हातारपणी विचार हेच औषध- काय करू नये?- देपैसे घेणरागावू नका- सोवळे ओवळे न पाहता नामस्मरण व योगप्रक्रिया- डोळ्याचे औषध- संसार दैवाधीन असो द्यावा.

७७) आत गुरुप्रेम, बाहेर आत्मदृष्टि (यष्टी१.ताईखोलकुटे १.) ओव्या ३२. उदासवृत्तीचा निषेध- आत गुरुप्रेम बाहेर आत्मरूप- सद्गुरु लक्षण- कैवल्याचा वर.

७८) योगमुद्रेची प्रक्रिया (यष्टी१.ताई खोलकुटे २.) गुरुलक्षण- आत्मप्राप्तीकरता बहु ग्रंथ वाचन नको- योगमुद्रा- चमत्कार निषेध- स्वप्नाची आठवण दिली.

७९) निर्गुण सोहं (यष्टी१.ताई खोलकुटे ३.)- ओव्या २३.श्रीगुरूचे निर्गुण स्वरूप- तूं निर्गुणाची अधिकारी - पंढरी यात्रेचे पुण्याप्रदान.

८०) श्रीगुरूंचे स्वरूप (यष्टी१.ताई खोलकुटे ४.)- गुरुप्रेम असावे पण शोक नको- गुरूचे स्वरूप- निर्गुणाचा उपदेश- अनधिकाऱ्याला सांगण्याचा निषेध.

८१) समाधीचा प्रत्यय (यष्टी१.ताई खोलकुटे ५.)- ओव्या १३. सर्वपुण्यप्रदान- प्रेम- नास्तिक-वृत्ति, बुद्धि व अहंकारनाश- समाधीचा प्रत्यय.

८२) ज्ञानोपदेश (यष्टी१.ताई खोलकुटे ६.)- श्रीगुरू व अवतार ब्रह्मसमुद्रातील तरंग- जीवत्वाचा त्याग- विघ्ननिवारण- समाधि- तीन कल्पना- जड चेतन विवेक- ईश्वर- पुनः पुनः अभ्यास- आश्वासन.

८३) अभयदान (यष्टी१.ताई खोलकुटे ७.)- ओव्या १२. सर्व कल्पनाच- 'नरकातूनहि उद्धरीन'- कर्म, भक्ति, ज्ञान, वैराग्य, प्रेम, आत्मानुभव- ज्ञानदृष्टीने स्वर्गनरक नाही- अभयदान.

८४) मलदोष निवारण (यष्टी१.ताई खोलकुटे ८.)- बुद्धीचे ३ दोष - दुष्ट विषयांचे आचरणाने पुढील जन्म- सत्कर्माने मलदोष निवृत्ति - गुणभेदाने मनुष्यांचे सहा प्रकार- प्रारब्धावर विसंबू नये.

विक्षेप दोषनिवारण- उपासनेचा अधिकारी- विक्षेपाची उपासनेने निवृत्ति- ईश्वरोपासनेचे १३ व गुरूपासनेचे १२ प्रकार- आपला अधिकार आपणच ठरवावा.

आवरण दोष निवारण- ईश्वरानुग्रहानेच गुरुप्राप्ति- देवापेक्षा गुरु श्रेष्ठ- निर्गुण उपासना- आवरण ज्ञानानेच नष्ट- तुझ्यापोटी जन्म घेई- चमत्कारनिषेध- महावाक्याचा अर्थ.

८५) ब्रह्मप्रयत्न मांडावा (यष्टी१.ताई खोलकुटे ९.) ओव्या १०. कर्माने अनुभवाचा रोध होत

नाही- ब्रह्मप्रयत्न मांडावा- लयविघ्न- महावाक्यसंप्रति- खरा साधु कोण?

८६) ब्रह्मस्थ होण्याचा मार्ग (यष्टी१.ताई खोलकुटे १०.)- अभंग १२. ब्रह्मनिष्ठेचा उपदेश- विवेक-वैराग्य-शमादिषटक-मुमुक्षेचे लक्षण- महावाक्यबोध- व्यतिरेक व अन्वयाचा अनुभव- सर्व वृत्ती ब्रह्मरूप- भक्ती ही योग/ज्ञानाचे विश्रांतिस्थान- वृत्तिसाक्षी व ब्रह्मस्थ हो- 'जन्मोजन्मी तुझा पुत्र होईन' -जीवन्मुक्तांचे जन्म लीलामात्र.

८७) योगातील ताटस्थ्य (यष्टी१.ताई खोलकुटे ११.) ओव्या २२. श्रीगुरुवचन- खेचरी मुद्रा- मिथ्या शरीराचे रक्षण व्यर्थ- योगाने वृत्तिताटस्थ्य.

बुवाबाजीचा दंभस्फोट

८८) बुवाबाजीचे स्वरूप (य७पत्र१०.मुळेमास्तर)- बुवाबाजी- ब्रह्मघोटाळ्यातून बाहेर पडण्याचा मार्ग- श्रीधरबोआ परांजपेंचे शिष्य- निष्ठेचे महत्व- पतिताला नव्हे पण त्याच्या वंशजांना सवलत- वैराग्यसंपन्नला कोणी फसवू शकत नाही- श्रीवासुदेवानंद सरस्वतीं संबंधी आदर.

८९) भोंदूगिरीचे २४ प्रकार (य७पत्र३१.मुळेमास्तर)- लबाडीतून सुटण्याचे चार मार्ग.

९०) भोंदूशी तुलना (य७पत्र३२.मुळेमास्तर)- वेश्या आणि भोंदू- कुत्रा आणि भोंदू- गाढव आणि भोंदू- कावळा आणि भोंदू- मास प्रॉडक्शन- मूर्ख भोंदू- शहाणे भोंदू- भोंदूची परस्पर भेट- भोंदूचा अनुग्रह आणि वर्गणी.

९१) मट्ठ शिष्य (य७पत्र३३.कृष्णराव मास्तर)- आत्मज्ञान सोपे वा कठीण नाही- तीन मानसिक क्रिया- युक्तीची अपेक्षा असणारा मट्ठ- बैलाची कथा- वेदात आज्ञा व सिद्धान्त अधिक- न्यायादिशास्त्रात युक्तिवाद अधिक- अनुमानातील दोष- निर्विकारी श्रद्धा उडवूं नये- जैन, म्लेच्छ व वैदिक यांचे कर्मवाद.

९२) फसविणारे साधू व लोक (य७पत्र१७.श्री.तांबे)- परमार्थात फसण्याची शंका नको- 'माझेकडून फसण्याची शंका असल्यास १०-२० वर्षे वाट पहावी'- कैवल्यावाचून सत्त्वगुण वाढल्यास असात्विक गुण येतात- शास्त्र प्रमाणप्रविण तर गुरु प्रक्रियाप्रविण- धर्मप्रेमाची गुरु आज्ञेने व्यवस्था.

९३) भोंदूचे आत्मसमर्थन (य७पत्र१५.श्री.तांबे)- परांजपे बोवांचे आत्मसमर्थन- धर्म दूषित न करता साधूंनी स्वतःचा अपमान करविणे : अमृतपानयोग- नवे योगी.

९४) परमार्थातील फसवणुक आणि नीति (य७पत्र२८.विठ्ठलराव केकरे)- संशयी विद्वानापेक्षा भोळा श्रेष्ठ- फसविणे हे सामान्य- न फसण्याचा उपाय- पाश्चात्य व भारतीय नीतींची तुलना- ईश्वरही नीतीचा पुतळा नाही— नीतीचा अभ्यास कसा करावा?

९५) वेदान्ताचे विडंबन : नीच गुरुवर्ग (य७पत्र२०.श्री.हरिदास)- साधारण लोकांचा वेदान्त : (१) मनोरंजन (२) पोटभरणे (३) यथेष्टाचरण (४) जाती मोडणे (५) समाजाचे भौतिक कल्याण (६) इंग्रजी ग्रंथाचा वेदान्ताशी मेळ जसे :- १.जगदीशचंद्र बोस २.आयोनिक थियरी म्हणजे ब्रह्म ३. स्पेन्सरचे ज्ञेय म्हणजे सत् ४.दृष्टिसृष्टिवाद म्हणजे आयडियालिझम्; वगैरे भलतेच अर्थ वेदान्तात घुसडून देणे- भोंदूगिरी- कर्मफलाविषयी आक्षेप- आत्मज्ञानी गुरुच श्रेष्ठ- चमत्कारांची थट्टा- धर्माचे लक्ष्य- आचारधर्मातील विकल्प- न्यायातून भौतिक शोध.

९६) दोषदृष्टि व साधुपरीक्षेचे १२ प्रश्न (य१२पत्र२४.श्री.तांबे)- वेदान्ताचे शिक्षण- १.वैय्यक्तिक दोषदृष्टि- २.सामाजिक दोषदृष्टि- ३.शास्त्रीय दोषदृष्टि- ढोंगीसाधू- साधुपरीक्षेचे १२ प्रश्न - लुच्या साधूंना ४ प्रश्न - पढिक साधूंना व अर्धवट योग्यांना प्रश्न.

९७) प्रश्नकदंब १. ओव्या १००. प्रश्न१९ (य७पत्र२४ श्री.मुळे, श्री.हरिदास) वेदान्ताचोरीचे

मासले.

९८) प्रश्नकदंब २. ओव्या ३४. प्रश्न ११.आभासवाद- जगाचे स्वरूप- लययोग- आत्माकारदशा- मृत्यूसमयीचा लय व आत्मज्ञान संबंधीचे प्रश्न.

९९) प्रश्नकदंब३. ओव्या ५०. प्रश्न १७. सृष्टीची उत्पत्ती- दृष्टिसृष्टिवाद- मायावाद- बिंबप्रतिबिंबवाद- आभासवाद- अवच्छेदवाद- अहंग्रहोपासना- भक्ति- ज्ञान- इ.संबंधी प्रश्न.

१००) प्रश्नकदंब ४. ओव्या ४०. प्रश्न १०. विश्वरूप- प्रलय- आत्माकारदशा- लययोग व भक्तियोग विषयक प्रश्न.

धर्म सुधारकांचा समाचार

१०१) आधुनिक धर्मसुधारक (य१२पत्र२१. श्री.हरिदास)- समाजकार्याचे तत्त्व- आधुनिक धार्मिकांची धर्मावर कुऱ्हाड- माझ्यातील विशेष- देशहितपटूंच्या चुका - स्वामी विवेकानंद- वर्णसंशयवादाचा अभिप्राय- परलोकोपयोगी- स्वामी रामतीर्थ- आपद्धर्म व संपद्धर्म- सुधारकांचे स्वरूप- चमत्कार- माझे धर्मकार्य- महाराजांना साह्य कसे कारावे?

१०२) धर्म जीवनिर्मित की ईश्वरनिर्मित? (य१२पत्र२९. शिवगंगामठाचेशंकराचार्य) धर्मात बदल करावा काय?- धर्माचे स्वरूप- विकारहित धर्मपालन- महात्म्यांचे विकार- यशोधनराजा- जगदुद्धार- सोईचा क्षेपकवाद- जगन्नाथपुरीचे शंकराचार्य- महाराजांचा वेदोच्चार.

१०३) धर्मसुधारकांचा समाचार (य७पत्र३७.श्री.तोंडे)- धर्माचा अभ्यास- धर्मसुधारक नवा पंथ काढतात किंवा धर्माला इहसुखाकडे झुकवितात उदा.थियॉसफी, विवेकानंद, अरविंद घोष, वगैरे- कबीरनानकादी पंथांचेश्रेष्ठत्व अदृष्टजनक सामुग्रीत आहे- सामान्यनीतीला अनुसरून सुधारकांची धर्मावर टीका- साधकावाचून महापुरुषांना नीतिदृष्टीने पाहणे हिंदुधर्माला संमत नाही यांची उदाहरणे- ब्राह्मणब्राह्मणेतर वादाला विवेकानंदांची पुष्टी- विवेकांनदांच्या वेदांतसंबंधी उत्क्रांतिमताचे खंडण- विश्वास कोणावर ठेवावा? चमत्कारावर? बुद्धीवर? की धर्मानुसार उपदेश करणाऱ्यावर?

१०४) पंचविध वेदान्ती (य७पत्र३४.श्री.नारायणराव केकरे)- वेदान्त शिकताना सदाचार आवश्यक- नवीन वेदान्तः- 'सर्व भरतखंड म्हणजे मी'- 'अत्याधिक पुण्याने वेदान्त मिळतो' या मतातील दोष- जैनमतविवरण- ''संगूढसर्वातिशयाक्रान्त अवतारशरीर'' हे नवे मत- मी सामान्य आहे म्हणून मुक्त या मतातील दोष- मर्कटी वेदान्त- कोणाकडून शिकू नये?

१०५) वेदान्ताचे शिक्षण (य२(उ)पत्र८.श्री.हरिदास)- वेदान्ताचे शिक्षण- शिक्षण म्हणजे सुसंस्कारांचे दान- पांडुरंग व गोपाळाची गोष्ट- गुरुशिष्यांची गोष्ट.

१०६) वेदांविषयीचे आक्षेप (य७पत्र२१.श्री.हरिदास)- जीव आणि ईश्वर- वेदविषयी आक्षेपांना उत्तर.

१०७) मनाचे निरीक्षण (य२(उ)पत्र१०.मुळेमास्तर)- 'ऑलनोक'- चित्ताची व्यापकता व दुर्जयत्व-साधनांचे वैय्यर्थ्य- तृप्तीच्या ३ कक्षा व लक्षणे - लोकालोक, शरीरे, आत्मा, इत्यादि पदार्थ- क्रिया व फल- अध्यात्माविषयी संसारी उदासीन.

१०८) सत्पुरुषांविषयी संशय (य२(उ)पत्र११.मुळेमास्तर)- सत्पुरुषांच्या सर्वशक्तिमत्वाविषयी सर्वांचा निश्चय नसतो- श्रीतुकारामांचे उदाहरण- लोकस्वभाव- अंधविश्वासावर टीका- अंधपरंपरा- नाथसंप्रदायानुसार सनत्कुमारादि१७ गुरूंनी सांगितलेला भक्तिविचार.

१०९) शास्त्रज्ञान व अनुभव बरोबीने (य२(उ)पत्र१२.मुळेमास्तर)- आत्मप्राप्तीला श्रोत्रियत्व

आणि ब्रह्मनिष्ठा दोन्ही आवश्यक- शास्त्रांवर अलंबुद्धि केव्हा व कशी?- सर्वभाषा प्राकृतच आहेत- भाषाज्ञान- इंग्रजी कां नको?

११०) लोकवृत्तिनिरीक्षण (य२(उ)पत्र१५.मो.गो.देशमुख)- अपूर्व कोटिक्रम- ज्ञानेश्वर स्तवनाच्या ९ ओव्या.

१११) युक्तीने आत्म्याची सिद्धि(य२(उ)पत्र१८.श्री.शांताराम अजनासवाले)- गुरुमुख द्वारा शास्त्रश्रवणाने आत्मज्ञान करून घ्यावे.

११२) अनेक धर्मांची उत्पत्ति व प्रकार (य७पत्र२६.श्री.बक्षी)- कर्मशरण्य व ईश्वरशरण्य धर्म- आगमिक व कल्पित धर्म- अनेक धर्मांची व पंथांची उत्पत्ति- आर्यधर्माचा इतरांशी भेद- दृष्टिसृष्टिवादानुसार कर्मवादाची संगती- वाममार्ग- परांजपे बोवांचे शिष्य- जन्मजातिवाद महत्त्वाचा- धर्मात पहिली निष्ठा महत्वाची - धर्म बदलणारा नित्य भिकारी- जैनधर्म कर्मशरण्य व आर्यधर्म ईश्वरशरण्य.

११३) भागवतावरील आक्षेपांचा समाचार (य७पत्र१२. श्री.पावनस्कर)- भागवताची समाधिभाषा- ईश्वर व जीवातील भेद- आक्षेपांचा समाचार.

११४) कर्माचे फल व मंत्रशास्त्र (य१२पत्र१४.श्री.भट वकील)- कर्माचा नियम व तीन प्रमाणे- चित्तशुद्धिकारक कर्म : यमनियम- मंत्राचे न्यासांचा अर्थ- ध्यान कसे करावे?- केशवादि नावांचा अर्थ- प्रारब्धाचा नाश- जपाने रोग नाश- आर्य वैद्यकशास्त्र- सद्‌गुरूची भेट.

११५) पापपुण्य व प्रयत्नावाद (य१५पत्र१.भाऊसाहेब खापरे)- आत्महत्येचा निषेध- यमनियमांचे बीज- महाराजांच्या वर्तनातील सूत्र- मानसिक दुर्बलता- सर्वच चार्वाक- ह्यूमच्या तत्त्वज्ञानाची चीरफाड- आस्तिकांचा दैवाद व नास्तिकांचा फेटॅलिझम्- नास्तिकांचा फ्रीझम- बायबल खंडन- अत्यंत स्वातंत्र्य व अत्यंत पारतंत्र्यवादाचे खंडन- दैवयत्नवाद- पत्र शंभरवेळा वाचावे.

११६) गोरक्षण : धार्मिक व वैद्यक दृष्टी- (य१२पत्र४३.३वचनबळाने परमेश्वर व्यक्त होतोच हा वैदिक सिद्धान्त- वैदिक धर्म निःपक्षपाती- गोरक्षणाला मुसलमान धर्माचाही विरोध नाही- गोमांसभक्षणाने रोगोत्पत्ति- क्षय, संग्रहणी इ. अनेक रोगावंर पंचगव्य- धर्मतः अर्थतः व कामतः गोरक्षणाची जरूरी- ''ब्राह्मणांतील धर्म जाईल पण गायीतील धर्म कधीच जाणार नाही.''

११७) साबर आणि नैगम मंत्र (य१२पत्र१६.श्री.बडबडे) मंत्रांचे प्रकार व त्यांची माहिती- महानुभावांचे वैदिकत्व- दोन कृष्णांची उपपत्ती.

११८) इंग्रजी भाषा वैकृत (य७पत्र१३.श्री.वाळिंबे)- ''इंग्रजी मंत्ररहित म्हणून तीतून तत्त्वज्ञान शिकू नये''- केवळ शब्दार्थाने ब्रह्मज्ञान होत नाही व प्रतिबंध दूर होत नाही- उचित श्रवणाने नियमादृष्ट- मंत्रशास्त्रानुसार इंग्रजी वैकृत- प्राणायामात वैकृत शब्दोच्चार- मानसिक रोग नामाने जातात.

११९) भूतयोनी (य१२पत्र१३.श्री.तांबे)- भूते आहेत की नाहीत?- भूतोन्माद- भूत लागण्याचे कारण- भूतांची वेळ- भूत कसे लागते?- भूत लागल्याची खूण

१२०) श्रीकुर्याभाईना पत्र- (य१८पत्र१)

***

This document was created with Win2PDF available at http://www.win2pdf.com.
The unregistered version of Win2PDF is for evaluation or non-commercial use only.
This page will not be added after purchasing Win2PDF.